मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/संदर्भ

म अ १३३
१

मा ३०
१
उर्मिला ८४

ठाणे.

सदर पुस्तकाचा नाम निर्देश
दाते सूचीत मिळत नाही.

०१२५६८

# कन्यागत गुरु चरित्र!

अर्थात्

## कन्या विवाह पुण्योदय!

---

धुंडि राज नामें कोणी एक जहागिरदार गृहस्थ प्रातःकालीं स्नान, संध्या अग्नि होत्रादि नित्य विधि आटोपून लोडाशीं टेंकून अन्य ग्रामस्थ एक दोन पाहुण्या बरोबर बोलत असतां शेजारच्या गांवचा मुरार राव नामें एक श्रीमान सावकार एका भटजीस बरोबर घेऊन आला त्यास पाहून —

धुं०—— या, मुरार राव, आज कोणी कडे मध्येंच आपलें येणें जहालें? आपल्या कडील क्षेम समाचार बरा आहे ना?

मुरार०—— ईश्वर कृपेनें आज दिन खुशाल आहों; पुढें त्याची मर्जी.

धुं०—— बरें, यंदा पाऊस पाणी पीक कसें आहे आपल्या तिकडे?

मुरार०—— सर्व यथास्थीत आहे. ह्मणण्या सारखी कांहीं कुरकुर नाहीं. लोक अबादानींत आहेत. व यंदा कन्यागत आलें आहे; तेव्हां यांत मुलींची लग्नें करण्यास लोकांला फारसें कठीण पडणार नाहीं.

धुं०—— मी समजलों नाहीं बरोबर कन्यागत काय तें तुमचें.

मुरार०—— भटजी सांगा यंदा मुलींच्या लग्नांत काय पुण्य आहे तें.

भट—— यंदा कन्यागताचा योग आलेला आहे; या योगांत कन्या दान केल्यानें पृथ्वी दानाचें पुण्य आहे. तेव्हां आमच्या यजमानांनीं, दोन कन्या आहेत त्या सालंकार दान करण्याचा निश्चय केला आहे.

धुं०—भटजी! तुमचें कन्यागत व पुण्य एकीकडे ठेवा. पण मी विचारितों कीं कन्या ही कशी दान होऊं शकेल? दान म्हणजे काय?

भट—आपली कन्या दुसऱ्यास भार्या करून देणें याचें नांव कन्या दान.

धुं०—काय आश्चर्याची व निंद्य पाजीपणाची गोष्ट कीं एखाद्या वस्तु प्रमाणें मनुष्यास मनुष्य अर्थात् मुलास मुलगी देणें ही! हर हर! ही शुद्ध गुलामगिरी कीं हो!

भट—कन्यादान ही कशी गुलामगिरी सांगा बघूं?

धुं०—ज्याला चैतन्य व बुद्धि स्वातंत्र्य नाहीं असा एखादा पदार्थ एखाद्यास देणें हें दान ठीकच! ह्मणजे पहा तेल किंवा जूतें एखाद्या भिक्षुकाला दान केलें अर्थात दिलें तर तें तेल किंवा तें जूतें "तो भिक्षुक वाईट, मला नाहीं तो आवडत, मी त्या दुष्टाशीं नाहीं रहाणार" अशा सबबीनें त्या भिक्षुकापासून आपण च होऊन पळून जाऊं शकणार नाहीं; तें तेथल्या तेथें च राहणार. कारण कीं त्यास चैतन्य व बुद्धि स्वातंत्र्य नाहीं. तात्पर्य चैतन्य व बुद्धि स्वातंत्र्यरहित पदार्थ दानास अर्थात दुसऱ्यास देण्यास योग्य होत. परंतु असा हा दानाचा प्रकार चैतन्य व बुद्धि स्वातंत्र्य युक्त मानवी प्राण्यांला लागू पडणार नाहीं. कारण समजलें भटजी काय तें? सांगा बघूं?

भट—आलें माझ्या लक्ष्यांत, मनुष्याला चैतन्य व बुद्धि स्वातंत्र्य आहे: त्या बुद्धि स्वातंत्र्याच्या योगानें तो मानव जुलुमानें दुसऱ्याच्या कबज्यांत गेल्यास आपण होऊन आपली

सुटका करूं शकतो. ह्मणजे एखाद्यानें मुलगा किंवा मुलगी एखाद्या माणसाला दिली तर त्या माणसापासून त्या मुलास किंवा मुलीस कोणत्याही कारणानें निघून जातां येईल; तेव्हां मुलाला मुलगी दान ह्मणजे देणें असें ह्मणणें गैर दिसतें खरें व अशा देण्यास गुलामगिरीची उपमा साजते तर खरी.

मुरार०—कन्यादान हें गुलामगिरी प्रमाणें वाईट, तर मग "मृदंगना दाने" असा कन्यादान शब्द मोरो पंतानें कवितेंत कसा योजला?

धुं०—विश्वास घात, मातृ गमन, गुरु तल्पक अशा शद्वांची प्रवृत्ति आहे व कविजन घडलेल्या किंवा चालू वऱ्या वाईट रीतीस अनुसरून त्यांचा दृष्टांतही देतात, ह्मणून तसा व्यवहार चालू ठेवणें योग्य होईल काय? नाहीं ना? तर तद्वतच कन्यादान शद्वाची प्रवृत्ति समजा. व उमजून शहाणे व्हा.

पाहुणा—काय हो भटजी! तुमचें कन्यागत तें काय वरें?

भट—गुरु कन्या राशीवर आला म्हणजे कन्यागत म्हणतात.

पा०—गुरु म्हणजे पंतोजी तो कोणाचा? व कन्या कोणाची? व रास कशाची? "गुरु, कन्या व रास" हें त्रिकूट आहे तरी काय?

धुं०—तें त्रिकूट या जगांतलें नव्हे. त्याचा आकाशांत संबंध आहे.

भट—होय. आकाशांत सूर्यादि ग्रह आहेत; पैकीं एकाचें नांव गुरु व मेषादि राशी आहेत; पैकीं एकीचें नांव कन्या. यांचा संबंध आमच्या जमीनीवरील मुलांशीं कसा लागत असेल तो असो. मुलींच्या लग्न करणाऱ्या बापास पुण्य आहे असें लोक ह्मणतात म्हणून आम्ही म्हणतों:- -

पा०—हें काय तुमचें ह्मणणें! समजलों; अहो भटजी! आकाशांत लहान लहान ताऱ्यांचे लहान मोठे पुंज्ये ह्मणजे राशी बारा आहेत त्यांला त्यांच्या आकृति प्रमाणें मेषादि नांवें दिलीं आहेत. या राशि अशा रीतीनें स्थापिलेल्या आहेत कीं सर्वांनीं ती व्यापिलेली जागा चक्राकार (गाडीच्या चाका-प्रमाणें) दिसते ह्मणून त्यास राशिचक्र ह्मणतात. आतां गुरु, शुक्रादि जे ग्रह आहेत, ते ईश्वर नियमा प्रमाणें फिरत असतां मदहू ताऱ्यांच्या राशि जवळ नियमानें आगें मागें येत असतात. गुरु नामें ग्रहास सूर्याच्या भोंवतीं एक फेरी करावयास अर्थात एकेक राशीवर जाण्यास एकेक वर्ष मिळून सर्व राशि-चक्र फिरण्यास बारा वर्षें लागतात. त्या मानानें तो "गुरु ग्रह" 'कन्या राशि' जवळ वस्तुतः बारा वर्षांनीं एकदा येतो. आतां त्याच्या तेथें येण्यानें आमच्या भूगोला वरील पोरींच्याच बापांच्या बऱ्या वाईटाचा संभव कसा होऊं शकेल? अहो! आह्मी दर वर्षीं दिपवाळीस बारा महिन्यांनीं उत्तर हिंदुस्थानांतून येथें दक्षिण हिंदुस्थानांत या राव साहेबांच्या भेटीस येण्याचा आमचा नियमीत क्रम आहे; त्या प्रमाणें आह्मी बारा महिन्यांनीं येथें आलों तर, आमचें नांव केवल "कानडा" आहे ह्मणून आमच्या येथें येण्यानें अमेरिकेंतील "कानडा" लोकांना शुभाशुभ होईल काय? किती ही विलक्षण कोटी! गुरु ह्मणजे मोठा जड अशा नांवाचा ग्रह 'आकाशांतल्या आका-'

शांतच "कन्याकांति" ताऱ्यांच्या पुंज्या सन्निध बारा वर्षांनीं एकदांचा येतो, तो आमच्या भू लोकांतील हिंदुस्थानच्या तुह्मां फक्त दक्षणी लोकांच्या "कन्याच्याच" (मुलींच्या) बापांच्या पुण्या साठीं येतो! आमच्या गुजराथ, कच्छ, काठेवाड, आग्रा, अयोध्या, पंजाब वगैरे उत्तर हिंदुस्थान प्रांतीं नाहीं हें ढोंग.

पा०—कन्याराशीवर गुरु येतो तेव्हां कन्यांचीं लग्नें जशीं लावतात तद्वत् मेष (मेंढा) वृषभ (बैल) सिंह, वृश्चिक (विंचू) मीन (मासा) कर्क (खेंकडा) मकर (सुसर) अशा राशींवर गुरु येतो तेव्हां मेंढ्याबैलांचीं वगैरे लग्नें हे भट लावित असतील तर मग!

धुं०—तुह्मांला संशय वाटतो? वेडगळ राजेरजवाडे व श्रीमान लोकांचीं मनें वळवून द्रव्य प्राप्त्यर्थ हे भटोबा मेंढ्या बैलांचीं लग्नें लावतातच. आतां भयंकर हिंसक पशु जो सिंह त्याची प्राप्ती होणें अशक्य असल्यामुळें त्या ऐवजीं ग्रामसिंह जो कुत्रा त्याचीं लग्नें लावून स्वार्थ साधतात. व तद्वत् विंचू, मासे, तुल (तागडी) खेंकडा, सुसर, कुंभ (मडकें) अशा राशि विधायक पदार्थांचीं लग्नें असावयाचींच. तुळस व रुई झाडांचीं लग्नें तर प्रसिद्ध आहेतच.

धुं०—चार सहा महिन्यावर सिंहस्थाचे (गुरु ग्रह सिंह राशी जवळ आल्याचे) सबबीनें गोदा नदी किनाऱ्या वरील नासिकस्थ लुटारू भटांनीं अंध परंपरेचें ढोंग माजवून सरसकट भोळ्या गरीब श्रीमान लोकांपासून कोट्यावधी द्रव्य हरण केलें. नासिकास सिंहस्थीं जसें गोदा नदी महात्म्य, तसें वांई, माहुली, नरसोबाची वाडी, भिल्लवडी, धोम, कऱ्हाड, सांगली प्रांतीं कन्यागतीं "कृष्णा नदी महात्म्य" लुटारू भटांनीं घडविलें आहे.

पा०—अहो भटजी तुह्मी कोणत्या प्रांतींचे रहाणारे?

भट—आमचा माहुली प्रान्त; कृष्णा किनारींच आहे.

धुं०—सिंहगत गुरु असतां नासिकास येऊन तेथील गोदानदीं-स्नान; किनारीं-श्राद्ध दान दक्षणा; व सान्निध-ब्राम्हण भोजन; हीं केलीं असतां जन्म जन्मान्तरींचें पाप नष्ट होतें व मृत पितर १२ वर्षें तृप्त होतात; जगांतील जीं ३॥ कोटी तीर्थें आहेत तितकीं गुरु सिंहगत असतां गोदा नदी स्नानार्थ येतात. तेथें १ वर्ष रहातात, त्यावेळीं तेथील स्नान मात्रें स्वर्ग सुख भोगून मुक्ति मिळते,-जल पानें करून १०० जन्मींचें पाप तत्क्षणींच नष्ट होतें. एका स्नानानें कोटी जन्माचें पाप नष्ट होतें. ६० हजार वर्षें पर्यंत भागीरथीचें स्नान केल्यापासून जें पुण्य होतें तें गोदेचें एक वार स्नान केल्यानें मिळतें या प्रमाणें पुण्याचा व स्वर्ग प्राप्तीचा सुकाळ स्वोदर पूर्त्यर्थ लुटारू भटांनीं दर्शवून भोळ्या सधवा विधवा बायका व त्यांचे पिता, भर्ता, भाऊबंद वगैरे भोळे वेडगळ आप्त यांची मनें फांस्यांत घातलीं व आपला लुटालुटीचा मार्ग जसा उभारला तद्वत् तुह्मी कृष्णा तीरीं तुमची माहुली आहे-तेथें मुलींच्या आई माउल्यानीं येऊन मुलींचीं लग्नें केल्यानें माउली म्हणा, कृष्णा म्हणा – अशी देवी संतुष्ट होऊन अखंड सौभाग्य, स्वर्ग व मुक्ति देते- अशा अर्थाचें एखादें माउली महात्म्य घडवा ह्मणजे त्या नासिककरांप्रमाणें तुमचीहि चांदी पिकेल.

भट—आह्मांला नाहीं एवढें संस्कृत प्राकृत ज्ञान.

पा०—तर मग बघा कोणी एखादा शीघ्रबोध ग्रंथ कर्त्या कऱ्हाड्या काशिनाथोपाध्या सारखा. कीं ज्याणें "अष्टवर्षा भवेद्गौरी" हें वाक्य घडवून अर्भकांवर जुलूम चालविला व आपला लौकर लौकर द्रव्य प्राप्ति होण्याचा मार्ग उभा केला.

भट—कन्यागत ज्योतिषांत आहे. ज्योतिष खोटें तर ग्रहण कसें खरें होतें?

पा०—ज्या ज्योतिष शास्त्र गणित विद्येवरून ग्रहणाचा दिवस अमुक असा काढतां येतो त्या ज्योतिष गणित विद्येंत "आकाशांतील" अमूक ग्रह अमूक वेळीं अमूक ठिकाणीं असला तर या "पृथ्वीवरील" अमूक एक जातीच्या बायकांस किंवा पुरुषांस अथवा एखादा बैल, रेडा, गाढव, डुकर, सर्प, कावळा, गिधाड अशा पशु पक्षादिकांस अथवा वनस्पतीस शुभाशुभ फळ होतें या विषयींचा उल्लेख अगदीं नाहीं. या करितां ग्रहण दिवस काढण्याच्या ज्योतिष गणित विद्येस या भुगोला वरील लोकांच्या शुभाशुभ फलाचा संबंध जडवूं पहाणें हें पतिव्रते मातेस जारिणी समजण्या सारखें होय.

धुं०—वैदिक ज्योतिष ग्रंथांत फलज्योतिष मुळींच नाहीं. हें अली कडील आहे. सूर्य, गुरु, शुक्रादि ग्रहाची हाल चाल अमुक वेळांत अमुक होते व त्या मानानें अमुक वेळीं अमुक ठिकाणीं त्यांचें स्थान असतें असें फक्त ज्योतिष गणित विद्ये वरून समजतें. तर अशा ज्योतिष गणित विद्ये वरून काढलेलीं ग्रहांचीं स्थानें घेऊन त्या संबंधानें या भूलोकांतील मानवी कृत्यास शुभाशुभ फळ (शकुनापशकुना प्रमाणें) जोडून पोटभऱ्या अनार्यांनीं नवे स्वार्थी ग्रंथ बनविले व त्यांस फलज्योतिष नांव पाडलें. या फलज्योतिषाचा मूळ उगम आर्बस्थानांतील साबा प्रांतस्थ साबियन लोकांपासून आहे. प्रथमतः हेच लोक आकाशांतील ग्रह नक्षत्र भक्त असून त्यांजवर आपलें शुभाशुभ समजत. पुढें हें त्यांचें फलज्योतिषाचें वेड प्रथमतः आर्बस्थानाच्या पश्चिम किनाऱ्या वरून जे अनार्य लोक येऊन आर्य धर्म थोडासा आचरून-

ग्वाहागरीं ब्राह्मण बनले त्यांणीं आणलेलें आहे. पूर्वीचें आर्य लोकांचें "तिथि, वार आणि नक्षत्र" अशा तीन नावांचें मात्र "त्र्यांग" होय; त्यास सांप्रत 'करण व योग' जोडून "पंचांग" बनाविलें. व अजून किती आंग होईल नकळे. तात्पर्य ज्या ज्या ग्रंथांत सूर्य, चंद्र, मंगल, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहु अशा ग्रहांच्या स्थानांस फल जोडलें आहे ते ते ग्रंथ ज्योतिष गणित शास्त्र बाह्य–खोटे मतलबी होत, हें पक्कें लक्षांत ठेवा. आणि उमजून शुद्धीवर या व शाहाणे व्हा.

धुं०—कन्यागताच्या संबंधानें अर्भक पोरींचीं (नावांचीं मात्र) लग्नें होतात तीं भट ह्मणविणारे जातींतच विशेष. व त्यांचा हा कित्ता इतर जात हि घेते. या भटांनीं आपल्या पोरांबाळांची लग्नें मोफत व्हावीं व शिवाय पैसेहि मिळावे म्हणून "भटाच्या पोरापोरींचीं लग्नें विशेषत: कन्यागत गुरु असतां कोणी धर्मार्थ केल्यास कोटी यज्ञाचें व पृथ्वी दानाचें पुण्य लग्न कर्त्यास मिळतें" अशी कंडी–द्वाही फिरवून भोळ्या पैसे वाल्यांचीं मनें मोहित केलेलीं आहेत. गेल्या कन्यागतांत अशाच लुटारू भटांच्या सांगण्यावरून सिंद्यानें ३६० पोरापोरींचीं लग्नें गरीब म्हणून प्रत्येक नवऱ्यास २०० रु० व नवरीस १०० रुपये खर्चून केलीं. यंदाहि अशींच शेंकडो लग्नें लावून देण्यास कांहीं भोळे लोक सोलापूर मद्रास वगैरे प्रान्तीं तयार झाले आहेत असें समजतें. या अशा भोळ्यांस ठकवून आपला स्वार्थ भट साधतात; परंतु त्या अर्भक पोरी, प्रतिसंबंध न जडतां अखंड वैधव्य दुःख प्रसंगांत पडून असन्त कष्ट भोगतात, व प्रसंगीं त्यांस बाल हत्या, भ्रूण हत्या, आत्म हत्या, द्रव्य नाश, वेश्या धंदा अशीं नीच क्रूर कृत्यें करण्याचें भाग पडतें याचा मुर्खास स्वार्थी पुढें विचार नाहीं–विचार शून्य पशूच केवळ!

पा०—भटाचीं वगैरे पोरें बाळें "गरीब—निराधार" अशा कारणानें त्यांचीं ( नावांचीं मात्र ) लग्नें आपला पदरचा पैसा खर्चून श्रीमन्त करितात. पण तो अर्भक नवरा जाणता (सज्ञान) होऊन पैसे मिळवी पर्यंत किंवा तो नवरा जिनगी मिळाविण्या पूर्वी मेला अथवा मूर्ख, आळशी, निरुद्योगी, छंदी होऊन अन्नास महाग झाला तर आमरणान्त त्याच्या त्या निराश्रित अर्भक बायकोचें पाळण पोषण करण्याची जबाबदारी आपल्यावर पडते कीं नाहीं याचा विचार त्या भोळ्या वेडगळ लग्न कर्त्यांस आहे काय? अशा अर्भकांस जे जे हाल व कष्ट भोगावे लागतात व त्यांची जी दुर्दशा होते त्या सर्वांस कारणभूत असे लग्न कर्ते भोळे श्रीमान होत व त्याजबद्दल त्यांस प्रायश्चित्त भोगावें लागणारच.

मुरार—अहो भटजी! राहुं द्या तें कन्यागत व ज्योतिष एकीकडे. खोटें कर खोटें. आम्हाला नको तें. आमचें मुख्य बोलणें आहे तें चालुं द्या आतां.

भट—( धुंडिराजास ) यजमानाची कन्या आहे. ती त्यांच्या मनांतून आपली सून व्हावी असें आहे. तिला ५ वें वर्ष संपून ६ वें लागलें आहे.

पा०—एवढ्या अर्भकाचें लग्न करणार? लग्ना योग्य होण्यास अजून तिला निदान तितकींच ह्मणजे ७।८ वर्षें तरी पाहिजेत.

भट—एवढी मोठी मुलगी होई पर्यंत लग्नाची ठेवूं नये. ८।१० वर्षांचे आंतच लग्न करावें असें शास्त्र आहे. कन्यागताच्या पुण्याचा लाभ घेण्या साठीं तर वर्षाच्या मुलीचेंहि लग्न करतात व आमची मुलगी तर ७ वर्षाची मोठी आहे.

पा०— अहो तुमचें शास्त्र कोणतें तें अमळ एकीकडे ठेवा. पण मी प्रथम तुह्मास विचारतों कीं लग्न करतात तें कशा साठीं बरें?

भट—प्रजोत्पादन लालनादि प्रापंचिक व पारमार्थिक व्यवहारार्थ.

पा०—बरें; तर मग, तुमच्या नेहमीच्या ८।१० वर्षांच्या व कन्यागतांतल्या—एक वर्षा पर्यंतच्या उमरीच्या " वधू मुली " प्रजोत्पादनास योग्य होऊं शकतील काय?

भट—नाहीं हें उघडच आहे; तें सांगायांला नकोच.

पा०—लहान मुलें बाहुल्यांचीं लग्नें लावतात—तशीं हीं अर्भकांचीं लग्नें!

धं०—बाहुल्यांचीं लग्नें बरीं; कारण त्या पासून त्यांचें परस्पर नातें न जडतां नफा नुकसान; सुख दुःख कोणास कांहीं होत नसतें. परंतु अर्भकांच्या लग्ना पासून दुर्दशा होते ती ऐकवत नाहीं. एक वर्षाची म्हणा किंवा ४।५, ७।८ वर्षांची म्हणा—अशा अर्भकांचें लग्न म्हणून तिच्या माता पितादिकांनीं एकदां लावलें म्हणजे आमरणान्त ती त्या नवऱ्याशीं बांधली जाते. वास्तवीक लग्न ( लग्-जोडणें ) म्हटलें म्हणजे नवऱ्यानवरीच्या गांठी-शरीर संबंध; तर आतां ४।२ वर्षांच्या लग्न झालेल्या अर्भकास पुढें नवऱ्याच्या खऱ्या गांठी पडे पर्यंत निरर्थक गुंतवून टाकणें यांत काय स्वार्थ! एवढ्या १२।१४ वर्षांच्या लांब मुदती पर्यंत नवरा जीवन्त राहिला तर पुढें केव्हां गांठी पडणार! परंतु विपरीत गोष्ट घडली तर मग त्या लहान अर्भकास, मानीव नवऱ्याचा कांहीं संबंध न जडतां त्याच्या नांवानें अखंड दुःख भोगण्यास दुष्ट लोक लावितात हा बिचाऱ्या पोरीं वर फारच जुलूम होय. अशा अर्भक पोरींस ना धड अन्न वस्त्र, ना अलंकार, ना विषयसुख, ना केश सौंदर्य ना कोठें बाहेर जाणें; कोठें गेली, नजरेस पडली, तर अवदसा, कुलघ्ना, कारटी अशा भाषणांनीं निर्भत्सना होते. हर हर! ईश्वर केव्हां या अर्भकांवर दया करील व दुष्ट प्रवर्तक भट व आप्त वडील यांस शासन करील तो सुदिन.

धुं०—या कन्यागतांत भोळे पैसे वाले लोक पुण्याच्या आशेनें शेकडो रुपये खर्चून परक्या अर्भक पोरींचाहि बळी देत असतात. सोलापुरांत एक पैसेवाला भोळा गृहस्थ अशा १०८ अर्भक पोरींचीं लग्नें आपल्या खर्चानें सांप्रत करणार असें समजतें. त्या प्रमाणें मद्रासेसहि ४।५ भोळे असामी तयार झाले आहेत, अशा ह्या अर्भकांच्या शेंकडों लग्नांनीं पुण्यप्राप्त होणें एकीकडेसच पण कर्मधर्म संयोगानें त्यांचे अर्भक नवरे अकालीं मेले मग मात्र त्या अर्भक दीन पोरींवर कोसळलेलें आमरणान्त अत्यन्त दुःसह वैधव्य ( सांप्रत २५।३० लाख अर्भकें वैधव्य ग्रस्त आहेतच ) अशा लग्न कर्त्यांस अधोगतीस नेणार.

पा०—भटजी! या भोळ्या यजमानांस कन्यागताचे वगैरे संबंध लावून त्यांजकडून अशा अर्भक मुलींच्या गांठी बांधवितां यांत तुम्हांस काय फायदा?

धुं०—फायदा असा आणि तसा! एखादा भोळसर पैसेवाला मिळाला म्हणजे ४।२ शें रुपयांस मारला हात! साधारण असामी पासून तर ५।५० रुपये ठेविले आहेतच. नारळ, तांदूळ, वस्त्र, व दुसरे पदार्थ यांची तर तोडच नाहीं; आतां अशी ही प्राप्ती जेवढी लवकर लग्नें होतील तेवढी तेवढी लवकर होते म्हणून हे भटोबा "कन्यागत, अष्ट वर्षा भवेद्गौरी" अशी कांहीं तरी बटवट करून आपला कार्य भाग साधतात. नवरानवरींचें कांहींका होईना आपला तळीराम गार झाला म्हणजे झालें असें त्याचें म्हणणें. दुसरें, अशी एखादी कन्या बाल विधवा झाली कदाचित् तरमग भटजी तिला आपल्या प्राप्तीचें माहेर घरच बनवितात. म्हणजे तिला जाऊन सांगायाचें कीं पूर्व जन्मीं ब्राम्हणांस दानधर्म न केल्यामुळें हें बाल वैधव्य प्राप्त झालें. तेव्हा या जन्मीं तरीं दर दिवस दरमहा, दरवर्षी ब्राम्हणास तन मन धन अर्पण करीत जा म्हणजे

पुढील जन्मीं अखंड सौभाग्य प्राप्त होईल " असें सांगितल्यावर ती तर बायको. च अज्ञानानें माहेर–शिवाय असा वैधव्य प्रसंग असल्यामुळें भटजी सांगेल अशा प्रकारें नादास लागून सर्वस्वी भटजीची धन करिते. बरें आतां या नवऱ्याच्या बदली ती नवरी कन्या मेलीच तर इकडे क्रिया श्राद्धें व तिकडे नवऱ्याचें दुसरें लग्न. तात्पर्य भटजीनें सर्वत्र आपली प्राप्ती योजली आहे.

भट—आह्मी पाहिजे तें सांगूं पण यजमानानें कां ऐकावें?

धुं०—हें मात्र भटजी तुमचें खरें! यजमान मूर्ख भोळे पडले. गुराखी बैला रेड्यांस जसा पाहिजे तिकडे वळवितो तद्वत् हे यजमान भटांकडून कसेहि वळले जातात. कित्येक इतके भोळे असतात कीं आपल्या बायका प्रथम भट महाराजांकडून पावन करून घेतात. वल्लभाचार्य पंथाच्या लोकांत बायकांस नवऱ्या पूर्वी महाराजांकडे पाठविण्याची विशेष चाल आहे. या अशा भोळे पणास पशुत्वा शिवाय दुसरी उपमा नाहीं साजत.

पा०—यजमान मूर्ख व भोळे असले ह्मणोन त्या मूर्ख पणाचा ज्ञाता ह्मणविणाऱ्या भटांनीं लाभ घेऊन आपला मतलब साधावा काय?

धुं—धर्माच्या मिषानें विघाडा होऊन अनाथ मूलींवर अनिवार्य वैधव्यादि दुःख प्रसंग येतात त्या सर्वांचें मूळ कारण उभय भोळे यजमान व धूर्त भट होत.

भट—आह्मांस कां? शास्त्रांत आहे ह्मणून आह्मी करितों. दोष लागेल त्या शास्त्र कर्त्यास व ते जातील अधोगतीस.

धुं०—ही बरी तोड! परंतु तेथें शास्त्रशब्द योजूं नका. शास्त्रा बद्दल ग्रंथ योजून लुटारू ग्रंथकर्ते अधोगतीस जातील ह्मणा.

पा०—असें तर खरेंच. कारण सांप्रत स्वार्थी भ्रष्ट लोकांनीं शीघ्रबोध नारायण भट्टी, अनंत भट्टी, धर्म सिंधु, मूहूर्त निर्णय सिंधु, योनि तंत्र, लिंग तंत्र, शूद्र कमलाकर, शांतिसार, दान व व्रत खंड अशा ग्रंथांचे ढीगांचे ढीग घडविले आहेत. या खोट्या ग्रंथांचें खंडण "वेदोक्त संस्कार प्रकाशांत" केलें आहे तें वाचा. असे दुष्ट ग्रंथ कर्ते नरकीं जाण्याचे अजून राहिले वाटतें काय? तुमचा नको त्यांस आशीर्वाद! हे ग्रंथ कर्ते जसे अधोगतीस गेले तद्वत् त्या प्रमाणें वागणारे हि जाणार. कारण मनुष्यास बरें वाईट योग्या योग्य समजण्याची विचार शक्ति आहे. त्या विचार शक्तिचा उपयोग न करितां अंध परंपरेचीं निंद्य कर्में केल्यानें त्याचें फळहि त्यास भोगलें पाहिजे हा न्यायच आहे.

मु०—शास्त्र कोणत्या ग्रंथाला ह्मणावें व त्यांत लग्नाविषयीं काय निर्णय सांगितला आहे? हें कृपा करून सांगा बघूं.

पुं०—वेद हेच मुख्य धर्म शास्त्र ग्रंथ असून प्रत्येक वेदावरून एक एक अशीं आश्वलायनादि गृह्य सूत्रें ( ह्मणजे घर करून राहणाऱ्या गृहस्थानीं वागण्याचे नियम ), शतपथादि ब्राह्मण व मन्वादि स्मृति असे ग्रंथ पूर्ण ज्ञात्या अनुभवी ऋषींनीं प्राचीन कालीं केले आहेत. या मान्य वेदांत,

**या धेनवो धनुयन्तामशिश्वीः शबदुघाः शशया अप्रदुग्धाः।**
**नव्या नव्या युवतयो भवन्तीर्महद्देवाना मसुरत्व मेकम् ॥**
**ब्रह्मचर्येण कन्या ३ युवानं विंदते पतिम् ॥**

या प्रमाणें स्त्रियांनीं युवावस्था- ह्मणजे (पंधरा) सोळा वर्षे पर्यंत व पुरुषांनीं त्या मानानें बावीस चोवीस वर्षें पर्यंत ब्रह्मचर्याश्रमीं ( कौमारी--कौमार) राहून वेद शास्त्रादि व्यवहारिक व पारमा-

र्थिक विद्या शिकून गुर्वाज्ञा घेऊन नंतर प्रसन्नतेनें, स्वेच्छेनें व मातापितादि आप्त वडिलांच्या अनुमोदनानें आपल्या योग्यतेचा अर्थात समान शील, गुण, प्रकृति, शरीर, रूप व वर्ण–जातीचा असा "तरुणपुरुष" वर योजून व पुरुषांनीं तद्गुण संपन्न "तरुणी स्त्री" वधू योजून परस्पर विवाह करावा, असें आहे. व हेंच विवेचन " बुद्धि रूप शील लक्षणसंपन्नाम् रोगामुपयच्छेत्, ब्रह्मचर्याश्रमं समाप्य गृही भवेत्, गुरुणानुमतः स्नात्वा समावृत्तो यथाविधि। उद्वहेत द्विजो भार्यां सवर्णां लक्षणान्वितां, आत्माभिप्रेत मुत्सृज्य कन्याभिप्रेत एव य; अभि प्रेता च या यस्मै तस्मै देया युधिष्ठिर" या प्रमाणें ऋ० गृ० सू०, श० ब्रा०, मनु स्मृति व भारत यांत केलें आहे. सर्वमान्य जो मनुऋषि त्याणें वरील श्रुतीस अनुसरून, **त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्यृतुमती सती। ऊर्ध्वं तु कालादेतस्माद्विंदेत सदृशं पतिम्** ॥ या प्रमाणें ( अज्ञानपणीं ब्र० पंधरा सोळा वर्षां पूर्वीं रजो दर्शन झाल्यास ) रजोदर्शनी नंतर तीन वर्षांनीं स्त्री विवाह व गर्भाधाना योग्य होते, असें विशेष स्पष्टीकरण केलें आहे व हेंच स्पष्टीकरण, **वर्षाणि त्रीण्यृतुमती कांक्षेत पितृशासनं। ततश्चतुर्थे वर्षेतु विंदेत सदृशं पतिम्**॥ या प्रमाणें बौधायनानें केलें आहे. आतां सज्ञान असतां ऋतु काळ नसला तरी ती सज्ञान असल्यामुळें "**त्रिंशद्वर्षः षोडशाब्दां भार्यां विंदेत नग्निकाम्**". याप्रमाणें सोळावे वर्षीं विवाहास योग्य जाणावी असें महाभारतांत स्पष्टीकरण केलेलें आहे.

भ०—अज्ञान पणीं म्हणजे १६ वर्षा पूर्वीच ऋतु प्राप्त झाला असला तर तो समय तरीं विवाह व गर्भाधानास योग्य होईल काय?

धुं०—याचेंहि स्पष्टीकरण आयुर्वेदोक्त वैद्यक शास्त्रांत केलें आहे. अत्यंत प्राचीन मुनि श्रेष्ठ धन्वन्तरी, ज्याचें प्रमाण या प्रसंगीं विशेष ग्राह्य, त्याणें विद्वज्जन मान्य सुश्रुत ग्रंथांत,

॥ ऊन षोडश वर्षाया मप्राप्तः पञ्च विंशतिम् ।
। यद्याधत्ते पुमान् गर्भं कुक्षिस्थः स विपद्यते ॥
॥ जातो वा न चिरञ्जीवे ज्जीवेद्वा दुर्वलेंद्रियः ।
। तस्मादत्यन्त बालायां गर्भाधानं न कारयेत् ॥

एणें प्रमाणें १६ वर्षांहून कमी वयाची अज्ञान "बाला स्त्री" गर्भाधानास योग्य नाहीं असें सिद्ध केलें आहे.

भु०—यावरून सज्ञानपण व संग अर्थात् चालू गर्भाधान हीं उभय नसलीं तर लग्नच नव्हे तर मग तें?

धुं०—यांत काय संशय? तसें नसलें तर "नवरा व बायको" हें परस्पर नातेंच होत नाहीं. यजुर्वेद व सामवेद गृह्य सूत्रांत,

॥ अथातश्चतुर्थी कर्म ॥ अनुमंत्रिता गुरुं गोत्रेणाभिवादयते ॥

याप्रमाणें विवाहाचे चतुर्थ दिवशीं गर्भाधान करावें. व गर्भाधानोत्तर "वधू स्त्री" ही पति गोत्रांत येते. असें सांगितलें आहे. व याचेंच विशेष स्पष्टीकरण बृहस्पति स्मृतींत केलें आहे तें:—

॥ चतुर्थी होम मंत्रेण त्वङ्मांस हृदयेन्द्रियैः ।
। भर्त्रा संयुज्यते पत्नी तद्गोत्रा तेन सा भवेत् ॥

**अर्थः**—विवाहाचे चतुर्थ ( अथवा अन्य ऋतुकाल ) दिवशीं यज्ञ विध्युत्तर वधूवरांचा संयोग होतो तेव्हांच वधु ही पतिगोत्र ह्मणजे कुळाला मिळून त्याची पत्नी होते असें जाणावें." याहूनाहि कांहीं विशेष स्पष्टीकरण भव देव, शातातपादि स्मृति कारांनीं केलें आहे त्यांतून विस्तार भयास्तव थोडेंच देतों तें:—

**॥ विवाहे चैव निर्वृत्ते चतुर्थेऽहनि रात्रिषु ।**
**। एकत्वमागता भर्तुः पिंडे गोत्रे च सूतके ॥**
**॥ संस्थिता यान्तु भार्यायां सपिंडीकरणान्तिकं ।**
**। पैतृकं भजते गोत्र मूर्ध्वन्तु पति पैतृकम् ॥**
**। एकमूर्तित्व मायाति सपिंडी करणे कृते ।**
**॥ पत्नी पति पितृणान्तु तस्मात्त द्गोत्र भागिनी ॥**

**अर्थः**—वर हा वधूचे ठायीं सपिंडी करण अर्थात् गर्भाधान विधि करी पर्यंत ती वधू फक्त पितृगोत्री असते. व नंतर ( गर्भाधानोत्तर ) ती पति गोत्रास मिळून पत्नीत्व पावते.

धुं०—या वरून ( योग्य कालीं ह्म० सज्ञान पणीं ) गर्भाधान होण्या पूर्वी नवरा मृत झाला तर त्याचें सूतक तिला नाहीं लागणार मग ?

पा०—तें नुकतेंच सांगितलें. सपिंडीकरण ह्म० गर्भाधान होऊन पति गोत्रांत वधू आलीच नाहीं तर मग तिला पत्नीत्व कसें मिळेल व तुह्मी ह्मणतां तें त्याचें सूतक कीं काय तें कसें लागूं शकेल बरें ?

**भट**—१६ वर्षां पूर्वी ऋतु प्राप्त झालेल्या वधूचें गर्भाधान झालें तर कसें?

**पा०**—त्या वेळीं अज्ञान असल्यामुळें नवऱ्याचें गोत्र तिला लागण्याचें एकीकडे ठेवाच; पण तिच्यावर अज्ञानावस्थेंत "आपण नवरा" असें विश्वासून

जुलूम ( *Rape* ) केल्याचा गुन्हा मात्र त्याला लागून निदान ५ वर्षे सक्त कैद खान्यांत ( तुरुंगांत ) बसविणें योग्य होय.

धुं०—लाखो ढोल, रणढोल तासे वडविले; लाखो रांडा नाचविल्या ;लाखो अंतःपट धरून मंगलाष्टकें गर्धभ ध्वनींत बोंबलून लाखो माळा घातल्या; लाखो सप्तपदी चालविल्या; लाखो नारळ वांटले;लाखो मिष्टान्न भोजने व्याह्या पाहुण्यांनीं झोडलीं; हिलाल, मशाली, दारुसामान, वेश्यागायन नृत्य यांहीं युक्त लाखो वराती काढल्या;-पण "सज्ञान पणीं गर्भाधान" विधी झाल्या शिवाय तें लग्न नाहीं होत हो, नाहीं! भटजी! हें पक्के ध्यानांत ठेवा व त्या प्रमाणें लोकांस उपदेश करीत जा.

भ०—बापानें मुलांचीं लग्नें करून देणें हें त्याचें धर्म संबंधी कर्तव्य कर्म असून लग्न हा वधूवरांचा करार नव्हे असें कोणी वकील ह्मणतात हें कसें?

धुं०—बहु पण अविचारी वेडगळ लोकांत आपली प्रौढ व्हावी ह्मणून अहंकारी मनुष्य सत्या विरुद्ध वटवट करितो. पहा,धर्माज्ञे प्रमाणें जर कर्तव्य कर्म तर बाप पूर्वी मृत्यु पावला असला, किंवा गरीब असला,किंवा त्याच्या संततीला विशेष व्यंग असलें किंवा त्याला मुलेंच झालीं नसलीं किंवा झालीं असून लग्न करण्या पूर्वी मरत किंवा वाटत चाललीं तर हें कर्तव्य कर्म कसें बरें पुरें होईल? आणि तें पुरें न झाल्यामुळें बिच्यान्याला नरकांत जावें लागणार ना! वा ! ही कोणत्या कोर्टाची वकीली बरें! तें असो; आतां करारा विषयीं पाहूं जातां "ज्या मंत्रांनीं लग्नें होतात त्या मंत्रांतच वधू वरांची परस्पर प्रतिज्ञा—करार आहे" हें स्पष्ट होतें. अमोहमस्मि० गृभ्णामि ते सौभगत्वाय० युवा सुवासा०गर्भं धेहि०पुत्रान् विंदावहै०( संपूर्ण मंत्र व अर्थ वेदोक्त संस्कार प्रकाश ग्रथांत पहा.)या लग्नांतील मंत्रांतच वधू वरांची सज्ञानता व प्रतिज्ञता-करार आहे . तेव्हां लग्नास कराराचा संबंध नसणें ह्मणणें हें किती मूर्ख, नीच पाजी पण! मिताक्षर व्यवहाराध्याया प्रमाणें मुलीच्या लग्नाच्या खर्चाचा बो-

आ तिच्या बापाच्या १/८ जिनगी वर मात्र असतो. परंतु वेदोक्त धर्म शास्त्रा विरुद्ध अर्भक पोरांच्या लग्नाची कर्तव्यता बापाला बिलकूल नसते.

भट०—लहान अज्ञान लेंकरांनीं लग्ने झाल्याचा केलेला करार खोटा व मर्यादि आपण सिद्ध केला कीं चालू कन्यादान ही गुलामगिरी तर मग सरकार त्याचा प्रतिबंध कां करीत नाहीं?

धुं०—हो; पण तुह्मीं नजरेस आणाल तेव्हां ना! सरकार न्यायी आहे. "शैस" ह्मणजे अज्ञान मुलींचीं तरवारी वगैरे सह लग्नें लावून त्यांस वेश्या धर्मी प्रवर्तविणें ही नीचलोकांची दुष्ट चाल सरकारच्या कानावर गेली तेव्हां ती सतीच्या व ह्मार टोपण्याच्या चाली प्रमाणें नाहीं का बंद केली?

मुरार०—सरकार धर्माचे कामांत हात कसें घालील?

धुं०—अहो आतांच वेदशास्त्राचीं प्रमाणें देऊन सांगितलें ना; कीं सज्ञान पणीं लग्न करणें हाच कायतो धर्म. व या सत्य धर्मास अनुसरून कायदा केला तर धर्मांत हात घातल्या सारखें कसें होईल? उलटी धर्मास मदत केल्या सारखी होणार आहे. पण "अज्ञान पणीं इच्छे विरुद्ध लग्न बंधन व तज्जन्य वैधव्य यांचा जो जुलूम अर्भक पोरींवर दुष्ट प्रवर्तक भट व वेडगळ माता पितादि वडील चालवितात तो जुलूम दुष्टांस शासन करून सरकारानें बंद न केला तर मात्र ठक, लुटारू व विचार शून्य मतलबी भटांस व वेडगळ वडिलांस उत्तेजन देऊन जुलुमाची व अन्यायाची प्रवृत्ति चालू ठेवल्याचा दोष सरकारच्या माथीं बसणार आहे. याचा सरकारानें विचार करावा.

( स्तब्ध होऊन निघून जातात. )

समाप्त.

# भटजी लीला—मृत.

( भाग १ ला. )

देशावरील एक गृहस्थ आपल्या तरुण बायकोसह मुंबई शहरीं एका चाळींत रहात असे. त्याचें नांव नारायणराव व बायकोचें गंगुताई. नारायणराव हे सरकारी नोकर होते. ते एके दिवशीं आगबोटीचा दिवस म्हणून लौकरच सकाळीं ८।८॥ वाजतां भोजन करून कचेरीस गेले. इतक्यांत

प्रातः क्षालित लोचनाः करतले चंचत्पवित्रांकुरा ।
स्तत्तत् स्थान निवेशितोर्ध्व तिलका श्चैलांत बद्धाक्षताः॥
को जातश्च मृतोऽथवा मृत तिथिः कस्यालये वर्तते ।
चेत्थं हर्ष शतैर्युताः प्रति दिनं धावंत्यहो भिक्षुकाः ॥

या प्रमाणें सकाळीं धोंड भट्टी ( आंघोळी वांचून गंध लेपनादि ) करून पळी, पंचपात्री, दर्भादि हातांत घेतलेला, वस्त्राच्या एका गांठीला मीठ बांधून दुसरींत अक्षता ( तांदूळ ) घेतलेला--असा एक उघडा बोडका भटजी मोठ्या लगबगीनें त्या चाळींत आला. आणि गंगुताईच्या शेजारच्या खोलींत बाया जमल्या होत्या तेथें जाऊन " द्वादशी हो द्वादशी" असें सांगून प्रथम ५।६ बायांकडून शेर शेर तांदूळ, एकेक नारळ व शाकभाजी असे ५।६ सिधे उठविले आणि " उद्यां पासून वट सावित्रीचें व्रत आहे " तीन दिवसाचें व्रत कोणाला करावयाचें आहे? असें बायांस विचारल्यावर त्या पैकीं गोदानामे एक बाई पुढें सरसावून,

मोदा—भटजी, मी गतवर्षी प्रमाणें तीन दिवस व्रत करणार. पातळ, खण, नारळ, तूप, साखर वगैरे सर्व तयारी संध्याकाळीं ते ( नवरे ) आले म्हणजे करीन. उद्यां बरीक लौकरच या बरें!

यमुना—हें मेलें आजच ऐकलें कीं ३।३ दिवस व्रतो पोषणें करावीं आमच्या राजापुर चिपळूण प्रान्तीं नाहीं ही चाल. मुंबईच्या बायकांचे नवरे पगारदार; त्यांजवळ पैसे घोळतात. तेव्हां त्यांस नसतीं ढोंगें आठवतात. भटजीचें तरीं काय जातें! त्यांना तर विशेष प्राप्ति होते.

गोदा—तुझ्या जंगली माणसांला काय ठाऊक? शेजारची सिंधुताई एक दिवस व्रत करी. परंतु तिच्या नवऱ्यास अत्यंत बरें नसल्यामुळें तिणे तीन दिवसाचें व्रत करण्याचा नवस केल्यावरून तिचा नवरा बरा झाला. व ती आतां ३ दिवसाचें व्रत करिते. इकडल्या पेक्षां तुमच्या तिकडे अधिक विधवा याचें कारण तुम्ही व्रत बरोबर आचरीत नाहींत.

विधवा—मी उपवर होण्या पूर्वींच प्रारंभापासून तीन दिवसाचें व्रत ५०।६० वर्षे केलें;—तर मग माझें कां कपाळ फुटलें? शेजारची वैद्याची आई एक दिवसाचेंच व्रत करीत होत्साती ८० वर्षांची सुवासिनी होऊन गेली. मेल्या व्रतांकडे कांहीं नाहीं. व्हावयाचें तें होणारच.

पुतण्या ( गोदेचा)—अशा व्रताशीं नवऱ्याच्या आयुष्याचा वगैरे कांहीं संबंध नाहीं. एक दिवस व्रत कर्त्या बाया जशा सधवा विधवा आहेत तशाच तीन दिवस व्रत कर्त्या बाया सधवा विधवा आहेत. व मुळीं व्रतच न करणाऱ्या अशा बाया आमरणान्त ८०।९० वर्षें सुवासिनी व सुखी असतात. सारांश सुख, दुःख, मृत्यु प्रालब्धाने नेमलेलेच असून त्या त्या काळीं ते उद्भवतातच. व्रतोपोषण व देवतार्चनेने तर काय पण "प्राप्तव्यमर्थं लभते मनुष्यः। देवोऽपि तं लंघयितुं न शक्तः" या

प्रमाणें स्वतः ब्रह्मदेवाच्यानेहि टळणार नाहीं. ह्मटलें आहेः—
सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता । परो ददातीति कुबुद्धिरेषा।
अहं करोमीति वृथाभिमानः। स्वकर्म सूत्र ग्रथितोहि लोकः ॥

भ०—या व्रताचा महिमा मोठा आहे; सर्व हिंदुस्थानांत हिंदु स्त्रिया हें व्रत मोठ्या रीतीनें करितात ह्या काय उगीच?

पु०—हिंदुस्थानांत सर्व हिंदु स्त्रिया हें व्रत करितात असें जें तुह्मी कोणा वकीलाचें उच्छिष्ट उचलतां तें अगदीं खोटें. नारायण--सत्य नारायण, गजानन-सत्य गजानन, अनंत—सत्य अनंत, दुर्गा--सत्य दुर्गा, अशीं सत्य सत्य व्रतें "फुलाबोलाच्या" न्यायानें ज्यास फलद्रुप होतात तो तीं करितो. ह्मणून सर्व लोक करितात असें ह्मणणें जेवढें मूर्खपणाचें तेवढेंच "सावित्री व्रत सर्वत्र आचरतात." असें ह्मणणें वेडेपणाचें होय. हें सावित्री व्रत टीचभर कोकण पट्टींत किंवा कोकणी माणसें पसरलेल्या कांहीं ठिकाणीं कदाचित् असेल. पण मुख्य आर्यावर्त, गुजरात, कच्छ,काठेवाड, सिंध, माळवा, ओरिसा, दक्षिण मलबार वगैरे हिंदुस्थानच्या ९॰ प्रान्तीं या सावित्री व्रताचा गंध हि नाहीं हें मी स्वतः आमच्या वडिलां बरोबर फिरत असतां पाहिलें व ऐकलें आहे. तुह्मी अगर तुमचे नवरे मुंबई, पुणे, कोंकण सोडून कोठें गेलां नाहीं, उगीच लोणकडी थाप मारून आपला वहु पण अविचारी मूर्ख समुदायांत महत्व मिळण्याचा किंवा द्रव्य प्राप्तीचा "मतलब साधणाऱ्या लोकांना" वेळ राहिली नाहीं; कदाचित् हें पेशवाईत चाललें असतें.

असें भटजी व बायांचे भाषण चाललेलें गंगू ताईनें ऐकून ती तेथें आली. तिला पाहून भटजी म्हणतो ही कोण नवी बाई, केव्हां एथें आली?

गोदा—हल्लींच मोठी होऊन २ महिन्यावर एथें नवऱ्याजवळ आली आहे. इजलाहि पूजा सांगायाला तुम्हीच या हो.

भ० ( मनांत-हा एक लाभ होय, निदान ४१५ रुपये तरी खरे )

पु०—भटजी, हीं गंगू तुह्माला एक नवें पैसेवालें खूळ मिळालें हो! तुमची चांदी बुवा. सोनें ह्मटल्यासहि चालेल!

सोबती—अशीं बायांचीं खुळीं मिळतात ह्मणून च एथें भटजीचें खूळ युरोपांतील पोपजी प्रमाणें माजलें आहे.

पु०—एका भटजीला अशी एक खूळ बाई मिळाली कीं तिणें नवऱ्यासहि वळवळवून व घरांत चोरीमारी करून भटाची भर करावी. डाग डागिन्याचाहि सप्पा उडवून भटजीचें नादीं सर्वस्वी लागली. व पति मरणोत्तर उघड देहार्पिण केलें.

गोदा—हीं पोरें इंग्रेजी शिकलेलीं, यांचें काय ऐकतां!

पु०—पण या इंग्रेजीवरच ना तुमची भर होऊन त्या भरीवरच ना अशा भटजीच्या दोंदावर दोंद चढतें तें!

सोबती—अहो, या ह्मताऱ्या जुन्या बाया, नाहीं मुळींच सुधरायाच्या. पण तरुण पोरींस या नादाला लावून बिघडवितात याचा बंदोबस्त त्यांच्या सुशिक्षित विचारी नवऱ्यांनीं केला तर सहजीं होणार आहे.

गोदा—(पुतण्यास) चला एथून; बायकांत काय तुमचें काम!

पुत०— आह्मी काय ते पुरुष; आणि हे भटजी! नाहीं काय ते पुरुष! बायकोच काय ती!!

गोदा—काय चावट पोरें? निघा एथून; शाळेंत नाहीं जायाचें वाटतें.

पु०—मोठे पुरुष काम धंद्यास बाहेर गेले ह्मणजे बायका घरांत राजाच बनतात. पण लहान पोरांची आडकाठी असते तीं मेलीं पोरें हि एकदांचीं शाळेंत वगैरे गेलीं ह्मणजे काय! सर्वच बादशाही. आह्मी बुवा जातों; चालूं दे तुमची बादशाही. घ्या ठकवून ( असें ह्मणून जातात. )

गोदा—काय त्या पोरांचें ऐकावयाचें? भटजी सांगा तुह्मी या गंगुबाईचें काय करितां तें. तिणें अजून व्रत घेतलेलें नाहीं. ती नवीनच आहे.

भट—ह्याच्या नवऱ्याला किती रुपयांची नोकरी आहे?

गोदा—५०।६० रुपयांची असून गांठीला चार पैसे बाळगून आहे.

भट—( मनांत–तर मग १०।१२ रुपयांची होईल प्राप्ति, या आनंदानें ) अहो, गंगू या अशा पुढें लाजतां काय?

गोदा—लाजते ती; नवीनच आहे. अजून भीड चेपली नाहीं.

भट—नवरे, दीर, भावे यांजकडे भीड ठेवावी परंतु आपले गुरु उपाध्ये, पुरोहित यांजला भिडूं नये. भिडलें तर कसलीं व्रतें आणि पारणे!

गोदा—ये गंगू; इकडे बैस, उपाध्याला कोण लाजतें? (असें शेजारीणीचें भाषण ऐकून गंगू बायांमध्यें येऊन भटजी जवळ बसली )

भट०—ह्यची मुद्रा पुण्यशील व देव, गुरु, ब्राह्मण प्रिय दिसते.

या भाषणानें गंगू खुलावयाची ती खुललीच आणि प्रथमच्या सावित्री व्रतास लागणाऱ्या जिनसाची म्हणून एक यादी ( १०।१२ रुपयांची ) भटजीनें आपण होऊन दिलेली मोठ्या आनंदानें घेऊन आपल्या

खोलींत गेली. भटजीहि तिच्या मागोमाग जाऊन " आपण उद्यांकडे भेटेन; यादी प्रमाणें नवऱ्याकडून तयारी करवा हो " असें तिला सांगून निघाला. व जातां जातां " हें आपलें कूळ दुसऱ्या भटाच्या हातीं दवडूं नका बरें " असें त्याणें गोदाबाईस सुचविलें.

संध्याकाळीं गंगूनें भतार–नारायणराव घरीं आल्यावर त्यास ती यादी देऊन सर्व हकीगत कळविली. तेव्हां ती १०।१२ रुपयांची यादी पाहून नारायणरावास राग येऊन बायकोस फार छडली. तथापि ती वरचेवर शेजारिणीच्या कान फुंकण्या वरून यादी प्रमाणें जिन्नस आणण्या साठीं आळ घेत असे. व नारायणराव तिला छडीत असत.

( आपला मतलब निक्की साधण्या करितां दुसरे दिवशीं सकाळीं ८।९ वाजतां भटजीची स्वारी नारायणरावाचे बिऱ्हाडीं आली. त्यास पाहून )

नारा०—कां हो ! तुह्मी कोण हे बोडके; एका हातांत आंब्याची टहाळी, दुसऱ्यांत पळी पंचपात्री व खांद्यावर पुरचुंड्यांचा पंचा घेतलेले असे उघडे बोडके; काय विचित्र सोंग हें !

भ० ( मनांत–हें चिन्ह बरें नाहीं. तथापि प्रयत्ना अन्तीं परमेश्वर असा मनास धीर देऊन ) आम्ही उपाध्ये–भटजी.

नारा०—बरें, मग! तुमचें ह्मणणें काय? आलां कां?

भ०—परवां वट सावित्री व्रत आहे–तेव्हां त्याची तजवीजेची सूचना पूर्वीच करावी म्हणून भेटावें म्हटलें तुम्हाला.

नारा०—अहो, ही उठाठेव तुम्हास सांगितली आहे तरीं कोणी?

भ०—काल यजमानीन बाईला भेटून सामानाची यादी दिली आहे.

नारा०—कोणती यजमानीन बुवा तुमची ती ?

भ०—आपली गृहणी–गंगूबाई.

नारा०—हिला भेटून तजवीज केली काय? (बायकोकडे) हा गधडे, २ महिने येऊन झाले नाहीं तोंच झालीस एवढी निःसंग; खबरदार पुनः असें नजरेस आलें तर!

शेजारी०—काय हो नारायणराव, कोणावर राग हा एवढा!

नारा०—काय या गाढवी बायकांना लज्जा नाहीं. स्वतंत्रच होऊं पहातात—जणूं काय यांचे शिरावर नाहीं कोणीच. या भटांच्या नादास लागून हवें तें करण्यास उद्युक्त होतात. ही गबडी भटाच्या नादास कीं हो लागली! ही पहा १०।१२ रुपयांची यादी भटाकडून घेऊन त्या यादी प्रमाणें जिन्नस मागत बसली आहे. व न दिल्यास डोकें फोडून घेईन ह्मणते!

शे०—खरें आपलें ह्मणणें; पुरुषांस विचारून काय तें करावें.

नारा०—तुह्मी तर या भटजीचेच सोबती कीं हो! बायकांनीं पुरुषांस विचारावें ह्मणतां हें काय? नवऱ्यांनां नाहीं काय समजत अमुक प्रपंच व अमुक परमार्थ करावा तो! वः एकून बायका काय त्या शाहाण्या! बिचारे नवरे बैलच.

शें०—यांत काय संशय? इंग्रजी शिकून नवरे भ्रष्ट झाले; बिचाऱ्या बायका तरी भटाला विचारून व्रतादिकें करून पवित्र होतात!!

नारा०—मग हे भ्रष्ट नवरे या पवित्र बायकांना कसे चालतील?

शे०—बायकांनी भटांच्या नादास लागूं नये हें योग्य होय.

नारा०—मी एक विचारतों "हें काय भटजींचें उघडें बोडकें फिरणें दुश्चिन्हा सारखें! हें सोंग कीं ढोंग!!

श्रोता—ढोंग हें उघडच; कोठून तरी भोळ्यांचीं मनें वळवावीं व पैसे उठवावे. हाच काय तो मतलब.

शे०—ही बोडक्याची रीतच एथें कोकण पट्टींत पडली.

नारा०—बायकांत उघडें बोडकें फिरण्याची असभ्य, निर्लज्ज, कंटाळवाणी, नादान चाल घालणारे किंवा घालूं देणारे स्वतः यजमानच तसे पडले!! कारण यथा यजमान तथा पुरोहित.

श्रो०—कित्येक भट तर वीत रुंदीचा+पंचा मात्र नेसलेले उघडे बोडके—जसे मुंबईतील जणु बाणकोटी गडी—बायकांत दिगंबर असतात—तसेच कीं हो—भिडस्थ, साध्वी, सभ्य, सलज्ज, तरुण, कोमलांगी स्त्रियांत हे टोणपे निःसंग निर्लज्जपणें वागत असतात. इकडील सुशिक्षित लोकांस बायकांची सभ्यता, मर्यादशीलपणा, भीड व लज्जा भंग करणारी ही नादान चाल कशी आवडते हें मोठें आश्चर्य! आमचे प्रान्तीं असा उघडा बोडका, पाऊण नग्न असा विद्रूप कोणी कोणाचे घरीं आला तर त्याला शेणमार होतो. ( असो आतां उशीर झाला असें ह्मणून नारायणराव नोकरीवर गेले. )

शे०—( भटजीस ) जा, आतां तुह्मी; उद्यां रविवार आहे. सकाळींच या असे; पण तुम्हीं उघडे बोडके फिरतां हें गैर. अंगांत अंगरखा बंडी किंवा अंगावर धोत्र घ्या व डोक्यास पागोटें टोपी असें कांहीं तरी घालून जा. उघडें बोडकें एखाद्याचे एथें जाणें हें खरेंच दुश्चिन्ह्या सारखें.

दिसऱ्या दिवशीं रविवार. नारायणराव सकाळीं सुमारें ८ वाजतां एक दोन गृहस्थांशीं बोलत असतां सदर भटजीची स्वारी डोक्यास पागोटें व अंगास बंडी घातलेली अशी आली त्यास पाहून,

नारा०—या महाराज बसा. काल मी बोललों तें सत्य कीं नाहीं?

भ०—खरेंच, यजमान; ह्मणूनच आतां मी सोडकें न घेतां पागोटें व बंडी अंगरखा घालून आलों.

नारा०—अहो आमचेकडे एवढ्यांत यजमानाचें नातें जडवलें काय? ठीक; बरें आह्मीहि तुमच्याकडे जडवूं तर. असो; आतां तुमचें काय ह्मणणें. सांगा काय तें लौकर.

भ०—उदयीक वट सावित्री व्रत बाई साहेबांस देणें आहे ना!

नारा०—बाई साहेब कोण आणि हें आहे तरी काय लफडें?

भ०—बाई साहेब आपली गृहणी गंगूबाई.

नारा०—ती झाली काय तुमची बाई साहेब? आह्मालाहि तुमच्या गृहणीला बाईसाहेब केली पाहिजे तर आतां!

भ०—माझी चूक झाली. आतां आपली काय मर्जी आहे?

नारा०—तुह्माला पाहिजे तरी काय आमचे कडून?

भ०—उद्यां तुमच्या एथें पूजेस आलें पाहिजे ना? सांगा केव्हां तें.

नारा०—आमच्या एथें पूजा बीजा कांहीं नाहीं. पूजा करणेंच असली तर आह्माला नाहीं काय करतां येत?

भ०—तें खरें; पण कोणी तरी तिऱ्हाईत पुरोहित म्हणून पाहिजे.

नारा०—बरें तुम्ही कसें करितां तुमच्या बायकोच्या पूजेला?

भ०—आम्हीहि आमचे बायको साठीं दुसरा कोणी बोलावतों.

नारा०—बरें आहे तर; तुमच्या बायकोचे पूजेला मी येतों. व तुह्मी आमच्याकडे या; ह्मणजे आह्मी तुमचे यजमान व तुह्मी आमचे यजमान. असे परस्पर यजमान व उपाध्ये होऊं! भग

तुमची गृहणी आमची बाई साहेब व यजमानीन होईल. मग दक्षणा, उपदक्षणा; दाने, उपदानें; वाणें;-यांची वजा थाट होईल व पैसे पेटींतल्या पेटींत रहातील.

भ०—असें कसें होईल ? आपण मराठे क्षत्रिय; आम्ही ब्राह्मण; ब्राह्मणच उपाध्ये होत असतात! तुमची काय ब्राह्मणं जात नव्हे.

नारा०—तुह्मी आपल्यास ब्राह्मण ह्मणवतां त्या तुमची जात कोण?

भ०—आमंची जात ब्राम्हण.

नारा०—काय ? ब्राह्मण ही काय जात आहे ? "**ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्** ०"इ०वेदोक्त व "शूद्रो ब्राह्मणतां याति ०"इ० मनूक्त आद्य सनातन शास्त्राज्ञा व " चांतुर्वर्ण्यं मया सृष्टं गुण कर्म विभागशः-"अशा भगवद्गीते सारख्या अर्वाचीन मान्य ग्रंथोक्ति प्रमाणेंहि " **ब्राह्मण** " हा शद्ब, वर्ण ह्मणजे पदवी विधायक आहे. तेव्हां तुमच्या ह्मणण्या प्रमाणें बि. ए; एम. ए; एम; डी.--अशा पदव्या आहेत त्याहि मग जाती होऊं लागतील!

श्रो०—पूज्य " ब्राह्मण " शद्बाचा सांप्रत मातेरा झालेला आहे. म्लेंच्छासहि कंटाळवाणीं व क्रूर वाटणारीं अशीं निंद्य अघोर कृत्यें करूनहि कांहीं लोक आपणास ब्राह्मण ह्मणून घेतात. द्रविड, तैलंगादि लोक आपणास ब्राह्मणांत गणतात. पण ते लोक सेमिटिक-म्लेच्छ असून पशु हिंसा कर्ते एवढेच नव्हत तर राज्य लोभानें वगैरे सती सारखी मानव हिंसा करणारे व बळी देणारे होत.सतीची दुष्ट भयंकर चाल( यज्ञ व देवी उपासना निमित्त चालू केलेल्या अत्यन्त क्रूर पशु हनन, मद्य

मांस सेवन व अगम्य स्त्री गमनादि निंद्य कृत्यां प्रमाणें.) प्रथमतः या **प्राचीन अनार्य** द्रविडादिकांनीं दक्षिण उत्तर हिंदुस्थान प्रांतीं चालू केली व तिचें अनुकरण पुढें **अर्वाचीन अनार्य** जे कऱ्हाडे चितपावनादि कोंकणे त्यांनीं घेऊन त्या पैकीं कपटें करून राज्य संपादून नावा रूपास आलेल्या पेशव्यानें सती संबंधी खोटे ग्रंथ घडवून ते शाहु राजाचे बायकोस वाचून दाखवून राज्य प्राप्त्यर्थ तिला सती घालविली व महाराष्ट्र प्रांतीं सतीची चाल चालू केली. तात्पर्य असे कऱ्हाडे चित्पावनादि नीच *लोक ब्राह्मणांत गणून घेत असल्यामुळें "ब्राह्मण" शद्वाच्या माणसावर सूक्ष्म शोध व विचार केल्याशिवाय विश्वासूं नये.

शे०—अहो भटजी, तुम्ही ब्राह्मणाचा धंदा करितां. पण पळसे, शेणवी, मराठे, चितपावन, माळी, कऱ्हाडे, सोनार, वाणी, देवरूखे, पांच कळसी, कोष्टी, भंडारी अशा ज्या जाती आहेत त्या पैकीं तुमची कोणती ?

भ०—असें काय? आमची 'जात' मराठा व 'वर्ण' ब्राह्मण.

नारा०—तें असो भटजी, पण; मी तुम्हाला विचारतों कीं तुह्मीं या भोळ्या बायकांच्या पाठी मागें व्रतादिकांचें मोहनास्त्र सोडतां हें कसें काय? उठला भटजी तो गल्लोगल्लीं फिरून मिळतील त्या बायकांला पति संबंधी पुराणोक्त वगैरे गोष्टी सांगून व्रतादि कर्में करण्यास मोहांत पाडतो ! तो

* हे लोक अनार्य असून पैकीं कऱ्हाडे ब्रह्मघ्न व चितपावन गोघ्न असल्याबद्दल स्कंध पुराण; दशमकरण; अहिंसा धर्म प्रकाश; व शिवाय मिटफर्ड, ह्यामिल्टन, उइलसन, मूलर अशा शोधक इंग्रजांचे इतिहास ग्रंथ यांत न्याय कोर्टांतील दाखल्यासह प्रतिपादन केलें आहे.

मोह (यांच्या) नवऱ्यांच्या दीर्घ प्रयत्नानेंहि कधीं कधीं जात नसतो. आमच्या बायकोचे अशाच एकानें-भट सावित्रीचें म्हणून एक व्रत करण्याविषयीं कान फुंकले व तें व्रत करणाऱ्या शेजारिणी बायाहि तिच्या पाठीस लागल्या आहेत कीं एकादाचें व्रत कर आणि आपल्या पंक्तीस येऊन भटजीची भर कर.-यामुळें तिणे माझा पिच्छा पुरविला. पण मी तिला सांगितलें "तुझ्या शेजारिणीचे नवरे शास्त्रें स्वतः पहात नाहींत." तेव्हां ते भट सांगेल तें करितात. पण शास्त्रें वाचणाऱ्या शोधक विचारी मनुष्यानें तसें करणें योग्य नाहीं. असल्या व्रतादि क्रिया कर्माचें ढोंग तर आपल्या शास्त्र ग्रंथांत मुळींच नाहीं. त्या वरून "व्रतादिकर्में हीं ढोंगें असल्या विषयींचा निर्णय भटजी व शेजारिणी बाया समक्ष झाल्यास आपण वसलीं व्रतादि ढोंगें करणार नाहीं असें तिणें सांगितले. तेव्हां भटजी कसें काय, हें सावित्री व्रत सशास्त्र आहे काय ?

(व्रत निर्णय ऐकण्यास चाळींतील सधवा विधवा बाया जमतात)

भ०—मी शास्त्र जाणत नाहीं. याच्या निर्णयार्थ शास्त्री आणतों पाहिजे तर. तो समोरच रहातो. (असें म्हणून भटजी धांवत धांवत जाऊन शास्त्र्यास घेऊन येतो व नारायण राव त्यास लोडाशीं बसवून.)

नारा०—शास्त्रीबुवा, सावित्री व्रत कोणत्या शास्त्र ग्रंथांत आहे?

शा०—पुराणांत; बहुधा मत्स्य पुराणांत असलें पाहिजे.

नारा०—काय, पुराणें जीं गोष्टींचीं पुस्तकें तीं शास्त्रें !!

शा०—हो; कां नाहीं? कांही लोक पुराणास शास्त्रें मानतात.

नारा०—पुराणाप्रमाणेंच कुराणास व बैबलास शास्त्रें मानून मूर्ख जन 'फकिरी' व 'मेरीला नवस' वगैरे करितात ते करोत. पण पुराणादि गोष्टींचीं पुस्तकें हीं शास्त्रें कीं काय एवढेंच सांगा.

श०—"४ वेद, ६ शास्त्रें, १८ पुराणें" "श्रुति-स्मृति-पुराण"

अशी शास्त्र भिन्न पुराणें असल्याची उक्ति शेकडो प्राकृत संस्कृत ग्रंथांत असतां, हें हो काय शास्त्री, तिच्या विरुद्ध सांगतां?

शा०—मी नाहीं तसें सांगत. मीं साधारण लोकांचें ह्मणणें बोललों. तुह्मा प्रमाणेंच आमचे सारखे शिकलेले शास्त्री वगैरे लोक गोष्टींच्या पुराणांस शास्त्र मानीत नाहींत.

नारा०—बरें, व्रतोपोषणादि धर्मोपदेशाचा विषय पुराणांत असतो काय?

शा०—असें कां? वट सावित्री, मंगला गौरी, हरितालका अशीं व्रतें असणारे ग्रंथ 'पुराणें' नव्हत असें काय तुमचें ह्मणणें?

नारा०—यांत काय संशय! इ०स० पूर्वी ५६ वर्षांचे सुमारास विक्रमार्क नामे राजा झाला. त्याचे पदरीं ९ पंडित होते; पैकीं प्रख्यात अमरकोशाचा कर्ता जो अमर सिंह त्याणें,

सर्गश्च प्रति सर्गश्च वंशो मन्वन्तराणिच।
वंशानुचरितं चैव पुराणं पंच लक्षणं ॥

या प्रमाणें उत्पत्ति, पुनरुत्पत्ति, देव वंश, मन्वन्तरें, इतिहास असे पांच विषय पुराणांत असावयाचे—हें स्पष्ट दर्शविलें आहे. तर व्रतें, उपोषणें, धर्मोपदेश असले—भिन्न विषय तुह्मी ह्मणतां त्याप्रमाणें पुराणांत असण्याचा कसा संभव होईल?

शा०—आपण दिलेल्या प्रमाणावरून व्रतें, उपोषणादि धर्म ह्मणून मानलेलीं कृत्यें मूळ पुराण ग्रंथांत नसावयाचीं; पण पुढें मतलबी लोकांनीं आचार, धर्मोपदेश, व्रतें, उपोषणादि विषयांची पुराणांतरीं भर घातली हें स्पष्ट होतें.

नारा०—एकून दोन गोष्टी सिद्ध झाल्या. एक—पुराणें हीं

शास्त्रें नव्हत. दुसरी–पुराणांत व्रतें, उपोषणादि धर्मोपदेश नसावयाचे. आतां मूळ मुद्दा ' सदर्हु व्रतें शास्त्रांत आहेत काय' हा राहिला त्याचें कसें काय निराकरण?

शा०—“श्रुतिस्तु वेदो विज्ञेयो धर्म शास्त्रं तु वै स्मृतिः” या मनूक्ती प्रमाणें वेद व तदनुसार आर्ष स्मृति हेच धर्म शास्त्र ग्रंथ असून त्यांत तर अशीं व्रतोपोषणें नाहींतच.

म०—धर्म सिंधु, निर्णय सिंधु, शीघ्रबोध इत्यादिकांत नाहींत काय?

श्रो०—आद्य, सर्व मान्य ऋषिकृत शास्त्र ग्रंथ झुगारून देऊन धर्म सिंधु व शीघ्र बोध बुकें शंभर वर्षांवर बाबा व काशिनाथ पाध्ये नामे कऱ्हाड्यांनीं व निर्णय सिंधु शें दीडशें वर्षांवर यंडु गुंडु द्रविडादिकांनीं धर्म मिषानें भोळ्या लोकांचें द्रव्य हरण करण्या करितां बनविलीं आहेत. आमच्या उत्तर हिंदुस्थान प्रान्तीं रामोशांचीं ‘धर्म निर्णय सिंधु, नारायणादि भव्या’ अशीं निंद्य चोपडीं कोणी हातांत सुद्धां धरणार नाहीं.

नारा०—अहो भटजी तुह्मी ऋषि कुलोत्पन्न आर्य असतां त्या द्रविडादि * अनार्य म्लेच्छांनीं केलेलीं नूतन धर्म निर्णय सिंध्वादि निंद्य लुटारू चऱ्हाटें तुह्मीं मानतां याची तुह्मास लाज वाटत नाहीं हें आश्चर्य! आतां कुराण, बायबलादि बुकांनाहि माना आपलीं शास्त्रें आणि चालवा एखादें नवें ढोंग!

* याचें सप्रमाण विवेचन “ अहिंसा धर्म प्रकाश ” ग्रंथांत केलें आहे.

ठाणे.

शा०—द्विजांस यज्ञोपवीत व सधवा स्त्रियांस कुंकूं, कंकण जसें आवश्यक आहे तद्वत् हें सावित्री व्रत आवश्यक नाहीं. [illegible] मात्र त्याची रूढि आहे. तीहि फक्त कांही दक्षिणी लोकांतच.

भ०—शास्त्र नसलें तरी "शास्त्रात् रूढिर्बलीयसी" असें वचन आहे.

नारा०—हें वचन शास्त्र कर्त्यांचें नव्हे; कारण शास्त्र कर्ता रूढि प्राधान्य ठेवील तर त्याच्या शास्त्राची ती काय मातबरी? रूढि घेणें आहे तर मध्यें शास्त्राची तरी लटपट कशाला? दारू पिणे, मांस खाणें, फकीरी घेणें, व्यभिचार, चोरी, विश्वास घात करणे ही लोकांची रूढि आहे ती ग्राह्य होईल काय?

शा०—शास्त्र ह्म० न्याय, तर्क, दूरवर दृष्टि व सद्विचार पूर्वक लिहून ठेवलेले सुनियम; तेच ज्ञाते जन आचरतात. पण रूढि ह्मणजे नीच लोकांनीं सद्विचार न कारितां प्रसंगा नुसार पाडलेली चाल; ती धर्म भ्रष्ट लोक मतलबार्थ आचरतात.

भ०—ही 'व्रत रूढि' शास्त्र विरुद्ध कशी ती सांगा बघूं?

नारा०—शास्त्र विरुद्ध व निषिद्ध तर आहेच. पण थोड्यास्या विचारानेंहि ती गैर दिसणारी आहे. तुमच्या सावित्रीव्रतधारी बायांशीं तुमच्या सावित्रीची गोष्ट कितपत मिळते ती प्रथम पहा:—

१ सावित्रीच्या बापानें पुत्रेच्छेनें सावित्री देवीची स्वतः आराधना केली व शंभर द्विजांकडून प्रत्यहीं १० महिने यज्ञ होम करविला; तुमच्या व्रतकर्त्या बायांच्या बापांनीं असें केलें होतें काय?

२ तिच्या बापाला सावित्री देवता भेटली; यांच्या बापाला कोण भेटली!

३ तिच्या बापाला सावित्री देवतेनें संतुष्ट होऊन पुत्रा बदल कन्या दिली;—तशा ह्या बाया कोणी दिलेल्या आहेत काय!

४ तिला आराध्य देवतेचें नांव ठेवलें;—तसें यानां ठेवलें आहे काय !

५ तिला नारदानें अमुक दिवशीं ( पौर्णिमेसच ) नवरा मरणार असें सांगितलें; तशी तर या बायांची मुळींच गोष्ट नाहीं !

६ तिने नवरा पौर्णिमेस मरणार असें समजून पूर्वी ३ दिवस व्रत केलें;तो प्रसंग येऊन तर देव दयेनें या सर्वांवर एकदम बितलेला नाहीं !

७ तिणें एकदांच व्रत करून नवरा जीवन्त करविला; या बाया ९९ वर्षे ( मरेपर्यंत ) व्रत करून एकीनें तरीं आपला मृत नवरा जीवन्त केला काय? अस्तु. सावित्रीला नवऱ्याचा प्राण घेऊन जाणारा यम दिसला; त्या यमापासून तिणे नवरा जीवन्त होण्याचे, राज्य प्राप्तीचे, पुत्र पौत्रादि होण्याचे, अंध सासू सासऱ्यास डोळे आणण्याचे--असे अनेक वर मिळविले तात्पर्य सावित्रीची उत्पत्ति, स्थिति, वैभव हीं तर वर सामर्थ्यानें सिद्ध झालीं असें सांगितलें आहे.तर मग या "वरहीन" बायांस स्व पराक्रमानें अर्थात् आंबे, केळीं वगैरे फळफळा वळीवर यथास्थित हात मारल्यानें व गंधाक्षता, फुलें, धूप,दीप,खाद्य यांहीं करून वट वृक्षांशी कवाईत केल्यानें व भटास वस्त्रोप वस्त्र, दान दक्षणा, फळ फळावळ दिल्यानें लाभ होण्याचा संभव कसा होईल? उलटी जवळील द्रव्याची मात्र हानी.

श्रो०—हें व्रत नवऱ्या करितां बायका करितात. तद्वत् बायकां करितां नवरे कांहीं व्रतोपोषणादि कृत्य करीत असतात काय ?

शा०—नाहीं, हो नाहीं; नवरे मात्र तेवढे निमक हराम खरे.

विधवा—आम्ही मात्र ( नवऱ्याच्या ) नावानें मरे पर्यंत रडत बसावें. आणि आपण बायको मेल्यावर स्मशानांतच ठरवा ठरवी करून अशौच सरलें नाहीं तोंच झक मारतात. त्यांना कोणी विचारता आहे !

सधवा—बायकांस पुनर्लग्नाचा प्रति बंध आहे म्हणून त्या झटतात.

( पुढे चालू. )

विधवा—पुनर्लग्न करणाऱ्या बायका नाहीं काय हें व्रत करीत? आमच्या पेक्षां तर त्यांची अधिक संख्या आहे. अशा व्रतानें कांहीं होणें नाहीं हें आतांच शास्त्री बुवांनी सांगितले. माझेंच पहा कपाळ. ३।३ दिवस उपोषणे करून ९०।६० वर्षे व्यर्थ शरीरास श्रम दिले व पैसे मेल्या भटांच्या कपाळावर घातले.

सुधवा—खरेंच हो या व्रतांत कांहीं हांसील नाहीं. उपोषणानें शरीर क्षीण होऊन एखादा रोग जडतो व द्रव्य नाश व्यर्थ होतो.

**नारायण**—"गतानुगतिका लोकाः" या प्रमाणें एकाचें कृत्य पाहून त्याचें अनुकरण दुसरा भोळसर घेतो. सारस्वत, पळसे परभू, चितपावन, कऱ्हाडे वगैरे कांहीं जातींत स्त्रियांचीं पुनर्लग्नें करित नाहींत ह्मणून विधवापणाचें त्यांजला विशेष भय असतें. तथापि त्या जातींतील सर्वच कांहीं स्त्रिया "विधवा न होण्याचें" हें वटसावित्री व्रत करित नसतात. सदहू जातींतील शुद्ध कोकणस्थ स्त्रिया अर्थात् थेट मुंबई पासून खालीं दक्षिणेस गोमंतकाच्या हद्दी पर्यंत असलेल्या स्त्रिया बहुधा ही वटसावित्रि कारितात. परंतु गोमंतकापासून पुढें दक्षिणेकडील व मुंबई पासून पुढें उत्तरे कडील त्याच जातींतील स्त्रिया "ही वटसावित्री बिलकूल करित नाहींत. तात्पर्य पुनर्लग्नास प्रतिबंध असणाऱ्या बाया सर्वच विधवा न होण्याचें हें वटसावित्री व्रत कारित असतात हें ह्मणणे अगदी खोटें. आतां ज्या कित्येक कारितात

त्या तर फक्त ( अंध ) परंपरेचें कर्म ह्मणून करितात. त्यांची खतांची खात्री बिलकूल नसते कीं अशी वटसावित्री केल्यानें आपण सुवासीनीच राहूं! कित्येक बायका " बरी बुवा ही बाई धार्मिक; तशीच पतिव्रता आहे " अशा संभावित ठक भटांच्या भुलथापी मुळें ही वटसावित्री करण्यास प्रवृत्त होतात.

श्रो०—या वट सावित्रीची कृति कशी काय ती सांगा बरें भटजी.

भ०—घरांतील भिंतीस हात दीड हातावर शेणानें सारवून वर वडाचें चित्र काढतात. व त्याला टेंकून वडाची फांदी तांदुळाचे राशीवर शोडोशी पुरून बाजूस सुपांत नारळ, तांदूळ, फळफळावळ, वस्त्रोपवस्त्र ठेवतात. व त्या सर्वांवर कांहीं शोक वगैरे ह्मणून गंध, तांदूळ, फूल अबीर, बुका टांकतात व त्या फांदी समोर धूप दीप जाळून खाद्य धरतात; आणि भटाच्या डोक्यावर गंध, फुलें, तांदूळ टांकून त्याला पैसे देतात. नंतर तो भट सदर्हु पदार्थ गोळा करून घेऊन जातो. व बायका त्या दिवशीं तांदूळ न खातां फळफळावळीवर मात्र झोड देतात. या सर्व कृतीस सावित्रीव्रत पूजा ह्मणतात. कोणी बाया ही कृति वटवृक्षा सन्निध करितात.

श्रोता—हीच काय ती नवरा जीवन्त ठेवण्याची संजीवनी! भोळ्या अज्ञान बायकांची गोष्ट असूं द्या; पण नवरे सुशिक्षित असून अशा पोरकट गोष्टी चालूं देतात हें मोठें आश्चर्य!

नारायण—नवरे पडले पाजी, अविचारी व अंधपरंपरेचे; तेव्हां त्या त्यांच्या बायका त्यांस ( नवऱ्यांस ) न जुमानतां भट सांगेल तें बेधडक करितात; मग भटाला द्रव्याची काय कमताई!

श्रो०—फक्त द्रव्याचीच नव्हे तर दुसऱ्याचीहि:—स्त्रियांच्या एकान्त वासापर्यंत भटजीची मज्जल, मग ती रात्रौ असो किंवा दिवसा असो त्याला आडकाठीच नाहीं. तरुण पोरींला, पुजेस व गोष्टींस घेऊन तो निःसंग एकान्तीं बसतो. व देवालयीं व तीर्थ यात्रेस आपल्या बरोबरहि घेऊन जातो. व संधी मिळाली म्हणजे काय तोड नाहीं. कित्येक नूतन यौवनारूढ पोरी डागिन्यासह भटाचा हात धरून गेल्याचीं उदाहरणें दृश्य आहेत!

**ना०**—अशा गोष्टी घडतात खऱ्या; तस्मात् शहाण्यांनीं आपली तरुण स्त्री, कन्या, बहीण, सून, भाउजई, अशांना निःसंग भटांच्या सन्निध एकव्या ठेवूं नयेत. कारण उघडच आहे.—

**॥ मात्रा स्वस्रा दुहित्रा वा न विविक्तासनो भवेत् ॥**
**। बलवा निंद्रिय ग्रामो विद्वां समपि कर्षति ॥** (म०स्मृ०)

**अर्थ**:—कोणत्याहि पुरुषानें, आपली माता, भगिनी किंवा कन्या अशा स्त्रिया सहवर्तमानही एकान्त स्थानीं वास्तव्य करूं नये. कारण इंद्रियगण अत्यंत बलवान आहे; तो इंद्रिय निग्रही ज्ञात्या पुरुषांलाही आकर्षून पराधीन करितो.

या प्रमाणें आपले आपणच आपल्या आप्त स्त्रियांशीं अविश्वासू; मग भटजी परका, व्यभिचारास कारणभूत असतां त्यावर एवढा विश्वास ठेवणें हा केवढा अविचार व मूर्खपणा!

सोन्नती—भटाजवळ बसण्यानें किंवा त्याच्या बरोबर देवालयीं वगैरे जाण्यानें स्त्रियांला नवऱ्या शिवाय कोठेंहि जाण्याची सवय होते: व तेणेंकरून त्या निःसंग व बेपर्वा होऊन नाटकास

वगैरे जातात. तेथें त्यांच्या देहाची हाल विपष्टा आणि जन्माचें मातेरें होऊन जातें—अशा गोष्टी दृश्य आहेत. तरी सद्धर्मी नवऱ्यांनीं आपल्या स्त्रियांशीं भटाचा कोणताच संबंध ठेवूं देऊं नये.

**ओ०**—या दक्षिणप्रांतीं धर्माचें विपरीत रूपान्तर झालें आहे. स्त्रियांनीं ह्मटलें ह्मणजे फक्त आपल्या पतिसन्निध किंवा एकटें बसून ईश्वरभक्ति करणें ती करावी. असा आद्य सनातन वेदोक्त धर्म आहे. ह्मणजे प्रातःकालीं व सायंकालीं संधी प्रकाश समयीं,

॥ **जायापती अग्निमादधीयीताम्** ॥ ( ब्रा० श्रुति. )

या प्रमाणें उभय नवऱ्या बायकोनें यज्ञ होम जानित सुवासिक स्थानीं बसून स्थीर व आनंदीत मनानें ईश्वर चिंतन व स्तवन व ध्यान करावें; व ते समयीं नवऱ्यानें ईश्वर स्तव विधायक वेदोक्त मंत्र स्वतः ह्मणावे किंवां,

॥ **वेदं पत्न्यै प्रदाय वाचयेत्** ॥ ( आ० सूत्र. )

या प्रमाणें पत्नीकडून वेदमंत्र ह्मणवावे. तर असा सत्य, सयुक्तिक विहित धर्म सोडून परक्या भटजीच्या संनिध एकान्तीं किंवा उघड कां होईना! स्त्रीनें बसणें किंवा नवऱ्यानें बसवूं देणें हें निंद्य लाजिरवाणें कृत्य सत्पुरुषास कदापि सहन होणार नाहीं. आमच्या तिकडे अशा पतिव्रत भंग करणाऱ्या निर्लज्ज स्त्रीला घरांतून हांकलून देतील. व पुरुषाची छिः थुः करतील.

**ना०**—स्त्रियांचें वपन करणें हें शास्त्र, न्याय, व तर्कसम्मत नसून अत्यंत लाजिरवाणें, निंद्य, जुलमी कृत्य होय. तें को-

णी करूं नये. व बंद होई पर्यंत तरी तरुण पोरींच्या वपनार्थ **हजामणीच्या** योजनेची जेवढी आवश्यकता आहे त्या पेक्षां अशा स्त्रियांचाच संबंध असेल तेथें भटांच्या ऐवजीं **भटणीची** योजना करणें विशेष अगत्याचें आहे. कारण हजामाशीं फक्त विधवा स्त्रियांचेंच नियमित सान्निध्य दिवसा अल्पकाळ पर्यंत, ८ दिवशीं एकदां घडतें; परंतु भटाचें संघटण एकंदर सधवा विधवा लहान मोठ्या बायांशीं बहुकाळ पर्यंत रात्रं दिवस निरंतर हित गुजाच्या गोष्टी सह वर्तमान असतें.

ना०—प्रार्थना समाजांत वगैरे आपल्या पतिसह जाऊन पृथक् स्त्री समुदायांत वसणाऱ्या साध्वी ज्ञात्या बायांस मूर्ख लोक हांसतात; पण आपल्या तरुण बायका पोरींस, सुने भाऊजयेस, वहिणी मेहुणीस अशा धन्याकच्या परक्या भटा सन्निध कीं जेथें अनाचार होण्याचा विशेष संभव अशा एकान्तवासीं--दिवसारात्रौ बेधडक ठेवण्यास मूर्खाला शरम, लज्जा लोकोपवाद व तिरस्कार वाटत नाहीं हें मोठें आश्चर्य!

श्री०—स्त्रियांस परक्या सन्निध एकटें एकान्तीं असूं देणें हें तर खरोखरच नादान काम; उगीच काय आगगाडींत स्त्रियां साठीं निराळा डबा ठेवण्याची व मुलींच्या शाळांवर स्त्रियाच शिक्षक नेमण्याची योजना झाली आहे! तर या गोष्टीचा दाखला ज्याला आपलें घर पवित्र राखणें आहे त्याणीं अवश्यमेव घेऊन सावध असलें पाहिजे.

म०—सावित्री व्रतासारखें रुढीचें कृत्य अयोग्य, हास्यास्पद, विचार व तर्क शून्य असें असल्यामुळें अमान्य: परंतु तसें नसलें तर मान्य होईल तरीना?

**नारा०**—होईल; पण तें कृत्य वेद निषिद्ध नसेल तर; एखाद्या गोष्टीचा शास्त्रानें **विधि निषेध** केला असेल तर त्या

विरुद्ध आचरूं नये ; ( ह्मणजे प्रथम विधिं घेऊं ) " अहरहः संध्या मुपासीत्।तस्मादहोरात्रस्य संयोगे संध्यामुपासीत्"साम ब्रा० या प्रमाणें उभय सायं प्रातः संधी ( संधी प्रकाश ) समयींच संध्या अर्थात् ईश्वराचें नित्य ध्यान करावें असा शास्त्रोक्त विधि असतां त्या विरुद्ध भलत्या वेळीं (दिवसा रात्रौ) करण्याची जी रूढी आह ती वर्ज करावी. "ब्रह्मचर्येण कन्या युवानं विंदते प-तिम्" अथर्ववेद।बुद्धिरूपशीललक्षणसंपन्नामरोगामुपयच्छेत्।आ०गृ०सू० या प्रमाणें वधूवरें तरुण, सज्ञान, समान रूपलक्षणाचीं असावीं अशी वेदशास्त्रोक्ति असतां त्या विरुद्ध वधूवरें अज्ञान, अल्पवयस्क असण्याची जी रूढी आहे ती अग्राह्य होय. ( आतां निषेध घेऊं)"असूर्या नामते लोका अंधेन तमसा वृत्ता । स्तॉंस्ते प्रेत्यापिगच्छंति येके चात्महनो जनाः" यजुर्वेद "माहिंस्यात् सर्वाभूतानि " नकलंज्जंभक्षयेत्"एतेषांपशूनांनाशितव्यम् य०ब्रा० तस्मान्मांसं विवर्जयेत्। तस्मान्मत्स्यान्विवर्जयेत् मनु०याप्रमाणें हिंसा किंवा मांस भक्षण कोणीच करूं नये—असा वेद शास्त्रोक्त निषेध असतां – त्या विरुद्ध क्षत्रियादिकांनीं मृगया वगैरेचे निमित्तानें व ब्राह्मणानीं यज्ञ, देवी उपासना, गौडाचार, कुलाचार वगैरेचे मिषानें प्राणी मारून खाण्याची जी दुष्ट, क्रूर, अमंगल रूढी आहे ती सर्वथैव अग्राह्य व निंद्य जाणावी.

भ०—शास्त्रांतील **विधि** व **निषेध** यांच्या विरुद्ध वागूं नये हें खरें; तर त्या प्रमाणें व्रतादिकांच्या निषेधार्थ दाखवा प्रमाण.

**नारा०**—**जीवद्भर्तरि या नारि उपोष्य व्रत चारिणि। आयुष्यं हरते भर्तुः सा नारी नरकं व्रजेत्॥** (अत्रि स्मृ०) ह्म०जीवन्त नवरा असणाऱ्या स्त्रिया व्रतें उपोषणें करितात त्या आपल्या नवऱ्याचें आयुष्य कमी करून स्वतः नरकांत पडतात.

**बाल विधवा**०—असा निषेध आहे ना! पूर्वीं असें समजलें असतें तर नाहीं हो या मेल्या भटांचे किंवा त्यांच्या पुस्तकांचे नादीं लागून ही दुर्दशा करून घेतली असती. मेल्यांच्या सांगण्या वरून त्रिदिनात्मक (३।३ दिवस उपोषणाचीं) व्रतें ५०। ६० वर्षे केलीं-- तेंव्हां कसें बरें नाहीं कपाळ फुटणार!

**तरुण वि**०—माझ्या कडूनहि तसेंच शास्त्रानिषिद्ध आचरण करविलें ह्मणून माझें कपाळ एवढें लौकर फुटलें नाहींना! भोळे घरांत ते (नवरे) सखे चुलत सासरे, दीर, पुतणे असे नावांचे मात्र पुरुष होते व शिवाय नणदे, भावे वगैरे सगे सोयरे येऊन लाडू, पोळ्या, चहा, काफी झोडीत, पण मेले सर्व अक्षर शत्रु व विचारशून्य; पशु धर्मा प्रमाणें खावें, प्यावें व निजावें. धर्माधर्मा बद्दल कांहीं विचार नव्हता, अघाडीच्या मेंढरा प्रमाणें मेला चोरटा भट सांगे तसें करावें व येऊन जाऊन बायकां पोरांस वस्त्रालंकार करणें; आपण उत्तम पागोटीं इस्त्रीचे कपडे घालणें; नाटकास, प्लेझरपार्टीस, रंडीच्या गाण्यास जाणे यांतच त्यांचें

मन गढलेलें शेवटीं ते मरून स्वर्गी गेले कीं काय कोण जाणे व आह्मांसहि तीच गती होणार काय! हाय! हाय!!

**नारा०**—अहो बाई, एक संमतीनें व विचारानें शास्त्रोक्त धर्माचार करण्याची नवऱ्या बायकोची प्रतिज्ञा विवाह समयीं होते. ती भंग केल्याचा दोष कपाळीं बसून ज्याचा अधिक अपराध त्यास अधिक विपत्ति भोगावी लागते असा आपला शास्त्राशय आहे; त्या प्रमाणें धर्म व पति विरुद्ध वागणाऱ्या बायांस इह पर लोकीं नरक अर्थात् विपत्ति भोगावी लागते.(भटजी कडे वळून)ऐकलेत ना तुह्माला बायांकडून कशा शिव्या मिळाल्या त्या! एथें चौघांत जीभ जरा तोकडी झाली; पण अन्यत्र ठिकाणीं किती अवाच्य भडिमार होईल कोण जाणें.

**भ०**—आह्माला कां त्या शिव्या! लागतील व्रतग्रंथ कर्त्यांस.

**नारा०**—ही बरी तोड काढली; पण घरोघर फिरून धर्माच्या मिषानें भोळ्यांचें मन वळवितां ह्मणून तुह्मी दोषी; आतां "अशा व्रतांनीं नवऱ्याचें आयुष्य क्षीण होतें व नरक प्राप्त होतो." असें बायकांस सत्य सांगत असतां बायका व्रतें करूं लागल्या तर मात्र तुह्मावर दोष नाहीं. पण तसें तुह्मी करितां काय?

**भ०**—नाहीं; कारण आह्माला शास्त्र निषेध माहित नव्हता; आतां तो बायकांला सांगूं; मग पोटाला मिळो न मिळो.

**श्रो०**—व्रत शब्दाचा वास्तविक अर्थ कसा काय आहे?

**नारा०**—व्रत ह्म०आचरण नियम, उदाहरणार्थ **अहिंसा व्रत** ह्म० हिंसा किंवा मांस भक्षण न करणेचा दृढ निश्चय. **सत्यव्रत** ह्म०यथार्थ योग्य न्यायरीत्या सदैव वागण्याचा दृढ निश्चय. **ब्रह्मचर्यव्रत** ह्म० विषय त्याग व वेदाध्ययन प्रतिज्ञा. **एकपत्नि व्रत** ह्म० एका विवाहित स्त्री शिवाय अन्य स्त्रीचा अभिलाष न करणें; **पतिव्रत** ह्म० एका पति शिवाय अन्य पुरुषेच्छा न करणें; **अस्तेय व्रत** ह्म०चोरी न करणेचा मनोनिग्रह. हींच काय तीं खरीं व्रतें; परंतु सांप्रत धूर्त स्वार्थी लोकानीं भोळ्या बायका पुरुषांस ठकवून द्रव्यादि हरण करण्या करितां काल्पनीक देवदेवतोद्देश व लाभ दर्शक रचलेल्या गोष्टी ज्यांत स्त्रियांनीं उपोषणें ह्म० फळफळावळ खाऊन-भटजीस दान दक्षणा, तांदुळ, फळफळावळ, वस्त्रोपवस्त्रें सुवर्ण, रौप्यादिधातु मूर्ती व पात्रें द्यावीं ह्मणजे इह परलोकीं सुख मिळतें असा उल्लेख केला आहे, अशा गोष्टींस व्रतें ह्मणण्याचा प्रघात घातला आहे. मंगलागौरी, हरितालिका, अशा नावांनीं अशाच मतलबी गोष्टी रचलेल्या आहेत त्या सर्व सावित्री व्रताप्रमाणें अग्राह्य होत.

श्रो०—भटजी, हरितालिका कोठें कशी काय झाली सांगा बघूं.

भ०—आम्हाला नाहीं ठाऊक. आम्ही काय ग्रंथ पडलों आहों!

**ना०**—भटजी हे **गंध फुले** होत ह्मणजे कांहीं श्लोक, आर्या व केशव, नारायण, विष्णु अशीं नांवें उच्चारून गंध, तांदुळ फुलें टाकणारें व **दक्षिणा उपटे** ह्मणजे "हिरण्य गर्भ गर्भस्थं

हेमबीजं विभावसोः । अनंत पुण्य फलदमतःशांतिं प्रयच्छ मे ”॥ असें बोलून पैसे गोळा करणारे होत. आतां हे जर शिकलेले विचारी, खरे, धर्मिष्ठ असते तर अशा प्रकारें भोळ्या बायकांला ठकवून अन्यायानें पैसे मिळवून त्यांनीं आपलीं पोटें भरलीं नसतीं. अस्तु. आतां हरितालिकेची काहाणी थोडी सांगू. भाद्रपद शुक्ल तृतीयेस भट सांगेल त्याप्रमाणें कोणी बाया **हरितालिका** व कोणी **हरिकालिका** करितात. व्यासावर भोळ्या लोकांचा भरंवसा तेव्हां त्या व्यासाच्या नावाच्या भविष्योत्तर पुराणांतील ह्मणून कांहीं श्लोक रचलेले दृष्टीस पडतात. या श्लोकांत भाद्रपद शुक्ल तृतीयेच्या “हरिकालिका व हरितालिका” अशा नावांच्या भिन्न २ गोष्टी आहेत; पैकीं हरिकालिका प्रथम पाहूं.

धर्मराजा कृष्णास विचारतो; त्यावरून कृष्ण ह्मणतोः—

॥ आसीद्दक्षस्य दुहिता काली नाम सुकन्यका । वर्णेनापि च सा कृष्णा नव नीलोत्पल प्रभा ॥ त्र्यंबकाय च सा दत्ता महादेवाय शूलिने॥

या प्रमाणें दक्षाची काली नावाची कन्या महादेवाला विवाह करून दिली. एके समयीं ती देवांच्या सभेंत असतां,

॥ तत्र स्थाना व्हयामास नर्मणा त्रिपुरान्तकः । काली नीलोत्पल श्यामां गण मातृ गणान्विताम् ॥ एह्येहि त्वं मतिः कालीं भिन्न कृष्णाञ्जन प्रभे । इत्येव मुक्ता सा देवी व्रीडिता क्रोध मानसा । निश्वासोच्छ्वास ताम्राक्षी बाष्प गद्गदया गिरा । रुरोद सस्वनं बाला०

या प्रमाणें तिला “ तूं काळ्या निळ्या रंगाची होय ” असें नवऱ्यानें ह्मटल्यावरून ती रागावून मोठ्या स्वरानें रडूं लागली व,

॥ निक्षेप देहं रोषेण ज्वालिते हव्य वाहने । पुनः पर्वत राजस्य गृहे गौरी बभूव सा । सा बभूव महावीर्या देवी कात्यायनी पुनः ॥

या प्रमाणें तिणे रागानें आपला देह जाळला व नंतर पर्वत राजाचे घरीं आपण गौरी बनली व त्या नंतर कात्यायनी झाली. आतां ही मूळ **काली** "हरेर्नाम्नः" या प्रमाणें हरिनामापासून झाल्यामुळें ती पुढें **हरिकालिका** नामाभिधान पावली. तेव्हां,

॥ भाद्रपदस्यैवं तृतीयायां समाचरेत् । रत्नधान्यैः स वैरूढैः कृत्वा विहित शाद्वले । खर्जूरै नारिकेलैश्च फलैश्च मधुरै स्तथा । गन्धैः पुष्पैः फलै धूंपै नैवेद्यै मोदकादिभिः । दद्याद्विप्राय दक्षिणाम् ॥

या प्रमाणें सुवर्ण, धान्य, फळफळावळीसह हरिकाली मूर्तिवर गंध तांदूळ फुलें घालून भटजीला पैसे द्यावे तेणें करून,

॥ पुत्रपौत्र सुहृन्मित्र नप्तृ दौहित्र संकुलम् । साग्रं वर्ष शतं जीवेद्रोग युक्ता महीतले । ततोवसाने देहस्य शिवलोके महीयते ॥

या प्रमाणें मुली, मुलगे व नातवंडें होतात व शंभर वर्षें पर्यंत या जगांत जीवन्त रहाण्यास मिळतें व मेल्यानंतर स्वर्ग मिळतो केवढा तरी सुलभ उपाय हा!(१००वर्षें जीवन्त राहण्याचा)

**वृद्धा०**—पोरांच्याच आशेनें ही "हरिकालिका" १०।६०वर्षें केली, तीं पोरें एकीकडेसच राहिलीं: पण उपोषणानीं मला क्षय रोग लागला व खोकेनें वरचेवर जीव जातोसें वाटतें. सून ती लहान पोरी--तिला आतां पासूनच त्या उपोषणाच्या त्रासानें

कडकी लागली आहे. मला तिची मोठी भीति आहे. अहो! माझ्या देखत अशा तरण्या पोरी उपोषणानें कितीस्या तरी खाऊन टाकल्या! कोठें मेलें तें १००वर्षे आयुष्य गेलें! सर्व ठकबाजी खरोखर आह्मा बायकांला हे कारटे उपाध्ये वेड लावतात.

**श्रो०**—अहो बाई तुह्माला या जगांत होणाऱ्या गोष्टींचा अनुभव आला ना कीं व्रतोपोषणांनीं "पोरें होत नाहींत" हा! तर त्याच प्रमाणें "मेल्यावर स्वर्ग मिळतो" या लिहिण्याचा परिणाम. येथली प्रचीती मिळत नाहीं. ती पुढली मेल्यानंतरची मिळणार आहे! काय पोर चेष्टा ह्या!!

**श्रो०**—आतां **हरितालिका** उरली तिची कहाणी कशी?

**ना०**—कोणी एका पर्वतस्थ शंकराला त्याची बायको गौरी ह्मणाली कीं "मी तुमची बायको कोणत्या उपायानें झालें?" हें कृपा करून सांगा; तेव्हां शंकर ह्मणतो कीं,

॥ पार्वतित्वं यथा बाल्ये परमाचरिती तपः। धूम्रपान मधो मुखी अन्न पान विवर्जिता। कस्मै देया मया कन्या एवं चिंता तुरो भवत्॥ शृणु शैलेंद्र मद्वाक्यं विष्णुना प्रेषितो स्म्यहं। योग्यं योग्याय दातव्यं कन्यारत्न मिदं त्वया। वासुदेव समो नास्ति ब्रह्माविष्णु शिवादिषु। तस्मै देया त्वया कन्या अत्रार्थेसंमतं मम॥

हे पर्वतराजकन्ये तूं बालपणीं अन्नपान वर्ज करून, धूर खाऊन व खालीं मान करून हिमालयीं तप आचरीत होतीस. पुढें ही कन्या कोणाला द्यावी अशा चिंतेंत बाप असतां तेथें कोणी नारद आला व त्याला ह्मणाला कीं आपल्याला विष्णूनें पाठवि-

ला आहे. वासुदेवा समान अन्य देव नाहीं; तस्मात् त्वां आपली कन्या त्याला द्यावी. माझीहि संमति आहे; हें ऐकून पर्वत कबूल झाला, व तयारी करून तिला वृत्तांत कळविला. तेव्हा ती,

॥ श्रुत्वावाक्यंपितुर्देवीगतासासखिमंदिरं । भूमौपतित्वासा देवीविललापातिदु:खिता॥सखिशृणुममप्रीत्यामनोभिलाषितंयथा । महादेवंचभर्तारंकरिष्येहंनसंशयः । एतन्मेचिंततंकार्यंतातेनकृतमन्यथा ।तस्माद्देहपरित्यागंकरिष्येहंसखिप्रिये॥

(असें)पित्याचें भाषण ऐकून सख्यांच्या खोलींत जाऊन जमिनीवर पडली व शोक करूं लागली व ह्मणाली"मला महादेवच नवरा पाहिजे. माझे इच्छे विरुद्ध बापानें मला वर केला; तेव्हां मी जीव देईन." हें तुझें भाषण ऐकून सख्यांनीं तुला बापा नकळत गुह्य रानांत नेली. (हरिता— नेली, आलिभि:— सख्यांनीं, ह्मणून हरितालिका ) तेथें नदी किनारीं, तिणें ( त्वां )

॥ संस्थाप्यवालुकालिंगंपार्वत्यासहितंमम । भाद्रशुक्लतृतीयायामर्चयंतीतुहस्तभे ॥ व्रतराजप्रभावेनआसनंचलितंमम । संप्राप्तोहंतदातत्रयत्रत्वंसाखिभि:सह । प्रसन्नोस्मिमया प्रोक्तंवरंब्रूहिवरानने । यदिदेवप्रसन्नोसिभर्ताभवमहेश्वर ॥

माझें लिंग पार्वतीसह ( कितीस्या तरीं पार्वत्या ह्या! )करून त्यांजवर गंध फूल घातलें; त्या प्रतापानें मी आसनासह तुझ्याकडे गेलों व तुला वर दिला. तेव्हां तूं मला ह्मणालीस कीं " माझा नवरा हो"त्यावरून मी नवरा व तूं माझी बायको झाली आहेस.

श्रो०—या गोष्टी वरून सांप्रत लग्न झालेल्या ज्या बाया ही "ह-

रितालिका करितात त्या तर गौरी प्रमाणें बापानें करून दिलेला नवरा आपल्याला नको ह्मणून करितात असें स्पष्ट होतें.

भ०—पुढील जन्मीं महादेव नवरा मिळावा असा हेतु आहे. मानव पति सोडून देव पति इच्छिण्यांत दोष नाहीं असें ह्मणतात.

श्रो०—गौरीनें मेल्या नंतरचा नवरा इच्छिला नव्हता; तर त्याच जन्मींचा : तेव्हां ह्या तुमच्या बाया याच जन्मीं दुसरा नवरा मिळावा ह्मणून हरितालिका करितात असें होतें. दुसरें—सर्वच स्त्रिया महादेवाच्या बायका झाल्या तर त्या एकट्याला कशा पुऱ्या पडतील. व तुह्मांला या जगांत कोठल्या मिळतील!

ना०—अहो तें सर्व पुढचें: पण प्रथम या स्त्रिया त्या गौरी प्रमाणें फक्त धूर खाऊन खालीं मान करून व बापानें दिलेल्या नवऱ्या कडे न जातां अर्थात त्याच्याशीं कोणताच संबंध न ठेवतां तीव्र तपश्चर्या करीत असतात काय? नाहीं हें उघडच आहे. मग तें बोलणें तरीं कशाला पाहिजे?

श्रो०—बायकांला शंकर, विष्णु, इंद्र, वरुण असे देव नवरे पाहिजेत तद्वत् पुरुषांना पार्वती, लक्ष्मी, इंद्रायणी अशा देवी बायका पाहिजेत असतील तर या प्रांतीं?

ना०—यांत काय विचारतां! तो हि प्रकार मग असायाचाच. दान दक्षिणेनें देवांगनांची रास पडते ह्मणे पुराणांत!

सो०— या भाद्रपदमासीं शुक्ल ५ मेस "ऋषि पंचमी" नांवें दुसरें एक व्रत खुळ्या स्त्रियांस लावलें आहे: प्रथम उपाध्ये बुवा कांहीं श्लोक ह्मणून मल विसर्जन, दंत धावन, मृत् स्नान ( माति

ची आंघोळ!) करवून गाईचें मलमूत्र खावविनात; नंतर त्यांच्या-वर गंध फुलें घालून अत्रि वसिष्ठादि ७ ऋषि व एक अरुंधती स्त्री मिळून आठांच्या नांवांच्या भिन्न भिन्न सुपाऱ्या, नारिळ, तांदूळ, ठेवतात व त्या सुपाऱ्यांस पाणी, दूध, तूप, मध, साखर, अशा ५ जिनसांचीं आंघोळ घालतात व खायाला देऊं करतात. नंतर कांहीं श्लोक ह्मणून पुनः आंघोळ घालून नेसण्यास वस्त्र देतात! चंदन, कुंकू, हळद, बुका, काजळ लावतात व खाण्याचे पदार्थ जवळ धरून सुपाऱ्यांस सांगतात कीं हे पदार्थ-खा! अशी क्रिया करून शेवटीं "नानाशाकसमायुक्तंवाणकं द्विजवर्यायसहिरण्यंददाम्यहम्।अन्नंसुवर्ण पात्रस्थं सवस्त्रफलदक्षिणं।वायनंगौरिविप्रायददामिप्रीतयेतव ॥असें ह्मणून बायकांस भांबवून भाजीच्या देंठा पासून तों १।१, २।२ तोळे सुवर्णपात्र पर्यंत मिळेल तें नागवितात. आतां अशा नागवणी करितां भीति व लालूची दाखविली आहे ती अशी कीं,

॥ब्रह्महत्यांपुराशक्रोवृत्रंहत्वाचप्राप्तवान्।ब्रह्माणंसमुपागच्छदात्मनःशुद्धिकारणात्। विभज्यब्रह्महत्यांतुचतुर्धाचचतुर्मुखः।वन्हेःप्रथमज्वालासुजातासुच्चनदीपुच।पर्वतेषुचराजेन्द्रनारीरजसिपार्थिव।प्रथमेहनिचांडालीद्वितीयेब्रह्मघातकी।तृतीयेरजकीप्रोक्ताचतुर्थेहनिशुध्यति॥ अज्ञानाज्ज्ञानतोवापि जातंसंसर्गपातकं। तत्पापसंक्षयार्थंहिकार्येयमृषिपंचमी ॥

या प्रमाणें पूर्वी इंद्राला वृत्र घाताची ब्रह्म हत्या जडली. तन्निवारणार्थ तो ब्रह्मयाजवळ गेला. तेव्हां ब्रह्मयानें त्या ब्रह्म ह-

त्येचे ४ तुकडे केले. पैकीं एक अग्नीच्या प्रथमच्या ज्वाळेंत, २ रा–नदींत, ३ रा – पर्वतांत व ४ था–स्त्री रजस्रावांत; अशी वांटणी केली. तेव्हां रजस्वला स्त्री ही प्रथम दिवशीं चांडाळीण, २ ऱ्या दिवशीं ब्रह्म घातकी, ३ ऱ्या दिवशीं धोबीण व ४ थ्या दिवशीं शुद्ध असते. अशा निंद्य रजस्वलावस्थेंत जाणून किंवा नकळून स्पर्श दोष घडतो ह्मणून तन्निवारणार्थ ही ऋषि५मी करावी." आतां या लिहिण्यावर विशेष भाव बसण्याकरितां पुष्टिकरणार्थ १।२ जुन्या पुराणोक्त ह्मणून गोष्टी सांगितल्या आहेत:-

कोणी एक स्त्री रजस्वला असतां घरांत स्पर्शूं लागली त्या दोषामुळें ती मेल्यावर अन्य जन्मीं कुत्री झाली व तिचा नवरा बैल झाला. व तीं उभयतां आपल्या पुत्राचे घरीं येऊन राहिलीं. एके दिवशीं त्या उभयतांला कांहीं अपराधामुळें खावयास दिलें नाहीं. मग रात्र झाल्यावर कुत्री बैला पाशीं जाऊन "सुनेनें मला आज उपवासी ठेवलें" असें गाऱ्हाणें सांगूं लागली. तेव्हां बैलहि तीच रड गाऊन ह्मणाला कीं "पुत्राने मला नांगरताना फार मारलें व खायालाहि घातलें नाहीं"–हें उभयतांचें भाषण पुत्रानें ऐकून तीं उभयतां आपलीं माता पितरें असें त्यास समजलें तेव्हां तो फार खंती होऊन त्यांची सुटका होण्या करितां तो सप्त ऋषी जवळ गेला त्यांनीं त्यास पूर्व जन्मींची कथा कळवून ॥ एतयोर्मुक्तिकामार्थेकुरुत्वमृषिपंचमीम् । भार्ययासहविप्रेन्द्रऋषीन्संपूज्ययत्नतः ॥ या प्रमाणे ऋषि पंचमी व्रत बायको सह करण्यास सांगितलें तें त्याणें केल्यावरून

" मुक्ता माता श्वयोनिता । विमानवरसंस्थिता । पितापि पशुयोनितः स्वर्गप्राप्तौ व्रतपुण्यैः " याप्रमाणें तीं पशुयोनि सोडून स्वर्गी गेलीं.

**श्रो०**—या ऋषि ५ मी कथेवरून असें दिसून येतें कीं पशूंस ( बैलाकुत्र्यांस ) पूर्व जन्म स्मरण असतें तसें मनुष्यांस नसतें, ह्मणून मनुष्याहून पशु अधिक ज्ञानी होत ! तेव्हां भटजी कसें, तुमच्या पेक्षां हे कुत्रेबैल ज्ञानी कीं नाहीं? आतां पशु कोण!

**भट**—आह्मी अशा असंभावी मतलबी गोष्टींवर विश्वास ठेवणारे; या करितां आमची ही अशी फजीती व्हावयाचीच.

**श्रो०**—दुसरें, ही ऋषि ५ मी "भार्यया सह विप्रेन्द्र ऋषीन् संपूज्य यत्नतः" या प्रमाणें बायकोनवऱ्यानें मिळून करावी असें आहे; तर मग ह्या ज्या विधवा सकेशा—निर्केशा बाया ही ऋषि पंचमी करितात त्यांजला नवरा कोठें असतो बरें !

**ना०**—बायको मयत असली ह्मणजे, जेव्हां तिचा नवरा कांहीं धर्म ह्मणून कृत्य करण्यास लागतो तेव्हां आपल्या मयत बायकोच्या ऐवजीं सोन्याची एक पुतळी ( स्त्रीलिंगी! ) कनवटीस लावून बसतो. त्याच प्रमाणे नवरा मयत असला ह्मणजे, जेव्हां त्याची बायको कांहीं कर्म करिते तेव्हां आपल्या मयत नवऱ्याच्या ऐवजीं सोन्याचा होन (पुल्लिंगी!) आपल्या गळ्यांत बांधून ती बसते ! खरें ना भटजी हें ? सत्य सांगा.

**भट**—कित्येक प्रान्तीं हा विलक्षणीक प्रकार भटांनीं चालू केला आहे. आह्मी भट, तरीं तो आह्माला नाहीं पसंत. तु-

म्ही ह्मणतां तें खोटें नाहीं कीं " हे भटोबा भोळ्या स्त्रीपुरुषांला हरतऱ्हेनें फसवून द्रव्यादि हरण करितात ते " !

**श्रो०**—विधवा स्त्री आपल्या मयत नवऱ्या ऐवजीं होन धारण करिते तशी सधवा स्त्री आपला नवरा काठें बाहेर गेला असला तर त्याच्या ऐवजीं काय बरें ती धारण करते भटजी !

**भट**—होन; आणखी काय धारण करणार !

**श्रो०**—अहो, मयत नवऱ्याबद्दलचा होन जीवन्त नवऱ्या ऐवजीं कसा चालेल? जीवन्त व मयत नवरे सारखे काय ?

**सो०**—मतलबी भटांनीं स्वोदर पूर्त्यर्थ ढोंगें माजविलीं आहेत; त्यांत कसला हो तर्क व न्याय व युक्ति असणार ?

**श्रो०**—असें तर खरेंच. आतां नारायणराव सांगा बघुं दुसरी ऋषि पंचमीची गोष्ट कोणती ती ?

**ना०**—एका ब्रह्मांड पुराणांत ह्मणून अशी एक गोष्ट आढळते कीं, सुशिला नामे एक पतिव्रता स्त्री होती. तिला मुलगा मुलगी अशीं दोन अपत्यें होतीं; त्या दोहोंचीं लग्नें केलीं. मुलीला थोड्याच कालीं वैधव्य प्राप्त झालें. तेव्हां तिचीं मातापितरें आपलें घर पुत्राधीन करून तिच्या सहवर्तमान वनांत राहूं लागलीं, मुलगी मातापित्याची शुश्रुषा करीत असतां एके समयीं,

" सुता बहुमतं तस्यापितु:शुश्रुषेणरता । शुश्रूषणंतत: कृत्वा परिश्रांता,कदाचन।निशीथे किल संसुप्ता कामिराशिरजायत्"

या प्रमाणें आईबापांची अनन्य सेवा करून ती मुलगी दमली व रात्रौ गाढ झोंपी गेली. तेव्हां तिच्या शरीराची किड्यांची

रास झाली. तें पाहून तिची आई फारच विलाप करूं लागली व शेवटीं तेथें कोणी सप्त ऋषि होते त्यांजला जाऊन विचारूं लागली कीं, आपल्या कन्येचे किडे होण्याचें कारण काय? त्याजवरून ते ऋषि सांगूं लागले कीं,

"प्रागियं सप्तमेऽतीते जन्मनि ब्राह्मणी ह्यभूत्। तदभागाद्रपदे संजाताच रजस्वला।अस्यास्तत् प्रभावेन जायते कृमिवद्वपुः। रजस्वला च भावेन युक्ता भवति सानघ।प्रथमेऽह्नि चांडाली द्वितीये ग्राम शूकरी।तृतीये रजकी प्रोक्ता चतुर्थे ह्नि शुध्यति। तथानया सखीसंगाद्व्रतं दृष्ट्वावमानितं। दृष्टव्रत प्रभावेन जाता द्विजकुलेमले।अवमानाद् व्रतस्यास्य कृमिराशिमयाधुना"

( याप्रमाणें ) ती मुलगी गेल्या सप्त जन्माचे ठायीं ब्राह्मणी होती. तेव्हां एकदां दुर्दैवें करून ती भाद्रपद मासीं रजस्वला झाली. त्याच्या योगानें तिचें शरीर कीडे होऊन गेलें. कारण रजस्वला स्त्री प्रथम दिवशीं चांडाली, दुसरे दिवशीं डुकरी, तिसरे दिवशीं धोबीण असते. तेव्हां अशा अमंगल स्थितींत असतां सखी संगानें ५ मी व्रत पाहून त्याचा तिणें धिःकार केला. त्यामुळें आतां तिचें शरीर कीटकरूप होऊन गेलें. व्रत पाहिलें त्याप्रभावानें मात्र ती शुद्ध द्विजकुलीं जन्मास आली तस्मात्

"ऋषिपंचमीति विख्यातं सर्वपापहरं परं। येन चीर्णेन राजेन्द्र नरकान्निव्यपोहति। कुरुते या व्रतं चैतत्सा नारी सुख भागिनी। रूप लावण्य संयुक्ता पुत्र पौत्रादि संयुता। व्रतस्यास्य प्रभावेन जातिं स्मरति पौर्विकीम्। "

याप्रमाणें ऋषि पंचमी करावी ह्मणजे नरक प्राप्ति होत नाहीं. जी कोणी नारी हें व्रत करिते तिला अखंड सुख सौभाग्य प्राप्त होतें. मुलगे, नातु, पणतु होतात व पूर्व जन्माचें स्मरण होतें.

श्रो०—(बायांकडे) अहो तुह्मी ही ऋषि ५ मी करितां काय?

बा०—आमची ही ५मी कडकडीत आहे. अन्नाचा लेश नाहीं.

श्रो०— तर या दुसऱ्या कथेवरून "व्रतस्यास्य प्रभावेन जातिं स्मराति पौर्विकीं" या प्रमाणें पंचमी कर्त्या बाईला पूर्व जन्माचें स्मरण असतें: त्या प्रमाणें तुह्मांला असलें पाहिजे तर मग आतां! सांगा बघूं तुह्मी पूर्व जन्मीं कोण होत्या त्या ?

सो०—तुमचे नवरे पूर्व जन्मीं कोण होते तेंहि सांगा हो !

श्रो०—नवरा परकी: तो काय त्यांच्या आईबापांला झाला आहे ? त्याच्या पूर्व जन्माची स्मृति त्याच्या बायकोला कशी असेल ? नवरा कोण होता तेंहि समजतें काय हो बाई तुम्हांला ?

वृद्धदाया—कसली स्मृति ! सर्व पोर खेळ ! आमची नको चेष्टा करूं. नाहीं मेल्या भटांच्या नादीं लागून भलतेंच करणार आतां पासून. याच जन्मांतलें बाळपण कोणाला आठवत नाहीं व आह्मां सारख्या ह्मातान्यांला तरुणपणांतील तर काय पण काल परवांच्या गोष्टी या साठी मुळें आठवत नाश्या झाल्या. याप्रमाणें या जन्मांतल्या स्मृतीस ठिकाणा नाहीं तो पूर्वजन्माची-स्मृति रहणार आहे ! काय गुलामा भटांची ठकविद्या ही !

श्रो०—अहो बाई, तुम्ही वृद्ध; या विपष्टेला फार दिवस नाहीं रहाणार; पण या तरूण पोरी--तुमच्या मुली, सुना यां-

ची आतां पासून विटा वीट व विपष्टा करून टांकली पाहिजे. कारण तुम्हीं उद्यां मयत झालां म्हणजे हे ठक भट व त्यांच्या अनुयायी बाया त्यांला सांगावयाच्या कीं " तुमच्या आई सासूचें व्रतोपोषण आतां पाठीं पडलें तुम्ही त्यांच्या सुना मुली; तेव्हां तें आतां चालवा: वंश मागतात तो कशाला मग? तुम्हाला हि मुलें व्हावयाचीं " अशा प्रकारचें ईर्षेचें, भुलथापिचें व पोरें बाळें होण्याचें बोलणें ऐकून पोरां बाळांस वसवसलेल्या तरण्या सुनां पैकीं एक म्हणते "मी बाई, सासूबाईची ऋषि पंचमी घेणार; दुसरी म्हणते मी सोमवार घेणार; तिसरी म्हणते मी दोनी ( पंचमी व सोमवार )घेतें." या प्रमाणे चढाचढी पाहून ठक भट ( खुळें मिळालीं म्हणून ) हर्ष युक्त होऊन त्या बायांना " अधिक स्याधिकं फलं" हा मंत्र सांगून सर्व उपोषणांची धाड त्या तरूण कोमल पोरींवर घालून आपला स्वार्थ साधतात.

**सो०**--सासूबाईला वंश झाला त्या प्रमाणें आपल्याला हि व्हावा असा त्या सुनांचा पुढील लांबचा उद्देश. पण त्या तारूण्याच्या भरावरील पोरींला परक्या भटाजवळ बसून चाळे करावयाला मिळाले पाहिजेत ना सांप्रत ! पुरुषाला अन्य स्त्री प्राप्तीचा जसा विशेष संभव असतो तसा बायकोला भटा शिवाय असत नाहीं म्हणून या तरूण पोरी कोणत्या हि मिशानें भटाशीं संबंध ठेवण्यास झटत असतात. खरें ना बाई ?

**बाया**--हा प्रकार तर सांप्रत तरूण पोरींत जारीनें सुरू आहे. ह्याचा बंदोबस्त नवऱ्यानें केला तर सहजीं होणार आहे.

**सासू**--एखादे सासूने कारव्या भटाच्या सांगण्यावरून ए-खादें वाईट काम केलें तर त्याचें मात्र अनुकरण मेल्या सुना करितात; पण तिच्या चांगल्या स्तुत्य कृत्यांचा कित्ता घेत ना-हींत. पहा--सासूने पहाटेस आळस सोडून सूर्योदया पूर्वी आं-थरुणा वरून उठावें : पण सुनांनीं प्रहर दिवस पर्यंत आळ-साने बिच्छान्यावर लोळत पडावें; सासूने प्रातःस्मरण करावें: पण सुनांनीं चाळे ढवळे व चेष्टा मस्कऱ्या कराव्या; सासूने गृह्य कृत्य अर्थात झाड लोट पाणी धुणी वगैरे करून आपली श-रीर प्रकृति सुदृढ, निरोगी व सतेज ठेवावी: पण सुनांनीं आ-ळसी बसावें, लोळावें व एकान्त मल विसर्जनाला लागणाऱ्या तांब्याभर पाण्यासाठीं सुद्धां बालदा-- सखजी ( चाकरा ) वर अवलंबून रहावें, आणि तेणेकरून शरीर शिथील, म्लान, उ-दास असें ठेवून अनेक रोग जडवून घ्यावे व लौकरच या ज-गांतून नवऱ्याच्या वगैरे कामास निरुपयोगी व्हावें; सासूने ४ माणसाचें अन्न स्वतः शिनवून दुसऱ्याच्या तोंडांत घालावें : पण सुनांनीं दुसऱ्या करितां अन्न शिजविणें राहुं द्या परंतु स्वतः क-रितां सुद्धां शिजविण्याची मारामार, फार तर काय कोणी अन्न शिजवून तोंडांत उंडी ( घांस ) घालतो कीं याची वाट पहावी; सासूने " दानेन पाणी न तु कंकणेन "या प्रमाणे दीन लाचार निराश्रित मनुष्याला यथा शक्त्या हस्तानें अन्न वस्त्र देऊन हात शोभवावे : पण सुनांनीं पाटल्या, बांगड्या, गोट, कंकणे का-रल्या , चंदन चुडे, चोळबंद वाकी असे सोन्या मोत्याचे डागिने

घालून हात शोभवावे ; सासूने सासू सासऱ्याशीं, नणदा जावा-शीं, परक्या गृहस्थाशीं जस जसा मर्याद शीलपणा व सभ्यप-णा ठेवावा तस तसा ठेवून वागावें : पण सुनांनीं त्या सर्वांशीं निर्लज्ज-उद्धट- व असभ्यपणानें वागावें ; सासूनें साधें, सभ्य नेसण पांघरूण परिधान करून गृहस्थी बाण्यानें वागावें : पण सुनेनें लज्जा भंग करणारीं अशीं सर्वांग दर्शक वस्त्रें अपुरीं धारण करून वेश्या-कलावंतीचे नखरे करावे ; सासूने आपल्या वडिलाचें रीति भातीचें बोलणें सोसावें: पण सुनांनीं आपल्या सासू सासऱ्यादि वडिलांच्या तोंडांशीं तोंड देऊन अमर्यादा करावी; सासूने मर्यादेच्या एकान्त स्थानीं राहून सलज्ज पणें गृह्य कृत्यें करावीं : पण सुनांनीं चार चौघांत उघड फिरून नि-र्भीडपणें चावटगिरी करावी; सासूनें काल क्रमणार्थ ईश्वर भक्तिपर पोथी पुस्तक वाचावें : पण सुनानीं "सुंदरमंचक" "मम प्राणनाथ " विलास रंग भरित"अशीं शृंगार दर्शक नाटकी पदें बोलून खिदडावें—अशा प्रकारें आली कडील सुनांची शोचनीय स्थिति झाली आहे. तस्मात् आतां पासूनच आम्ही त्यांला सांगत अहों. पण ऐकतो कोण ! आंतड्या फाडून आलेले स्व रक्ताचे पोर मेले ऐकत नाहींत ; मग त्या परक्या रक्ताच्या मेल्या पोरी आमचें ऐकणार आहेत काय !

**श्री**०—नवरे मेले बायल बुद्धे : म्हणून हा विघाडा होतो.

**नारा**०—ह्या बिघाड्याचें मूळ कारण ठक भट. बायकांला हे भटोबा कांहीं तरी आपल्या दान दक्षिणा प्राप्तीचें काम सां-

गतात. बायका भोळ्या पडल्यामुळें भटास अनुसरून नवऱ्याला " अमुक आणा, तमुक आणा, मी अमुकच करतें, तुह्माला काय ! तुह्मी सुधारलां " असा त्रास देतात. तस्मात् या ठक भटांला नवऱ्यानीं आपल्या दारावर सुद्धां उभें करूं नये.

**नवरा**–भटाशीं संबंध न जडलेल्या नवीन पोरी पुढें अशा शिक्षणानें भटांच्या नादास नाहीं लागणार, पण आमच्या बायकांस भटाचा एकदां नाद लागला तो कसा सुटेल ?

**ना०**–अहो नवरे! ईश्वरानें पुरुषां प्रमाणें बायकांलाहि ज्ञान, विचार, तर्क व बुद्धि हीं दिलीं आहेत. तस्मात् त्यांस शांततेनें व दृढ निश्चयाने धर्माधर्म व नीति सांगितली तर त्या खरोखरच विचारावर येणार आहेत. पुरुषाला पत्नि व्रताचा अभिमान नसतो पण, बायकांना आपल्या पतिव्रताचा एवढा जबर अभिमान असतो कीं त्या पुढें त्या आपल्या जिवाची सुद्धां पर्वा करीत नाहीं. तेव्हां तुम्ही आपल्या बायकांला सांगा कीं, " धर्मे च कामे च नाति चरामि " म्हणजे धर्म व काम विषय हे पाति शिवाय अन्यत्र करणार नाहीं अशी प्रतिज्ञा विवाह कालीं असते व शिवाय धर्म संबंधी कृत्यें स्त्रीनें फक्त आपल्यापाति सन्निध करावीं अशी वेदाज्ञा आहे (पृष्ठ२०)तर अशा शास्त्र विवाह प्रातिज्ञे विरुद्ध भटा सन्निध बसून धर्म कृत्य केल्यानें धर्माच्या बरोबरीचा जो काम विषय तो केल्या सारखा होऊन पातिव्रत्य भंग अर्थात् जार कर्म केल्या सारखें होतें असा स्पष्टार्थ बायकोला सांगा म्हणजे ती समजेल कीं भटा

सन्निध बसून धर्म मिशाने गंध फुलें तांदूळ अबीर बुका यांशी कवाइत केल्यानें आपल्याला जार कर्माचा दोष लागतो" आणि मग ती सभ्य बायको भटाजवळ बसण्याचें राहूं द्या पण त्या दुष्ट मेल्याचें तोंड सुद्धां पहाणार नाहीं. तात्पर्य अशा थोडक्या उपायानें तुमची स्त्री तुमच्या कह्यांत राहील बरे !

**बायको**—गंध फुल वगैरे भटा सन्निध बसून घातल्यानें पातिव्रत्याचा भंग होतो खराच. तर जळो तें गंध फूल व आग लागो त्या धूप दीप दक्षिणेला. मी बयानो असें कृत्य प्राणान्तीं देखील करणार नाहीं.

**सो०**—बालपणीं अर्थात् लज्जेचें ज्ञान प्राप्त होण्यापूर्वी नग्न रहाणें किंवा उघड्यावर मल मूत्र विसर्जन करणेची लज्जा नसते. परंतु मोठे पणीं महा लज्जा उद्भवते; तेव्हां तसें कोणी करीत नाहीं; तद्वत् अज्ञान पणांत ऋषि ९ म्यादि कृत्याला भटा जवळ बसण्याचें निर्लज्ज कृत्य केलें तें आतां सज्ञान पणीं ( समज आल्यावर ) करूं नये हें खरेंच भूषणास्पद आहे.

**श्रो०**—या ऋषि ९ मीच्या १ ल्या कथेंत रजस्वला स्त्रीला द्वितीय दिवशीं ब्रह्मघातकी ठरविली आहे: व दुसऱ्या कथेंत ( त्याच द्वितीय दिवशीं) गांव डुकरी बनविली आहे ! तर यांतील खरें तें कोठचें ! काय हो बाई तुह्मी त्या दिवशीं **ब्रह्मघातकी** कीं **डुकरी** होतां ! खरें सांगा हो !

**सो०**—बाया डुकरी झाल्या, तर त्यांचे नवरेहि डुकर झाले असले पाहिजेत मग ! पण ते जीवन्त असले तर हो !

धों०—अशा पुराणोक्त मतलबी गोष्टींचा जों जों बारीक विचार करावा तों तों त्या फारच विलक्षणीक, असंभाव्य, वेडगळ दिसणाऱ्या आहेत; त्यांत कांहीं हांसील नाहीं. पण या अशा कथांचा उपदेश मतलबी भट उपाध्ये भोळ्या स्त्रियांला करितात तेणें करून त्या बायांचें नुकसान होतें हें मात्र वाईट. याचा शाहाण्या पुरुष नवऱ्यानें विचार करावा.

ना०—हीं वटसावित्र्यादि वेदशास्त्र निषिद्ध व तर्क शून्य व्रतोपोषणें करण्याचा निंद्य उपदेश ज्या भोळ्या बायकांला भट करितात त्या भोळ्या बायकांचें काय तें, तेणे करून नुकसान होतें ह्मणजे उपोषणें करून फक्त त्यांचीच शरीर प्रकृति विघडते व भटजीस दान, दक्षिणा, वस्त्रोपवस्त्र वगैरे दिल्यानें द्रव्याची व्यर्थ वाट लागते ; पण लग्नाच्या संबंधानें जो उपदेश करितात तेणें करून तर अर्भक पोरींवर फारच कहर व जुलूम होतो तो तोंडावाटे बोलतां व हातावाटे लिहितां येत नाहीं. लग्नाच्या योगानें, सांप्रत मुदतीच्या कायद्याप्रमाणें लौकर द्रव्य प्राप्ति व्हावी ह्मणून "अष्टवर्षा भवेद्गौरी नववर्षा च रोहिणी, दशवर्षा भवेत्कन्या ततऊर्ध्वं रजस्वला। माता चैव पिता चैव ज्येष्ठ भ्राता तथैवच, त्रयस्ते नरकं यांति दृष्ट्वा कन्यां रजस्वलाम्"

या प्रमाणें काशिनाथ पाध्या नामे एका कऱ्हाड्यानें शीघ्रबोध पुस्तकांत रचला व तोच श्लोक पुढें,—ज्या प्रमाणें आपल्या अनार्यत्वाचा व नीचपणाचा उपहास कोणी करूं नये

ह्मणून चितपावनांनीं, " अतश्चित्तस्य पूर्ण यो निंद्यात्तस्य क्षयो भवेत् " ह्मणजे चितपावनाची निंदा करील त्याचा कुलक्षय होईल, असा लेख पराशरींत ढकलला त्याच प्रमाणें कसा तरी घुसडून दिलेला आहे *या श्लोकांतील **अष्ट,नऊ** व **दश** असे संस्कृत आंकडे व **नरक भीति** अर्थात् ८वें किंवा निदान १०वें वर्ष लागण्या पूर्वीं मुलींचें लग्न मातापितादिकांनीं करावें; न केल्यास तीं मातापितादि नरकांत पडतात. अशी ओरड निंद्य अंधपरंपरेवर उपजीविका करणारे भट उपाध्ये, भोळ्या बायका पुरुषांच्या कानावर घालितात व विचाऱ्यांला भांबवून टाकतात. कित्येक जाहागिरदार,पगारदार किंवा पेनशनदार पैसेवाले—पण अविचारी अज्ञान असे लोक "अष्ट वर्षा भवेद्गौरी" अशीं मैंदा भटांकडून ऐकलेलीं अक्षरें वेदवाक्यच समजून विवाहकालाच्या योग्यायोग्यते बद्दल कोणी कांहीं सयुक्तिक सशास्त्र बोलला तर तीं अक्षरें पुढें काढतात व पैशाचे जोरावर व्यर्थ बडबड करून आपला पशुतुल्य मूर्खपणा दाखवितात; पण असे हे पढत मूर्ख ह्या" अष्टवर्षा भवेद्गौरी० "श्लोकाचा वास्तविक अर्थ आपल्या सत्य वेद शास्त्रास जुळतो कीं काय? किंवा त्यांत कांहीं तर्क,युक्ति, विचार याचा लेश तरी आहे कीं काय? याचा तादृश विचार न करितां ७।८ वर्षांच्या अर्भक पोरींला विचारहीन होत्साते विवाह बंधने करून बांधून टांकून

---

*या घुसडलेल्या खोड्या लेखांचें विवेचन पुढें करण्यांत येणार.

" विचारहीनः पशुभिः समानः" या न्यायानें आपल्याला शुद्ध पशु वर्गांत ठरवून घेतात ! !

**श्रो०**–८ व्या वर्षापासून मुलगी ' गौरी ' 'रोहिणी' ' कन्या' 'रजस्वला' अशी होत जाते; तेव्हां तत्पूर्वी ह्मणजे ।१।२।३।४ ५।६।७ अशा वर्षींच विवाह करावा असाहि उपदेश करून हे भटोबा आपला स्वार्थ मिळेल तिकडे साधून पोटें जाळतात !

**भट**–या"अष्ट वर्षा०"श्लोकाचा अर्थ तरीं कसा काय आहे, व तो प्रमाणभूत कां नाहीं ? कारण तो पराशरींतहि आहे.

**श्रो०**–अहो याजवद्दल नारायणरावांनीं पूर्वीच(पुस्तक १ लें कन्यागत गुरुचरित्र पृष्ठ १३।१४ ) सांगितलें आहे कीं, वेद हाच आपला मुख्य धर्मशास्त्र ग्रंथ असून प्रमाणार्ह आहे; पण त्याविरुद्ध पुस्तकें प्रमाणार्ह नाहींत; वेदांत विवाह समयीं वधू ही '**युवति**' ह्मणजे १५,१६ वर्षांवरील वयाची असली पाहिजे व त्या मानानें वर हा आपल्या उपनयन म्हणजे मौंजिबंधनांतील " द्वादश वर्षं ब्रह्मचर्यं चरामि " या प्रतिज्ञेप्रमाणें उपनयनोत्तर निदान बारावर्षें अर्थात आपल्या वयाच्या २२।२४ वर्षें पर्यंत ब्रह्मचर्याश्रमीं राहून वेदशास्त्रादि व्यवहारिक व पारमार्थिक विद्या शिकलेला असला पाहिजे व अशा सज्ञानपणीं वधूवरांचा गर्भाधान संस्कार विधि झाल्याशिवाय तें खरें लग्नच नव्हे, अर्थात वधूवरांला पतिपत्नीत्व प्राप्त होत नाहीं व वधू ही पति कुळास मिळत नाहीं, तर अशा वेद व वैद्यक सत्य शास्त्र ग्रंथ प्रतिपादित विधि विरुद्ध तुमची पराशरी " १।७ वर्षांच्या अ-

र्भक पोरींची लग्नबंधनें करण्यास सांगणारी " कशी बरें प्रमाणार्ह होईल ? बनावट वृद्ध तरुण पराशरी, शीघ्रबोध, धर्म-निर्णयादि सिंधु, अनंत-नारायणादि भव्या—अशा बुकांस शास्त्रें ह्मणण्याचा प्रघात मतलबी लोकांनीं सांप्रत घातलेला आहे त्यावरून एका सद्धर्मी ज्ञात्या व शोधक मनुष्यानें ह्मटलें आहे कीं,

॥ तावद्गर्जन्ति शास्त्राणि जंबुका विपिने यथा ।
। न गर्जति महाशक्ति यावद्वेदान्त केसरी ॥

अर्थ उघडच आहे कीं, वेदरूपी सिंहापुढें हीं शास्त्र बुकें कोल्ह्याप्रमाणें होत ह्मणजे वेदापुढें या मानीव शास्त्र बुकांची मातबरी बिलकूल नाहीं; तेंव्हां भटजी समजलें काय तुमची पराशरी कोणत्या योग्यतेची! ज्ञानाअंतींआई बायकोचा भेद बरें!

**सो०**—पराशरी किंवा काशिनाथ पाध्याच्या या" अष्टवर्षा भवेद्गौरी०" श्लोकांत शास्त्र, युक्ति, तर्क किंवा न्याय याचा लव लेश नाहीं. सर्व मतलब आहे. पहा गौरी ह्मणजे शुभ्र वर्णी किंवा शिवाची स्त्री पार्वती; तर आतां ८ वे वर्षी कन्येचा विवाह केल्यानें कृष्णवर्णी कन्या शुभ्रवर्णी कशी होईल ? किंवा शिवाची स्त्री जी-ती गौरी—तुह्मी पुराण वाल्यांनी माता मानलेली त्या मातेबरोबर कसा विवाह होऊं शकेल ! दुसरें; रोहिणी नक्षत्र आकाशांत रहातें, तो निर्जीव पदार्थ—त्याच्याशीं लग्न कसें होईल ! किंवा रोहिणी बलदेवाची माता होती ती मेली; तिचा विवाह कसला ? तसेंच "१०वे वर्षी कन्या हो-

ते," ही हि गोष्ट खोटी; कारण जोंपर्यंत विवाह झाला नाहीं तों पर्यंत मुलीला कन्या ही ( शास्त्रीय ) संज्ञा आहे व माता पित्याला तर ती सदा कन्या व बंधूला भगिनी होय. आतां १० वर्षांपासून कन्येला रजस्वला जाणावी असें जें पाद्या लिहितो तें प्रत्यक्ष अनुभवावरून खोटें ठरतेंच; कारण १० वर्षांपलीकडील मुली ह्मणजे १० पासून १९ वर्षें पर्यंतच्या मुली—रजोदर्शन न झालेल्या अशा शेंकडा ९० सांप्रत सांपडतील. आतां या नियमास अपवाद आणणाऱ्या थोड्या गोष्टी सांपडत असतील त्या तर अकालीं बाल्यावस्थेंत मुली, नवऱ्याच्या सर्वस्वीं स्वाधीन पडतात ह्मणून, किंवा तिचीं आईबापें तशा स्थितींतलीं असल्या कारणानें आईची (बळेंकरून आणलेली) शीघ्र रजोदर्शनाची अवलाद मुलीला लागते ह्मणून घडलेले असतात. दुसरें हा जो पाद्या ( किंवा पराशरी म्हणा ) मातापित्यानें किंवा ज्येष्ठ बंधूनें कन्या रजस्वला पाहिली अर्थात् १० वर्षांपूर्वी तिचें लग्न न केलें तर तीं मातापिता किंवा ज्येष्ठ बंधु नरकीं जातात असें लिहितो तो तर महानीच, पाजी, मूर्ख स्वार्थी होय हें विचारी मानवास विचारान्तीं वाटणार आहे; पहा माता पिता किंवा बंधु यांणीं असा कोणता महा अपराध किंवा पातक केलें कीं "कन्या रजस्वला पाहिली अर्थात तिचें लग्न १० वर्षांचे आंत न केलें म्हणून या मातापित्यादिकांनीं नरकीं जावें.!!" रजस्वला होणें हा स्त्रियांचा सृष्टिसंबंधी स्वाभाविक धर्म आहे तो घडणारच; यांत मातापित्यांस

काय सामर्थ्य आहे कीं तें रजोदर्शन अमुक मुदती पर्यंत बंद ठेवावें! आद्य सर्व मान्य मनु ऋषि याणें तर "त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्यृतुमतीसती। उर्ध्वं तु कालादेतस्माद्विंदेतसदृशंपातिम्" या प्रमाणें (अप्रौढ कालीं ऋतुस्नात झाल्यास) वैद्यक सुश्रुतास व वेदास अनुसरून ( पुस्तक १ कें कन्यागत गुरु चरित्र पृष्ठ १३।१४)रजोदर्शनानंतर तीन वर्षांनी स्त्रीही विवाह व गर्भाधा नार्ह होते असें स्पष्ट लिहिलें. व त्याचप्रमाणें बाल्यावस्था ह्मणजे १५।१६ वर्षें उमरीपर्यंत मुलीनें बापाच्या स्वाधीन व पुढें विवाहोत्तर नवऱ्याच्या स्वाधीन असावें अशीं शेंकडो वचनें मन्वादि स्मृतींत व अन्य ग्रंथांत असल्याची प्रसिद्धि आहेच, तात्पर्य अशा सर्वमान्य सत्य शास्त्राविरुद्ध एखादा शास्त्रार्थ म्हणून प्रतिपादन करणें हें विचारी शोधक मानवा पुढें उपहासास्पद होईल याचें भान मतलबान्ध पणा मुळें काशिनाथ पाद्यास राहिलें नाहीं हें ठीकच आहे! स्वार्था पुढें बुद्धि भ्रंश व्हावयाचाच.

**भट**—आईची शीघ्र रजोदर्शन प्राप्तीची अवलाद तिच्या मुलीला प्राप्त होते हें खरें; पण स्त्रियांला बळेंकरून रजोदर्शन होतें हें कसें संभवेल? कारण सृष्टि नियमा प्रमाणें तें व्हावयाचेंच वेळीं होणार. अकालीं कदापि होणार नाहीं.

**ना०**—आंबा, फणस, सीताफळें अशीं फळें सृष्टि नियमा प्रमाणें झाडावरच स्वाभाविक उबेनें पिकावयाचीं पण चुना राख, गवत यांच्या कृत्रीम उबेच्या योगानें तीं आंबा, फणस, वगैरे फळें अकालीं पक्व होतात, त्याच प्रमाणें बाल्यावस्थित

कांहीं स्त्रीशीं पुरुषाचें (कामोद्भवक) संघटण व कांहीं स्त्रीयांला भागवतांतील वगैरे राधाकृष्ण विलासासारख्या शृंगारीक गोष्टींचें श्रवण व नाटकावलोकन व तज्जन्य विषय चेतना व स्फूर्ति यांच्या प्रयोगामुळें उद्भवलेल्या शारीरीक व मानसीक विकारजन्य उत्तेच्या योगानें ती स्त्री अकालीं पक्वतेस अर्थात् रजस्रावाप्रत पावते. यांत कांहीं शंका स्थान नको.

**श्रो**०—आपलें ह्मणणे खरें; ह्मणूनच मन्वादि स्मृतिकारांनीं असें ह्मटलें आहे कीं, मुलगी ही बाल्यावस्थेंत आपल्या माता पित्याच्याच स्वाधीन असली पाहिजे व तोंपर्यंत तिचें लग्न करूं नये : नाहीं तर अकालीं तिच्यावर जुलूम व्हावयाचा.

**सो**०—हे ठक भट उपाध्ये किंवा त्यांचे वेडगळ यजमान तरीं कोठें त्या "अष्टवर्षा०" श्लोका प्रमाणें वागतात ह्मणजे ८ व्या ९ व्या वर्षा पूर्वीच मुलींचीं लग्नें करितात ?

**श्रो**०—भटजी खरें सांगा; तुम्ही "अष्टवर्षा" श्लोकाविरुद्ध १२।१३ वर्षांच्या मुलीचीं लग्ने सांप्रत लावितां कीं नाहीं ?

**भट**—होय, लावतों; सांप्रत बहुतेक यजमान सुधरत चालले आहेत. आम्ही पोटार्थी. यजमान मिळेल तसें वागलें पाहिजे.

**सो**०—अहो तुम्ही पोटार्थी, तुमचें असूं द्या; पण तुमचे शहाणे ह्मणविणारे यजमान "अष्टवर्षा" चा अभिमान धरून त्या प्रमाणें वागत नाहीं. तेव्हां ते मानव रूपी शुद्ध पशु होत. तोंडाने **आई** ह्मणावयाची व कृतीनें **बायको** मानावयाची—अशा प्रकारचे तुमचे यजमान पशु तुल्य बरें भटजी !

श्रो०—ज्या प्रमाणें सांप्रत इंग्लिश मुदतीच्या कायद्या अन्वयें दुसऱ्याचे देण्याचे ( कर्जाऊ ) रुपये तीन वर्षांच्या मुदती नंतर ऋणकोला स्वतः उपभोगावयाला मिळतात; तद्वत् या "अष्टवर्षा" श्लोकाप्रमाणें दहावे वर्षी मुलीचा कन्यापणा अर्थात् तिचा योग्य पुरुष वराला वरण्याचा वेळ ( मुदत ) संपून ती मुलगी ( विवाह न होतां ) भोग्य स्त्री-पणाला प्राप्त होते. तेव्हां त्या मुलीचा तो भोग्य स्त्रीपणा अन्य पुरुषाकडे न जातां घरच्याघरीं ( कोणी बाप, चुलता, भाऊ वगैरे असेल त्याजकडे ) रहातो हें स्पष्ट होतें. तर मग हे "अष्टवर्षा" चा अभिमान धरणारे लोक आपल्या ९ वर्षा वरच्या— मुली, बहिणी, पुतण्या वगैरे मुलग्या— अविवाहित अशा स्वतः भोगण्याला योग्य होत असतां त्या-चा लाभ न घेतां दुसऱ्याला विवाह करून देतात हें मोठें आश्चर्य समजलें पाहिजे ! कोणा विचारी पुरुषाच्या सत्सं-गतीनें अशा ठिकाणीं पशुप्रवृत्तीला न अनुसरतां भोळे लोक सत्य मानवी विचारावर आले ही मोठी अभिनंदनीय गोष्ट होय. ईश्वर करो व असेच अन्य खऱ्या विचारावर येवोत.

ना०—अहो या ( तुमच्या पराशरीच्या) "अष्टवर्षा भवे-द्गौरी०" श्लोकाप्रमाणें आमच्या जवळ ( सद्योनिर्मित ब्रम्ह-स्मृतीचा ) एक श्लोक आहे तो असाः—

"एकक्षणा भवेद्गौरी द्विक्षणे या तु रोहिणी ।
त्रिक्षणा सा भवेत् कन्या ह्यत ऊर्ध्वं रजस्वला ॥

माता पिता तथा भ्राता मातुलो भगिनी स्वका।
सर्वे ते नरकं यांति दृष्ट्वा कन्यां रजस्वलाम्"

अर्थः—"जेवढ्या वेळानें डोळ्याची पापणी हालते तेवढ्या वेळास क्षण ही संज्ञा होय. आतां मुलगी जेव्हां जन्मते तेव्हां ती त्या एका ( पापणी हालण्याच्या ) क्षणांत गौरी बनते; दुसऱ्या क्षणांत रोहिणी होते, व तिसऱ्या क्षणीं कन्या व चवथ्या क्षणीं रजस्वला होत असते. तर अशा रजस्वलेला पाहून तिची आई, बाप, भाऊ, बहीण, मामा वगैरे आप्त सर्व नरकांत पडतात." याप्रमाणें उत्पन्न होऊन ४ था क्षण लागलेल्या मुली रजस्वला होतात तेव्हां त्यांचें लग्न नरक भीतिस्तव तत्पूर्वी म्हणजे १ ल्या, २ ऱ्या किंवा निदान ३ ऱ्या क्षणांत केलेंच पाहिजे असें होतें मग त्याप्रमाणें तुम्हीं करतां करवितां काय ?

भट—हा श्लोक आम्हाला प्रमाण नाहीं. कां कीं तो खोटा.

ना०—कां प्रमाण नाहीं ? जर हा ब्रम्हदेवाचा "एकक्षणा" श्लोक प्रमाण नाहीं तर तुमचा पराशरीचा "अष्टवर्षा" हा श्लोक सुद्धां प्रमाण होऊं शकत नाहीं. दुसरें ब्रम्ह देवापासून तुमच्या पराशराची उत्पत्ति तेव्हां त्या ( ब्रम्ह देवा ) बापाचा श्लोक त्या ( पराशरा ) पोराच्या श्लोकाऐेक्षां विशेष प्रमाणाई घेतला पाहिजे.

भट—तें खरें; पण तो श्लोक असंभव्य आहे. कारण ४ थ्या क्षणीं मुली रजस्वला अर्थात् भोग्या योग्य होत नाहींत.

ना०—बरें तुमच्या पराशरीच्या तरी ७।८ वर्षांच्या पोरी कोठें गौरी, रजस्वला होत असतात? कारण १६ व्या वर्षा-नंतर विवाह झाल्यानें स्त्रीचें वीर्य परिपक्व, शरीर बलिष्ट व गर्भाशय पूर्ण होऊन संतानोत्पत्ति उत्तम होते. ज्याप्रमाणें ७।८ वर्षांच्या कन्येचे ठायीं संतानोत्पत्ति असंभव्य तद्वत् तिला गौरी, रोहिणी नांव देणेंहि अयोग्य होय. पहा, जर कन्या गौरी म्हणजे शुभ्र रंगी नसून काळ्याच रंगाची नि-र्माण झाली तर तिला गौरी म्ह० शुभ्ररंगी नाव ठेवणें व्यर्थ होय. किंवा गौरी ही महादेवाची स्त्री व रोहिणी वसुदे-वाची स्त्री जी तुम्ही पुराणवाल्यांनीं माते समान मानलेली तिची भावना जेव्हां सर्व कन्येच्या ठायीं केलेली आहे ते-व्हां अशा माते समान मानलेल्या कन्येसह विवाह करणें कसा संभव व धर्मयुक्त होऊं शकेल? याकरितां तुमचा श्लोक खोटा. आम्ही "ब्रम्होवाच" म्हणून श्लोक केलेला आहे. तद्वत् तो तुमचा श्लोक सुद्धां पराशरादिकांच्या नावानें कोणी घडविलेला आहे. तस्मात् या सर्वांचें प्रमाण सोडून सर्व मान्य सत्य वेदाचें तर्क सिद्ध प्रमाण ग्राह्य करणें योग्य होय.

भट—बरें आमच्या पराशरीचा श्लोक खोटा तर खोटा; पण तुमच्या ब्रम्हदेवाचा तरी कोठें खरा आहे?

ना०—तुमचा श्लोक खोटा तर आमचाहि मग खोटा मानुं

आम्ही कोठें आग्रह धरितों व लोकांस सांगतों कीं, आमचा श्लोक खरा व त्याप्रमाणें तुम्ही वागा !!

भट०—" अष्टवर्षा०" हा श्लोक निरर्थक असल्याची माझी तर आतां पूर्ण खात्री झाली; या श्लोकाच्या उत्पत्तिच्या कारणाविषयीं काल मी असें ऐकलें कीं, ज्या वेळीं हा कल्पित श्लोक रचला त्या वेळीं या भरतखंडांत जुलमी मुसलमानाधिकारी होते, ते आर्यलोकांच्या मुली बलत्कारें पकडून आपल्या घरीं नेत असत. ते समयीं कांहीं बुद्धिमान लोकांनीं असें पाहिलें कीं, हा मोठा अनर्थ घडत आहे. तेव्हां त्यांणीं असा विचार केला कीं, मुसलमानी धर्मांत विवाहित स्त्रीला पकडून नेण्याची मनाई आहे. तेव्हां बालपणीं लग्नें करावीं ह्मणजे जुलूम व्हावयाचा नाहीं. त्याजवरून त्यांनीं सदर्हु श्लोक घडविला. आतां हें कारण जरीं खरें मानलें तरीं त्या श्लोकाची आतां कांहीं अवश्यकता राहिली नाहीं, कां कीं, सांप्रत न्यायशील इंग्लिश राज्य आहे.

नारा०—अहो भटजी, "अष्टवर्षा" श्लोक कोणी कोठें कोणत्याहि कारणानें रचो, पण तो आपल्या वेदशास्त्र निषिद्ध आहे एवढीं लोकांची खात्री झाली ह्मणजे बस आहे. कारण मूर्ख लोक आपल्या सत्य वेदधर्मास न समजून व्यर्थ दूषण देतात हें आह्माला सहन होत नाहीं.

भट—माझी आतां पूर्ण खात्री झाली कीं हा "अष्टवर्षा" श्लोक व त्यासंबंधाचे व अर्थाचे दुसरे श्लोक किंवा वचनें

कोणी रचली किंवा रचलेली असली तर ती अगदींच खोटीः पण आह्माला तसें प्रसिद्धपणें ह्मणतां येत नाहीं; कारण मग आह्मास हे भोळे वेडगळ आमचे यजमान लोक आपल्या द्वारावर सुद्धां उभे करणार नाहींत.

नारा०—सांप्रत तुमच्या वेडगळ यजमानांकडून अंतःपट धरण्याकरितां किंवा गंध, फूल, तांदुळ, वगैरे घालण्याकरितां जे कांहीं तांदुळ, डाळ, पैसे तुह्माला मिळतात त्याच्या दिडी दुप्पट तुह्माला मिळालें तर मग हा "अष्टवर्षा" श्लोक वेदशास्त्र निषिद्ध—खोटा आहे असा सत्योपदेश करून लोकांस सत्य वेदोक्त धर्म मार्गावर आणण्यास कायावाचा मनें करून प्रयत्न कराल कीं नाहीं?

भट—पोटाला मिळाल्यावर आम्ही पाहिजे तें करूं. मग हें तुमचें काम सत्योपदेशाचें चांगलें आहे. तें तर मोठ्या आनंदानें, उत्सुकतेनें व प्रसिद्धपणें कोणाची भीड न ठेवितां करूं.

श्रो०—यावरून सध्या बायकांकडे जें भटपण तुम्ही करितां तें पुरुषाला चोरून मारून करितां असें होतें तर मग?

भट—यांत काय संशय? आतां बाहेर फुटलों खरा. खरें सांगतों ऐका. नवरे, दीर, भावे वगैरे पुरुष मंडळी काम धंद्यास एकदाची बाहेर पडली म्हणजे त्यांचे घरीं आमच्या भटांची "पंढरी" पिकते. हरतऱ्हेच्या धर्म मिषानें त्यांच्या घरांतील बायकांचें आम्ही मन वळवितों; नंतर रात्रौ पुरुष

मंडळी घरीं आल्यावर त्यांजला टोंचटोंचून त्या वायका आमचा कार्य भाग साधितात. आतां कित्येक ठिकाणीं भोळ्या वायकांप्रमाणें भोळे श्रीमान पुरुष जेव्हां आमच्या तडाक्याला सांपडतात तेव्हां तर आमचें "कुबेर गृह" पिकतें ! भाजीच्या देंठापासून सुवर्णरौप्यपात्रें व शाली, शालजोडेपर्यंत उत्तम वस्त्रें व त्याचप्रमाणें अनेक मिष्टान्नें प्राप्त होतात.

सो०—पाहिलेतना, हे भटजी कसे कपटी, स्वार्थी व नादान व ठक असतात ते ? अशा भटांशीं कोणत्याच प्रकारचा घरीं संबंध ठेवूं देऊं नये. भोळे, वेडगळ अशिक्षित लोक या भटाच्या पाशांत पडतात हें ठीकच; पण शहाणे, शिकलेले, सुधारेच्छू लोक पडतात ही सखेदाश्चर्य गोष्ट होय. बहुतेक राव बाहादुर, राव साहेब, आनेरबल, डाक्टर सर्जन, असे छापेवाले लोक व त्याचप्रमाणें समाज, क्लब, सभा अशा भिन्न भिन्न नावाच्या मंडळीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष असे असामी "या ठक भट उपाध्याच्या ठकबाजीचा अर्थात् सांप्रत विवाह, उपनयनादि कर्मांत चालू केलेल्या निंद्य, वेद निषिद्ध तर्क शून्य चालींचा व कर्माचा मोड होऊन योग्य सुधारणा व्हावी या हेतूनें व्याख्यानें झोडून व निबंध - खरडून कायावाचामनें करून झटत असतात ही मोठी अभिनंदनीय गोष्ट होय. पण त्यांचें तें बोलणें त्यांच्या खुर्च्यां टेबला पलीकडे कांहीं चालून जात नाहीं, ही मात्र अत्यंत शोचनीय गोष्ट होय, क्लबांत किंवा समाजांत सदहू राव बाहादुर वगैरे व्या-

ख्याने झोडून घरीं आले म्हणजे भट उपाध्यांनी फितुर व दूषित केलेल्या बायका विचाऱ्यांला टोंचटोंचून खातात!" व्याख्यानें बिख्यानें राहिलीं समाजांत क्लबांत: एथें तीं नाहीं चालावयाचीं: आम्हाला सर्व हांसतात: परवां गोविंद भटजी आले ते सांगत होते कीं, आनंदी काळी, गंगुताई गोरी, बेनबाय दळी अशा पोक्त बायका आम्हांला म्हणतात कीं ह्या अमक्या तमक्याच्या (तुमचें नांव घेऊन) बायका शाहाण्या, पोक्त, कुलीन असून नवऱ्याचें कसें ऐकतात कोण जाणें; तर या अशा बोलण्याची आम्हांला मोटी लाज वाटते, मेलें मरावयाला पुरेसें होतें, तुम्हाला काय वाटतें? लाजबीज दिली सर्व सोडून; काय पाप केलें होतें आम्ही पूर्वजन्मीं, म्हणून अशा तुम्हां भ्रष्टांच्या पदरांत पडावें लागलें आम्हाला;त्या बायका पाहा आपल्या नवऱ्यांनां समाजांत वगैरे मुळीं जाऊंच देत नाहींत. कसे ते पुरुष, बायकाधीन; त्यांना पाहून तानभूक निवते; नाहींतर हीं मेलीं हिडीस सोंगें; आतां तुम्हीं समाजांत ना अगर नको जा; झकमारा व पाहिजे तें करा; पण त्या भटजीस वायने व कोहाळा व दीपदान उउदयीक करणें आहे त्याजबद्दल रुपये २० पाहिजेत, तें प्रथम टांका व नंतर इजार वगैरे कपडे काढून खोलींत या; व त्याचप्रमाणें त्या हिराबेनला आतां ७ वें वर्ष संपत आलें. व गंगूला, अबब! नववें वर्ष लागलें: ती तर आतां गळ्याला लागली आहे, आह्मांला लोक हांसतात; तथापि तुह्मी

तिच्या लग्नाचा कांहीं विचार करीत नाहींत; तेव्हां आतां मीच करितें त्यांच्या लग्नाची तजवीज त्या रामभटजी कडून; द्या त्या दोन्हीं पोरींच्या जन्म पत्रिका कोठें जाळल्या आहेत त्या, आणि मग टाका खोलींत पाय किंवा समाजांत जाऊन खुशाल व्याख्यानें झोडीत रहा—" अशा अनेक प्रकारें सदरील राव बहादुरादिकांस घरीं बायका टोंचणी करितात व ती टोंचणी, बायको कोठें तरीं भटाच्या शिकवणी वरून निघून जाईल अशा भीतीने ते राव बाहादुरादि सुधारेच्छु नवरे निमुटपणें सहन करितात व आपल्या व्याख्यानाला व निबंधाला अक्षय हरताळ लावून बायका सांगतील तशीं निंद्य, अविचारी कृत्यें करितात; तर अशा भटाधीन सुधारेच्छू लोकांच्या हातून कांहीं सुधारणा ह्मणून होणार नाहीं. "येनकेनप्रकारेणप्रसिद्धःपुरुषोभवेत्" या ह्मणी प्रमाणें आपलें नाव पत्रांतरांतून वगैरे लोकांच्या कानावर जावें हाच त्यांचा उद्देश दिसून येतो. अन्यथा त्यांनीं आपली अशी शोचनीय स्थिति करून घेतली नसती. अशा शोचनीय स्थितीस मूळ कारण ठक भटजी उपाध्ये: तर यांचा पहिल्यानें निःपात केला पाहिजे. पहा स्त्री ही शरीर रचने वरून कोणत्याहि अवस्थेंत एक सारखी दुर्बळ आहे असें असतां तिजला बिघडणाऱ्या अशा चार चौघांत उघड्या मोहक जाग्यावर ठेवून ती बिघडली याचें कारण वास्तवीक तिला उघड्यावर ठेवणें हें होय, तर त्या कारणाचा विचार न करितां अर्थात

तिला चांगल्या एकान्त, निर्भय, सुरक्षित जागीं न ठेवितां, ती बिघडूं नये ह्मणून नुसतीं व्याख्यानें झोडलीं तर त्यांचा कांहीं उपयोग होईल काय? नाहीं हें उघडच आहे. तद्वत्च या सुधारेच्छू लोकांच्या बायका "या भटाधीन होऊन बिघडतात" हें मुख्य कारण त्यांच्या सुधारणेला अडथळा आणणारें आहे तें जाणून उमजून त्यांनीं आपल्या घरीं भटजी उपाध्याला बिलकूल प्रवेश करूं देऊं नये; तरच त्यांचा प्रयत्न सफळ जाईल. अन्यथा गावांतील कुत्र्यांच्या भोंकण्याप्रमाणें त्यांची उरस्फोट होय. (हें चाललें बोलणें सदहू दूषित व उपहासित राव बाहादुरादिकांनीं ऐकून त्यापैकीं प्रथम, बाहादूर पुढें सरसावून)

बा०—काय हो! भटजी उपाध्यांनीं तर वेद धर्म सांभाळिले ह्मणून तर आज हिंदुधर्म जिवंत राहिला. नाहीं तर तो केव्हांच लयास गेला असता. असें असतां भटजी उपाध्याच्या नांवानें तुह्मी खापर फोडतां हें नवल होय.

ना०—अहो बाहादुर! तुह्माला न समजणाऱ्या व तुह्मी विचार न केलेल्या अशा अनेक गोष्टी आहेत. तुह्मी परीक्षा दिलेल्या विषयाचें ज्ञान तुह्माला कदाचित् अर्धें मुर्धें (एक तृतियांश पास होण्या जोगतें) असेल, पण दुसऱ्या अनेक विषयांचें जें ज्ञान तुह्माला नाहीं तें तुह्मीं संपादन करून घतलें पाहिजे. पाश्चिमात्य त्रोटित ज्ञानलवानें तृप्त राहून बाहादुरी मिळविण्याची उदार इंग्लिश राज्यांत आतां वेळ राहिली

नाहीं. चार चौघांत येण्यासाठीं मोठी गंभीरता, लीनता, शोधक बुद्धि, पूर्ण विचार, दूर दृष्टि व निरभिमान यांची प्रथमतः आवश्यकता आहे; पहा वेदधर्म व हिंदुधर्म यांचा मुळीं तुह्माला भेदच कळत नाहीं. हिंदुधर्म ह्मणून जो सांप्रत चालू आहे, तो तर आपल्या आद्य, सनातन सत्य वेदधर्माविरुद्ध आहे. व असा हा वेद निषिद्ध व बाह्य हिंदुधर्म सांप्रत भटजी उपाध्यांनी भोळ्या लोकांत चालू केला आहे; बऱ्याच वर्षांपूर्वीं या भरतखंडांत अनार्य ( म्लेच्छ ) लोकांनीं प्रवेश करून सत्य आर्य वेदोक्त धर्मांत घोंटाळा करून टाकला. द्रविड, तैलंगादि प्राचीन अनार्य व कऱ्हाडे चितपावनादि आर्वाचीन अनार्य लोकांनीं थोडासा आर्य-वेदोक्त धर्म बाह्यत्कारी स्वीकारून यज्ञामिषानें कृष्ण यजुस् नामे एक वेद व त्या संबंधाचे तैत्तिरीय ब्राह्मण व आरण्यक; यूप लक्षण, छाग लक्षण, प्रतिज्ञा, श्राद्ध कल्प, कुर्म लक्षणादि १८ परिशिष्टें; कौल व अल्लोपनिषदें; आपस्तंब, हिरण्यकेशी, आगम अशीं सूत्र पुस्तकें: देवीउपासना मिषानें शक्तिरहस्य योनितंत्र, लिंगतंत्र, शक्ति संयोगतंत्र, बालाविलासतंत्र अशीं तंत्रपुस्तकें, व विवाहादि षोडश संस्कारमिषानें गोपिनाथभट्टी, बाळंभट्टी, नारायणभट्टी अशा भट्ट्या; धर्मसिंधु, निर्णयसिंधु, मुहूर्तसिंधु असे सिंधु; श्राद्धशांति; कालमाधव १२; हेमाद्री १२; द्योत शेखर १२; आचार शुद्धि; शांति कम-

लाकर; शूद्रकमलाकर; कौस्तुभ; व्रतकौमुदी; कल्पवल्ली; गदाधर; रत्नसंग्रह, नारद पंचरात, दान व व्रत खंड; गरुडपुराण—प्रेतकल्प अशा मुख्य ३ प्रकारांनीं शेंकडो ग्रंथांचे ढिगांचेढीग रचून पैकीं पहिल्यांत "गाई, मेंढें, बोकड, कोंबड्या, बेडूक, मासे असे भू चर, जल चर व गगन चर प्राणी शस्त्र न लावितां गळा दाभून श्वास कोंडून मारावे व त्यांचें मांस पुरुष सूक्त मंत्रांनीं पाणी सिंपडून खावें; दारू प्यावी; यजमान पत्न्या भोगाव्याः" दुसऱ्यांत "अनेक जातीची दारू प्यावी. अनेक मांसें खावींत, ज्ञातिभेद ठेवूं नये; नग्न स्त्रीची पूजा करावी, व ती स्त्री ऋतुमती किंवा मांगीण किंवा म्हारीण जशी नीच असेल तसें तसें जास्त पुण्य लागतें; तिच्या योनीशीं तोंड लावून मंत्र जपावे व तिचें उचिष्ट मद्य मांस सेवन करून तिच्याशीं समागम करावा. चोळ्या एकत्र करून ज्याच्या हाताला जिची चोळी मिळेल त्याणें तिजला ( मग ती माता, कन्या, भगिनी, स्नुषा, किंवा परपत्नी असो ) यथेच्छ भोगावी"—अशीं अवाच्य, असभ्य, अमंगळ अत्यन्त क्रूर व घाणेरी कर्में ग्राह्य केलीं आहेत. व त्याचप्रमाणे तिसऱ्यांत "मुलीचें लग्न अत्यन्त बाल्यावस्थेंत म्हणजे ६।७ वर्षांचें वय असतां करावें; व अशी अर्भक मुलगी पुढें पतीशीं संयोग प्राप्त होऊन खरी बायको होण्यापूर्वीं तिचा तो मानीव पति मयत झाला तर तिणें पुनर्विवाह न करितां केशादि सौंदर्य काढून टाकावें; थेरड्या

१०।६० वर्षांच्या ह्मातार्‍याने ८।१० वर्षांच्या अर्भक कोमल मुलीशीं विवाह करावा. व त्यासंबंधानें गणपति पूजन, नांदी श्राद्ध, मातृका पूजन, गौरी हर, विनायक शांति नवग्रह पूजनादि अनेक वेद बाह्य क्रिया व त्याचप्रमाणें मृतक संस्कार संबंधानें गाईदान, जूतेंदान, छत्रीदान, शय्यादान, सपिंडी आदि श्राद्धें; तेल, तूप, धान्यें, दीप, पात्रें, सुवर्ण, रौप्य इत्यादि दानें करावीं ह्मणजे मृत प्राण्याला ते ते दान केलेले पदार्थ स्वर्ग ह्मणून एक गांव आहे तेथें मिळतात."

एणेप्रमाणें वेद बाह्य व निषिद्ध क्रियाकर्में उभारून मूळ सत्य वेदोक्त धर्माचा विध्वंश करून टाकला आहे समजलें, राव बाहदुरजी? तात्पर्य अशीं हीं वेदनिषिद्ध कर्में तुमचे सांप्रतचे भटजी उपाध्ये तुम्हांला करण्यासाटीं उपदेश करितात; तस्मात् या दुष्ट उपदेशक भटजींचा प्रथम निःपात झाला पाहिजे तरच सत्यधर्माचा प्रसार होऊन सुधारणा होईल.

बाहा०—असें बारकाईनें जर पाहिलें तर खरोखरच सांप्रत या भटजी उपाध्यांनीं वेदाचा लोप करून टाकला असें दिसून येतें. भटजीला जर विचारिलें कीं "काय हो, अमुक तुमचें क्रियाकर्म कोठें सांगितलें आहे? तर बहुतेक उत्तर देतात कीं, आह्मांला त्याचा पत्ता नाहीं, पूर्वापार चालत आलें तें आह्मी करितों. आतां एखादा शिकलेला भटजी असला तर तो असा जबाब द्यावयाचा कीं "धर्मसिंधु, निर्णयसिंधु, नारायणभट्टी अशा (तुह्मी तर दर्शविलेल्या

वेद बाह्य व निषिद्ध ) पुस्तकांत किंवा फार तर गरुडपुराण, भारतादि गोष्टीच्या ग्रंथांत ते क्रियाकर्म सांगितलें आहे." तात्पर्य वेदाच्या प्रमाणाचें कोठें नांव ऐकूं येत नाहीं. वेदाचा खराच लोप झाला आहे तर मग.

श्रो०—शंखासुर नामें अनार्य राक्षसानें पूर्वीं ( पुराणकाळीं ) वेद लपवून ठेविले याचा अर्थ तरी हाच कीं, वेदोक्त सद्धर्मा विरुद्ध हिंसादि निंद्यकर्मे चालवून सर्वत्र भ्रष्टता केली अर्थात वेदाचा लोप केला. व त्याच प्रमाणें हल्लीं त्या शंखासुर अनार्याचे वंशज जे द्रविड, चितपावनादि सप्त कोकणे ते आपल्या आनार्य शंखासुर पूर्वजाचें "वेद निषिद्ध व बाह्य क्रियाकर्मे करण्याचें अनुकरण घेऊन वेदाचा लोप करित आहेत व अनेक निंद्य ढोंगें माजवीत आहेत."

सो०—तुह्मीं ह्मणतां त्याप्रमाणें हे चितपावन खरेच अनार्य वेद धर्म द्रोही कीं हो ! कारण परवा मुंबईतील माधव ( लक्ष्मी नारायण विलास ! ) बागेंत या कांहीं अनार्य चितपावनांनीं आद्य, सनातन वेदप्रतिपादित धर्माचरणा विरुद्ध कांहीं भोळ्या, वेडगळ आर्य लोकांचीं मनें प्रसिद्धपणें वळविलीं व त्यांजला आपल्या अनार्यत्वाचा टिळा लाविला:

भट— सांगा बघूं त्या माधव बागेंतील प्रकार कसा तो ?

आनरेबल—तो मागाहून सांगा; पण हे द्रविड, चितपावनादि अनार्य ( म्लेच्छ ) असल्याबद्दल कोठें कसें काय प्रमाण आहे तें ऐकूंद्या पहिल्यानें. मग ठीक पहेल.

सो०—हे द्रविड, चितपावनादि अनार्य असल्याबद्दल तुम-च्याच पुराणेतिहास ग्रंथांत प्रमाणें आहेत. व त्याजबद्दल शोधक इंग्लिश लोकांचे लेखहि बरेच आहेत, त्या सर्वांचा विस्तार, विस्तार भयास्तव एथें देतां येत नाहीं. तस्मात् थोडक्यांत सांगतों तें चित्त देऊन ऐका बरें.

पौंड्रका श्चौंड्र द्रविडाः कांबोजा यवनाः शकाः।
पारदाः पल्हवाश्चीनाः किराता दरदाः खशाः॥ (मनु.)

अर्थः—पौंड्रक, औंड्र, द्रविड, कांबोज, यवन, शक, पारद, पल्हव, चीन, किरात, दरद व खश हे म्लेच्छ होत.

या म्लेच्छ द्रविडापैकींच आंध्र ह्मणजे तैलंगादि लोक हे अनार्य म्लेच्छ होत अशीं प्रमाणें प्राचीन ऐतरेय ब्राह्मणांत (७।४।१८) व आर्वाचीन विष्णुपुराण (४।३-१८२१) व महाभारत. (अनुशासनपर्व २१०५-६, शांतिपर्व २४२९) यांमध्यें विपुल आहेत; पैकीं विस्तार भयास्तव पहिलें एकच देतों तें ऐणें प्रमाणः—

तस्य ह विश्वामित्रस्यैक शतं पुत्रा आसुः पंचाशदेव ज्यायांसो मधुछंदसः पंचाशत्कनीयांसस्तद्ये ज्यायांसो न ते कुशलं मेनिरे ताननु व्याजहारांतान्वः प्रजा भक्षीष्टेति त एतेऽध्राः पुंड्राः शबराः पुलिंदा मुतिबा इत्युदंत्या बहवो भवंति॥

अर्थः—[पूर्वी हरिश्चंद्र राजानें पुत्रोत्पत्तीच्या नवसाच्या संबंधानें शुनः शेफ नामे एक मुलगा वरुणाला बळी देण्या-

कारितां आणला होता; त्याजला विश्वामित्र ऋषीनें मोठ्या युक्ति प्रयुक्तिनें सोडवून घेऊन आपल्या पुत्रांमध्यें मुख्य केला परंतु ] विश्वामित्राच्या १०० पुत्रांपैकीं वडील पन्नास पुत्र त्याजला श्रेष्ठ मानीनात; ह्मणून त्यांजला विश्वामित्रानें ( आपली आज्ञा भंग केल्यामुळें ) ज्ञाती भ्रष्ट करून आर्यावर्तांतून दक्षिणेस अरण्यांत हांकून लावले, ते पुढें दक्षिणेकडील द्रविड तैलंगादि आंध्र, पुंड्र, शबर अशा अनार्य राक्षस जातींत मिसळले व अशा भ्रष्ट ब्राह्मण व क्षत्रिय आर्यांची जी पुढें संतति झाली ती सुद्धां,

झल्लो मल्लश्च राजन्याद् व्रात्यान्निच्छिविरेव च ।
नटश्च करणश्चैव खसो द्रविड एव च ॥ ( मनु )
द्राविडाश्च कलिंदाश्च पुलिंदाश्चाप्युशी नराः ।
कौलिसर्पा माहिषकास्तास्ताः क्षत्रियजातयः॥ ( भारत )

याप्रमाणें द्रविड, तैलंगादि म्लेच्छ होऊन बनली.

ह्या द्रविड, तैलंगादि ( यंडु गुंडू ) लोकांच्या भाषेवरून ते लोक अनार्य म्लेच्छ असल्याबद्दल शोधक इंग्लिश तत्ववेत्त्यानीं सिद्ध केलें आहे; म्यूर नामे एक युरोपिअन ह्मणतोः-

The old Sanskrit literature proves that the Arian population of India came in from the North-West at least 3000 years ago. India was already peopled by a dark complexed peo-

ple more like the Australians than any one else, and speaking a group of languages called Dravidian.—*Müre.*

अर्थ—वेदसंहिता, ब्राह्मण, निरुक्त, आश्वलायन, पारस्करादि सूत्र व इतिहास ग्रंथ—असे प्राचीन संस्कृत ग्रंथ व त्यांची भाषा यांजवरून असें स्पष्ट होतें कीं, सांप्रतचे हिंदुस्थानांतलि आर्य लोक प्रथमतः या हिंदुस्थान देशांत वायव्य दिशेकडून अर्थात मूळ आर्यभूमीहून सुमारें ३००० वर्षांपूर्वी आले. हे लोक हिंदुस्थान देशांत येण्यापूर्वीच तो हिंदुस्थान देश काळ्या रंगाच्या द्राविड लोकांनीं वसाहत केलेला होता; अर्थात् द्रविड, तैलंगादि यंडु गुंडु लोक सांप्रत हिंदुस्थानच्या दक्षिण भागीं भरून गेले होते. हे लोक द्राविड अर्थात् तेलंगु, तामिळ, तुलुव, मलयालिनादि भाषा बोलतात व या भाषा सेमिटिक आस्ट्रेलियन भाषेला मिळून आहेत. हे द्रविड, तैलंगादि लोक, सेमिटिक—अनार्य जे ऑस्ट्रेलिअन--आफ्रिकेचे सिध्धि, त्यांच्याशीं ( शरीर बांध्यानें, भाषेनें व होम निमित्त श्वासावरोधने करून वळवळवून बोकडाम--मारून खाण्याच्या अत्यन्त निंद्यकर्मानें ) जसे मिळतात तसे इतर कोणत्याच लोकांशीं मिळत नाहींत. तात्पर्य हे द्रविड, तैलंगादि लोक ऑस्ट्रेलियन लोकांप्रमाणे अनार्य ( सेमिटिक ) ज्यांला पूर्वी राक्षस ह्मणत ते होत.

या म्यूर प्रमाणें मि. म्यानिंग, नारिस, जान हट्ट, डा. रोस्ट, डा. क्ल्याडवेल असे शोधक दीर्घ यत्नी युरोपियन ज्यां- पैकीं बहुतेकांनीं या हिंदुस्थानांत व त्याच्या आसपासच्या बेटांत आपलें आयुष्य खपविलें त्यांनीं हे द्रविड, तैलंगादि दक्षिण हिंदुस्थानस्थ लोक त्याच्या त्या तामिळ, तेलगु आदि भाषां- वरून, व तद्वत् शरीरबांधा व यज्ञ निमित्त बोकड, गवा वगैरे प्राणी वळवळवून मारून खाण्याच्या अत्यन्त क्रूर आचरणावरून हिं- दुस्थानच्या दक्षिणेकडील आस्ट्रेलिया बेटांतील म्लेंछ लोकां- पैकीं मूळचे असल्याचें सविस्तर सप्रमाण विवेचन केलें आहे, तें ते ते इंग्लिश ग्रंथ वाचल्याने, आतां इंग्लिश वाचणारे तुह्मा आनरेबलासारखे पुष्कळच तयार झाले आहेत त्यांजला समजणार आहे. आतां सहर्हुपैकीं मि. म्यानिंग यांहीं आपल्या " प्राचीन व मध्यंतरी हिंदुस्थान " इतिहासांत भाषेच्या सं- बंधाचा अनेकांच्या मतासह थोडक्यांत घोषवारा दिला आहे तो मात्र ( विस्तार भयास्तव एकच ) ऐथें देतों:—

The kindred languages, spoken in the peninsula or Deccan, are observed to be related to each other, but to be distinct in structure from Sanskrit. These languages are the Tamal, the Telagu, the Tulava, the Malayalina and the Canarese. Dr. Cladwell, who has long resided in the Country, and is familiar with these languages, as also with the Science of philosophy, recognises them as five varieties of Non- Sans-

krit or Un- Aryan languages, and concludes that with the exception of Orrisa "those districts of western India & the Deccan, in which the Gujarathi & the Marathi are spoken, the whole of the peninsular portion of India, from the Vindhya mountains & the Narmada river down to the Southern extremity of Cape Comorin is peopled, & from the earliest period always has been peopled by different branches of one & the same race, speaking dialects of one & the same language." This race or people he calls Dravidian.

Mr. Norris fully concurs in this opinion but further observes a decided relation-ship between these languages & those of Australia.

Mr. John Hutt, who was long resident in Australia, has simultaneously made the same discovery and for the truth of these observations Dr. Rost, of the Royal Asiatic Society of London, may be cited as another independent witness, he, having in 1847, submitted a memoir on the subject to the late Chevalier Bunsen, Dr. Rost considers it "an undeniable fact that the gramatical Skeleton of the Australian, Mongolian, and south Indian languages is essentially the same, is not only distinct from the Sanskrit type, but from that of the Malay, Polynesian, Indo-chinese and Sub-Hunalian tongues.

अर्थः— “ हिंदुस्थान द्वीपकल्पाच्या दक्षिण प्रदेशांत ज्या भाषा बोलतात त्या एक जातीय अर्थात् त्यांचा परस्पराशीं अगदीं निकट संबंध आहे. परंतु त्या सर्व भाषांचें स्वरूप संस्कृत भाषेहून अगदीं भिन्न आहे. या भाषा तामिळ, तेलगू, तुलुव मलयालिनी व क्यानरी होत. डा. क्ल्याडवेल नामे गृहस्थ, ज्यांनीं या देशांत पुष्कळ वर्षे राहून त्या सर्व भाषा शिकून त्या भाषांचें शद्ब व्युत्पत्तिसह पूर्ण ज्ञान संपादन केलें ते असें ह्मणतात कीं, सदर्हू तामिळादि ९ प्रकारच्या भाषा अनार्य म्हणजे आर्य जी संस्कृत भाषा त्या भाषेहून केवळ भिन्न आहेत. शिवाय त्यांणीं असें सप्रमाण प्रतिपादन केलें आहे कीं ओरिसा प्रदेश व त्याच प्रमाणें पश्चिम हिंदुस्थान व डेक्कन यांतील प्रांत जेथें गुजराती व महाराष्ट्र भाषा बोलतात ते सर्व प्रांत व प्रदेश सोडून बाकी विंध्या पर्वत व नर्मदा नदी पासून केप कोमारिनच्या अगदीं दक्षिण टोका पर्यंतच्या हिंदुस्थानच्या सर्व द्वीपकल्प प्रदेशांत फार प्राचीन काळापासून एकाच अनार्य जातीचे भिन्न भिन्न शाखी व एकाच अनार्य भाषेचे भिन्न भिन्न पोट भाषी लोक रहात आले आहेत. या अशा जातीस किंवा लोकांला द्राविड ही संज्ञा होय.” या म्हणण्याला मि. नारिस यांचें पूर्ण पणें मत मिळतें व शिवाय ते आणखीं असें निश्चयात्मक प्रतिपादन करितात कीं या तामिळादि भाषा आस्ट्रेलियाच्या अनार्य म्लेच्छ भाषांशीं अगदीं जवळ जवळ मिळून आहेत. मि. जान हट्ट ज्यांणीं वर्षांचीं वर्षे आस्ट्रेलिया मध्यें

तद्देशीय भाषांच्या ज्ञान प्राप्त्यर्थ घालविलीं त्यांणीं हि अशा प्रमाणें एक सारखा शोध व सिद्धांत केला आहे. व याच्या विशेष प्रमाणार्थ लंडन एथील रॉयल एशिआटिक सोसाइटी-च्या डा. रोस्ट नामें एका सभासदाचा दुसरा एक स्वतंत्र पुरावा देतां येईल. डा. रोस्ट यांणी या विषया संबंधीं बनसेन साहेबाला बरेच शोध सादर केले आहेत त्यांत ते असें म्हणतात कीं, आस्ट्रेलिअन भाषा, म्यांगोलिअन भाषा आणि दक्षिण हिंदुस्थानांतील तामिलादि भाषा—या सर्व भाषांच्या व्याकरणाची सरणी, पद्धत व रचना मुख्यत्वेंकरून एकच आहे. व ती संस्कृत भाषेहून भिन्न आहे एवढेंच नव्हे परंतु मले, पोलिनीशिअन, इंडोचायनिज व हुनेलीअन पोट भाषा या भाषांहून फार भिन्न आहे. ही निर्विवाद व निःसंशय गोष्ट होय. एणेंप्रमाणें द्राविडादिक **प्राचीन अनार्य** होत. आतां **आर्वाचीन अनार्य** जे चितपावनादि त्याजबद्दल थोडीं प्रमाणें देतों.

। एवं निवासं कुर्वत्सु अकस्माद्दैव योगतः । नीत्वा सागर मध्यस्थै र्म्लेंच्छैर्बर्बरकादिभिः । बहू न्यद्धा न्यती तानि तेभ्यो जाता च संततिः । जातिं पृच्छसि हे राजन् जाति कैवर्तकः स्मृतः । सिंधू तीरे कृतो वासो व्याध कर्म विशारदः । चतुर्दशं गोत्रकुलं स्थापितं चातुरंगके । सर्वेंच गौर वर्णास्ते सुनेत्राश्च सुदर्शनाः ॥स्कंध पुराण.

अर्थः—या प्रमाणें ( सह्याद्रीच्या पाश्चिम समुद्र किनारीं अंत्यजांचीं १४ घराणीं सहकुटुंब परिवारें निवास करीत असतां

त्यांत)दैवयोगानें आफ्रिकेंतील बर्बरादि म्लेंच्छ लोक हिंदुस्थानच्या पश्चिमेकडून येऊन मिसळून पुष्कळ वर्षे झालीं आणि त्यांच्या पासून जी पुढें अकर्माशी संतति झाली ती(चितपावन) होय ×( पुढें एकदां कोणी परशुराम राजानें त्या लोकांस जात विचारिली तेव्हां त्या पैकीं एक ह्मणतो) हे राजा आम्ही ( चितपावन ) ज्ञातीचे कोळी* आहों. या मलबार—आरबी समुद्र तीराचे ठायीं वास कारितों व पारध करून त्याजवर आपली उपजीविका करितों×हे लोक मिश्रणानें गौरवर्णी घारे डोळ्याचे व चांगल्या स्वरूपाचे होते पण त्यांजला अनार्यत्वामुळें ओळखण्यासाठीं कांहीं कुळ नांव नव्हतें म्हणून त्या १४ घराण्यांला १४ नावें देऊन चातुरंग पर्वतावर त्यांची स्थापना केली. माधवशतप्रश्नकल्पलतिका ग्रंथांत हे चितपावन,

॥ शाखा यग्मंच संस्थाप्य शाकलां स्तैतिरीयकां ॥
निषिद्ध कर्म निरता मत्स्य भक्षण तत्पराः ॥ कन्या
विक्रय कारांश्च इंद्रियाणा मनिग्रहात् ॥ कलभाषी
पालनाच्च कर्कलाख्याः प्रकीर्तितः ॥

---

*सध्या मलबार किनारीं गाबीत नावाच्या ज्या कोळ्यापैकीं कांहीं कोळी चिपळूण, गुहागर, पुणें वगैरे प्रान्ती जाऊन चितपावन बनले त्या कोळ्यांची भाषा पद्धत, आडनावें, डोळ्यांचा घारेपणा व केशाचा पिंगटपणा व नैसर्गीक गुण ह्या गोष्टी चितपावन जातींत आढळतात. बिचाऱ्यांना भोळा शाहू नाहीं मिळाला!

या प्रमाणे निषिद्ध कर्म करणारे व मत्स्य व बदके आदिकरून मधुर ध्वनी करणाऱ्या पाळीव पक्षांचें मास खाणारे, कन्या विक्रय करणारे व तसेच अगम्य गामी असे होत.

हे चितपावन आपण अनार्य, या हिंदुस्थानांत पश्चिमेकडून आल्याचें स्वतः कबुल करितात तेव्हां त्याजबद्दल विशेष प्रमाणें देण्याचे भरिस पडत नाहीं.कोणी मंडलीक नावाच्या चितपावनानें रॅायल एशिआटिक सोसाइटीला आपल्या जाती संबंधी रिपोर्ट केला त्यांत ते असें ह्मणतात कीं, ( चितपावन भाग्योदय पृष्ट ५।६) " चितपावन या शद्वाचा अर्थ निंदेने अथवा थट्टेने चिता ह्मणजे सरण, व पावन ह्मणजे पवित्र या पासून निघाला. × या अर्थास इतिहासिक किंमत ( ग्रंथाचा आधार) आहे. मला असें वाटतें या जातीचे ( चितपावनाचे ) प्रथम वंशज (पूर्वज) हिंदुस्थानांतील एखाद्या बंदरांतून किंवा हिंदुस्थानच्या पश्चिमेकडील आफ्रिकेच्या समोरील किनाऱ्या पासून बहुधा तारवानें आले असावे " याच्च प्रमाणे चितपावन हे अनार्य असून मूळ आफ्रिकेंतून हिंदुस्थानांत आल्याविषयीं ग्यांन्ट डफ, रिचर्ड बर्टन, मार्क विल्क्स, एडवर्ड मूर, ह्यामिलटन, ड०वार्ड अशा शोधक युरोपिअनांनी विवेचन केलें आहे.

**आनरेबल**– प्रमाणें तर ठीक आहेत. पण मी असें विचारितों कीं हे चितपावन अनार्य– म्लेंच्छ असतां त्यांजला लोक ब्राह्मण मानतात हें कसें !

**ना०**– या चितपावनास सर्व लोक कांहीं ब्राह्मण मानीत

माहींत. पुण्याच्या आजूबाजूस जेथें चितपावनी पेशवाई झाली तेथें " राजा करील ती पूर्व दिशा " या ह्मणी प्रमाणें व अहमदनगर येथें मुसलमानी राजधानी होती तेव्हां त्या ठिकाणीं हुसनी मुसलमान, ब्राह्मणी आचार थोडासा स्वीकारून आपआपल्या जसे ब्राह्मणांत गणून घेऊं लागले तद्वत् बर्बरी चितपावनांनीं आपण ब्राह्मण बनून कांहीं लोकांमध्यें आपला ब्राह्मणपणा जुलूमानें व कपटानें वगैरे चालू केला:—.

"माध्यं दिनाश्च देशस्था गौड द्राविड गुर्जरा: कार्णाटा तैलंगाश्चापि चित्त पूर्णस्य वंशजा:*" ह्म० चितपावन हे मुख्य असून त्यांच्या पासून गौड, गुर्जर, देशस्थादि सर्व ब्राह्मण उत्पन्न झाले आहेत. असा श्लोक पराशरींत कसा तरीं ढकलून अज्ञान भोळ्या लोकांचीं मनें दूषित केलीं. तथापि पढीक उंच वर्णाचे लोक सामील होईनात. खुद्द बाजीराव पेशवा, राघोबाचा मुलगा, एकदां नासिकास गेला होता तेथें ज्या पायऱ्यांनीं पवित्र ब्राह्मण गंगेवर उतरतात त्या पायऱ्यांनीं त्यास (बाजीरावास) उतरूं देईनात. ( ह्यामिल्टन; पृष्ठ १९७ ) व त्याच प्रमाणें पेशव्यांची इतकी उंच स्थिति होती कीं, मराठी दरबारचे मुख्य जे पेशवे जे हिंदुस्थानांतील कोणत्याहि राजा प्रमाणें महत्व धरीत होते, त्याजला कोणत्याहि उंच वर्णाच्या

---

*या विलक्षण मतलबी खोट्या श्लोकाचें खंडण चितपावन विनोद, दशप्रकरण, अहिंसाधर्म प्रकाश ग्रंथांत सविस्तर केलें आहे.

ब्राह्मणां बरोबर जेवण्यास प्रतिबंध होत होता. ( वार्ड; पृष्ठ १९९ ) याप्रमाणें उंच वर्णाची आपल्यास प्रतिबंदी आहे असें जाणून बाजीराव पेशवा मोठ मोठ्या क्षेत्रीं व गावीं जाऊन ब्राह्मण भोजनें घालूं लागला. तेव्हां जे मूढ, अन्नार्थी होते ते पोटभर दक्षिणेच्या लोभानें पेशव्याचे पंक्तीस बसूं लागले. परंतु जे पढीक, घरंदाज होते ते कबूल होईनात. तेव्हां शेवटीं ब्रह्मावर्तांत लक्ष्मणघाटीं येऊन राहिला आणि तेथें जो कोणीं ब्राह्मण येईल त्यास तो यथेच्छ द्रव्य देऊन आपल्या पंक्तीस घेत असे. असा क्रम चालू होतां "द्रव्येण सर्वं वशात्" या म्हणी प्रमाणें मध्य देशस्थ उंच वर्णाचे शतशः लोक पेशव्यास ब्राह्मण मानून त्यासह पंगत करूं लागले. इतर वर्णाचे लोक तर सहजीं वळले. अमक्यानें वेद शिकूं नये, तमक्यानें संस्कृत वाचूं नये, अमक्यानें आडवें गंध लावूं नये, उमें वस्त्र नेसूं नये, चितपावना शिवाय कोणी कोणाचे घरीं धर्मकृत्यें करूं नये. अशा जुलुमामुळें कित्येक माळी, कुणबी वगैरे लोकांस चितपावनाला ब्राम्हण म्हणणे भाग पडलें. तथापि त्या १०० वर्षांच्या जुलमी चितपावनी पेशवाईचा अंत होतांच व निःपक्षपाती व न्यायशील इंग्लिश कारकीर्दीचा उदय होतांच पुणे जिल्ह्यांतील ते माळी कुणबी वगैरे लोक सत्यशोध व स्वतंत्र विचारावर आले. व त्यांनीं अशा नीच चितपावनांशीं धर्म संबंध कोणताच ठेवूं नये असा आपसांत ठराव केला. एका कोकणस्थ मराठ्यानें " दीनबंधु" त एक पत्र छापलें आहे त्यांत

असें आहे कीं, " ह्या आमच्या कोंकण प्रांतांत परशुरामानें म्लेंच्छाच्या प्रेतापासून केलेले चितपावन त्यांस आम्ही भूदेव असें मानीत गेलों. त्यांनी परशुरामाशीं कापट्य व अघोर कर्म केल्यामुळें ते अंत्यज आहेत. त्यांचें तोंड सकाळचे सव्वा प्रहर पर्यंत जो पाहिल व त्यांच्या पंक्तिस किंवा घरीं भोजन करील तो जन्मभर दरिद्री होईल असें परशुरामाचें स्पष्ट शापवचन आहे त्या अर्थी आम्ही या ठकबाजी उपाध्ये बुवांकडे अन्न पाणी घेणें दूरच आहे; परंतु आह्मास म्लेंच्छाचा स्पर्श झाला म्हणजे स्नान करावें लागतें त्याचप्रमाणें वरील अशुद्ध उपाध्ये बुवांचा स्पर्श झाल्यास अवश्य स्नान केलें पाहिजे. आपल्या वेद वाक्यास या मतिमंद लोकांनीं बोटासारखा हळदीचा सफा ओढून स्वताचे तोंडांतून निघाले तेच वेद आणि बोललें तेंच शास्त्र; केला तोच न्याय; याप्रमाणें स्वमतीनें थोतांडें माजविलीं तीं प्रभूस सहन न झाल्यामुळें या ठकबाज लोकांच्या मूळ उत्पत्तीचा सह्याद्रिखंड सर्व साक्षी परमेश्वरानें दयाळु होऊन आम्हाला पाठवून दिला. तात्पर्य " जेथून आवाहन तेथून विसर्जन" या ह्मणी प्रमाणें ज्या मराठ्या कुणब्यानीं चितपावनास पेशव्याच्या भीतीमुळें पूज्य मानिलें तेच मराठे कुणबी लोक त्यांस आतां अन्त्यजवत् मानतात. त्याचप्रमाणें ज्या दक्षिण मलबार किनारीं (गोवें कारवारपासून दक्षिण प्रान्तीं) हे बर्बरी म्लेच्छ (सांप्रत चितपावन) उतरले तेथील लोकांस जेव्हां समजलें की ह्या म्लेच्छ लोकांनीं

गुहागर वगैरे प्रदेशीं जाऊन ब्राह्मणत्व स्वीकारून धर्म भ्रष्टता चालविली तेव्हां पासून अशा ब्राह्मणवेषधारी कपटी चित्पावनांचें प्रातःकालीं कोणी तोंड पाहूं नये, पाहिल्यास सचैल स्नान करावें असें ठरविलें व त्याप्रमाणें सांप्रत वहिवाट चालु आहे. दुसरें हे बर्बर ( सांप्रत चितपावन ) व द्राविडादि म्लेंच्छ जेव्हां ब्राह्मण ह्मणून वागूं लागले व जिकडे तिकडे भ्रष्टकार चालविला तेव्हां त्या वेळच्या शास्त्र ग्रंथ कर्त्यांनीं त्यांचा,

॥ त्रिशंकून् बर्बरानंध्रान् ॥ चीन द्रविड कोंकणान् ॥ कर्णाटकांस्तथा भीरान् कलिंगांश्च विवर्जयेत् ॥ ( हेमाद्रि )

या प्रमाणें निषेध केलेला आहे. तात्पर्य अनार्य चितपावनास सर्व साधारण लोक नीच मानतात. आतां थोडे बहुत कोणी त्यांस ब्राह्मण मानतात किंवा मानले म्हणतां तर तो प्रकार राज भीतीनें व द्रव्य लोभानें घडलेला आहे. शिवाय आणखीं एक कारण पहा कीं, सत्य वेदोक्त धर्माचा लोप झाल्यामुळें कांहीं हिंदु लोक एवढे विचार शून्य व मूढ होऊन गेले आहेत कीं ते म्लेच्छांस व नास्तिकांस देव मानीत आहेत. येसु ख्रिस्त जो म्लेंच्छ ‘ त्याची आई जी मेरी तिला’ “ मोत माउली ” देवी मानून किरीस्तावाच्या देवळांत जाऊन भजत आहेत. ताबूत हीं म्लेच्छांचीं थडगीं. तर अशा म्लेच्छ थडग्यांस देव मानतात. जैन लोक जे सत्य वेद धर्म बाह्य व नास्तिक बनले त्या जैनांस देव मानून देवालयांत त्यांच्या नावाचीं एकेक मूर्ति स्थापिली आहे. प्रेत, भूत पिशांचास तर सर्वत्र

देव बनविले. तात्पर्य ज्या हिंदुस्थान प्रदेशांत म्लेच्छांस देव मानणारे सांपडतात तेथें त्या म्लेच्छांस ब्राह्मण मानणारे सांपडत असतील यांत काय आश्चर्य !

**आन०**—आतां कऱ्हाडे उरले त्यांची कशी काय हकीकत ?

**ना०**— कऱ्हाडे हे द्राविडादि प्राचीन अनार्यांप्रमाणें मूळ स्थायिक किंवा चितपावनादि आर्वाचीन अनार्यां प्रमाणे बहीर्प्रदेशाहून आलेले असें जरीं स्पष्ट इतिवृत्त दृश्य नाहीं तरीं,

> ॥ कऱ्हाढ देश नामाच दुष्ट देशः प्रकार्तितः ॥ सर्व लोकाश्चकठिणा दुर्जनाः पापकर्मिणः ॥ पापकर्मा महानष्टा व्यभिचारेण चोत्पत्तिः ॥ कऱ्हाढ अस्थियोगेन रेतं क्षिप्त्वा विभावकम् ॥

या प्रमाणें त्यांची उत्पत्ति व्यभिचारानें कऱ्हाढ देशांत झाली असून ते दुष्ट, निर्दय, पापकर्मांत सदा रत असे नष्ट, भ्रष्ट दुरात्मे व शिवाय मातृका, भवानी आदि देवतांच्या नावानें मनुष्याला ठार मारण्याच्या अत्यन्त भयंकर, क्रूर व निंद्य कृत्यावरून ते लोक असुर—अनार्य असल्या बद्दल लोक प्रसिद्धि आहेच. हे लोक लाडी गोडीनें एखाद्या माणसाला विश्वासवून आपल्या घरीं ठेवून घेऊन ठार मारीत असल्यामुळें "कसायाचा विश्वास धरवेल पण कऱ्हाड्याचा धरवणार नाहीं" अशा प्रकारें लोकांत म्हणाहि पडून गेली आहे. हे लोक बहुधा चिनाहून सुमारें १२०० वर्षांपूर्वी आलेले असल्याबद्दल मि. विलफर्ड, क्यांबेल अशा शोधक युरोपिअनाचें म्हण-

णें आढळतें व तें बरेच अंशीं संभवनीय दिसतें; कारण त्या देशांत असें क्रूर व नीच आचरण करणारे लोक बरेच आहेत व तद्वत्च त्या कऱ्हाड्यांला मनुष्याचा साक्षात् प्राण घेण्याची कांहींच पर्वा वाटत नाहीं. व मघां हेमाद्रीचा जो श्लोक सांगितला कीं "बर्बरादि अमुक अमुक म्लेच्छ लोक ब्राम्हण बनले तस्मात् त्यांच्याशीं कोणी धर्म संबंध ठेवूं नये" तर अशा पैकीं जे चिनी ब्राह्मण सांगितले तेच हे कऱ्हाडे होत. इंग्लिश लोकांची कारकीर्द या हिंदुस्थान देशांत सुरू झाल्यावर त्यांणीं " कोण लोक कसे " असल्या बद्दल बरेच शोध लिहून ठेविलेले आहेत त्यांमध्यें,

In former times they occasionally poisoned their sons-in-law, visitors & strangers as sacrifices to their goddess in the hope of securing offspring; *Vanshavridhi.-(Ratnagiri Gazetteer.)*

( याप्रमाणें ) ते (कऱ्हाडे) प्रसंगानुसार आपले जांवई, पाहुणे किंवा कोणी परके माणूस यांस विष प्रयोग करून आपल्या देवीला मागें बळी देत " असा उल्लेख केला आहे. ह्या लोकांच्या घरीं कोणी परदेशस्थ पाहुणा वाटसरू वगैरे आला म्हणजे त्याजला लाडी गोडीनें बळी देण्याच्या वेळा पर्यंत ठेवून घ्यावयाचा. आतां वार्षीक महापूजा दसऱ्याचे १० वे रात्री दर साल होते त्या समयीं कसेंहि करून ब्राह्मण मारा-

वयाचा* व तो वेळेवर मिळण्याचा संभव नसल्यास एखा-द्याला आपली मुलगी देऊन त्याला त्या लोभानें आपल्या घरीं ठेवून घ्यावयाचा व दुसरा आला ह्मणजे त्याजला बळी द्या-वयाचा; असे वर्षानु वर्षे जांवई मारल्यानें एखाद्याच्या एकटी असलेल्या मुलीला किती नवरे करावे लागत असतील ते असोत! एका मुलीवर असेच प्रसंग गुजरले होते. पण एका वर्षी तिच्या फक्कड नवीन नवऱ्याशीं अत्यंत प्रेम व प्रीति जडल्यामुळें तिणें आपल्या नवऱ्या बदली आपल्या भावास विष देऊन मारवला व प्रीयकराचा प्राण वांचविला. असें हें भयंकर क्रूर कृत्य फार गुप्त रीतीनें चाललेलें असतें तें पुणें

---

* त्यांची ( कऱ्हाड्यांची ) पूर्वापार अशी चाल आहे कीं, विष प्रयोग करून दरसाल एक तरी ब्राह्मण मारावा. म्हणजे लक्ष्मी तुष्ट होते. ( मनो वेधक गोष्टी )

*जो बळी देतात त्याचा अंश खाण्याची चाल अनार्यांत आढळते. त्या प्रमाणें हे कऱ्हाडे मनुष्याचा बळी देऊन त्याचें मांस खात असावे असें विचारी लोक अनुमान करि-तात खरें व फार प्राचीन काळीं ते सुधारलेल्या आर्य भूमींत येण्यापूर्वी कदाचित् कांहीं रानटी लोकां प्रमाणें खातहि असतील; परंतु या आर्यावर्त भूमींत आल्यापासून गुप्त रीतीनें प्राण घेण्यासाठीं विष प्रयोग करावा लागतो ह्मणून याणीं नर मांस खाल्याचा कोठें आधार सांपडत नसावा.

दरबारीं प्रथम उघडकीस येऊन लोक प्रसिद्ध झालें. कऱ्हाड्यांच्या ह्या नीच व क्रूर कृत्याबद्दल मोठ्या बारकाईनें शोध करून शोधक युरोपिअनांनीं माहीतीचे लेख लिहून ठेविले आहेत त्या पैकीं विस्तार भयास्तव फक्त एकट्या मिटफर्ड साहेबाचा दाखला देतों तो येणें प्रमाणें :—

Human sacrifices are still common in the Company's territories in India, although the practice is kept more secrect. ( One instance is cited here.) On the festival of Dasara the Karhadas sacrifice a man to the Saktees (infernal deities); this sacrifice is called Naramedha. Dr. Collier related to me the following story, which took place in the time of Balaji Bajirav, the father of the late Peshwa, in Poona itself; this extraordinary case exhibits the desecration of every hallowed sentiment and feeling at the Shrine of the most atrocious superstition. A Karhada was sitting at his door, when he observed a Brahmin traveller sit down to rest at the well in front of his house, the thought struck him that this man would answer well as a victim at the next Dasara; he accordingly entered into conversation with the stranger and invited him to his house, and eventually induced him to remain his guest; after remaining a considerable time, the young man wished to

take leave of his hospitable host. The festival was yet distant and the crafty Karhada, finding no other means of detaining him, and perhaps imagining he might be suspected, actually bestowed on him his daughter in marriage; this, besides blinding the eyes of his victim, was an effectual way of detaining him; the father-in-law only waited for the festival day to consummate his diabolical plot; however, there was a lady in the case, and what was more, she loved her new husband, and was not inclined to part with him so easily; when the heart is engaged it would be an insult to the most beautiful half of the creation to suppose that a woman could not outwit a priest. Every thing was arranged for the concluding scene; at a great banquet a narcotic or poisonous draught was to be administered to the unconscious victim, when he was to be carried before the idol of Bhawani, where his throat was to be cut, and his body afterwards buried at the feet of the idol, to insure prosperity to his murderers for the ensuing year. The lady had far more pleasing prospects in view for him, and on the day of the festival succeeded in changing the poisoned cup, which fell to the lot of her brother, who was poisoned instead of the intended sacrifice: this un-expected denouement caused an uproar

and was the means of making the whole affair public, and bringing it before thé Peshva, who punished the guilty individuals and banished the whole sect from Poonah.

**भावार्थः**— हिंदुस्थानांतील कंपनी राज्यांत दसऱ्याच्या सणाचे दिवशीं आपल्या आराध्य देवीला नरमेधाची ( मनुष्यें बळी देण्याची ) वहिवाट कऱ्हाडे लोकांत फार गुप्त रीतीने अजून सर्वत्र चालू आहे. खुद्द पुण्यांत बाळाजी बाजीरावाचे वेळीं कऱ्हाड्यांतील उघडकीस आलेल्या एका नरमेधाविषयीं डा. कालिअर यांणीं मला एक गोष्ट सांगितली. या विलक्षण गोष्टीवरून अति भयंकर मूर्तिमंत देव भोळेपणामुळें धर्मसंबंधी विचाराचा व मानसिक शक्तीचा पाजीपणा व्यक्त होतो : एका कऱ्हाड्यानें आपल्या घरासमोर एका विहिरी जवळ एक तरुण ब्राह्मण प्रवासी विश्रांति घेत बसलेला पाहिला. व हा मनुष्य येत्या दसऱ्या दिवशीं बळी देण्यास उपयोगीं पडेल असें लक्षांत आणून त्या कऱ्हाड्यानें लाडीगोडीच्या भाषणानें आपल्या घरीं रहाण्याविषयीं त्या पांथस्थाचें मन वळविलें. पुढें तो पांथस्थ तेथें बरेच दिवस राहिल्यावर स्वदेशीं जाण्याकरितां आपल्या यजमानाचा निरोप मागूं लागला. परंतु दसऱ्याला बराच अवकाश आहे व तेथपर्यंत त्याला राहून घेण्यास योग्य निमित्त नाहीं व कदाचित् त्याच्या मनांत संशय येईल असें जाणून त्या कऱ्हाड्यानें आपल्या मुली बरोबर त्याचें लग्न

लाविलें तेव्हां त्या मोहपाशामुळें तो पांथस्थ काळाच्या जभ-ड्यांत पडण्यासाठीं तेथें राहिला. इकडे त्याचा सासरा द-सरा येऊन आपलें निंद्य कृत्य केव्हां साधतें याची वाट पहात बळी देण्याच्या तयारींत राहिला. पण या तयारींत त्याची ती मुलगी होती. त्या मुलीचें आपल्या नूतन नवऱ्यावर फार प्रेम जडल्यामुळें आपल्या नवऱ्याचा सहजीं वियोग करून घेण्यास तिचें मन लागेना. अंतःकरण एकदां वेधून गेलें ह्मणजे स्त्री ही मोठ्या धूर्त कावेबाज धर्मवेत्त्या पुरुषाला फस-विणार नाहीं असें नाहीं. पुढें दुष्ट हेतु सिद्धीस नेण्याची तयारी करून तन्निमित्त मोठी मेजवानी केली. व पुढील वर्षीं मोठें भाग्य प्राप्त व्हावें ह्मणून बेशुद्ध करणारें औषध किंवा विष त्या भोळ्या गैर माहिती मनुष्याला द्यावयाचें; व नंतर त्याला बेशुद्धावस्थेंत भवानी देवीच्या मूर्ति पुढें न्यावयाचा व तेथें त्याचा गळा कापावयाचा व (रक्त तोंडास लावून-पाठवि-शेष) त्याचें शरीर त्या मूर्तीच्या पायांशीं पुरावयाचें-अशी यो-जना केली. पण त्याच्या पासून होणाऱ्या जास्त सुखोपभोगाचे विचार त्या मुलीच्या मनांत घोळून तिणें त्या आपल्या नवऱ्या-च्या भोजन पात्रावर बेशुद्ध करणाऱ्या औषधाचा प्याला ठेवावयाचा तो न ठेवतां दुसऱ्या पात्रावर ठेवला व तें पात्र तिच्या बंधूचें असल्या मुळें तो प्याला तिच्या त्या भावाच्या वांट्यास आला. व व्हावयाचा परिणाम झालाच.

या एकाएकीं घडलेल्या गोष्टीवरून मोठा गवगवा झाला

आणि सर्व कृत्य उघडकीस येऊन पेशव्याकडे चौकशी सुरू झाली. ( विशेष अन्य पाठ असा आहे कीं, त्या कऱ्हाड्याचा तो मुलगा कैफानें बेशुद्ध झाल्यावर नित्य क्रमानुसार नियमित असामींनीं त्याला देवालयीं नेऊन देवी सभोंवती ३ वेळां फिरविला. आणि नंतर देवी समोर आडवा पाडून त्याचें डोकें कापलें आणि रक्त देवीच्या तोंडास लावून प्रेत तिच्या शेजारीं पुरलें. हें भयंकर अघोरी कृत्य त्या पांथस्थानें ( जांवयानें ) पाहून तो जीव घेऊन रातोरात्र पळाला आणि एकदम बाजीरावाचे दरबारीं जाऊन सर्व वृत्तांत कथन केला; त्याजवरून बाजीरावानें सर्व कऱ्हाड्यांला पकडून आणून चौकशी चालविली आणि जे खुनास प्रत्यक्ष कारणभूत झाले त्यांजला देहान्त शिक्षा देऊन बाकी सर्व कऱ्हाड्यांची जात काळ्या पाण्यावर पाठविली ह्मणजे पुण्याहून हद्द पार केली.

**भट**—हे द्राविड, चितपावनादि अनार्य असल्याचें सिद्ध होतें तें असूं; पण त्या माधव बागेचा प्रकार सांगणें राहिला आहे तो सांगा बघूं. हे आनरेबल आड आले मध्येंच.

**ना०**—आपल्या वेदशास्त्रांत ( येथें वेद व शास्त्रें असे भिन्न भिन्न ग्रंथ नाहीं समजावयाचे बरें ! तर वेद हेच शास्त्र ह्मणजे शिक्षणाचे ग्रंथ असें समजलें पाहिजे; दुसरे कांहीं शास्त्र ह्मणजे शिक्षणाचे आर्ष ग्रंथ मन्वादि स्मृती सारखे असले तर ते वेद शास्त्रास जितक्या अंशीं अनुकूळ असतील तितक्या अंशीं मात्र मानावयाचे; या विषयीं पूर्वींहि

सप्रमाण कथन केलेंच आहे, तर अशा सनातन, आद्य वेदशास्त्रांत ( सविस्तर प्रमाणें पुस्तक १ लें कन्यागत गुरु चरित्र यांत दिलीं आहेत ) " विवाह समयीं वधू ( नवरी) ही युवती ह्मणजे १५।१६ वर्षांच्या वयाची सज्ञान अशी असली पाहिजे व त्या मानानें वर ( नवरा ) हा २१। २४ वर्षांच्या उमरीचा असला पाहिजे " अशी वेदाज्ञा आहे. तर अशा ह्या वेदाज्ञे विरुद्ध केवळ बाल्यावस्थेंत ह्मणजे १ पासून ७।८ अशा वर्षांच्या मुला मुलीचीं नांवाचीं लग्नें ह्मणून विचार शून्य धर्म भ्रष्ट लोक लावतात. ही दुःखास्पद गोष्ट होय. वास्तविक "लग्न" या शब्दाचा तर्कसिद्ध शास्त्रीय अर्थ असा आहे कीं, " समान शील - स्वभाव, समान गुण, समान प्रकृति, समान रूप, समान वर्ण अशा व त्याच प्रमाणें वधूपेक्षां सवा किंवा फार तर दीड पट ज्यास्त उमरीचा वर अशा नियोजित वधूवरांचा संयोग अर्थात् शरीर संबंध होणें"- तर अशा प्रकारें शरीर संबंध न जडतां ( शरीर संबंधाचा अभाव असावयाचाच : कारण वधू ही अधिकांत अधिक १०।११ वर्षांची व कमींत कमी वर्ष ६ महिन्याची असते व वर त्या मानानें २-३ वर्षें मोठा असावयाचा ह्मणजे केवळ अज्ञानच ) शरीर संबंध जडला अर्थात् **लग्न झालें किंवा केलें असें जुलुमानें मानून** लग्न बंधन संबंधी सर्व जबाबदाऱ्या। गरीब अर्भक अबलांवर टाकून वेडगळ अंध परंपरागत लोक त्यांजला अप्रीति, तिरस्कार,

वैधव्यादि दु:सह दु:खार्णवांत व्यर्थ लोटतात ही अत्यन्त शोचनीय गोष्ट न्याय, तर्क, व सद्विचार, सच्छास्त्र विरुद्ध होय. एखाद्या अज्ञान ७-८ वर्षांच्या पोरीला, तिच्या **वाढत्या सुखोप भोगाला** निर्बल, व निरुपयोगी **उतार सुखोपभोगाच्या** अशा ५०-६० वर्षांच्या थेरड्याच्या गळ्यास अज्ञान पणांत बांधणें व तें तिला पुढें सज्ञानपणांत सहन करण्यास लावणें हा त्या अबला जातीवर केवढा जुलूम !

२ बाल्यावस्थेंत प्रथमतः मुली मुलगे निरोगी दिसतात. परंतु पुढें शरीरस्त धातु पक्क होण्याचे संधीस अर्थात मुलीच्या १५।१६ व्या व मुलाच्या २०।२२ व्या वर्षांच्या वयाच्या सुमारास, रोगी प्रकृति होणे असल्यास कफ, क्षयादि अकाल प्राण नाशक पिंडस्थ रोग दृष्टिगोचर होतात अशी आद्य सर्व मान्य धन्वन्तरी आदि महा अनुभवी ऋषि मुनींनीं सिद्धता केली आहे. व त्या प्रमाणें सांप्रत राजाने केलेल्या मनुष्य गणतीवरून स्त्रिया १६।१७ वर्षांवरील आणि पुरुष २१।२२ वर्षांवरील जितके मृत्यु पावतात त्या पेक्षां १६।१७ वर्षां आंतील स्त्रिया आणि २१।२२ वर्षां आंतील पुरुष ( सदर्हु पिंडस्थ रोगाने ) ज्यास्त मृत्यु पावतात हें अनुभव सिद्ध पहातों : तर अशा रोग दृष्टि गोचर होण्याच्या अनिवार्य दु:खोद्भवक वेळाचा तादृश विचार व तिल:प्राय काळजी न करितां त्या वेळे पूर्वींच बालकांला विवाह बंधनानें बांधून भयंकर परिणामाच्या मार्गावर टाकणे हा के-

वढा बरें बिचाऱ्या अबलांवर जुलूम !

३ स्त्री पुरुषांनीं आमरणान्त एकत्रपणें एक विचारानें रहाणें, परस्परांनीं परस्परांच्या सुख दुःखाच्या व नफ्या तोट्याचे विभागी असणें, एकमेकांस स्वशक्त्यनुसार काया, वाचा मने करून मदत करणें, परस्पर प्रीति व स्नेह भावानें वागणें, संतति उत्पन्न करून तिचें यथाशक्त्या पालन पोषण करणें व तिजला उत्तम शिक्षण देऊन सन्मार्गास लावणें, व्यभिचार न करणें अशा बद्दलचा त्यांच्या ( स्त्री पुरुषांच्या ) मर्जीवरचा जो प्रतिज्ञा—करार लेख किंवा शब्द—वचन त्याचें नांव विवाह. हा विवाह रूपी प्रतिज्ञा लेख साधारण अज्ञानावस्थेंत झालेला न्याय, तर्क, नीति यांच्या विरुद्ध होय असें विचारा अंतीं विचारी मानवास वाटल्या वांचून किमपि राहाणार नाहीं. यःकश्चित् पैशाच्या वगैरे देणे घेणेच्या व्यवहारास जर सांप्रत सर्व लोकानुमतें व राजानुमतें सज्ञानपणाची ह्मणजे मनुष्याच्या १८।१६ वर्षांच्या वयाची आवश्यकता आहे, तर मग आमरणान्त एकत्र राहाण्याच्या विवाहरूपी प्रतिज्ञा लेखास किंवा वचनास सज्ञानपणाची, दूर दृष्टीची व दूरवर ज्ञानाची व विचाराची किती आवश्यकता असली पाहिजे बरें ! ४।५।६।७।८।९ अशा वर्षांची लहान अर्भक कन्या जी प्रजोत्पादनार्थ वगैरे निर्बल व अयोग्य असते—अशा त्या निर्बल अयोग्य अज्ञान अर्भका कडून प्रजोत्पादनार्थ वगैरे करार करवून घेणें हा बिचाऱ्या अबलांवर केवढा जुलूम !

४ "चतस्रोवस्थाःशरीरस्य । वृद्धिर्यौवन संपूर्णता किंचित् परिहाणि श्चेति । तत्राषोडशाद्वृद्धिः इ०" या धन्वन्तरि मुनिकृत सुश्रुत नामक प्राचीन सर्व मान्य वैद्यक ग्रंथोक्ती प्रमाणें मनुष्याची अर्थात् स्त्री पुरुषांची युवावस्थेंत ह्मणजे वयाचे १६ वर्षांवर, शरीरस्थ धातु पुष्ट व परिपक्व होते व तेणें करून शारीरीक पुष्टि व विचार शक्ति हीं सदृढ होतात. व अशा यौवन समयीं शरीरस्थ धातु वृद्धिगत व पक्व होऊं लागल्यावर मनुष्याच्या पुढील शारीरीक स्थिति विषयीं व मानसीक बरे वाईट गुण व विचार याज विषयीं चांगलें परिज्ञान होतें. अर्थात अमुक एक स्त्री किंवा पुरुष बाल्यावस्थेंत ह्मणजे वयाचे १५।१६ वर्षांचे आंत असतां पुढें शरीरानें निरोगी किंवा रोगी होईल अथवा मानसीक विचारानें पुढें सद्गुणी किंवा दुर्गुणी निपजेल अशा गोष्टीचा यौवनावस्थेंत विशेष बोध होतो. व ही गोष्ट सर्व शोधक विचारी मानवास अनुभवशीर असून निर्विवाद मान्य हि आहे. तर अशा मानवी प्रकृतीच्या शारीरीक व मानसीक धर्माचें व गुणाचें अनुमान करून घेण्याचे वेळे पूर्वीच ५,६,७,८,९,१० वर्षें अगोदर अर्भकांच्या अकालीं विवाह गांठी बांधून त्यांजला पुढें होणाऱ्या वैधव्यादि दुःखार्णवांत पडण्याच्या मार्गावर विनाकारण ठेवणें हा बिचाऱ्यांवर केवढा जुलूम !

५ अज्ञानावस्थेंत स्वरूप व सद्गुण संबंधी परस्पर अनुमोदना वांचून विवाह झाल्यामुळें एक तर परस्परांस परस्परांच्या

स्वरूपाचा व स्वभावाचा कंटाळा व तिरस्कार बहुशः उद्भवतो. व संतति उत्तम होण्याचें मुख्य साधन जी परस्पर प्रीति तिचा भंग होऊन मोठाले अनर्थ घडतात:— वधू कुरूप किंवा काळी असली ह्मणजे वर पुढें वयांत आल्यावर स्वप्रतिमानुरूप अन्य सुरूप शुभ्र वर्णी स्त्री वरतो किंवा तसें करण्यास योग्य साधन नसल्यास वेश्येच्या नादीं लागतो. तेणें करून बिचारी वधू अन्नवस्त्रासहि महाग होते. बरें वर कुरूप किंवा काळा असला तर ती वधू वयांत आल्यावर त्या वरास ( जुलमानें मानिवलेल्या नवऱ्यास ) कंटाळते व आत्म सुखार्थ स्वप्रतिमानुरूप अन्य पुरुषाशीं अनाचारास प्रवृत्त होते. व असा अनाचार त्या मानीव नवऱ्याच्या नजरेस आल्यावर रागाच्या आवेशांत तो तिचा प्राण घेतो किंवा तिला घरांतून हांकलून देतो ह्मणजे तिला पोटासाठीं वेश्येचा धंदा करावा लागतो. अशा गोष्टी दृश्य आहेत—तर या प्रमाणें परस्पर अनुमोदना वांचून अज्ञानावस्थेंत विवाह बंधन करून उभय पक्षीं बिघडा बिघड व तज्जन्य भयंकर परिणाम होऊं देण्यास कारणभूत होणें हा केवढा पाजीपणा व जुलूम होय !

३ "**चतुर्थी होममंत्रेण त्वङ्मांस हृदयेंद्रियैः।भर्त्रा संयुज्यते पत्नी तद्गोत्रा तेन सा भवेत्**" ह्म०जेव्हां नियोजित वधूशीं वराचा संभोग होतो तेव्हांच मात्र ती वधू त्या वराची विवाहित स्त्री होऊन त्याच्या गोत्रांत—कुळांत येते अशी ज्ञात्या अनुभवी ऋषींची शास्त्राज्ञा आहे त्या शास्त्राज्ञे प्रमाणें

सांप्रत १.२.३.४.५.६.७.८.९. अशा वर्षांच्या ज्या अज्ञान अल्पवयी मुलींचीं नांवाचीं*लग्नें ह्मणून होतात त्या अल्पवयी अज्ञान मुली आपल्या ( त्या नांवाच्या मानीव ) नवऱ्याच्या गोत्रांत येत नसतात हें उघड आहे. कारण त्यांच्याशीं संभोग होणें असंभव्य व होताहि नसतो, ही निर्विवाद व निःसंशय गोष्ट होय. तर १।२।३।४।५ अशा वर्षांच्या अर्भक मुली, वराशीं **संभोग न होतां** व तेणे करून वराच्या गोत्रांत त्या येत नसतां. " **या गोत्रांत आल्या अशी खोटी कल्पना** करून" तो ( नांवाचा मानीव )पति मयत झाला असतां त्याच्या नांवानें वैधव्यादि दुःखें अज्ञान मुलीला भोगण्यास लावणें हा सद्धर्मी ह्मणून घेणाऱ्या वडिलांचा बिचाऱ्या अज्ञान मुलांवर केवढा जुलूम व अविचार होय!

७ " **एकमूर्तित्व मायाति सपिंडीकरणे कृते । पत्नी**

---

* या हिंदुस्थानांतील मुलींचीं ( नांवाचीं ) लग्नें पाळण्यांत १ महिन्याचे वयाचे आंतहि करितात. बडोद्यांत मागें खानेसुमारी झाली त्यावरून १ महिन्यापासून १२ **महिन्यांच्या विधवा** ६ व १ वर्षापासून २ **वर्षांच्या वयाच्या विधवा** ६१ व २ पासून ३ **वर्षांच्या वयाच्या विधवा** ९० याप्रमाणें ४.५ ६.७.८. अशा वर्षांच्या वयाच्या हजारो विधवा मानलेल्या आहेत, असें दिसून येईल (विशेष स्पष्टीकरणार्थ नारायण केशव शास्त्री कृत " पुनर्विवाहकांस चपमा " ग्रंथ

**पति पितृणान्तु तस्मात्त गोत्र भागिनी** " ह्म० वधूवरांचा अर्थात् विवाहार्थ योजिलेल्या स्त्री पुरुषांचा परस्पर शरीर संबंध ह्मणजे संभोग ( सांप्रत चालू गर्भाधान ) होण्या पूर्वी त्यांजला फक्त **वधूवरें** हीच संज्ञा असते. एकदां पाणि गृहणादि विध्युत्तर अशा नियोजित स्त्री पुरुष **वधूवरांचा** परस्पर **संभोग झाला** ह्मणजे मात्र त्या **वधूस्त्रीला पत्नी** व त्या **वर पुरुषाला पति** ही संज्ञा प्राप्त होते व तदनंतर ती स्त्री पत्नी रूपी अशी आपल्या पतिगोत्रास मिळते., याप्रमाणें विवाहार्थ योजिलेल्या वधूवरा **स्त्री पुरुषांचा** ( सज्ञानपणीं ) परस्पर संभोग झाला तरच त्या पुरुषाला **पति** व स्त्रीला **पत्नी** हें

---

पहावा ) या वडोद्याच्या खानेसुमारी प्रमाणें इतर ठिकाणच्या खानेसुमारींत विधवांच्या वयाचे पृथक् पृथक् आंकडे असते तर या हतभाग्य हिंदुस्थानांत १ महिन्या वयाच्या किती विधवा अकाल बालविवाहाच्या योगानें मानलेल्या आहेत, हें दाखवितां आलें असतें. तात्पर्य अशा ह्या १ महिन्याच्या ह्मणा किंवा १.२.३.४.५. अशा वर्षाच्या वयाच्या अर्भक पोरी, त्यांचा तो मानीव अर्भक पति मेला असतां विधवा मानून त्यांजला पुरीं ९२ वर्षें ( ४।२ कमी ह्मणा ) वैधव्यादि अखंड दुःसह दुःखें सहन करण्यास पाषाण हृदयी मातापितादि आप्तवडील लावित असतात हें ऐकून विचारी सदय अंतःकरणाचे लोकांचें हृदय चरचरां भाजल्यावांचून कसें बरें राहील ?

नांव प्राप्त होतें असें असतां सांप्रत एक वर्ष उमरी पर्यंतची अज्ञान मुलगी नियोजित वराशीं न संभोगितां व तेणें करून तिजला पत्नीपणा प्राप्त न होतां ती **पत्नी झाली अशी खोटी कल्पना करून** तिचा तो **नांवाचा मानीव पति** मयत झाला असतां त्याच्या नांवानें वैधव्यादि दुःखें अज्ञान मुलीला भोगण्यास लावणें हा पाषाण हृदयी विचार शून्य वाडिलांचा बिचाऱ्या मुलांवर केवढा बरें जुलूम व कहर होय !

८ **नियोजित वर-पुरुष पाणि ग्रहणोत्तर नियोजित वधू-स्त्रीशीं संभोग करीतो तेव्हांच पुरुषाला नवरेपणा** व **स्त्रीला बायकोपणा** प्राप्त होतो. असें सप्रमाण वर प्रदर्शीत केलें आहे. तर त्याप्रमाणें संभोग होऊन पुरुषाला नवरेपणा व स्त्रीला बायकोपणा प्राप्त न होतां तो पुरुष दुष्ट, कामांध अविचारी होत्साता त्या स्त्रीला आपली बायको असें मानून तिचे इच्छे विरुद्ध मतलबी लोकांच्या बोलण्यास किंवा कायद्यास अनुसरून बायकोपणाचा हक्क न्यायदरबारीं शाबित करितो व जुलूम चालवितो हा केवढा बरें अन्याय !

९ **स्त्री वयांत आल्यावर—सज्ञानपणीं—अर्थात्** १५-१६ वर्षांच्या उमरी नंतर तिचा विवाह करावा अशी आपली वेदशास्त्राज्ञा आहे. ती वर दर्शविलीच आहे. तर त्याप्रमाणें मोठेपणीं लग्न करावें अशी वेदशास्त्राज्ञा असतां अशिक्षित उदरंभरू उपाध्ये लोक बालपणीं लग्न करावें अशी शास्त्राज्ञा असल्याचा खोटा धर्मोपदेश आपल्या वेडगळ यजमानास क-

रून एकपक्षीं वेदशास्त्राचा अनादर करितात. हा केवढा नीच पाजीपणा! व दुसऱ्या पक्षीं ते वेडगळ यजमान लहानें पोरींचीं लग्न बंधनें करून प्रसंगवशात् त्यांस बाल वैधव्यादि दुःखें उद्भवणाऱ्या मार्गावर सोडितात हा केवढा वरें अबलांवर जुलूम !

अशा प्रकारचा जुलूम व अविचार सांप्रत हिंदु अबलांवर चालू आहे तो एकदांचा लोकांचीं मने सन्मार्ग व सद्विचारावर आणून ह्मणा किंवा तसें होत नसल्यास सरकारच्या कांहीं सामान्य मदतीनें ह्मणा कसा तरीं बंद व्हावा ह्मणून बहुतेक ज्ञाते, विचारी. स्वदेश हित चिंतक, सदय लोक तन मन धनानें प्रयत्न करीत आले व पुढें ही प्रयत्न चालवीत आहेत. परंतु मतलबी, अनार्य-नीच लोकांपैकीं कित्येक स्वार्थ बुडतो ह्मणून व कित्येक बहु पण वेडगळ लोकांत आपलें नांव व्हावें ह्मणून ते प्रयत्न सफळ होऊं न देण्या विषयीं आपल्या हाडांचीं काडें करीत असतात. व त्या प्रमाणें कांहीं दिवसां मागें सदहु माधव बागेंत इनमीन-साडेतीन अनार्य चिंतपावनादिकांनीं भाटिये, लवाणे वाणिये वगैरे भजीं, तेल, तूप विकणारे व कोळी, खारवी अशा गुजराथी लोकांचें गोळांगुळ जमवून विवाहा संबंधी असलेल्या वेदोक्त धर्माचरणा विरुद्ध त्यांचीं मने दूपित केलीं व सरकार कदाचित् हात घालील या भीतीनें विवाह संबंधी आपल्यांत जुलूम होत नसल्याचा व आहे तें ठीक आहे, सरकारानें मध्यें पडूं नये असा अर्ज त्यांज कडून सरकारास करविला.

भट– धर्माधर्मा बद्दल विचार करणें किंवा तत्संबंधी सरकारास कळविणें हें तर शिकलेल्या ज्ञात्या पुरुषाचें काम. मग असें हें भर्जी, तेल, तूप वगैरे जिन्नस विकें अशिक्षित, हलकट गोळांगुळ जणुकाय पुराणांतील अठ्याऐशीं सहस्र ऋषिच या प्रमाणें कशासाठीं तरीं जमविलें होतें ?

ना०–कारण मग सांगूं; पण प्रथम त्यांची योग्यता दाखवूं. या गुजराथी गोळांगुळा पैकीं बहुत करून सर्व असामी अशिक्षित, अज्ञानी, असे होते एवढेंच नव्हे तर,

" तस्माद्दादौ स्वोप भोगात्पूर्वमेव सर्व वस्तु पदेन भार्या पुत्रादीनामपि समर्पणं कर्तव्यं विवाहानंतरं स्वोप भोगे सर्व कार्ये सर्व कार्य निमित तत्त त्कार्योपभोगी वस्तु समर्पणं कार्य समर्पणं कृत्वा पश्चा त्तानि तानि कार्याणि कर्तव्यानीत्यर्थ * " –म्हणजे नवऱ्यानें आपली विवाहित बायको आपण स्वतः भोगण्या पूर्वी तिला आपल्या महाराजाकडे पाठविली पाहिजे. भार्या, पुत्र धनादि सर्व अर्पण करावें अर्थात् ज्या ज्या भोग्याला जी

---

* याचें इंग्लिश भाषा-तर महाराज लायबल केसींत हाय कोर्टा समोर केलेलें दिलें आहे तें असें.—

Consequently before he himself has enjoyed her, he should make over his own married wife ( to the Maharaja )

"After having got married, he should before having himself enjoyed his wife make an offering of her (to the Maharaja )after which he should apply her to his own use.

जी वस्तु त्या त्या भोग्याला ती ती वस्तु महाराजाकडे पाठवावी. लग्न झाल्यांवर नवऱ्यानें आपली स्त्री संभोगण्यापूर्वी तिजला प्रथम महाराजाकडे पाठवावी आणि नंतर तिला आपण भोगावी. ( म० लायबल केस )

या प्रमाणे वागून केवळ पशुत्व प्रवृत्तीस अनुसरणारे होते. सदर्हु ग्रंथांत या लोकांच्या निंद्य आचरणाचा बराच उल्लेख केलेला आहे त्यांतून थोडाच देतों.

It is the duty of the female members to love the Maharajas with adulterine love and sexual lust whenso-ever called upon or required by any of the latter so to do, albeit such female members are or may be un-married maidens or wives of other men. Adultery with the Maharajas is not only enjoined but an absolute necessity without which no man can expect happiness in this world or bliss in the next. A course of bestial licentiousness is their beautitude of heaven. They (Maharajas ) may be described as living incarnation of Satan.

अर्थ—जेव्हां जेव्हां एखादा महाराज व्यभिचार करण्यास्तव कोणत्याहि एखाद्या (वल्लभ पंथी) स्त्रियेला बोलावील तेव्हां अशी आमंत्रित स्त्री अविवाहित कुमारी असो किंवा विवाहित परस्त्री असो- तिणें त्याच्याशीं व्यभिचाराला प्रवृत्त झालें पाहिजे. महाराजावर अत्यन्त प्रेम ठेवणें, त्याच्याशीं जार कर्म

करण्याचा उत्साह व मनः पूर्वक भाव ठेवणें व मैथुनेच्छा प्रफुल्लित ठेवणें अर्थात् त्याच्याशीं उपभोगाला तत्पर असणें हें त्या स्त्रियेचें कर्तव्य कर्म होय. महाराजाशीं व्यभिचार करणें अशी फक्त आज्ञा आहे एवढेंच नव्हे तर त्या आज्ञेप्रमाणें ( जार कर्म ) करणें हें निर्बाधक कर्तव्य, आवश्यक कर्म होय. व त्या शिवाय मनुष्यास इह किंवा पर लोकीं कोणतेंच सुख प्राप्त होणार नाहीं. अशा पशु प्रवृत्तीच्या व्यभिचारा पासून स्वर्ग व मोक्ष प्राप्त होतो. असे हे महाराज सैतानचेच जीवन्त अवतार होत असें ज्ञात्या विचारी सद्धर्मी जनांनीं म्हटलेलें आहे.

**भट**—भाटे, वाणे आदि गुजराथी लोक आपल्या घरांतील बायका मनुष्यें आपल्या गुरु महाराजांस अर्पण करितात. हें मी आजच ऐकिलें. बरें हे महाराज तरीं कोण कोठील ?

**ना०**—हे वल्लभी महाराज होत. द्रविड व तैलंग हे अनार्य म्लेंच्छ असल्याचें मागें सांगितलेंच आहे. या अनार्यांपैकीं ज्या प्रमाणें कोणी " शंकर " या नांवाच्या द्रविडानें आपण आचार्य पद धारण करून " शंकराचार्य " या नांवानें मद्य मांस सेवन व कन्या भगिनी स्नुषादि अगम्य स्त्री गमनाचा निंद्य " देवी उपासना " मार्ग मनःपूत स्थापन केला ( याचें विशेष स्पष्टी करण पुढें करण्यांत येईल ) त्याच प्रमाणें कोणी "वल्लभ " नांवाच्या तैलंगानें आपणास आचार्य हें पद घेऊन, "वल्लभाचार्य " या नांवानें भागवतांतील कृष्णाप्रमाणें वेड-

गळ गुजराथी लोकांच्या बायका, मुली, सुना, भोगण्याचा मार्ग सुरू केला. हा वल्लभ गुजराथेंत जाऊन आपण कृष्णाचा अंशावतार व तेथील बायका ह्या गोपी असें सिद्ध साधक मार्गें ढोंग माजवून गवळ्याच्या टोणग्या प्रमाणें आपल्या पंथांत आलेल्यांच्या बायका भोगण्याचें काम त्याणें चालू केलें व त्याजबद्दल दक्षणाही ठेविली. धर्मभीति व जुलुमामुळें बायका देण्याची ही पशुप्रवृत्ति बहुकाळ गुप्तपणें अव्याहत चालली आहे. पण सांप्रत न्यायी इंग्लिश राज्यांत कांहीं शोधक विचारी धैर्यवान् गृहस्थांनीं तीउघडकीस आणून दुष्ट महाराजांची व त्याच्या दुराचारी भक्तांची फजीती उडविली आहे.

**श्रो०**—हा वल्लभ जरीं अनार्य तैलंग-जातीचा होता तरीं त्याचा तो परपत्नी वगैरे भोगण्याचा निंद्य मार्ग जातीस न आवडून त्याजला ज्ञाति भ्रष्ट केलें होतें*.

**भट**—भाट्ये, वाणे, आदि गुजराथी लोक आर्य होत्साते त्यानीं अनार्य म्लेच्छ तैलंगास गुरु किंबहुना देव मानून आपल्या बायका देणें हें अत्यन्त निंद्य कर्म असल्याचें त्याचें ध्यानीं येत नाहीं हें मोठें आश्चर्य. केवढे नीच लोक तरीं!

**ना०**— तैलंग हे प्राचीन व चितपावन हे अर्वाचीन अनार्य असल्याचें मागें स्पष्ट केलेंच आहे. सांप्रत या अनार्य चि-

---

*Laxman Bhat (*A TELING*) the father of Vallabha and Vallabha himself were excommunicated by the Telings for founding a new Sect. ( *M. LIBEL CASE* ).

तपावनाचे नादीं हे भाट्ये, वाणे आदि गुजराथी लोक लागले आहेत. तेव्हां त्यांची पुढें काय गती होईल ती होवो, कारण एकदां प्राचीन अनार्य-तैलंगाच्या (वल्लभाच्या) नादीं लागून त्याजला आपल्या बायका देण्याचें ते नीच कृत्य करूं लागले. व आतां ते लोक अर्वाचीन अनार्य जे चितपावन त्यांचे नादीं लागत आहेत तेव्हां त्यांच्या मनांतून आपली कितीशी तरी नीचावस्था करून घेणें आहे !

**भट—** **नीचपणा तो आणखीं काय** राहिला ! एकदां त्यांच्याशीं मिळून अनार्यच बनतील म्हणजे झालें.

**ना०—** हे भाट्ये आदि गुजराथी लोक, म्लेंच्छ चितपावनांत नाहीं मिसळणार. कारण हे अनार्य चितपावन यज्ञाच्या नांवानें बोकडांस श्वासावरोधनें करून वळवळून ( मांसाची रुची कमी होईल ह्मणून ) अत्यंत क्रूरतेनें मारून खातात व तेंहि काशी सारख्या पवित्र मानलेल्या क्षेत्रांत सुद्धां. पण गुजराथी लोक हिंसा किंवा मांस भक्षण मुळींच करीत नाहींत तेव्हां अशा व्याघ्र रूपी हिंसक चितपावनाशीं गोरूपी अहिंसक गुजराथी लोक मिळून कसे एक रूपी होतील ?

**ओ०—** हे अनार्य चितपावन यज्ञाच्या नांवानें बोकडास हाल हवाल करून मारून खाण्याचें निंद्य क्रूर कर्म करितात तें कसें ? कां ? सांगा बघूं बरें ?

**भट—** तें पुढें. पण प्रथम त्या माधव बागेकडे वळा. **अनार्य चितपावनांनीं** भाटये वाण्ये आदि जे वेडगळ गुजराथी

जमविले ते बहुधा तेल, तूप, भजीं विके केवळ धर्म भ्रष्ट पशुत्व प्रवृत्तीस अनुसरणारे - एवढें तुह्मीं दर्शविलें. आतां हें गुजराथी गोळांगुळ कां जमविलें तें सांगणें पुरे करा.

**ना०**—एखादें मत किंवा कृत्य मान्य अमान्य, योग्य अयोग्य पहाणे असलें तर ज्या पक्षाकडे "लोक समुदाय अधीक" ( मेजारिटी ) तो पक्ष मान्य, योग्य असा एक साधारण नियम सरकारानें बांधलेला आहे. तर त्या नियमा प्रमाणें अनार्य चितपावनांनीं "अकाल लग्न बंधन व तज्जन्य वैधव्यादि जुलूम" करण्याच्या आपल्या अनार्य कृत्याला अनुकूल "मेजारिटी" दाखवावी ह्मणून तें वेडगळ, आशिक्षित पशु प्रवृत्तीस अनुसरणारें गुजराथी गोळांगुळ जमविलें होतें.

**भट०**—असें धर्म भ्रष्ट नीच वल्लभ पंथी गुजराथी गोळांगुळ धर्माच्या योग्यता योग्यते बद्दल विचार करणार काय ? ठीक ! एखाद्या चोराच्या नाईकानें आपल्या "चौर्यकर्म" प्रतिपादनार्थ चोरांची "मेजारिटी" मिळवावी ह्मणजे चौर्यकर्म ही योग्य होऊं लागेल मग ! तात्पर्य अनार्य चितपावनांनीं तेल, तुप, भजीं विक्या धर्म भ्रष्ट वल्लभपंथी गुजराथी लोकांचें गोळांगुळ वेदोक्त धर्माविरुद्ध अनाथ अन्नलांस आहे तशा दुःखार्णवांत ठेवण्यास लक्ष्मीविलासबागेंत जमविलें होतें.

**श्रो०**—चितपावन हे अनार्य सत्य वेद धर्म द्रोही असल्याचें तुम्हीं मघां जें सांगितलें तें पहावें तिकडे खरें दिसून येतें कीं हो ! वेद प्रतिपादित धर्मा विरुद्ध आचरणा-

बद्दल बरीच कमाल करून कित्येक चितपावनादि अनार्य पत्रकर्त्यांनीं आपलें खरें मायावी स्वरूप प्रकट केलें. सदरील माधव बागेच्या बालविवाह विषयासंबंधानें पुणे वैभव कर्ते म्हणतात कीं "आमच्या धर्म स्थापक श्रीशंकरानें शिवाजीचा अवतार धरून त्यांचा ( मुसलमानाचा ) उत्सेद केला. सरकार जर कायदा काढील, तर आह्मांवर धर्म संबंधी जुलूम झाला म्हणजे, पुनः आमच्या धर्म रक्षक देवास अवतार घ्यावा लागेल; सबब सरकारानें आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्याचें करूं नये + + अन्यथा आमच्या लोकांच्या त्वेषांच्या भांड्यावरील शांततेचें झांकण उडून जाऊन गोष्ट भलत्याच परिणामास येईल." इ० तर माझें याजवर असें विचारणें आहे कीं " पुराणांतील अवतारानें जर या अनार्य चितपावनादिकांचा कार्य भाग होतो तर मग त्याजबद्दल पत्रांतरीं लिहिण्याच्या भानगडींत ते कां पडतात? त्या अवताराचाच ते धांवा कां करीत नाहींत.

ना०–खरेंच हा तर त्यांजला फार सोपा मार्ग आहे. सुधारेच्छू देश हितचिंतक लोकांला हवी तशी बडबड करूं द्या व सरकाराला पाहिजे तेवढे व पाहिजे तसे कायदे करूं द्या; पण त्याजबद्दल मनांत किंचित् भय न बाळगितां चितपावनांनीं क्षीरसागराच्या किनारीं जाऊन अवतारार्थ आपल्या शंकर देवाचा धांवा करावा ह्मणजे झालें !

भट–क्षीर सागर त्यांजला पुण्यांत कोठचा मिळणार आहे?

**ना०**—पुण्यांत तर सागर नाहींच. मुंबईस जवळच पाव दिवसाचे वाटेवर सागर आहे तेथें आग गाडीनें सर्व चितपावनी पुणें आणावें व क्षीर सागरा बद्दल मुंबईचे पूर्व बाजूस सोनसागर आहे त्याचे किनारीं जाऊन धांवा करावा!

**श्रोता०**—अहो, क्षीर सागरीं "विष्णूचा" धांवा आहे आणि आमच्या चितपावनी पुणें वैभवाला तर "शिवाचा" धांवा पाहिजे आहे. मग त्याची वाट कसी!

**ना०**—शिव हा चिता ( स्मशान ) वासी व ते चितपावनहि मुळचे चिता निवासी ह्मणून चितपावन. तेंव्हां आपल्या मूळ आवडत्या चितास्थानीं (स्मशानीं) त्या अनार्य चितपावनांनीं ॥ शंखान् दध्मुः पृथक् पृथक् ॥ याप्रमाणे शंख ध्वनी करावी.

**श्रोता०**—अहो स्मशानांत त्याणीं शंख ध्वनी केली आणि तेथील त्यांच्या भस्म धूलीत बाजीरावानें ती ऐकिली आणी तो जर पुराणांतील परशुरामा प्रमाणें त्यांच्या धांवणीस पोंचून प्रगटला तर पंचाईत होईल ना! पूर्ववत् सर्वत्र जुलूम व कहर व धर्म भ्रष्टता होऊन जाईल!!

**सो०**—इंग्लिशांशीं गांठ आहे बरें! एक वेळीं जुलूम केल्यामुळें एथल्याएथें ब्रह्मावैवर्ती कैद्या प्रमाणें रहावें लागलें. पुनः तसें करील तर एकदम लापलन्ड सारख्या ६ महिने दिवस व ६ महिने रात्र अशा स्थळीं नेऊन त्याजला इंग्लिश लोक अक्षय गाडून टाकणार नाहींत काय!

**ना०**—जाऊं द्या; अशा शुष्क गोष्टी कशाला पाहिजेत!

**श्रोता०**—पण मीं एकच थोडें विचारतों कीं ज्यादूच्यां योगानें कांहीं माणसांला ठार मारण्या करितां एका पेस्तनजी नामें पारस्यानें प्रयत्न केला. तेव्हां त्याच्या वर खटला होऊन ज्यादू जरी खोटा, तरी त्या माणसांचा खून करण्याचा हेतु त्या पारस्याचा होता, असें ठरवून सरकारानें त्या पारस्यास ७ वर्षे सक्त कैदेची शिक्षा दिली. त्याच प्रमाणें ज्या अर्थी हे पुणे वैभव कर्ते पुराणोक्त देवतावतारें इंग्लिशांचा मुसलमाना-प्रमाणें नाश करण्याचें इच्छितात त्या अर्थीं जरीं पुराणोक्त देवतावतार खोटे तरीं इंग्लिशांचा नाश करण्याचा जो वैभव कर्त्याचा हेतु तो हेतु तर राजद्रोहाचा होय. तस्मात् असा राजद्रोह हेतु पीनल कोडा प्रमाणें शिक्षेस पात्र होतो कीं नाहीं ?

**ना०**—तुमचा न्याय बरोबर आहे. पण हा राजकीय विषय आहे. त्याजबद्दल आपण विचार करून काय उपयोग होणार आहे ! सरकार घेईल पाहून पाहिजे तर !

**पुणें वै०**—असें बोलणें आमच्या पुण्यांत नाहीं चाललें असतें. दयायन्द विरुद्ध बोलूं लागला, तेव्हां पाहिलेत ना " त्याला पुण्यांत शेणमार कसा मिळाला तो !"

**ना०**—अहो चितपावनादि दा-दा, तुह्मीं आपल्या जातीवर जाणारच. तुमचे अनार्य पूर्वज जे राक्षस - असुर नामाभिधानी ते पूर्व युगीं वेदोक्त धर्मी आर्य लोकांला काय थोडा त्रास देत होते? हिंदुस्थानाचा थोडा उत्तर भाग सोडून बाकी दक्षिण भाग तुमच्या अनार्य पूर्वज असुरांनीं व्यापलेला होता. सांप्रत

जम्ना व गोदावरी या दोहों नदी मधील भागाला दंडकारण्य ही संज्ञा होती; या दंडकारण्यांत तुमचे पूर्वज आर्यलोकांला फारच त्रास देत असत ; प्रथमतः जेंव्हां परशुराम, राम, कार्तवीर्य असे राजे लोक व वसिष्ठ, वाल्मिकादि ऋषि मुनि उत्तरे कडून दक्षिण प्रदेशीं जाऊन रानटी लोकांत धर्म सुधारणा व्हावी म्हणून तेथें वसाहती केल्या तेंव्हां असुर लोक त्यांचा फार छळ करीत असत. असे पुराणांतरीं अनेक लेख आहेत. श्रीराम दक्षिणे कडे येत असतां जेंव्हां प्रथम दंडकारण्यांत पोंचले तेंव्हां तेथील तापसी मुनी रामचंद्रास बोलूं लागले कीं,

**॥ रक्षांसि पुरुषा दानि नाना रूपाणि राघव ।**
**। वसंत्य स्मिन् महारण्ये व्यालाश्च रुधिराशनाः ॥**
**॥ उच्छिष्टं वा प्रमत्तं वा तापसं ब्रह्मचारिणं ।**
**। अदंत्यस्मिन् महारण्ये तान्निवारय राघव ॥**

‘हे रामचंद्र, या अरण्याचे ठायीं अत्यंत क्रूर व मनुष्य भक्षक लोक रहातात. व ते तेथील ब्रह्मचारि व तापसी ऋषि मुनींला मारून भक्षण करितात” असें हें बोलणें श्रवण करून राम पुढें चालले; तेंव्हां त्यांजला विराध नामे एक अनार्य-राक्षस भेटला तो रामास प्रश्नांतीं उत्तर देतो,

**॥ अहं वनमिदं दुर्गं विराधो नाम राक्षसः ।**
**। चरामि सायुधो नित्यमृषि मांसानि भक्षयन् ॥**

कीं हें मोठें अरण्य माझें आहे, त्यांत मी शस्त्रास्त्र सहीत

संचार करून ऋषि मुनींचें मांस भक्षण करीत असतों." असें भाषण ऐकतांच रामानें त्या दुष्ट व क्रूर नराधमाचा शिरच्छेद करून राम पुढें चालते झाले, ते कोणी एका ऋषि आश्रमीं आले त्यांजला बाणसज्ज पाहून तेथील सर्व तापसी ऋषि रामास विनंति करूं लागले कीं,

॥ एहि पश्य शरीराणि मुनीनां भावितात्मनां ।
। हतानां राक्षसैर्घोरैर्बहूनां बहुधा वने ॥
॥ पंपानदी निवासाना मनु मंदाकिनीमपि ।
। चित्रकूटालयानां च क्रियते कदनं महत् ॥
॥ ततस्त्वां शरणार्थंच शरण्यं समुपस्थिताः ।
। परिपालय नो राम वध्यमाना न्निशाचरैः ॥

हे वीर श्रेष्ठ राम, एकाग्र ईश्वर चिंतन करीत ध्यानस्थ बसलेल्या ऋषि मुनींला अनेक प्रकारें हालहवाल व विपेष्टा करून दुष्ट नराधम राक्षस लोक या अरण्याचे ठायीं ठार मारित असतात त्यांचीं हीं हाडें पडलेलीं आहेत, तीं अवलोकन करावीं; थेट पंपा व अनुमंदाकिनी नदी पासून चित्रकूट पर्यंत सकल दंडकारण्याचे ठायीं वास करणाऱ्या सर्व ऋषि मुनींला राक्षस लोक अत्यंत त्रास व पीडा करितात ती आमच्यानीं सोसवत नाहीं; या करितां आह्मीं तुह्मांस शरण आलों आहों. हे राक्षस लोक आह्मांला ठार मारित असतात, तर यापासून हे राम, आपण आमचें पालन करावें."

तात्पर्य हे चितपावनी दा-दा, अशा मनुष्य हिंसक अ-

नार्य राक्षसांचे जे तुह्मी वंशज, ते तुह्मी आपल्या राक्षसी पूर्वजांचें कसें बरें ब्रीद वाळगणार नाहीं ? व परोपकारी दयानंदासारख्या ऋषि मुनीला पीडा करणार नाहीं. विचारे दयानंद सरस्वती हे मनुष्य प्राण रक्षक, न्यायी, दयाळू इंग्लिश राज्यांत सांपडले ह्मणून जीवानिशीं सुटले; नाहींतर तुह्मी आपल्याराक्षसी पूर्वजांप्रमाणें त्यांजला ठारमारून खाल्लें असतें. यांत कांहीं कसर न होती असें तुह्मांस वाटतें काय ?

आ०—आमची जात नीच, वाईट पण आमच्या ह्मणण्याप्रमाणें तर सरकारानें वाल "विवाहा" विरुद्ध कायद्याची वगैरे कांहीं एक तजवीज होत नाहीं असें ठरविलें ?

ना०— तुमच्या जाती प्रमाणें तुमचें ह्मणणे व करणे नीच असावयाचेंच : व अशा ह्या तुमच्या नीचत्वाचा प्रयोग बिचाऱ्या अबलांवर व्हावयाचा तो पूर्वापार तुमच्यांत चालूहि आहे. तुमच्या पेशवाई बाजीरावांनी अनाथस्त्री जातीवर फारच कहर मांडला होता. एकदां बाल व तरुण विधवा ३०० शें वर घरांतून जबरदस्तीनें काढून गोळा करून त्यांचें वपन अर्थात् डोक्याचें केस मोठ्या जुलुमानें व बळजोरीनें नाशीक एथें नदी किनारीं काढविल्याचें प्रसिद्ध आहेच. निपुत्रिक शाहू राजाच्या बायकोला जीवन्त जाळून राज्य बळकाविलें व पति मरणोत्तर बायकांला जाळून मारण्याची सक्ती चालविली. नाना साहेब पेशव्याचें युरोपिअन बायका पोरांस ठार मारण्याचें नीच क्रूरकृत्य तर सर्व जगजाहीर आहे; बाजीराव पे-

शव्यानें चितपावन जातीच्या स्त्रियांमध्यें आपल्या स्कंदपुराणोक्त प्राचीन नीच वळणाची उजळणी (भ. ली. पृ० ६९) केल्याचें वर्णन बापू गोखले चरित्रांत दिलें आहे पैकीं थोडें असें. " बाजीरावी वाड्यांत नेहमी शेकडो स्त्रिया जमलेल्या, बहुतेक सर्वच देखण्या! त्यांचें न्हाणें, धुणें, नटणें, मुरडणें तेथें सदा चाललेंच! कोणी स्त्रिया उंची पैठण्या नेसून डागिने घालून नट्टा पट्टा करीत आहेत; कोणी वेणी फणी करून बुचड्याची अक्कड करून तिचे खालींच चूर झाल्या आहेत. कोणी पातळ लुगडें, व पातळ चोळी घालून सर्व शरीराचा भाग वस्त्राचे आंतून दिसावा अशा तऱ्हेनें जाणून बुजून वस्त्रें परिधान करीत आहेत ! ! असो, हा सर्व प्रकार सूज्ञ वाचकांचे तेंव्हांच ध्यानांत येईल ह्मणून त्या बद्दल अधीक लिहिण्याचें प्रयोजन दिसत नाही.

सारांश बाजीरावाचे कारकीर्दीत कोणास कांहीं कार्य भाग करून घेणें तर स्त्रियांचे मार्फत करून घेणें भाग येई. हा निर्लज्जपणा इतका वाढला होता कीं येथील ( चितपावनी ) सरदारांच्या स्त्रियाहि आपलें घरदार सोडून शुक्रवारांतील बाजीरावाचे वाड्यांत सर्व प्रकारची चंगळ उडवून नवऱ्याचा काडी इतका देखील धाक न बाळगितां पापाचरण करीत असत. असो अशा ह्या चावटपणाच्या गोंधळांत **रावबाजी** रंगून गेल्यामुळें राज्य कारभार कसा चालत असेल ह्मणाल तर त्या वेळीं जवळ मंडळ तसेंच हलकट व खुशाल चेंडू

जमलें होतें तेंच मंडळ वरील *उपभोग घेऊन बाजीराव नेत्र सुखाचे धनी " ! ! !

देशमुख कृत लोकहितवादी पुस्तकांतील थोडे वेंचे:—

" प्रत्येक बाजीरावी वाड्यांत दोन तीनशें बायका नित्य न्हावयास येत असत. त्यांनीं सकाळीं न्हावयाचा समारंभ कराना, तो प्रहर दिवस पर्यंत चाले ! नंतर जेवावयाची तयारी झाल्यावर इच्छेस येईल त्या वाड्यांत बाजीरावाची स्वारी जात असे. पंक्ति भोजनाचे समयीं सर्वकाळ बायका जवळ बसलेल्या असावयाच्या. बायकांनी सर्व कारभार करावा; व उलटा नवऱ्यावरच त्यांचा हुकूम असे ! त्यानीं आपल्या नवऱ्या करितां श्रीमंतांस सांगून त्यांस मामलती, कमाविशी वगैरे द्याव्या ! ! त्यांजवर नवऱ्याचा हुकूम इतकाच कीं, वाड्यांत राहा आणि सरकारची मर्जी खुष करा ! ! बयाताई दातारीण, शिता शेंडी, काशी दीक्षितीण, उमा फडकीण, ताई पेठीण, या प्रकारच्या सुमारें दोन च्यारशें उनाड बायकांचा थवा नेहमीं वाड्यांत भरलेला असे. शिष्ये, पाणके, वगैरेशीं व्यभिचाराची त्यांस सदर परवानगी असे ! "

---

* वल्लभी महाराजाच्या व्यभिचाराच्या वळणामुळें भाटे, वाणिये, वगैरे गुजराथी लोकांच्या झालेल्या संततीच्या खऱ्या बापाचा पत्ता लावणें जसें अशक्य आहे. त्याचप्रमाणें अशा या व्यभिचाराच्या जारीमुळें यांची संतति त्र्यंबकजी डेंगळ्या सारख्या कोण कोणच्या जातीच्या बापापासून झाली हें ठरविणें अशक्य आहे.

बाळाजी बाजीराव व नाना फडणवीस यांनीं आपल्या जातीमध्यें केलेल्या व्यभिचाराचें वर्णन इतिहासांतरीं प्रसिद्ध आहेच. व त्याच प्रमाणें " पुण्यांत हिंदु धर्म बुडाला घरोघरीं व्यभिचार घडे " इ० अशा ह्या त्या वेळच्या स्थितीचें प्रसिद्ध अनंद फंदी यानें केलेलें वर्णन सुप्रसिद्ध आहे.

" बाजीराय राज्यवृत्ति" नामे एक ओवीबद्ध जुनाट ग्रंथ आहे त्यांत स्त्री पुरुष विषया संबंधी बाजीरावाचें एवढें नीच, अवाच्य,बिभित्स व निर्लज्ज वर्तन दर्शविलें आहे कीं तें लिहिण्यासपीनल कोडाची मोठी भीति आहे ह्मणून घेतां येत नाहीं.

या प्रमाणें स्त्रियांची शारीरीक व मानसीक स्थिति बिघडवून त्यांची हाल विपष्टा बाजीराव पेशवे करीत असत एवढेंच नव्हे तर बिचाऱ्या अबलांस त्यांच्या खऱ्या ( पक्क्या ) किंवा मानीव नकली अथवा(कच्चा)पति मरणोत्तर"सती" घालविण्याचा अर्थात् ह्या पक्क्या किंवा कच्चा*मृत पतीच्या प्रेतासह जाळून मारून टाकण्याचा भयंकर जुलूम चालवीत असत अशा ह्या स्त्रियांला जीवन्त जाळण्या करितां धर्म व कर्मभ्रष्ट पाषाण हृदयी चितपावन प्रभूनें पुणे मुक्कामीं मूळा व मूठा

---

* सज्ञानपणीं गर्भाधान विधि (संभोग) झाल्यावाचून वर हा **पति** होत नसतो अशी शास्त्राज्ञा आहे. तस्मात् गर्भाधान न झालेल्या वधूस्त्रीचा **वर** हा **कच्चापती** होय. कारण परस्परांचा संभोग झालेला नसतो.

मदीच्या किनारीं एक जागा तयार केली होती. * तेथें कोणा बाईचा नवरा मयत झाला ह्मणजे एकदम तिजला " सती " जाववीत असे. इंग्लिश सरकाराचा रेसिडन्ट ( वकील ) तेथें पुण्याजवळच होता. त्याणें अशीही अत्यंत भयंकर क्रूर सतीची चाल बंद करण्या विषयीं बाजीरावी पेशव्यांची पुष्कळ कान उघडणी केली, निरोप पाठविले व उपदेश केले पण अशा नीचांच्या अंतःकरणाला कसा द्रव येईल? या नीच चितपावनी पेशव्यांला प्रथमतः मराठ्याचें जें राज्य मिळालें

---

* The Kokanasthas ( Chitpavans ) were greatly addicted to Sati; but when that horrid act was interdicted by Govt. in 1830, they discontinued it without any remonstrance. Some of the Chitpavans would be glad to ex-culpate their fellow Casteman "Nana Saheb" from the atrocities laid to his charge, but this is more creditable to their feeling of shame on account of these atrocities than to the soundness of the judgment which they form of their perpatrator.

The burning of widows with their husbands' corpses is very frequent at Poona, where five or six instances occur every year, & the immolation is usually performed at the junction of the Moota & Moola rivers, close to the British residency. (Mure )

तें शाहू राजाला जारण मारणादि* औषधी प्रयोगानें मारून

---

* शाहूराजा भ्रमीभूत । होवोनि राहिला दुखगाईत । सन्निध बाजीराय सुत । नाना साहेब पेशवे ॥ परम आर्जवी चितपावन । तशांत भ्रमिष्ट शाहूमन । झालें ह्मणोनि आपल्याधीन । करोनि लीन शेवेशीं ॥ स्वकार्य साधू बाजीराय । जारणादि करोनि उपाय । शाहू राजासी करोनि मरण प्राय । राज्यसूत्र बळकाविलें ॥ पोटीं नव्हता शाहूस पुत्र । नानास लाधलें अधिकार पत्र । तेंव्हां राज्याधिकार सूत्र । नृप मृत्यन्तीं आवरिलें ॥ स्वाधीन सेना समुदाय पाहीं । प्रतिनिधीचें न चले कांहीं । त्याचे बेडी घालोनि पायीं । पर्वतारूढ तो केला ॥ शाहूभार्या संकराबाई । नृपासंगें सती न जाई । ह्मणोनि तिजला नाना उपायीं । बोधोनि अपाई दग्धविली ॥ लोभ दावोनि बंधूस तीचे । होते बन्धु दुष्ट मतीचे । त्यांहीं बळत्कारें सतीतें धर्म बोधोनि सती नेली ॥ शाहूनृपाचे सुहृदन्यत्र । सातान्यासी ते सर्वत्र । रक्षोनि स्वाज्ञे निबन्ध सूत्र । आपुल्या तंत्रांत ठेविलें ॥ सातान्याचें सोडोनि स्थान । पुणियासीं केलें अधिष्ठान । नृपाधिकार मान पान । सातान्यास करत्री तया ॥ वृक्षीं फळें येतां पाडा । वानरें पाहोनि त्या झाडा । शाखोशाखीं उड्या धडधडां । घेवोनि कडाडा भक्षिती फळें ॥ किंवा मर्कटें सिंदीवन । देखोनि करिती मधु सेवन । तैसे अधर्मी चितपावन । धांवोनि आले पुणियासीं ॥

व त्याची निपुत्रिक विधवा बायको राज्य प्राप्तीच्या कामांत प्रतिकूळ होईल ह्मणून "सती जाण्याचे" नवे ग्रंथ रचून व प्राचीन ग्रंथांत "दशरथ, पंडू, रावण, इंद्रजित अशांच्या स्त्रिया" सती "गेल्याकारणानें स्वर्गी गेल्या" अशीं क्षेपकें घुसडून ते मतलबी ग्रंथ भटोबांकडून तिला वाचवून दाखवून व शिवाय द्रव्य लालूचीनें वश केलेल्या तिच्या भावांकडून उपदेश करून व भीति दर्शवून तिच्या इच्छे विरुद्ध तिजला 'सती' घालवून अर्थात् जींवत जाळून टाकून मिळविलें होतें, तेव्हां अशा विधवा बायका जाळल्यानें राज्य लक्ष्मी प्राप्त होते असा विलक्षणीक ठसा चितपावनी पेशव्यांच्या मनांत बिंबून त्याणें तें विधवा जाळण्याचें भयंकर क्रूर कृत्य विशेष राज्य लोभार्थ चालू केलें.

या प्रमाणें चितपावनी पुणेशाईंत धर्माच्या वगैरे निमित्तानें स्त्रियांवर अनेक प्रकारांनीं फारच जुलूम चालविलेला असल्यामुळें ती पुणे शाही पेशवाई समूळ नाहींशी झाली. एवढेंच नव्हे तर पेशव्यांचा अगदीं कुळक्षय झाला. आतां या तुमच्या भाऊबंद पूर्वज चितपावनी पेशव्यां प्रमाणेंच तुह्मी हि स्त्री जातीवर जुलूम चालवीत आहां: त्या अर्थी तुमचाहि त्याप्रमाणें समूळ नाश होऊन कुळक्षय होईल. स्त्री जातीनें, बाल्यावस्थेपासून नांवाच्या ( नकली ) विवाह बन्धनांच्या योगानें बालवैधव्यादि दुःसह दुःखार्णवांत पडून रहावें अर्थात् त्यांनीं विषय सुख भोगूं नये; डोक्याचे केश काढून

देवानें दिलेलें स्वरूप विद्रूप करावें; कंकणादि शोभादायक भूषणें धारण करूं नयेत; दिवसा एकच वेळ अर्धेमुर्धे ओलें कोर्डे अन्न खाऊन उपासमारानें देह झिझवावा, कामाग्नीनें जीव पोळून आणि तळमळून घ्यावा; लोकांच्या नजरेस पडूं-नये, नजर पडलीच तर बोडकी, कपाळ करंटी, अवदसा, दुश्चि-न्ही अशा हृदय छेदक शद्बांनीं लोकांनीं केलेली विपष्टा सहन करावी, लहान पोरांटोरांसाहि भिऊन लाजून काळोखांत को-नाकोपरीं बंदीखान्यांप्रमाणें एकांतीं काळ घालवावा, अशा प्रकारच्या गुलामाच्याहि स्थिती पेक्षां अत्यंत निंद्य नीचावस्थेंत व दुःखार्णवांत बिच्याऱ्या अबला पडत आहेत त्यांना त्या दुः-खार्णवांतून मुक्त करावें ह्मणून सदय, स्वदेश हित चिंतक धर्मिष्ठ लोक प्रयत्न करीत आहेत त्यांजला यथाशक्त्या मदत करावी किंवा होत नसल्यास मेल्यासारखें तरीं उगीं रहावें तें टाकून उलट त्यांचे ते योग्य प्रशंसनीय प्रयत्न सफळ होऊं देऊं नये ह्मणून हाडाचीं कार्डे करितां हें तुमच्या अनार्य नीच जातीला साहाजिकच आहे. एखादें बरें कृत्य कुलीन व सज्जन मनुष्याचेच हातून घडतें व त्याजला बहुधा बरींच विघ्नें व अडचणी कांहीं काळ येतात पण दुष्ट कृत्य दुष्टच माणसाच्या हातून तात्काळ घडत असतें. पहा एखादें घर किंवा देऊळ बांधणें हें सत्कृत्य तडीस नेण्यास निदान वर्ष दीडवर्ष तरीं पाहिजे. परंतु तेंच घर किंवा देऊळ (त-यार झालेलें असें ) जाळून टाकण्यास एक दोन तास सुद्धां

नकोत. तर या घर जाळण्याच्या दुष्ट कृत्याप्रमाणें तुम्ही अ-नार्य नीच लोक वर्ष सहा महिन्या पर्यंतच्याहि उमरीच्या अज्ञान अर्भक नग्न मुलींची अकाल — **नकली लग्न** बंधनें व तज्जन्य **बालवैधव्यता** त्या बिचाऱ्या अबलांवर लाधून त्यांच्या सृष्टिजन्य हि सुखोपभोगाला आग लावितां हें तुह्मां सारख्या आर्य विद्या भूषित असामीला फारच निंद्य होय. तुमच्या अनार्योद्भव शरीर जातीला कदाचित् शोभेल. पण तुह्मांला जी आर्य विद्या व सदसद्विचार व ज्ञान हीं इंग्लिशाच्या धर्मानें प्राप्त झालीं आहेत त्यांजला मात्र लाजीरवाणे होय. कडू कारलें तुपांत तळलें साखरेंत घोळलें तरीं कडू तें कडू याह्मणी प्रमाणें सदसद्विचार, विद्या व ज्ञान स्वरूपी तुपासाखरेंत तुह्माला घोळले तरीं तुमचा उपजत मुळचा दुष्ट नीच स्वभाव "मूर्ध्नि तिष्ठति" ह्मणजे पुढें यावयाचाच.

आतां बालविवाहाची ही दुष्ट जुलूमी व नीच चाल मोडण्याचे कामीं सांप्रतच्या सरकारानें मन न घातल्याबद्दलची फुशारकी मिरवितां त्यास सरकारचे अधिकारी कामदार सर्वच दूरदृष्टी सदसद्विचारी, व न्यायी असतात असें नाहीं. एका अधिकाऱ्यानें केलेल्या इनसाफास ( न्यायास ) दुसरा वरिष्ट अधिकारी अन्याय ह्मणतो, मुनसीफ किंवा म्याजिस्ट्रेटच्या उलट डि. जज्य, डि. जज्याच्या उलट हायकोर्ट, त्याच्या विरुद्ध प्रिव्हिकाउन्सल व त्याच्या विरुद्ध पार्लिमेन्ट सभा असे परस्पर विरुद्ध न्याय होतात. शिवाय चालू अधिकारी जे

आहेत, ते अगदींच कोते विचाराचे; त्यांच्यांत गंभीरता, न्यायशीलत्व, सदसद्विचारपणा यांचा खरा अंश मिळणें कठीण. सुमारें ५० वर्षांवरचें सरकार सदृढ न्यायी विचाराचें होतें. तसें सांप्रतचें नाहीं. इंग्लंडांतील प्रसिद्ध महा विद्वान् शोधक मोक्ष मुलर साहेब, ज्याणें आज सतत ४०।४५ वर्षे या हिंदुस्थानांतील राजकीय,सामाजिक, व धर्म संबंधी विषयावर मोठमोठे ग्रंथ लिहिले व अजून लिहित आहेत, त्यांनीं ५० वर्षांपूर्वीच्या सरकारची न्यायाची व विचाराची स्थिति जशी होती तद्वत् सांप्रतच्या सरकाराची नाहीं.व बालविवाह हा वेद शास्त्रास बिलकूल संमत नाहीं अशा अर्थाचें पत्र हिंदुस्थानस्थ सुधारेच्छू लोकांस लिहिलें आहे त्यांतील ४ ओळी तुह्मासारख्या बालविवाहपक्षी विचार शून्य, मंदमेंदु निष्ठूर व धर्मभ्रष्ट लोकांच्या कान उघडणीकरितां देतों.

Government in India is no longer what it was fifty years ago. I do not see that you could have expected more from Government. I hope you do not consider the battle lost. Now seems to me the time to resume your work with double vigour. For every fight against old established prejudices, defeat is at first inevitable, but it is invariably the precursor of victory. × × Now mind, I am not in favor of paternal Government, not even in India. But I hold that Government loses its *Raison De'tre*, if it does not prevent &

punish what is morally wrong, even though the moral wrong has the sanction of religion & tradition. I don't say that Infant Betrothal & even enforced Widow-hood, are morally wrong, but the consequences flowing from them lead to civil torts which any Government, deserving that name, ought to prevent. I was amused with the case that happened in Madras. By all means let the castes ex-communicate, but if the excommunicated man is injured by having an open Post Card sent to him announcing his excommunication let that tort be redressed by Government.

That infant marriage has no sanction whatever from either Sruti or Smriti. I told you from the very first, & I see that no Pandit now ventures to gainsay that Manu wishes a young man to marry when he may become a Grihasta i.e. when he is about 24 years of age. As to the girl, she is to marry when she is fit for it and that may vary in different climates. But an engagement between infants is never contemplated by any legal authority, much less are the sufferings of widowhood inflicted

by Sruti or Smriti on a girl whose polygamous husband dies before she has even seen him. That argument has been treated with so much learning by your own scholars and lawyers that nothing more need be said on it. The study of Sanskrit, even by so called Mlenchhas like myself, begins to bear fruit. You remember how in the case of Suttee, the Shastris quoted passages from a lost Sakha of the Veda, intended to show that widows should be burnt with their husbands. They actually tampered with a passage from their own sacred Veda, and not till I published the passage from the Asvalayana. Grihya Sutras, forbidding widow burning, would they become silent.

भावार्थ:—"बालविवाहाच्या प्रकरणांत सरकार मन घालीत नाहीं ह्मणून तुह्मी हरलां असें मानुं नकां; हिंदुस्थानांतील सांप्रतचें सरकार ५० वर्षांपूर्वींच्या सरकाराप्रमाणें नसल्यामुळें त्या पासून विशेष होण्याची कांहीं आशा नाहीं. सुधारणा होण्याविषयीं पूर्वींपेक्षां ज्यास्त हिमतीनें प्रयत्न करण्याची ही वेळ आहे. जुन्या वेडगळ देव भोळ्या लोकांच्या दुष्ट चाली मोडून टाकण्याच्या कामीं प्रथमत: अडथळे आल्यावांचून राहत नाहीं. परंतु काळें करून जय व्हावयाचाच. कोणत्याहि देशांत [या हिंदुस्थानांत सुद्धां] इंग्लिश सरकारानें [ चालू ]

पितृधर्म धारण करून पितृ राज्य चालवावें असें माझें मत नाहीं. पण माझी खात्री आहे कीं, ज्या गोष्टी विचार व नीतिदृष्ट्या न्याय्य नाहींत त्यांजला धर्माची व रूढीची जरीं संमति असली तरीं त्या सरकारानें बंद केल्या पाहिजेत. सरकार जर त्या बंद करीत नाहीं, तर सरकार या नात्यानें त्याची मोठी चूक आहे असें मी समजतों. बाल विवाहच तर काय पण जुलुमानें वैधव्य भोगविणें सुद्धां नीति दृष्ट्या गैर आहे असें मी ह्मणत नाहीं; परंतु त्यांपासून सामाजिक अनेक नुकसानी उत्पन्न होतात; तस्मात् जे कोणी आपल्यास सरकार ह्मणून घेतात त्यांनीं अशा नुकसानी होऊं नये ह्मणून बंदोबस्त करणे आवश्यक होय. मद्रासेस जी गोष्ट घडली तिचें मला मोठें हांसूं येतें. एखाद्या असामीला जातीनें बहिष्कार घातला तर घालूं द्या. परंतु त्याची नालस्ती करण्याकरीतां एखाद्यानें जर ती गोष्ट उघड ( कार्ड ) कागदावर लिहून पोस्टांतून प्रसिद्ध केली तर त्यावरून होणाऱ्या त्याच्या नुकसानी बद्दल सरकारानें अवश्यमेव बंदोबस्त केला पाहिजे. अन्यथा सरकार दोषी व अन्यायी ठरतें.

बालविवाहाला वेद किंवा आर्ष स्मृति यांचा बिलकूल आधार नाहीं असें मी तुह्माला पाहिल्यापासून सांगत आलों आहें. व ही गोष्ट कोणाहि शास्त्रीपंडिताच्यानें नाहीं ह्मणवत नाहीं असें हल्लीं माझ्या अनुभवास आलें आहे. पुरुष २४ वर्षांचा झाल्यावर गृहस्थपणास योग्य होतो तेव्हां त्याणें आपला विवाह

करावा असें मनूचें मत आहे. स्त्रीविषयीं ह्मटलें ह्मणजे तिजला विवाहास योग्य अशी स्थिति (सज्ञानपण व रजोदर्शन) प्राप्त झाल्यावर तिनें लग्न करावें; परंतु ही गोष्ट निरनिराळ्या देशांतील हवेच्या मानावर अवलंबून आहे. परंतु अर्भक बालकांचें वाग्दान करणें ( गुलामाप्रमाणें दुसऱ्यास देणें ) हें तर कोणाच्याच शास्त्रांत सांगितलेलें नाहीं; तर मग नवऱ्याला अनेक बायका असून ज्याचें तोंडहि कधीं दृष्टीस न पडतां जी अल्पवयस्क कोमलांगी तरुणी विधवा होते, तिच्यावर जीं दुःखें कोसळतात त्यांस वेदशास्त्राची मुळीच संमति नाहीं. तुमचेच शास्त्री व पंडित यांनीं या वाक्याचा असा चांगला अर्थ प्रतिपादन केला आहे कीं त्याजबद्दल विशेष लिहिण्याची अवश्यकता नाहीं. माझ्यासारखे म्लेच्छ ह्मटलेले लोक संस्कृताचा अभ्यास करीत आहेत, त्याचें फळ आतां मिळूं लागलें आहे. सती जाण्याच्या प्रकरणांत विधवा स्त्रियांनीं आपल्या पती बरोबर प्राण त्याग करावा यास पुरावा देण्याकरितां शास्त्रीमंडळ वेदाच्या हरवलेल्या ( नष्ट ) शाखेचा नेहमी आधार दाखवीत असत. हें तुह्माला चांगलें स्मरतच असेल. असें करण्याकरितां साक्षात् ते आपल्या पवित्र पुस्तकांतील ( वेदांतील ) वचनांचा भलताच अर्थ करीत असत; परंतु आश्वलायन गृह्य सूत्राच्या ज्या भागांत विधवांना जाळून टाकण्याची मनाई केली आहे तो भाग जेव्हां मी छापून प्रसिद्ध केला तेव्हां मात्र ते शास्त्री लोक कुंठित होऊन शांत बसले " या प्रमाणें इंग्लंडा-

तील म्लेंच्छ मानलेल्या मोक्ष मूलर साहेबाला आर्य लोकांचे धर्मशास्त्र ग्रंथ समजावे व दुष्ट हिंदु लोकांच्या बालविवाह, बालवैधव्यता व सती अशा निंद्य क्रूर चालींचा त्यांनीं अव्हेर व धिःक्कार करावाः आणि आमच्या हिंदुस्थानांतील पवित्र ब्राह्मणादिवर्णांत गणून घेणाऱ्या लोकानीं त्या दुष्ट चालींचा स्वीकार करावा ! हें केवढें बरें विलक्षणीक !!

ना०— मूर्ख लोक इंग्लंडवासी मोक्ष मूलर साहेबास म्लेंच्छ ह्मणत असले तरीं ते साहेब कसे झाले तरीं आर्यः पण आमचे हे हिंदुस्थानवासी बाहादूर—अनार्य, नीच, म्लेच्छ होत, तेव्हां त्यांचे विचार कसे बरें शुद्ध पवित्र व निर्दोष असतील !!

आन०—आमचे विचार खोटे, कबूल केले; पण मी एक विचारितों कीं, बालपणीं ( संभोग न होतां ) लग्न झालें तर पति मयत होऊन स्त्रिया विधवा होतात तशा मोठेपणीं ( संभोग होऊन ) लग्न झालें तर नाहीं का विधवा होत ?

ना०—मृत्यु केव्हां कोणाला येईल हें निश्चयात्मक कोणाच्यानें सांगवणारच नाहीं. मोठेपणीं पति मयत होऊन स्त्रिया विधवा होत नसतात असें कांहीं आमचें ह्मणणें नाहीं. आमचें सशास्त्र, न्याय व तर्क युक्त ह्मणणें असें आहे कीं, स्त्रीला तर्क सिद्ध शास्त्ररीत्या धवा ( पति ) संभोग होऊन प्राप्त न होतां, झाला असें मानून ( त्या मानीव पति मरणोत्तर तिला विधवा ह्म० नवरामेलेली असा 'नवरा झालेल्याचा' खोटा आरोप तिच्यावर आणून पूर्वोक्त वैधव्यादि दुःखें तिला व्यर्थ भोगण्यास लावणें

हा मोठा जुलूम होय एवढेंच आमचें ह्मणणे होय व तें किती दां तरीं सप्रमाण सांगितलें असून तुमच्या लक्षांत रिघत नाहीं व भलतेच कुतर्क काढतां तेंव्हां धन्य तुमच्या अनार्य-नीच अंतःकरणाची व कुळाची ! बाल लग्न बंद झालें ह्मणजे "बालविधवा" हा शद्ब तरीं प्रचारांतुन नाहींसा होऊन सांप्रत "बाल विधवा" हजारो होत चालल्या आहेत त्या तरी बंद होतील असे सुविचार तुमच्या नीच व पाजी अंतःकरणांत कोठून बरें प्रवेश होतील ?

आ०संभोगानें लग्न होतें तर अन्य संस्काराची काय जरूरी !

श्रोता— बालपणीं, होम हवन व पाणि गृहणादिकानीं जो लग्न संबंधी संस्कार विधि होतो त्याच फक्त विधीनें लग्न पुरें होत नाहीं. कर्जाऊ रुपया कारितां उभय ऋणको धनकोंच्या संमतीनें प्रथम स्टांप कागद आणावयाचा; नंतर त्यावर देण्या-घेण्याचा व फेडाफेडीचा करार लिहावयाचा व त्याजवर सई साक्षी घालावयाच्या—एवढा प्रकार झाला तरीं रुपये पदरांत पडल्याशिवाय जसें देणे खरें होत नाहीं तद्वत् लग्नसंबंधी पाणि गृहणादि विधि झाला तरी संभोग झाल्याशिवाय तें लग्न पुरें होत नसतें. समानशील, समानवर्ण, अशा पूर्वोक्त गुणयुक्त वधू वरांची शास्त्रोक्त निवडणूक व पाणिगृहणादि विधि न होतां फक्त संभोगच झाला तर तो व्यभिचार होय व असा व्यभिचार शास्त्र रीत्या शिक्षेस पात्र आहे.

नारा०— सांप्रत बालपणीं लग्न ह्मणून जें होतें तें नांवाचें

नकली लग्न किंवा लग्नाचा फार्स होय. एखाद्या असामीची न- क्कल किंवा फार्स करितांना जशी त्या असामीची प्रत्यक्ष आव- श्यकता नसते तद्वत् तुमच्या बालविवाहास वधूवरांची प्रत्यक्ष हजर असण्याची जरूरी नाहीं. कां कीं, हजर असण्याचें मुख्य कारण शरीरसंभोग; तेव्हां तो ज्या अर्थी तुमच्या लग्न विधींत नाहीं होत आहे, त्या अर्थी तेथें वधूवरांची हजर अ- सण्याची जरूरी नाहीं हें उघड दिसतें; आतां पाणिग्रहणादि प्रातिज्ञा विधि जो प्रथम व्हावयाचा त्याजलाहि त्याची प्रत्यक्ष जरूरी नाहीं. कारण, ती प्रतिज्ञा वगैरे काय? कशी? याबद्दल बालकत्वामुळें त्यानां मुळीं समजच नसतो. म्हणूनच प्रतिज्ञेचा वगैरे भाग अर्भक वधूवरांचे आप्त वडील करीत असतातच. तात्पर्य वर्ष ६ महिन्याच्या किंवा ७।८ वर्षां उमरीच्या पोरी- च्या विवाहांत तीं तसलीं अर्भक वधूवरें प्रत्यक्ष हजर असण्या- ची कांहींच जरूर नाहीं; त्यांच्या नांवें* "वधूवरार्थे पूगीफले स्थापयामि" असें म्हणून सुपारी, केळें वगैरे ठेवून जो काय विधि करावयाचा तो केला म्हणजे झालें. बिचाऱ्या मळ म- त्रांत लोळणाऱ्या व पाळण्यांतील रडत रडत निजणाऱ्या अर्भ-

* सांप्रत भटउपाध्ये, यजमानाचे घरीं आपलें एखादें कर्म चालवीत असतां गजाननाची मूर्ति नसली तर 'गजाननार्थे पूगी फलं स्थापयामि' असें किंवा पूजासमयीं वस्त्र वगैरे कांहीं नसलें तर 'वस्त्रार्थे अक्षतान् समर्पयामि' असें म्हणतात तद्वत्

क मुलींला निजलेल्या त्या पाळण्यांतून जबरदस्तीनें बाहेर काढून किंवा किंचित् मोठ्या ७।८ वर्षांच्या चिखलामातींत खेळणाऱ्या व नेसण्याच्या वगैरे लज्जेची पर्वा न करणाऱ्या अशा उघड्या नागड्या असणाऱ्या पोरींला त्यांच्या त्या खेळांतून ओढून काढून जुलुमानें नेसवून अर्थात् कमरे सभोंवती फडका गुंडाळून तिला विवाह समारंभांत "वधू" ( भोग्य स्त्री! ) या नात्यानें आणून तिच्या जोडीचाच लंगोटी सुद्धां सांभाळूं न शकणार जो "वर" (भोग्य पुरुष!) त्याच्या समोर आणून तिजला त्रास तरीं कशाला देतां. अशा तुमच्या वधूवरांला मल मूत्रांत किंवा चिखलामातींत मोकळ्या अंगानें ( वस्त्रादि बंधनरहीत—नग्नपणें ) खुशाल खेळूं किंवा लोळूं द्या ! व त्यांच्या बद्दली नारळ सुपारी वगैरे कांहीं तरी ठेवा !!

श्रोता—मल मूत्रांत लोळणाऱ्या किंवा चिखलामातींत खेळणाऱ्या व नग्नावस्थेचीहि लज्जा न आलेल्या लहान अर्भक मुलांचीं "लग्नें ह्मणणें" ह्मणजे लग्न शब्दाचा फार्सच होय. अशा मल मूत्रांत व चिखलामातींत लोळणाऱ्या अर्भकांचें लग्न ह्मणण्यापेक्षां त्यांच्या लग्नकर्त्या वडिलांचें लग्न, किंवा विवाहार्थ जमून पक्वान्नें झोडणाऱ्या पाहूण्याचें लग्न, किंवा स्वार्थ साधणाऱ्या उपाध्या भटाचें किंवा तासे, चौघडेवाले वगैरे वाजंत्री यांचेंच काय तें लग्न होय. कारण कीं, " लग्न " शब्दाचा मुख्य अर्थ शास्त्र नियोजित वधूवरांचा संभोग,—तो या समयीं होत नसतो. व त्याचप्रमाणें पाणिगृहणादि प्रतिज्ञा—करार वधूवरांकडून व्हा-

वयाचे ते हि त्यांच्या अज्ञानत्वामुळें होणें अशक्य; आतां उत्तम वस्त्रालंकार, मिष्टान्नें, वेश्यागायन व नृत्य, वाजंत्रें, ऐष आराम, डामडौल अशा क्रिया ज्या होतात त्यांचा सुखोपभोग व अनुभव वधूवरें मानलेल्या बिचाऱ्या अर्भक पोरांस न होतां त्यांच्या त्या वडिलादिकांला होतो. तेव्हां अशीं हीं "वधूवर संभोग रहीत" जीं लग्नें सांप्रत होतात तीं त्या वधूवरांच्या पुरस्कर्त्या वडिलादिकांचींच होत असें समजलें पाहिजे.

आ०— बालविवाह हा तर देशाचार आहे व तो सप्रमाण मानावा असें आहे: मग तुमचें शास्त्र कोठें राहिलें?

ना०—शास्त्र टाकून रूढी किंवा देशाचार मानणारे तुह्मी काय! एखादें शास्त्र निषिद्ध निंद्य कृत्य आहे तें देशाचार किंवा रूढी धरून ग्राह्य करावें काय? स्त्रीनें एक पति जीवंत असतां दुसरा करणें हें शास्त्र व तर्क निषिद्ध निंद्य कृत्य होय; असें असतां देशाचारावरून तुह्मी आपल्या बायकोस दुसरे अनेक पति करून द्याल काय? पशुपक्षादि कोणत्याहि प्राण्याचें मांस, त्यांस मारून भक्षण करणें हें शास्त्र निषिद्ध नीच कृत्य असतां देशाचारावरून तें अमंगल मांस तुह्मीं आपल्या तोंडांत घालाल काय? मातृगमन करणे हें शास्त्र निषिद्ध अमानुष कृत्य तुमच्या वाममार्गी कुलाचारावरून करण्यास तुह्मीं प्रवृत्त व्हाल काय? शिमग्या पौर्णिमेच्या नांवानें चोरी करणेचा कुलाचार आहे त्याप्रमाणें तुह्मी चोरी कराल काय? व अशा चोरीमुळें तुह्मीं पीनलकोडच्या सक्त मजूरीच्या शिक्षेस पात्र नाहीं हो-

णार आहां काय ? तुमच्या भवानी देवीला, धन व वंश वृद्धि प्राप्त्यर्थ, दरसाल दरमाहा मनुष्य बळी देण्याचा तुमचा कुलाचार आहे त्याप्रमाणें तुह्मी मनुष्याचा बळी दिल्या मुळें पीनलकोडच्या देहांत अर्थात फांसीच्या शिक्षेस नाहीं काय पात्र होणार ? तात्पर्य अशा शास्त्र निषिद्ध हानी कारक रूढी किंवा देशाचार निंद्य होत—ते कोणी कदाकाळीं आचरूं नयेत. व याविषयीं सदहू प्रसिद्ध मोक्ष मूलर साहेब ह्मणतात:—

With regard to the proper age for marriage, I published the important passages in my Hibbert Lectures in 1878, p. 352-3, and as these lectures are being translated under your auspices into most of the modern languages of India, I doubt whether any Shastri now will dare to invoke either Sruti or Smriti in support of Infant Marriage. But, of course, they, will invoke the authority of Achara or Desa dharma, unless they remember that custom and local law have no authority whenever they conflict with Sruti or Smriti.

'Infant marriage is a native custom, and we do not want the Government to interfere.' I have not a word to say against this argument, provided always that no tort is inflicted on individuals. Government does not deserve

the name of Government, if it declares itself unable to protect each individual subject against personal torts, whether sanctioned by custom or not. Now, infant betrothal is a tort –it is a contract made without consent of one of the parties. If, therefore, that party suffers and wishes to be released from an unjust contract, the Government ought so far to protect him or her. Whether the Government is foreign or native, does not matter. It is your Government, as long as you accept it. and enjoy all the advantages of it; and to turn round and say that your Government should not prevent and punish iniquity is self-contradictory. Do you not invoke the aid of Government to stop drunkenness or Thuggee ? The Thugs appealed to custom and to their protecting goddess, but the Government did not listen, but did its duty. Now ask any high minded woman, what is preferable–to be killed in the most expeditious way, once for all, or to be married to a man whom you loathe—and I believe the answer cannot be doubtful. The custom of infant betrothal is unjust ; the custom of infant marriage is criminal. In the for-

mer case Government should give every relief that is demanded by the injured party, in the latter Government should punish the criminal. But for the unfortunate feeling against Government interference-in many cases a mere excuse of interested parties,—no man worthy of the name of Arya would tolerate or try to explain away such iniquities. I wish the Government, while declaring its impotence, had at least given expression to the righteous indignation which every Englishman must feel when reading the accounts you have published of infant-brides and infant–widows.

अर्थः—लग्न करण्याच्या वयाची इयत्ता जी शास्त्र कर्त्यानें ठरविली आहे तिजविषयीं माहिती होण्याकरितां मी आपल्या "हिबर्टलेकचर" नांवाच्या व्याख्यानांत शास्त्राधार छापून प्रसिद्ध केला आहे. आणि ज्या अर्थी हिंदुस्थानांतील बहुतेक चालू भाषेंत या व्याख्यानाचें भाषांतर होत आहे त्याअर्थी बालविवाहास वेद किंवा स्मृति यांचा आधार दाखविण्याचें आतां कोणी धाडस करील असें वाटत नाही. तथापि "आचार किंवा देश धर्म" यांचा पुरावा—आधार ते देतील यांत संशय नाहीं. पण असा आधार जर ते आणित असले तर वेद किंवा स्मृति निषिद्ध व विरुद्ध अशा रूढी व देशाचार प्रमाणास धरतां येत नाहींत या गोष्टीच्या अज्ञानत्वाबद्दल ते मूर्ख ठरतात असें ह्मटलें

पाहिजे. बालविवाह हा देशाचार आहे; या कामांत सरकारची मध्यस्थी आह्मास नको" असें लोकमत असल्याची कल्पना केली पाहिजे. आचार हा जर कोणाच्या नुकसानीस कारणीभूत होत नाहीं, तर त्याबद्दल मला कांहीं हरकत वाटणार नाहीं. परंतु कोणाएका व्यक्तीचें नुकसान झालें असून त्याचा बंदोबस्त करण्याला जें सरकार असमर्थ आहे त्याजला सरकार असें म्हणतां येत नाहीं. बालपणीं वाग्दान होणें हें एक नुकसान आहे, कांकीं हा एक प्रकारचा करार होय, व त्यांत एका पक्षाची संमति नसतांना तो करार झालेला आहे. तस्मात् त्यापासून पुढें जर एकापक्षाचें नुकसान होतें व त्या नुकसानीपासून आपलें रक्षण व्हावें असें जर तो पक्षकार ह्मणतो तर गैरशिस्त व अन्यायी जुलमी करारापासून त्याची किंवा तिची सुटका सरकारानें केली पाहिजे; मग तें सरकार स्वदेशी असो किंवा परदेशी असो, तें तुमचें सरकार आहे, त्यास तुह्मीं मानतां, व त्याच्या आमदानी खालीं राहून त्याचा उपभोग घेत आहां येवढें पुरें आहे. तुमच्या सरकारानें तुह्मास झालेल्या किंवा होणाऱ्या नुकसानीपासून तुमचें संरक्षण करूं नये अर्थात् नुकसान न होईल असा बंदोबस्त करून नुकसान कर्त्यास शिक्षा करूं नये हा किती विसंगतपणा होय! मद्यपान व दरोडे या पासून बचाव होण्याकरितां तुह्मी सरकारची मदत मागीत नाहीं काय? दरोडे घालण्याची आमची जुनी चाल व वहिवाट चालू आहे असें ठग लोकांचें ह्मणणें होतें कीं

नाहीं ? परंतु सरकारानें त्यांच्या बोलण्याकडे लक्ष न देतां आपलें कर्तव्य बजाविलें. " कोणत्या तरीं सयुक्तिक रीतीनें एकदांचा तावडतोब प्राण जाणें " हें बरें किंवा " प्रेम नसलेल्या पुरुषाशी विवाह करणे हें बरें असें एखाद्या प्रगल्भ बुद्धीच्या स्त्रीला विचारल्यास ती काय उत्तर देईल याचा मला अगदीं संशय नाहीं. बाल्यावस्थेंत वाग्निश्चय होणें हें गैरशिस्त आहे; पण बालपणीं लग्न करणें हें पातक ( गुन्हा ) आहे. बाल्यावस्थेंत वाग्निश्चय झाल्यास त्यावरून ज्या पक्षाचें नुकसान होत आहे त्या पक्षकाराची दाद सरकारानें लावली पाहिजे; पण बालपणीं लग्न लावणारास तर शिक्षाच झाली पाहिजे. "असे गुन्हे - हे अन्याय नव्हत" असें कोणीहि आर्य श्रेष्ठ मनुष्य कधींहि ह्मणणार नाही. जे कोणी म्हणतात ते तरी दुर्दैवानें सरकार मध्यस्थ होत असल्यावरून मनांत टोंचत असल्यामुळें म्हणतात; व यांत त्यांचा कांही तरी स्वार्थ साधावयाचा असतो ( म्हणूनच ते असें म्हणतात ). बालविधवा व अर्भक नवरा यांचें प्रसिद्ध केलेलें वर्णन वाचून " या प्रकरणीं आम्ही दाद लावण्यास असमर्थ आहों असें जेव्हां सरकारानें म्हटलें तेव्हां योग्य अभिमानाचा बाणा बाळगून आपल्यास " इंग्लिश " म्हणविणाऱ्या प्रत्येक मनुष्याला अबलांच्या अशा दुःखाची दया येऊन त्या अन्यायाचा जो खरा धिःकार व क्रोध यावयाचा, तो धिःकार व ती दया हि सरकारानें आपल्या ठरावा सोबत प्रदर्शीत केली असती तर ठीक.

श्रो०-अकाल बालविवाह करणें ही फक्त रूढी असून आ

रूढीला शास्त्र मानून 'धर्माच्या बाबतींत आपण हात घाल-णार नाहीं' असा सन १८५७ सालचा सरकाराचा ठराव म-तलबान्ध पाषाणहृदयी लोक पुढें आणून सरकारच्या डोळ्यांत धूळ घालण्याकरितां प्रयत्न करीत आहेत त्यांचें मोक्ष मूलर सा-हेबानें हें उत्कृष्ट खंडण केलें आहे. धन्य हे मोक्ष मूलर ! इंग्लंडांत असले म्हणून काय ! कसे झाले तरी आर्यच कीं नाहीं ते ? नाहीं तर हीं हिंदुस्थानांतील आनरेबला सारखीं हि-दीश भूतें पहा ! नीचांची नीचच बुद्धि असावयाची.

सो०-- बालविवाहाच्या रूढी धर्माप्रमाणेच या हिंदु हराम धर्माभिमानी लोकांची 'यात्राजन्यपटकी' ही रूढी धर्मच होय. पण या यात्राजन्य पटकीच्याच फक्त रूढीधर्मात सरकारानें हात घालावा अर्थात् पटकी नाहींशी होण्याकरितां यात्रा बंद करावी अशी ओरड या आनरेबला सारखे हिंदु--हराम धर्मा-भिमानी ओरड करित असतात. कारण कीं, यात्राजन्य पटकी-मुळें त्यांच्या जीवावर पाळी येऊन प्राण हानी व्हावयाची: तशी बालविवाहामुळें त्यांची कांहीं नुकसानी होत नसते. नु-कसानी व्हावयाची ती परस्पर बिच्याऱ्या अबलांची, ती होई-ना कां ? असे ह्या हिंदुधर्माभिमानी लोकांचे नीच विचार बरें !

श्रो०-- या यात्राजन्य पटकी पासून जी हानी व नुकसा-नी होते त्यापेक्षां बालविवाह व स्त्री पुनर्विवाह निषेध यांपासून फारच ज्यास्त होते, याबद्दलची वगैरे मूर्ख हिंदु धर्माभिमानी लोकांची मूर्खांनी शूद्र मानलेल्या ( वास्तवीक ब्राह्मण ) 'दीन-

बंधू ' कर्त्यांनें बरीच कानउघडणी केली आहे पैकीं थोडी अशी:--' क्षेत्रांचे ठिकाणची पटकी मोक्षप्राप्त करून देणारी नव्हे काय ? असले सुलभ व त्वरित मुक्ति मिळण्याचे साधना आड आमचें सरकार तर येतेंच; परंतु हिंदु धर्माचे कट्टे कैवारी तेहि सरकारास या यात्रेकरूंच्या कामीं हात घालण्यास सुचवीत आहेत; तेव्हां हा नाहीं काय धर्मांत हात घातल्यासारखा होत ? कोणत्याहि धर्मांचे बाबतींत सरकारानें हात घालूं नये म्हणून कित्येक लोक दीर्घस्वराने ओरडून सरकारास सन १८५७ सालचा जाहीरनामा पाळण्यास सांगतात.-अशा यात्रेच्या योगानें लोकांची फार नासाडी होते ती बंद करण्यास सरकारानें हात घातला पाहिजे असें जर या डळमळीत विचारांचे लोकांचें बोलणें असेल तर तोच सिद्धांत सर्वत्र ठिकाणीं कांघेऊं नये? विधवांचीं पुनर्लग्नें न करणे आणि बालविवाह होऊं देणें या पासून हिंदुलोकांचें नुकसान होत नाहीं काय ? यात्रेपेक्षां या उभय गोष्टींत फारच नुकसान होत आहे. यात्रेंत मनुष्यें मेल्यानें मुक्ति पावतात. परंतु या उभय कृत्यांच्या होणाऱ्या परिणामापासून जे मरतात ते अधोगतीस जातात. हें तर होतेंच. परंतु ह्या पासून नेहमीचे दोन मोठे गैरफायदे आहेत. एक तर विधवांपासून (बालहत्यादि) पातकाच्या राशी पदरांत पडतात. आणि बाल लग्नापासून प्रजा शक्तीहीन व अल्पायुषी निपजते. या एकंदर परिणामाकडे पहतां यात्रेतील उद्भवणाऱ्या पटकीपेक्षां विधवांचीं पुनर्लग्नें

करूं न देणें आणि बालविवाहाचा प्रतिबंध न करणें हें फारच गैर फायद्याचें आहे. ह्मणून जसा पटकीविषयीं बंदोबस्त सरकारानें करावा असें हिंदुधर्माचे कट्टे कैवारी म्हणतात तेव्हां या उभय गोष्टींतहि सरकारानें आवश्य हात घातला पाहिजे कारण यापासून फारच अनर्थ होत आहेत.

भट–विधवांपासून बालहत्यादि पातकें होतात तर मग त्यांनीं पापाचार आपल्याकडून घडूं नये ह्मणून योग्य पुरुषाशीं आपलें लग्न करून नियमितपणें वागणें हें सयुक्तिक दिसतें; पण त्याजबद्दल धर्मशास्त्रीय विचार कसे आहेत?

ना०–'आहार निद्रा भय मैथुनं च सामान्यमेतत्पशुभिर्नराणां' याप्रमाणें आहार, मैथुनादि सृष्टिजन्य विषय मनुष्यादि प्राणिमात्रांस सामान्य आहेत. व अशा विषयांचा प्रतिबंध करणें हें मोठें जुलमाचें कृत्य होय हें निर्विवाद होय. व त्याप्रमाणें एखाद्या स्त्रीचें खाणें पिणें बंद करणें हें जेवढें जुलमाचें कृत्य तेवढेंच त्या स्त्रीचें मैथुन अर्थात् विषय वासना तृप्त करून घेण्याचें बंद करणें जुलमाचें व शिवाय भयंकर परिणामाचें कृत्य होय. आहार बंद करण्यानें त्या आहार बंद केलेल्या एकट्याच शरीराची विपत्ती व हानी होते; पण मैथुन बंद केल्यानें त्या मैथुन बंद केलेल्या स्त्रीच्या शरीराचा कामानलेंकरून दाह होतो तो बंद होण्याकरितां चोरून विषय वासना तृप्त करून घेते व तेणेंकरून गर्भ राहिला ह्मणजे लज्जा निवारणार्थ

ती स्त्री गर्भपात करिते व तो होत नसल्यास बालहत्या
करिते. व केव्हां केव्हां तर गर्भपात किंवा बालहत्येचे भरीस
न पडतां आत्महत्याहि करिते. तात्पर्य एवढे भयंकर परि-
णाम स्त्रीचा विषय बंद केल्यानें होत असतात. तस्मात्
असें विषयसेवन बंद करण्याचें नीच जुलमी कृत्य मानवानें
करूं नये. आतां मानव (मन् विचारकरणें या धातूपासून)
हा विचारी प्राणी होय. तेव्हां त्याणें त्या आहार मैथु-
नादि व्यवहारास कांहीं नियमितपणा ठेविला पाहिजे. केवळ
पशुत्व प्रवृत्तीस अनुसरून अनियमित वेळीं व अयोग्य ठिका-
णीं ते व्यवहार ठेवूं नयेत. पण कांहीं नियम ठेवावे ह्मणजे
आहार—अमुकच प्रकारचा अमुकच वेळीं, निद्रा अमुक वेळीं
अमुकच पर्यंत व तद्वत् विषयसुखाची अमुक मर्यादा या-
प्रमाणें. (आश्वलायन गृह्यसूत्रादि ग्रंथांत हे नियम असून
त्यांचें विवेचन पुढें स्वतंत्र करण्यांत येणार)—एवढे सामान्य
तर्कसिद्ध शास्त्रीय नियम स्त्रीपुरुषांस उक्त आहेत. पण
एखादा पुरुष (नवरा) मयत झाल्यावर त्याच्या विवाहित
स्त्रीनें किंवा ती स्त्री मयत झाल्यावर तिच्या नवऱ्यानें विषय-
सेवन करूं नये असा जुलूम आपल्या सनातन शास्त्रांत बि-
लकूल नाहीं. विवाहित स्त्रीपुरुषांचा परस्पर शरीरभोगसंबंधी
करार आमरणान्तच असतो ह्मणजे एकदां नवरा किंवा बा-
यको मयत झाल्यावर मागें जीवन्त रहाणाऱ्या स्त्री किंवा
पुरुषानें मयताशीं शरीरभोगसंबंधीं केलेला करार सुटतो

(विवाह प्रतिज्ञा मध्येंहि हा स्पष्टार्थ आहे) तस्मात् मागें जीवन्त राहाणाऱ्या नवऱ्या किंवा बायकोनें मर्जी किंवा अनुकूलता असल्यास, "वधूवरें हीं असगोत्र असून वधूच्या सव्वापासून दीडपटी मानापर्यंत वराचें वय असलें पाहिजे" असा जो शास्त्रीय मुख्य नियम त्यास अनुसरून खुशाल पुनः विवाह करावा. अशा पुनर्विवाहास उघड प्रतिबंध नाहीं. आतां अशा लग्नाच्या संबंधानें एवढा मात्र शिष्टाचार आहे कीं स्त्रीपुरुषानें मुलें बाळें होतां किंवा न होतां बरींच वर्षे विषयसुखोपभाग भोगल्यावर उभयापैकीं कोणी मयत झालें तर मागें रहाणाऱ्या स्त्री किंवा पुरुषानें पुनः लग्न करून विषयासक्त प्रपंच्यांत परत शिरण्यापेक्षां सदुपदेशादि परोपकारीं व ईश्वर भजनीं कालक्षेप करणें हा श्रेष्ठ मार्ग व पुनः लग्नकरून मोहांत पडणें हा कनिष्ठ मार्ग, तो उभय पक्षानें (स्त्रीने तसा पुरुषानेंहि) स्वीकारूं नये. एखादा मनुष्य परोकारीं ईश्वरभजनीं काळ न घालवितां केवळ प्रपंचांतच सर्वकाळ घालवितो व तेणेकरून तो जसा सज्जन साधुसंतांस अमान्य व अग्राह्य होत असतो तद्वत् एकदां विषय सुखानुभव घेऊन मुल बाळें झाल्यावर पुनः विषयासक्त होऊन प्रपंचांत पडणारा मनुष्य सज्जन श्रेष्ठ ज्ञानी जन समूहांत अग्राह्य व हलका मानला जातो. तस्मात् असें हलकेपणाचें कृत्य अर्थात विषय सुखानुभवलेल्या स्त्री पुरुषांनीं परत आणखीं विषयाची मुदत (सामर्थ्य कमी होत असतां)

वाढवून त्यांतच निमग्न रहाणें हें लाजीरवाणे होय—एवढाच कायतो आपल्या आद्य, अनुभवीक ऋषिजनांचा सिद्धांत आहे. पण असें हें लाजीरवाणे हलकें कृत्य केल्यानें मोठेंसें पाप आहे असें नाहीं. सारस्वत, कान्यकुब्ज, पळसे, वाणी, परभु, कऱ्हाडे, चितपावन अशा कांहीं थोडथोड्या जातींत स्त्रीपुरुष पुनर्विवाहाच्या संबंधानें विलक्षणीक पक्षपात दिसून येतो तो असा कीं, पति पुरुषानें मात्र पुनः लग्न करावें पण पत्नी स्त्रीनें पुनः लग्न करूं नये. केलेंच तर महत्पाप लागून ४१ पूर्वज व ४१ वंशज नरकीं पडतात* !! ठीक! अशा मानानें, स्त्री अर्धांगी व पुरुष सर्वांगी बनल्यामुळें, पुरुषानें परत लग्न केलें तर त्याचे, ८२ पूर्वज व ८२ वंशज नरकांत पडले पाहिजेत! पण असे—पुरुषाचे पूर्वज नरकांत पडण्याच्या संबंधी श्लोक कोणी रचले नाहींत. कारण धर्म मिषानें वगैरे ग्रंथ लिहिणारे पुरुषच सर्व: तेव्हां ते आपल्या विरुद्ध लेख कसे लिहितील! तात्पर्य अपराध

---

* स्त्रियांनीं पुनर्लग्न केलें तर त्या, ४१ वंशज व ४१ पूर्वजांसह नरकांत पडतात असें सदरील सारस्वत पळसे वगैरे थोडथोड्या जातींचें ह्मणणें आहे; तर या हिंदुस्थानांत ज्या इतर शेंकडो मोठमोठ्या जातींतील कोट्यावधि स्त्रिया पुनर्लग्न, पाट वगैरे करितात त्या नरकांत पडणार मग! आणि या सारस्वत वगैरे लहान लहान जातींतील मूठ भर विधवा स्त्रिया अनाचारास प्रवृत्त होऊन प्रसंगवशात् गर्भपात, बालहत्या व आत्महत्या करून स्वर्गीं जाणार! काय येड्यांच्या कल्पना तरी! अशा पोरकट कल्पनेवर शहाणे ह्मणविणारे लोक विश्वास ठेवतात यांत त्यांजला नीचपणा वाटत नाहीं हें मोठेंच आश्चर्य.

करितो एक व शिक्षा भोगावी लागते दुसऱ्यांला,* तीहि मरून गेलेले पूर्वज व पुढें जन्मणारे वंशज अशांस! काय तर्क रचना! असो आतां हा जो पक्षपाती नियम या लोकांत चालू आहे तो योग्य आहे अशाबद्दल कित्येक वेडगळ अनार्य दुराग्रही लोक ह्मणतात कीं, "नवरा मयत झाल्यावर तो आपल्या बायकोच्या निम्मे विषय वासना बरोबर घेऊन जातो. बाकी निम्मे राहिल्या त्या तिच्या केशवपनानें जातात! ठीक: असा प्रकार असता तर मुंबईतील गटारांत किंवा गंगा, यमुनादि पवित्र मानलेल्या नदीच्या किनारीं मेलेलीं व पंढरपुरच्या अनाथ बाल रक्षक गृहांत जीवन्त टाकून दिलेलीं अर्भक पोरें सांपडलीं नसतीं. असो. पक्षपाताचें वास्तवीक

---

* गुजराथेंत अशी ह्मण आहे कीं "पोमली जणे अने पोमलो सुवावड खाय" "ह्मणजे बायको बाळंत व नवऱ्याला पथ्य" याप्रमाणे हा न्याय.

† 'आमरणान्त अन्यत्र विषय सेवन करणार नाहीं' अशी प्रतिज्ञा विवाह समयीं नवऱ्या बायकोकडून होत असते. पण त्या प्रतिज्ञे विरुद्ध नवरा हा बायको जीवंत असतां व प्रतिज्ञा लागू असून अन्य विवाह व व्यभिचार प्रसिद्धपणे करून प्रतिज्ञा भंगाच्या दोषास पात्र होतो तशी साध्वी बायको होत नसते ह्मणजे नवरा जीवन्त असतां आपल्या विवाह कालच्या प्रतिज्ञे विरुद्ध लग्न किंवा व्यभिचार करीत नाहीं. तर अशा ह्या पतिव्रता साध्वी स्त्रीला पति मरणोत्तर 'प्रतिज्ञा लागू नसतांहि' दुष्ट पुरुष त्या प्रतिज्ञा लागू करून तिचें पुनर्लग्न बंद करितात पण आपण स्वत: वर दर्शविल्याप्रमाणे, तिच्या हयातींतच प्रतिज्ञा लागू असतांहि लागू नाहीं असें मानून खुशाल लग्ना मागें लग्नें व व्यभिचार करीत रहातात! तर हा पुरुषांचा केवढा वरें पक्षपात व अन्याय! अशा पक्षपाती

कारण पुरुषानें आपल्यास नव्या नव्या स्त्रिया प्राप्त व्हाव्या हें होय; पण पुढें आपल्या वृद्धापकाळीं किंवा मृत्युनंतर त्या स्त्रिया भरज्वानींत आलेल्या गुप्तपणें कश्याहि वागून गर्भपात, बालहत्या, आत्महत्या करूं लागल्या तरीं त्याचा विचार त्यांस नसतो. तात्पर्य सदरहू जातींतील असा बिचाऱ्या विधवा स्त्रियांवर पुनर्लग्नाच्या प्रतिबंधाचा अर्थात् कामानलानें पोळून राहण्याचा जुलूम होत आहे एवढेंच नव्हे तर केशवपनादि अन्य तऱ्हेनेंहि त्यांची हाल विपष्टा दुष्ट पुरुष जातीकडून होत आहे. भर्त्यांच्या प्रेतकाळीं तरुण गतभर्तृकेचें दुःख एका पुस्तकांत वर्णिलं आहे तें असें:—अभंग.

"गतभर्तृकांचीं, दुःखें हो अपार । पापें कोठवर । पहावीं आह्मीं ॥ १ ॥
पति मृत होतां, त्या मोठ्या दुःखांत । वृद्ध हो ह्मणत । काय तेव्हां ॥ २ ॥
आणा नापितासि, उशीर कांसया । भोजनासीं जाया । उशीर होतो ॥ ३ ॥

---

अन्यायी पुरुषास परमेश्वराकडून नाहीं काय शिक्षा होणार ?

दुसरा "सती घालविण्याचा" एक पक्षपात होता ह्मणजे स्त्रीनें मात्र आपल्या मयत पतीसह जळून मरावें, पण पुरुषानें आपल्या मयत पत्नीसह जळून न मरतां उलट नव्या नव्या स्त्रिया भोगाव्या! दयाळू इंग्लिश सरकारानें सती बंद केल्यामुळें हा पक्षपात आपोआप खुंटलाच. आरेबियन नायट मध्यें मयत पत्नीसह पुरुषाला पर्वताच्या अफाट दरी गुहेंत लोटून देण्याची चाल सिंदाबादला अनुभवलेली होती; तशी कांहीं सदरहू सारस्वतादिकांत असती तर ते पक्षपाती न ठरते! तात्पर्य सतीच्या पक्षपाती चालीचें मूळच सरकारानें परभारें उपटलें. आतां स्त्रीपुरुष पुनर्लग्न संबंधीं जो पक्षपात आहे तो तरीं स्वतः मोडून टाकण्याचें यश सदरहू स्त्री पुनर्लग्न निषेधक जातीनें सरकार जुलूम होण्यापूर्वीं घ्यावें.

दुःखांतची दुःख, होवो तें आतांच । वाट हो पहातांच । धर्म बुडे ॥ ४॥
पहा ही तरुणी, सुंदर रुपिणी । केशाच्या योगानी । होईल जार ॥ ५ ॥
ऐसें म्हणोनियां, न्हाव्यासी आणिती । विधवेसी मुंडिती । बलात्कारें ॥६॥
सुज्ञ लोक ह्मणती, वपने काय झालें । मदनासी जाळीलें । काय तुह्मी ॥७॥
केश काढोनियां, किती हो वाढवीती । पोटें ही पाडीती । नाहीं कां हो॥८॥
वपने मदन, बंद कां पावला । किंवा तो शिणला । किंवा मेला ॥ ९ ॥
जातीची कामिनी, भ्रष्ट हो करीती । नापिकासी देती । एकान्तांत ॥१०॥
कामाचा तडाका, आहे जबरदस्त । कैसा राहे स्वस्थ । एकान्तीं तो॥११॥
अग्निकुंड नारी, घृतकुंभ पुरुष । स्त्रीपुरुष वेष । तैसा आहे ॥ १२ ॥
किंवा हळद चुना, मीठ दुध जाणा । भेटी होतां यांना । रंग फीरे ॥१३॥
रंगाचा बेरंग, अमृताचें विष । परपुरुष स्त्रियांस । तैसें करी ॥ १४ ॥
विचार करूनी, चाल वपनाची । मोडावी ही साची । पंडितांनीं ॥ १५ ॥

(विधवेचें वपन करवितात त्या प्रसंगाचा श्लोक—लावणीची चाल)

"मृतपति दुःखें मुर्च्छित असतां, केश वपन करविती । पटाने चंद्रवदन लपविती ॥ धृ० ॥ काढुनी भूषणे घेती, तिजला देती नीचाकर्री । ह्मणती ते बळकट तिजला धरी । नापित हस्तें ठेविती वस्त्रा तिच्या डोईवरी । उतरतां तिची वेणी भुईवरी । क्षणभर रडवुनी सर्वहि जाती, आपआपल्या घरीं, मग ती दुःखें तळमळ करी । सासू सासरा ह्मणती तिला हो अवदसा अवदसा । जावा ह्मणती व्यर्थ फोडिते घसा घसा ॥ मृतपति० ॥"

अर्थ उघडच आहे. बिचारी कोमलांगी, अबला स्त्री प्रत्यक्ष पति मरणाच्या अत्यंत शोकार्णवांत असतां तिजला हजामाजवळ एकान्तीं फरफरां ओढून नेऊन तिचे केश भादरावे ! कोणी कपाळाचें कुंकू पुसावें ! कोणी हातांतील बांगड्या (कांकणें) फोडावीं ! कोणी मंगळसूत्र तोडून न्यावें ! कोणी नथ, डुगडी, डुसी वगैरे अलंकार हिस्कावून घ्यावे !— याप्रमाणें घाटके

दोन घटिकेंत बिचारीवर अतिकहर व जुलूम करून तिजला आमरणान्त दुःख समुद्रांत टाकून दुष्ट लोक आपापल्या घरीं चालते होतात. काय हा अनर्थ व जुलूम तरी ! असे जुलूम करणारे पुरुष महा रौरवीं—नरकीं पडतील हें सांगणे नकोच. आतां ज्या विधवा ह्मणून स्त्रिया गर्भपात किंवा बालहत्या, आत्महत्या करितात त्या सर्वच विधवा म्हणजे **नवरा मेलेल्या** असत नाहींत. त्यांत **खऱ्या व खोट्या** अशा दोन प्रकारच्या विधवा आहेत. ज्यांना प्रत्यक्ष पति प्राप्त होऊन त्याशीं शरीर संबंध जडला अशा स्त्रिया आपल्या त्या पति मरणोत्तर विधवा होतात त्या खऱ्या विधवा; व ज्यांना नियोजित वर पुरुषाशीं संभोग घडून धवा—पति प्राप्तच झाला नाहीं, अशा स्त्रिया (सांप्रतच्या बालविधवा) त्या **मानीव पति** मरणोत्तर विधवा मानल्या जातात त्या खोट्या विधवा; व अशा ह्या खोट्या (बाल) विधवा पासूनच सदरहू बालहत्या, आत्महत्यादि महापातकें बहुधा होत असतात. कारण खऱ्या विधवां प्रमाणें त्यानां विषयसुख व तज्जन्य मुलें बाळें होऊन विषयवासनानुभव व शमनता झालेली नसते. विषय कसा असतो याचा अनुभव घेण्यास त्या खोट्या विधवा हरतऱ्हा करितात व त्या साध्य होण्याकरितां एकदां एखा-द्या पुरुषाच्या नादीं लागल्या ह्मणजे तो पुरुष युक्तिप्रयु-क्तीनें—त्या अबलाच मुळीं—त्याचें मन तो वळवितच दिवसें दिवस रहातो. मग त्या मोहपाशांत पडून दुष्कर्म आच-

रून बालहत्यादि महापातकांस कारणभूत होतात. व त्याप्रमाणें अशा ह्या खोट्या (बाल) विधवांपासून दरवर्षी हजारो बालहत्या होत असतात हें सरकारच्या रिपोर्टावरून दृश्यहि होत आहे. व शिवाय निरवयव, सावयव, सजीव, निर्जीव अशा प्रकारचे गर्भपात सरकारास न समजणारे व गुप्तपणें घडणारे असंख्य घडत असतात. व अशा गर्भपात करण्याच्या कामीं भयंकर औषधोपचारानें अनेक विधवा स्वतः प्रसंगवशात् प्राणासहि मुकतात; किंवा जिवानिसीं वांचल्याच तर रोगग्रस्त होऊन दुसऱ्यांलाहि जाचतात. तस्मात् अशीं गर्भपात, बालहत्यादि महापातकें नाहींशीं होण्याकरितां बालविवाहच बंद झाला पाहिजे. व जोंपर्यंत तो बंद झाला नाहीं तोंपर्यंत पूर्वोक्त गर्भपातादि अनर्थ घडणारच घडणार. बालविधवा होण्याचें बंद झालें अर्थात बालपणीं खोटीं लग्नबन्धनें न झालीं विशेषार्थीं तर्क सिद्ध वेदशास्त्राधारें योग्य वेळीं (मोठेपणीं) खरीं लग्नें झालीं तर असंख्य बालविधवा होत आहेत त्या मुलीच नाहींशा होऊन फक्त थोड्या बहुत खऱ्या (प्रौढ) विधवा कायत्याच रहातील व अशा प्रौढ विधवांच्या हातून पूर्वप्रदर्शित कारणांवरून गर्भपात, बालहत्यादि महापातक घडण्याचा फारसा संभव नाहीं. व तेणेंकरून त्यांच्या पुनर्विवाहाची आवश्यकता वाटणार नाहीं. बाल हत्यादि महापातकें विधवांच्या हातून घडतात. ह्मणूनच विधवांनीं पुरुषांप्रमाणें पुनः लग्न करून नियमितपणें

वागणे हें न्याय्य दिसतें. बालहत्यादि महापातकें, बालविधवांपासून बहुधा होणारीं — तीं बाल लग्न प्रतिबंधनानें नाहींशीं झालीं ह्मणजे विधवांच्या पुनर्विवाहाच्या आवश्यकते बद्दल कोणाच्या लक्षांत कल्पना येणार नाहीं व विधवा पुनर्विवाहाच्या संबंधानें सांप्रत जो अवडंबर माजलेला आहे तो अजीवाद बंद होईल. आतां ज्या खऱ्या (प्रौढ) विधवा कित्येक राहातील, त्या पैकीं ज्या कांहीं साध्वी, ज्ञानी, विचारी असतील त्या तशा प्रकारच्या पुरुषाप्रमाणें विषय मोहपाशांत न पडतां व्रतस्थ राहून ईश्वर भजनीं काळ घालवितीलच. व ज्या कांहीं अज्ञानी विषयसक्त असतील त्यांणीं तशा प्रकारच्या पुरुषाप्रमाणें पाहिजे असल्यास पुनः लग्न करून नियमित पणानें वागावें हा सयुक्तिक व न्याय्य सृष्टि धर्म होय व अशा न्याय्य सृष्टि धर्मा विरुद्ध जे पुरुष आपल्या जातींतील कामी विधवा स्त्रियांला पुनर्लग्न करण्याच्या प्रतिबंधनांत ठेवणारे आहेत ते खरोखरच अबला स्त्री जातीवर जुलम व अन्याय चालविल्याबद्दल दोषी ठरून महा रौरवीं–नरकीं पडणार हें सांगणें नकोच.

**श्रोता**–पुनर्लग्न प्रतिबंधनाचा जुलूम स्त्रीयांवर चालविल्यामुळें त्या लोकांस जसा नरक प्राप्त होतो तद्वत् लग्न प्रतिबंधनापासून स्त्रियां कडून बालहत्या व गर्भपात व प्रसंगवशात् आत्महत्या ज्या होतात त्या बद्दलहि त्यांजला विशेष नरक भोगावा लागतो. कारण ते लोक विधवांना सरळ लग्न

करूं देत नाहींत व त्या मुळें त्या कामानल दग्ध स्त्रियांस व्यभिचार करावा लागतो व तेणे करून जे गर्भ रहातात त्या गर्भांची हत्या त्या स्त्रीयांना लज्जा व जातीबहिष्काराच्या भीतीस्तव कराव्या लागतात. तात्पर्य विधवा विवाह प्रतिबंधक लोकांसच त्या विधवा स्त्रियांनीं केलेल्या गर्भपात बालहत्यादि महापातकांचा दोष लागतो व त्या मुळें त्यांजला चिरकाल नरक प्राप्त होतो व त्याप्रमाणें त्या लोकांनीं शास्त्र मानलेल्या भागवतांत व स्क० पुराणांतहि सांगितलें आहे:—

"बालहत्यां प्रकुर्वन्ति नराः पापेन मोहिताः । ते यान्ति नरकं घोरं यावच्चंद्र दिवाकरौ" भा० १०।४, स्कं० ११८ ह्मणजे सूर्य चंद्र आहेत तों पर्यंत अशा बालहत्या करणाऱ्या क्रूर, दुष्ट, चांडाल पापी लोकांस अनिवार्य दुःखोद्भवक नरक सतत एकसारखा भोगावा लागतो.

**ना०**— सन १८८४ सालच्या सरकारच्या रिपोर्टावरून बंगाल, पंजाब, अलाहाबाद, मुंबई व मद्रास या फक्त ५ प्रान्तांत विधवा स्त्रियांचे हातून १२ हजार, ५ शें, ४२ बाल हत्या उघडकीस आल्याचें दिसून येतें. परंतु या हिंदुस्थानांत दुसरे जे आणखीं प्रांत व देशी व परदेशी संस्थानें आहेत तेथील बालहत्तेची माहोती मिळूं शकत नाहीं. व शिवाय उघडकीस न येणाऱ्या गर्भपातादिकांची संख्या किती होते हेंहि समजूं शकत नाहीं. तथापि तेथील खानेसुमारी ह्मणजे मनुष्य गणतीवरून या सर्व हिंदुस्थानांतील पुनर्लग्न न हो-

णाऱ्या जातींतल्या विधवा स्त्रियांची संख्या २६ लक्ष, ४ हजार, ७ शें, ३४ मिळते. तर या विधवांचे संख्येपैकीं सदरील ९ प्रान्तांत जर १२ हजार, ९ शें, ४२ बालहत्या झाल्या असें साधारण प्रमाण मिळालें आहे तर काश्मीर, नेपाळ, वऱ्हाड, हैद्राबाद, बडोदा, अजमीर, आसाम, कुर्ग, गोवें, दमण, ब्रह्मदेश वगैरे या सर्व हिंदुस्थानांतील बाकी राहिलेल्या स्त्री पुनर्लग्न करूं न देणाऱ्या विपुल लोकांनी भरलेल्या प्रांतांतील विधवांचे हातून आज शेंकडो वर्षें पुनर्लग्न बंद झाल्या दिवसापासून किती कोटी गर्भपात व बालहत्या झाल्या याचें अनुमान विचारी शोधक पुरुषांनींच करावें.

श्रोता०— ह्या ज्या कोट्यावधी बालहत्या होतात त्या बहुधा बालविधवां पासूनच होतात व बालविधवा होण्यास मूळ कारण वेदशास्त्र तर्कें निषिद्ध बाललग्न होय. कारण आज जर बालविवाह अजीबाद बंद झाला तर बालविधवा ह्मणून एकहि सांपडणें नाहीं हें निर्विवाद सिद्ध आहे. तेव्हां बालविधवा व तज्जन्य बालहत्या यांस मूळ कारण जें बाललग्न त्या बाललग्न पक्षाचे लोक, शिवाय विधवा विवाह प्रतिबंधक लोक या उभयतां पैकीं प्रत्येक असामीच्या कपाळीं सदरहू विधवाजन्य कोट्यावधी बालहत्या बसावयाच्या व तेणेकरून त्यांजला दारुण नरकवास सोसावा लागणार बरें!

ना०— खरेंच; पण त्यांत विशेष प्रकार एवढाच आहे कीं जे जे कोणी प्रत्यक्ष कारणभूत पुढारी असतात—अशांला

विशेष दारुण व भयंकर शिक्षा भोगाव्या लागतात. "**अनुमन्ता विशसिता निहन्ता क्रय विक्रयी संस्कर्ता चोपहर्ताच खादकाश्चेति घातकाः**" या मनूक्तीप्रमाणें एखादा प्राणी मारून खाण्यास दुसऱ्याला उपदेश किंवा संमत देणारा, प्राण्याला हनन करणारा, कापणारा, विकत देणारा व घेणारा, नेणारा, शिजविणारा व खाणारा या सर्वांचे शिरीं हिंसा दोष बसून जो प्रत्यक्ष मारणारा असतो त्याजला जशी विशेष शिक्षा असते व सांप्रत प्रत्यक्ष मनुष्य वध करणारास विशेष देहान्त शिक्षा होते तद्वत् बाललग्नास सामील असलेले भट उपाध्ये, शास्त्री पुराणिक, कलावंतीणी, तासे चौघडेवाले वाजंत्री, दक्षणा उपटे भट, स्वयंपाकी पाणके, पक्कान्नें झोडणारे व्याही पाहुणे, सोयरे धायरे, मंडप वगैरे उभारणारे मजूर, नारळाचे दोन दोन, चार चार जोड नेणारे इष्टमित्र, फुलांच्या वेण्या—माळा देणारे माळी, पुष्प व वस्त्रालंकारांनीं विभूषित केलेला मुख—मोहरा चार चौघां लोकांला दाखविण्यास उत्सुक व निर्लज्ज झालेल्या अशा करवल्या व खुद्द राजश्री यजमानाची सपत्नीक स्वारी या सर्वांच्या शिरीं या अशा बाललग्न जन्य विधवांपासून होणाऱ्या बालहत्या एकसारख्या जडत असून त्यांजला साधारण नरक प्राप्त होतो. पण वेडगळ लोकांस जमवून त्यांचीं मनें बालविवाहाकडे व विधवा विवाह प्रतिबंधाकडे वळविण्याचे कामीं जे कोणी भट उपाध्ये, शास्त्री किंवा आनरेबलासारखे दुसरे

कोणी प्रत्यक्ष पुढारी असतात त्यांजला अघोर नरकाच्या दारुण भयंकर यातना भोगाव्या लागणार.*

भट— सदर्हु सारस्वतादि जातींत ज्या कांहीं खोव्या (बाल) विधवा आहेत त्याचें लग्न करणें त्यास फक्त 'लग्न'च ह्मणावें किंवा '**पुनर्लग्न**' ह्मणावें? माझ्या मतें तें 'लग्नच,' 'पुनर्लग्न' नव्हे. कारण लग्न विधींत पाणि गृहणादि आवश्यक प्रतिज्ञा व्हावयाच्या त्या करण्यास वधू सज्ञान असली

* सती ह्मणजे स्त्रीला आपल्या मयत पतीसह चिताग्नींत जाळून टाकण्याचें निंद्य कृत्य करणाऱ्यास शिक्षा होईल असा अकबरानें कायदा केला असतां कित्येक वेडगळ देवभोळ्या लोकांनी (पुराणांत लिहिलेल्या कोटी अश्वमेध यज्ञाच्या फलप्राप्तिस्तव!) कांहीं सती घालविल्या. तेव्हां अशा निंद्य, क्रूर कृत्याला सामिल असलेले लोक ह्मणजे लांकडें आणन चिता रचणारे मजूर वगैरे; तंत्रमंत्र बोंबलून सतीचे वस्त्रालंकार व शिवाय दक्षणा उपटणारे भटजी; तूप, तेल, पिंजर, हळद, कुंकू असा सौभाग्य मसाला देणाऱ्या घेणाऱ्या व चिताग्नींत टाकणाऱ्या बाया; सती जीवंत जळत असतां तिच्या भयंकर हृदय छेदक काकळूतवाण्या किंकाळ्या ऐकूं न येण्याकरितां वाद्यांचा अति गजर करणारे तासेवाले वगैरे वाजंत्री; ३ पट ४ पट किंमत घेऊन हळदीचें पातळ देणारे व्यापारी व शिवाय 'सती स्त्रीला मरणापर्यंत पोंहचविणाऱ्या प्रत्येक असामीला एकेक पावलास सहस्र अश्वमेध पुण्य व तज्जन्य स्वर्ग मिळतो' या आशेनें जाणाऱ्या स्त्रीपुरुषांचे थवे अशा सर्वांला दंडाची व कैदेची शिक्षा झाली व शिवाय मुख्य कारस्थानी लुटारू भटजी व "भरतखंडे, दक्षिणारण्ये अमुकग्रामेच कालेच सती कर्ममहंकरिष्ये" असा संकल्प करून चितेला अग्नी लावणारा सपत्नीक यजमान बुवा यांस देशहद्दपार केलें. तर याच प्रमाणे बाललग्नाच्या शोचनीय परिणामाअन्तीं त्या बाललग्नास सामील असणारे जे भटजी उपाध्ये वगैरे त्या सर्वांला शिक्षा होणें हें न्याय्य होय.

पाहिजे; पण वधू त्यावेळीं बाल—अज्ञान असल्यामुळें तिच्या तर्फेनें ह्मणून झालेल्या प्रतिज्ञा तिच्या कडून झाल्या असें होत नाहीं. शिवाय लग्न पुरें होण्यास वधूवरांचा परस्पर शरीरसंबंध घडला पाहिजे तोहि घडलेला नसतो. तस्मात् बालपणीं लग्न ह्मणून झाललें '**लग्नच**' नव्हे असें स्पष्ट होतें.

**ना०**— असें तर खरेंच; खऱ्या व खोट्या विधवां प्रमाणें **सविवादलग्न** व **निर्विवादलग्न** असे लग्नाचे दोन भेद सांप्रत काढतां येतात. निर्विवाद ह्मणजे खरें, बिनहरकतीचें; व सविवाद ह्मणजे हरकतीचें, संशयीत; ह्मणजे अज्ञान वधूवरांच्या लग्नसमयीं परस्पर प्रतिज्ञा होणें, प्रत्यक्ष शरीर संबंध जडणें वगैरे जो विधि व्हावयाचा तो आपणच केल्यासारखा करून जे कोणी सांप्रत बालकाचें लग्न त्यांचे वडील लावितात तें सविवाद लग्न होय, ह्मणजे उघडच आहे कीं, अशीं हीं अज्ञ वधूवरें पुढें सज्ञान होऊन दुसऱ्यानें केलेली प्रतिज्ञा त्यांजला मान्य होऊन जमलें अर्थात् परस्पर शरीर संभोग घडला तर तें लग्न बिनहरकतीचें, निर्विवाद असें खरें ठरतें; पण तीं वधूवरें प्रतिज्ञेस मान्य व संभोगास योग्य होई पर्यंत मध्येंच हरकत आली अर्थांत वधू किंवा वर मयत झाला किंवा दुर्गुण, कुरूप शरीर, व रोगी प्रकृतिमुळें एक दुसऱ्याला न आवडूं लागलें तर तें मानीव लग्न खोटें ठरतें ; ह्मणजे अज्ञान वधूवरांचें पुढें जमलें तर तें खरें लग्न व्हावयाचें; पण संभोगास योग्य होई पर्यंत एकादा पक्ष मयत झाला किंवा

दुर्गुणी, रोगी, व्यसनी निपजला व न जमलें तर तें लग्नच नाहीं झालें असें समजावयाचें. सारांश, अशा अज्ञान वधूवरांचें सज्ञानपणीं जमेल किंवा न जमेल हें आज निश्चयानें सांगतां येत नाहीं ह्मणून त्या अज्ञ वधूवरांच्या मानीव लग्नास साविवादलग्न ही संज्ञा होय. तस्मात् अज्ञ वधूवरांचीं अशीं साविवाद झालेलीं लग्नें पुढें एखाद्या पक्षाच्या मरणामुळें निर्विवाद लग्नें न ठरलीं तर मागें जीवंत राहणाऱ्या वधूचें किंवा वराचें लग्न होणें तें पुनर्लग्न नव्हे; तर खरें निर्विवाद, पूर्ण लग्न होय. आणि ह्मणूनच सांप्रत बालविधवा मानल्या आहेत त्यांचें लग्न करणें हें पुनर्लग्न नव्हे—अशा बाल (खोट्या) विधवांच्या लग्नास पुनर्लग्न न ह्मणतां 'निर्विवाद,' 'खरें,' 'पूर्ण' लग्न ह्मणणें योग्य व सशास्त्र न्याय्य होय.

भट— स्मृति पुराणादि शास्त्र ग्रंथांत स्त्री पुनर्लग्नाचा प्रतिबंध दिसतो तेव्हां ते ग्रंथ खोटेच मानले पाहिजेत तर?

ना०— अलबत! जे ग्रंथ वेद विरुद्ध व बाह्य आहेत ते खोटेच. शास्त्र कोणत्या ग्रंथास ह्मणावें याजविषयीं लोक भ्रांतींतच आहेत. एखादा संस्कृत ग्रंथ असला ह्मणजे त्याला शास्त्र ह्मणण्याची रूढी मूर्ख अविचारी लोकांत पडलेली आहे. परस्पर विरुद्ध व असंभव्य गोष्टींचीं पुराणें; धर्म मिशानें यजमानापासून नारळ, तांदूळ, सुवर्णादि दान दक्षणा—पैसे ठकवून घेण्यासाठीं योजलेले धर्मसिंधु, निर्णयसिंधु, नारायण, अनंतादि भट्ट्या; व तद्वत् मद्यमांस सेवन व यज-

मानपत्नी, कन्या, स्नुषादि अगम्य परस्त्री गमन करण्या-बद्दलचीं योनितंत्र, लिंगतंत्र, बालाविलासतंत्र, देवीरहस्य—अशीं निंद्य पुस्तकें संस्कृत भाषेंत असल्यामुळें त्यांतील वचनें मूर्ख अविचारी लोक शास्त्राज्ञेप्रमाणें मानतात. त्यामुळें सत्य वेदोक्त धर्मांत भयंकर घोटाळा झाला आहे. आपल्या आर्यलोकांनीं वेद हेच मुख्य शास्त्र अर्थात् शिक्षणाचे ग्रंथ असल्याचें मार्गें दर्शविलें असून तें निर्विवाद व सर्व मान्यहि आहे; तर अशा सत्य सनातन वेद ह्याच शास्त्रांत स्त्री पुनर्लग्नाचा प्रतिबंध बिलकूल नाहीं एवढेंच नव्हे तर उलट (पाहिजे असल्यास) स्त्रीचा पुनर्लग्न संबंध असावा अशा अनेक उक्ति आहेत पैकीं विस्तार भयास्तव एकच देतों:—ऋग्वेद १०।१८।८

उदीर्ष्व नार्यभि जीवलोकं गतासुमेतमुप शेष एहि ।
हस्तग्राभस्य दिधिषोस्तवेदं पत्युर्जनित्वमभि संबभूथ ॥

या मंत्राचें सायणाचार्यकृत भाष्य:—"हे नारि त्वं गतासुं गतप्राणं एतं पतिं उपशेषे उपेत्य उदीर्ष्व अस्मात्पतिसमीपादुत्तिष्ठ जीवलोकमभि जीवन्तं प्राणि समूहमभिलक्ष्य एहि आगच्छ । त्वं हस्तग्राभस्य पाणि ग्राहवतः दिधिषोः पुनर्विवाहेच्छोः पत्युः एतत् जनित्वं जायात्वं अभिसंबभूव आभिमुख्येन सम्यक् प्राप्नुहि" ह्मणजे हे स्त्रिये! आपल्या पतिमरणोत्तर चारचौघां वडिलांच्या संमतीनें विषय सुखार्थ पुनर्लग्न संबंध ठेवण्याची इच्छा असली तर ती खुशाल प्राप्त करून घे.

श्री मद्दयानन्द सरस्वती स्वामीकृत सदरहू मंत्र भाष्यः- हे विधवे नारि ( एतम् ) ( गतासुम् ) गतप्राणं मृतं विवाहितं पतिं त्यक्त्वा ( अभि जीवलोकं ) जीवन्तं देवरं द्वितीयं वरं पतिं ( एहि ) प्राप्नुहि ( उपशेषे ) तस्यैवोप शेषे सन्तानोत्पादनाय वर्तस्व तत्सन्तानं ( हस्तग्राभस्य ) विवाहे सङ्गृहीतहस्तस्य पत्युः स्यात् यदि नियुक्तपत्यर्थो नियोगः "कृतस्तर्हि ( दिधिषोः ) तस्यैव संतानं भवेत् ( तवेदं ) इदमेव विधवायास्तव ( जनित्वं ) संतानं भवति । हे विधवे त्वं ( उदीर्ष्व ) विवाहित पति मरणानन्तरमिमं नियोगमिच्छ तथा ( अभि संबभूथ ) सन्तानोत्पत्तिं कृत्वा सुखसंयुक्ता भव" ह्मणजे यांत पूर्वापार संबंधानुसार विशेष पदार्थ एवढाच आहे कीं, स्त्रियेच्या विवाहित पति मरणोत्तर तिणें फक्त प्रजोत्पादनार्थ दुसऱ्या पुरुषासह लग्न संबंध ठेवावा किंवा ब्रह्मचर्यव्रतीं राहून मुलींना व प्रौढ स्त्रियांना विद्या शिकवावी. व अशा नियोजित उभय स्त्रीपुरुषांनीं प्रथम विवाहाज्ञिप्रमाणें परस्पर सुखदुःख भोगून, सेवाचाकरी करून, एक विचारानें, अन्तःकरणानें व सद्धर्मानें प्रीतिपुरस्सर वागावें.

आश्वलायन गृह्य सूत्रांतहि या मंत्राचा विनियोग विधवेच्या लग्नाकडे लाविलेला आहे व त्याचा उल्लेख इंग्लंडवासी परस्थ मोक्षमूलर याणें आपल्या वरील लेखांत प्रसिद्ध केला आहे. अस्तु. याप्रमाणें स्त्री पुनर्लग्न संबंधाची प्रतिबंधी आपल्या वेद ग्रंथांत मुळींच नाहीं. आतां या वेद ग्रंथाशिवाय ब्रा-

ह्मण व सूत्रग्रंथ ह्मणून आहेत त्यांत अनेक छंदोबद्ध वेदांतील परमार्थ, न्याय, योग, विवाह, उपनयनादि आवश्यक कर्तव्य विषय क्रमवार योजिले आहेत व या सूत्रापैकींच सदरहू विधवा विवाह प्रतिपादक आश्वलायन गृह्य सूत्र होय. हे सूत्रग्रंथ फार जुने असून त्यांत वेद विरुद्ध किंवा बाह्य विषयांची भेळ फारसी नाहीं. परंतु स्मृति, पुराणें, तंत्रें वगैरे जे श्लोकग्रंथ व नारायणभट्टी, अनंतभट्टी, धर्मसिंधु, निर्णय सिंध्वादि गद्यग्रंथ निर्माण झाले त्यापैकीं बहुतेक तर वेद धर्माचा ऱ्हास होण्याकरितां. या स्मृत्यादि ग्रंथांपैकीं कांहीं ग्रंथ वेदास अनुसरून मूळ असावे; पण पुढें स्वमत पुष्टिकरणार्थ नीच मतलबी लोकांनीं स्वकपोल कल्पित नूतन श्लोक व क्षेपकें मिसळून ते ग्रंथ दूषित केले. पूर्वीं हिंदुस्थानांत छापखाना नसल्यामुळें एखाद्या ग्रंथाच्या प्रति फारशा नसावयाच्या; शें पन्नास कोशांवर एक दुसरी प्रत कोणी श्रीमंत शोकी उपाध्याकडे असावयाची : तर अशा स्थितींतल्या ४।२ प्रति मिळवून त्यांतील एक दुसरें पत्र काढून ( पत्रें सुटींच असायाचीं ) त्याचे बदली नवीन क्षेपक युक्त श्लोकांचीं पत्रें ठेवायाचीं किंवा क्षेपक युक्त पत्रें पृथक् जोडायाचीं असा क्रम मतलबी लोक चालवींत; यामुळें ऋषिकृत स्मृति ग्रंथांत परस्पर विरुद्ध व वेद निषिद्ध विषय सांपडतात. मूळग्रंथ क्षेपक मिश्रणानें दूषित करण्याचें नीच कृत्य ३०।३२ वर्षांमागें कृष्णाजी साठे नांवाच्या एका चितपावनानें केल्याचें

उघडकीस आलें. सदरहू चितपावनानें पराशर स्मृतीच्या हस्तलिखित असलेल्या कांहीं प्रति मिळविल्या त्यापैकीं १ प्रत वे. रा. रा. बाबा पाठक उपाध्ये वस्ती मुंबई यांची होती, त्या प्रतींत त्या चितपावनानें, स्वनीचत्वा च्छादनार्थ,

कोंकणाश्चित पूर्णास्ते चितपावन संज्ञकाः । ब्राह्मणेषुच सर्वेषु यतस्ते उत्तमामताः । एतेषां वंशजाः सर्वे विज्ञेया ब्राह्मणाः खलु । माध्यंदिनाश्च देशस्था गौड द्राविड गुर्जराः । कर्णाटा तैलंगाद्यापि चितपूर्णस्य वंशजाः। अतःश्चितस्यपूर्णं यो निंद्यात्तस्य क्षयो भवेत् * " ह्मणजे चितपावन हे सर्व ब्राह्मणांत

---

* हे श्लोक वाचणारा विचारांत पडेल कीं चितपावनाचें असें निंद्यत्व तें कोणतें कीं लोकांनीं त्यांची निंदा करावी ? तर त्याचें स्पष्टीकरण मागेंच केलें आहे कीं चितपावन हे अर्वाचीन अनार्य मूळ आफ्रिकेंतील बर्बरी प्रान्तांतुन हिंदुस्थानांत येऊन मलबार किनारीं प्रथम गाबीत कोळी बनलेले व पुढें जैन बुद्धादि धर्मक्रांतीच्या गडबडींत अकरमाशी, बंदे, शूद्र वगैरे बनून हिंदु धर्मांत व लोकांत मिसळलेले होत ( जसे सांप्रत ख्रिस्ती धर्माच्या मुक्तिफौजेंतील युरोपियन, अमेरिकन लोक आपलीं म्लेंच्छ नामाभिधानें टाकून दीक्षित, अग्निहोत्री, फाटक, सहस्रबुद्धे अशीं नावें धारण करून व अंगावर भगवीं धोत्रें घेणें, नेसणें; डोकीस रामदासी वगैरे फेंटे बांधणें; अनवाणी किंवा खडावानें चालणें, शेंडी राखणें किंवा सर्व क्षौर करणें–वगैरे हिंदु रीतिभाती व पोशाक स्वीकारून ब्राह्मण, गृहस्थ, भटभिक्षुक संन्यासी बनून हिंदूंत मिसळत आहेत तद्वत् )–तर असें हें आपलें निंद्यत्व कोणी काढूं नये ह्मणून पराशर ऋषीच्या नांवानें भीति दर्शविली आहे. परंतु मूर्खांस एवढें समजत नाहीं कीं पराशरानें तर काय पण त्याच्या ब्रह्मदेवा बापानें खोटें

श्रेष्ठ असून गौड, द्राविडादि सर्व ब्राह्मण या चितपावनांचे वंशज होत, चितपावनांची निंदा करणाऱ्याचा क्षय होईल" अशा अर्थाचे कांहीं कल्पित श्लोक १२ व्या अध्यायांत ब्रह्म निरूपण प्रकरणामध्येंच घुसडले व त्या अध्यायाचे अथेति-पर्यंत अंक देखील फिरविले व जागा न उरल्यामुळें बाजूला

---

कर्म केलें तर त्याला मुखछेदनाची वगैरे शिक्षा करणाऱ्या आर्य लोकांपुढें आपलें कृत्रीम कांहीं चालणार नाहीं ! आतां दुसरें; "माध्यंदिनी, गौड, सारस्वत, गुर्जर, देशस्थ, कर्णाट असे ब्राह्मणलोक चितपावनापासून झाले आहेत' अशा प्रत्यक्ष बीजारोपणाचा दोष आपल्या आई बायकांवर अनार्य नीच चितपावनानें ठेविला आहे तो त्या लोकांला कसा सहन होत आहे कोण जाणें ! यःकश्चित् अरेतुरेच्या भाषणावरून बेअब्रूच्या फिर्यादी करून गुन्हेगाराचें पारपत्य करितात. पण अशा 'आयमाय' घेणाऱ्या चितपावनावि-रुद्ध ते कांहीं तजवीज करीत नाहींत हें लांछनास्पद होय. तरी या गोष्टीचा सदरहू जातींतील जज्य, वकील, ब्यारिष्टर, प्रोफेसर, मास्तर, एन्जीनीअर व अन्य कारभारी; शेटसाहुकार, वतनदार, धर्माधिकारी गुरुमहाराज अशा समंजस लोकांनीं विचार करून सदरहू निंद्य बनावट लेख सरकारमार्फत वगैरे नाहींसे करण्यावि-षयीं निदान प्रयत्न तरी चालवून आपला मनुष्यपणा दाखवावा हें त्यांस भूषणास्पद होय. असतु; असे हे श्लोक घुसवितेवेळीं स्मृतींत वंश इतिहास असतो कीं काय? पराशराच्या वेळीं चितपावन जात होती कीं काय ? गौड, गुर्जर, देशस्थ असे ब्राह्मण–पोटभेद स्मृतींत असावयाचे काय ? चितपावनापूर्वी कोणी ब्राह्मण होते कीं नाहीं ? पुराणांतील ब्रह्मदेवाच्या तोंडापासून मुळ ब्राह्मण निघाले ते हे चि-तपावन असें ह्मणून घेण्यास अन्य मान्य प्राचीन ग्रंथांत प्रमाण

कांहीं श्लोक चरण लिहून त्याप्रमाणे श्रीधर शिवलाल मारवाडी यांजकडून ज्ञानसागर छापखान्यांत हजारो प्रति छापल्या व नंतर ती मूळ लेखी प्रत गपचूप परत केली. कांहीं दिवसांनी चितपावनाचें तें नीच कृत्य पाठकांच्या दृष्टीस येऊन फिर्यादी पर्यंत प्रकरण माजलें. पण मध्यस्थीनें तें मिटलें. तात्पर्य अशा क्षेपकांनीं जुने ग्रंथ दूषित झाले आहेत व या विषयीं विशेष सप्रमाण विवेचन ' अहिंसा धर्मप्रकाश' ग्रंथांत केलेलें आहे. दुसरें; स्मृतिग्रंथाच्या नांवावरूनच पूर्वीं जें कांहीं ( बरें वाईट ) होतें त्याची स्मृति ह्मणजे आठवण करून लिहिलेले ' ग्रंथ ' हें स्पष्ट होतें. कारण स्मृति व्हावयाची ती पूर्व विषयाचीच. पूर्वीं कांहीं घडलेंच नाहीं तर स्मृति कशाची ? ह्मणजे पुत्र किंवा कन्येच्या अभावीं नातवाचा संभव कसा ? एक स्मृति भाष्यकर्ता ह्मणतो:—

" पूर्व विज्ञान विषयं विज्ञानं स्मृतिरुच्यते । पूर्व ज्ञानाद्विनातस्याः प्रामाण्यं नावधार्यते । मन्वादीनामपि यदि प्रथमं किञ्चि-

---

नाहीं तें नाहीं पण उलट त्यांच्या निंद्य अनार्यत्वाबद्दल स्कंधपुराणादि ग्रंथांत लेख आहेत याचा लंबकर्णांनीं कांहीं तरी विचार करावयाचा होता! पण ते मतलबांध कोठून करतील ! सरासरी श्लोक घुसविले; तेहि ध्यानमार्ग प्रकरणांत—मध्येंच ! सारांश आपली लुच्चेगिरी कोणास समजणार नाहीं, असें खासे मानीत होते परंतु फसले गेले. आणि या जगांत असा एक चमत्कार आहे कीं, लबाड लोक जो कांहीं खोटा व्यूह रचतात त्यामध्यें त्याचें खरें स्वरूप दृष्टीस पडण्याला कांहींना कांहीं तरी छिद्र रहातें.

तं प्रमाणं संभाव्यते ततः स्मरणं भवेन्नान्यथा । कस्मात् पुनः पुत्रं दुहितरं चाधिक्रम्य वंध्या दौहित्रोदाहरणं कृतं । स्थान तुल्यत्वात् पुत्र स्थानीयं हि मन्वादेः पूर्वं विज्ञानं । दौहित्र स्थानीयं स्मरणं । अतश्च यथा दुहितरभावं परामृश्य दौहित्र स्मृतिं भ्रान्ति मन्यंते तथा मन्वादिभिः प्रत्यक्षाद्यसंभव परामर्शादृष्टकादि स्मरणं मिथ्येति मंतव्यम् "

अर्थ वर स्पष्ट केलाच आहे. विशेष एवढाच आहे कीं, मन्वादिकाचें मुळचें ज्ञान पुत्राप्रमाणे व त्या ज्ञानाची स्मृति नातवाप्रमाणें होय. ज्याप्रमाणें मुलांच्या अभावीं नातवाची उत्पत्ति अविश्वासनीय—खोटी; तद्वत् मन्वादिकाला मुळच्या प्रामाण्य ज्ञान विषयाचा अभाव होता अर्थात् कांहीं साधन नव्हतें असें मानलें तर त्याच्या स्मृति असंभव्य खोट्या व अविश्वासनीय होत. तात्पर्य पूर्वींच्या मूळ वेद विषयास अनुसरून किंवा विरुद्ध जे पूर्व विषय—गोष्टी त्यांची जी आठवण तिला स्मृति ही संज्ञा होय. आतां वेदविरुद्ध पूर्व विषय स्मृतींत नसावयाचे ह्मटले तर ' वेद विहित धर्म स्मरून त्या धर्माचें विशेष स्पष्टीकरण करून सोईस अनुकूल, हितकारक असे प्रबन्ध ह्म० नियम लिहून ठेवलेले ग्रंथ' अशी स्मृति व्याख्या होणार. कसाहि प्रकार असो : असे हे स्मृति—आठवणीने लिहिलेले व कल्पित निंद्य क्षेपकांनीं दूषित केलेले जे स्मृति ग्रंथ ते स्वतः सिद्ध प्रामाण्य नाहींत.* तस्मात् त्यांतील वेदार्थास अनुसर-

*असे हे स्मृति ह्मणजे पूर्वींच्या बऱ्या वाईट गोष्टीचे आठवणीने लिहिलेले व शिवाय कल्पित क्षेपकः मिश्रणानें दूषित केलेले असे

णाराच विषय ग्राह्य होय. व त्याचप्रमाणें पुराणादि अन्य श्लोक ग्रंथ ग्राह्या ग्राह्य होत. व बाकी धर्मसिंधु, निर्णयसिंधु व नारायणादिकांच्या भट्टया, योनि-लिंगतंत्रादि तरुणी विलास तंत्रें, शूद्र कमलाकर वगैरे आधुनीक पुस्तकें 'कुराण बाय-

---

ग्रंथ असल्यामुळें " श्रुति स्मृति विरोधेतु श्रुतिरेव गरीयसी । धर्म जिज्ञासमानानां प्रमाणं परमं श्रुतिः " ह्य० मन्वादि स्मृतींतील वेद विरुद्ध विषय अप्रमाण–अग्राह्य होत; तस्मात् धर्म वेत्त्यांनीं मूळ वेदाच प्रमाणें वर्तावें असा सिद्धांत–निर्णय पूर्वीच्या धर्म विवेचकांनी लोक भ्रम निरसनार्थ केला आहे. शोधक युरोपियनांच्याहि दृष्टोत्पत्तीस " सदर्हू स्मृत्यादि श्लोक–ग्रंथ क्षेपकांनीं वगैरे दूषित झाल्याचें " आलें आहे. पैकीं एक कोलब्रूक ह्मणतो—

I don't mean to say that forgeries are not sometimes committed; or that books are not counterfeited, in whole or in part. Sir W. Jones and Mr. Blaquiere and myself have detected interpolations. Many greater forgeries have been attempted; some have for a time succeeded and been ultimately discovered: in regard to others detection has immediately overtaken the fraudulent attempt. A conspicuous instance of systamatic fabrication by which captain Wilford was for a time deceived, has been brought to light as has been fully stated by that gentleman. But though some attempts have been abortive, others may doubtless have succeeded.

Some fabricated works, some interpolated pages, will be detected by the sagacity of critics in the progress of researches into the learning of the East; but I don't doubt that the Vedas will appear to be of this description.

भावार्थ वर दिलाच आहे. विशेष एवढाच कीं, कित्येकांच्या क्षेपकांची वगैरे लबाडी तत्काल उघडकीस आली व कित्येकांची

बलाच्या मालिकेंत हि गणनीय नाहींत, कारण, कुराण बायबलांत निदान कांहीं नीतीच्या व ज्यांत कांहीं ठकबाजी नाहीं अशा कांहीं गोष्टी आहेत; परंतु हीं सिंधु, भट्टया, तंत्रादि चोपडीं निषिद्ध व अनीतीच्या व ठकबाजीच्या मंत्र तंत्रांनीं ओतप्रोत भरलेलीं आहेत. व बायबलादिकांस वेद्य

---

छपून राहिली तीहि उघड होत चालली आहे. × फक्त वेद खेरीज करून बाकी पूर्वेकडील कांहीं ग्रंथ दुसऱ्याच्या नावाने खोटे रचलेले व कांहीं ग्रंथ, क्षेपक मिश्रित केलेले—असे आहेत असें बुद्धिमान शोधक विचारी पुरुषाच्या दृष्टीस सहज येणार आहे. सांप्रत " मनुस्मृति " ह्मणून जो ग्रंथ भाषासह १२ अध्यायांचा छापलेला आहे तो स्वतः मनूचा नसून मतलबी लोकांनीं मनूचे थोडे बहूत श्लोक घेऊन पाहिजे तसे हिंसादि अनीति दर्शक श्लोक नूतन रचून घडविलेला आहे. मनूची मूळ खरी स्मृति प्रयाग येथें छापली जात असून लोकरच प्रसिद्ध होईल. सदरहू कोल्ब्रूक, मनु व याज्ञवल्क्य या दोन स्मृतींबद्दल ह्मणतोः—

The two principal codes of Hindu Law are usually cited as Manu's and Yadnyavalkya's : but in the codes themselves those are diagolists not authors and the best commentators expressly declare that these institutes were written by other persons than Manu and Yadnyavalkya.

कीं मनु व याज्ञवल्क्य या नांवाच्या हिंदु शास्त्राच्या ज्या मुख्य दोन स्मृति मानल्या आहेत. त्या, मनु व याज्ञवल्क्य यांस संबोधून कोणी दुसऱ्यानें लिहिल्या आहेत. असें त्या स्मृतीच्या महा भाष्यकर्त्यांनीं स्पष्ट सिद्ध केलें आहे; याज्ञवल्क्य भाष्यकर्त्या विज्ञानेश्वरानें असें सिद्ध केलें आहे कीं सांप्रतची याज्ञवल्क्य स्मृति ही कोणीं दुसऱ्यानें संक्षिप्तपणें रचलेली आहे.

मानणारे जसे तत्पक्षी लोक आहेत तद्वत् अनार्य नीच कुलोत्पन्न द्रविड,चितपावनादि लोकांस किंवा त्यांच्या बीजापासून कोणी उत्पन्न झाले असल्यास तशा लोकांला हीं तल्लोक निर्मित धर्मसिंध्वादि चोपडीं वंद्य होतील; पण खरे आर्य लोक अशा निंद्य चोपड्यांला स्पर्श सुद्धां करावयाचे नाहींत.तात्पर्य असे हे स्मृत्यादि श्लोकग्रंथ, क्षेपक दूषित आहेत तरीं त्यांजमध्यें स्त्रीपुनर्विवाहाच्या विधिचा प्रसंगानुसार भिन्न भिन्न उल्लेख केलेला आहे. तत्संबंधी थोडीं प्रमाणें देतों :—

" नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ ।
पञ्च स्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते* " } मनु, नारद पराशर.

---

* भृगूनें ' संक्षिप्त ' ह्मणून केलेली जी मनुस्मृति, सांप्रत सटीक व सभाषांतर छापून प्रसिद्ध झालेली आहे, तिजमध्यें हा ' नष्टे मृते० ' श्लोकच नाहीं. अमरकोश टीका कर्ते महेश्वर भट्ट यांचे वंशजाचे घरीं ( गोमांतकीं महाशाला [ माशाळ ] गांवीं ) मनुस्मृतीचे कांहीं अध्याय पहाण्यांत आले त्यांत सदरील श्लोक आढळला व सांप्रत खरी मनुस्मृति जी छापली जात आहे त्यांतहि तो श्लोक असल्याचें समजतें व शिवाय लघुपराशर स्मृतीचा टीकाकर्ता जो माधव त्याणें विवाहासंबंधी श्लोकांची टीका करीत असतां सदरहू ' नष्टे मृते० ' हा श्लोक ' मनूचा ' ह्मणून प्रमाणार्थ घेतलेला आहे. व त्याचप्रमाणें ' नारद स्मृति ' ही मनुस्मृतीची ' संक्षिप्तमत ' ह्मणून प्रसिद्ध आहे तिजमध्यें हि सदरहू श्लोक स्वतंत्र आहे. व तद्वत् पराशर स्मृतींतहि तो श्लोक आहे. तात्पर्य सांप्रत ' मनुस्मृति ' ह्मणून जी छापलेली आहे ती मागें दर्शवि-

" स तु यद्यन्य जातीयः पतितः क्लीब एव च ।
विकर्मस्थः सगोत्रो वा दासो दीर्घामयोपि वा ।
ऊढापि देया सान्यस्मै सप्रावरण भूषणा " कात्यायन.
" कुलशील विहीनस्य षंढादि पतितस्य च ।
अपस्मारि विधर्मस्य रोगिणां वेषधारिणां ।
दत्तामपि हरेत्कन्यां सगोत्रोढां तथैव च " वसिष्ठ.
" या पत्या वा परित्यक्ता विधवा स्वेच्छयापि वा ।
उत्पादयेत् पुनर्भूत्वा स पौनर्भव उच्यते " ब्रह्मपु०.
"अक्षताच क्षता चैव पुनर्भूः संस्कृता पुनः" याज्ञवल्क्य.
" वरयित्वा तु यः कश्चित् प्रणश्येत्पुरुषो यदा ।
ऋत्वागमां स्त्रीनतीत्य कन्याऽन्यं वरयेद्वरम् " कात्यायन.
" उद्वाहितापि सा कन्या न चेत्संप्राप्त मैथुना ।
पुनः संस्कार मर्हत यथाकन्या तथैव सा " नारद.

या सर्व संस्कृत वचनांचा भावार्थ असा आहे कीं, शास्त्र नियोजित वधूवरांचा पाणिग्रहणादि प्रतिज्ञा संस्कार झाला असून

---

त्याप्रमाणें क्षेपक. दूषित आहे एवढेंच नव्हे तर ती अपूर्ण आहे म्हणजे त्यांत खुद्द मनूचे न्याय नीति व सद्धर्म दर्शक असे अनेक श्लोक गाळलेले आहेत. सांप्रत छापलेल्या 'मनु' नांवाच्या स्मृतींत एकंदर २६८५ श्लोक आहेत. परंतु भृगुस्मृतींत मनुस्मृतीची एकंदर श्लोक संख्या चार हजार (४०००) असल्याचें लिहिलें आहे. या सर्व गोष्टीवरून सांप्रतची मनुस्मृति अपुरी व नूतन श्लोक व क्षेपक मिश्रित खोटी बनावट आहे हें स्पष्ट होतें. तस्मात् ती स्मृति 'स्वतः प्रामाण्य सिद्ध' नाहीं.

शरीर संबंध जडतां किंवा न जडतां एकाएकीं वर मयत झाला तर त्या स्त्रीचा पुनः पूर्ववत् लग्न संस्कार करावा. व त्याचप्रमाणें पति हा नपुंसक, पतित–ज्ञाति बाह्य, धर्मभ्रष्ट, सगोत्री, दीर्घरोगी, अपस्मारी, कुलहीन, वेषधारी, गोसावी, किंवा नाहींसा अथवा मृत झाला तर त्याच्या पत्नीनें पुनः लग्नसंबंध ठेवावा; व तो पुरुष नष्ट झाल्यापासून तीन ऋतुकाळ गेल्यानंतर असावा असें कात्यायनाचें विशेष मत आहे.

आतां सदरहू स्मृति ग्रंथांतील स्त्रीपुनर्लग्न निषेधक वचनांचा विचार करूं. 'दत्ता कन्या न दीयते' (दिलेली कन्या पुनः देतां येत नाहीं) 'सकृत्कन्या प्रदीयते' (कन्या एकचवेळ देतां येते) 'नैका द्वौ पती विन्दते' एकीनें दोन नवरे करूं नये ) 'न तु नामापि गृह्णीयात् पत्यौ प्रेते परस्य तु' (पति मरणोत्तर अन्य पुरुषाचें नांव सुद्धां घेऊं नये ) एवढें कायतें भांडवल निषेधपक्षीं आहे. बरें हा जो निषेध, वेद व सृष्टि धर्मविरुद्ध आढळतो तो सदरील स्त्री पुनर्लग्न निषेधक सारस्वत, पळसे, वाणी, कऱ्हाडे, चितपावन अशा अमुकच जातीला लागू आहे असा त्यांत कांहीं उल्लेख नाहीं. सर्व जातीस लागू ह्मणावा तर भंडारी, मराठे, कुणबी, माळी वगैरे अनेक जाती त्या निषेधा विरुद्ध स्त्री पुनर्लग्न करितात. आतां तो निषेध ब्राह्मणांत गणणाऱ्या लोकांनीं लागू करून घेतला आहे ह्मणावें, तर दक्षिणेंतील नंबूरी, हुसनी वगैरे व उत्तरेकडील घोगारी, हालाई, कच्छी व कांहीं सारस्वत असे

ब्राह्मणांत गणणारे पुष्कळ लोक आहेत ते स्त्री पुनर्लग्न प्रशस्त करितात व ते कुणबी, वाणी व लवाणे क्षत्रियांचे भट उपाध्ये आहेत. स्त्री पुनर्लग्न करणाऱ्या सारस्वतांचा वंश क्षीण होऊन गेल्यामुळें ते पुनर्लग्न करणाऱ्यामध्यें येऊं पहातात; व तेहि अशा करारानें कीं आपली मुलगी विधवा झाली तर तिचा परत विवाह करावा! तात्पर्य 'स्त्री पुनर्लग्न-निषेध' ही एकपक्षी थोड्या लोकांची रूढि होय. स्मृतीशीं त्यांचा कांहीं संबंध नाहीं. असो, सदरहू 'दत्ता कन्या न दीयते' इत्यादि जीं निषेधक वाक्यें आहेत तीं सदरील 'सारस्वतादि जातीसच' लागू आहेत असें अध्याहारीत मानण्यापेक्षां तीं निषेधक वचनें—'सा चेदक्षतयोनी' 'न संप्राप्तमैथुना' (शरीर संभोग न घडलेली) 'नष्टे मृते०', (पति भ्रष्ट नष्ट, मृत वगैरे झालेली)—"अशी स्त्री असली तर पुनर्लग्न संस्कार करावा" अशा साधक वचनांला अपवादक आहेत असें अध्याहारीत मानण्याचें व त्याचप्रमाणें 'नैकाद्वौपती' याचा सम्यगर्थ एका समयींच अर्थात एक पति जीवंत असतां अन्य करूं नये पण मरणोत्तर करावा, असें विशेष संभवनीय, न्याय्य व तर्कसिद्ध वेदार्थाला अनुसरणारें आहे. वेदाज्ञेप्रमाणें रजोदर्शनानंतर सज्ञानपणीं कन्येचें लग्न दीडीपासून दुपटीच्या मानाच्या वराशीं झालें तर बहुधा पुनः सदरहू स्मृत्युक्त आपात्ति होण्याचा संभव नाहीं होत. व लौकर संतानोत्पत्ति — दुर्बल, क्षीण, रोगी, अल्पायुषी होते; या

कारणामुळें ' सकृत्कन्या० ' 'दत्ताकन्या० ' या विधी वाक्यानें पुनर्दानाचा निषेध केला आहे व तोहि पति जीवन्त असे प-र्यंत. दुसरें असें आहे कीं, सदरहू ' दत्ता कन्या न दीयते ' वगैरे जीं वचनें आहेत तीं उत्सर्ग अर्थात् सामान्य विषयक होत व पूर्वोक्त ' सा चेदक्षतयोनी ' इत्यादि वचनें त्याच्या अपवाद विषयक विशेष होत; अर्थात कन्येचें एकवेळ दान होतें हें सामान्य होय. परंतु ती कन्या 'अक्षतयोनी ' अशी अ-सली किंवा वर भ्रष्ट, कुलहीन, षंढ वगैरे असला तर तिचें पुनर्दान होऊं शकतें हें विशेष होय, याजवरून क्षतयोनी (श-रीर संभोग प्राप्त ) स्त्री एकवेळ दानार्ह होय. तात्पर्य स्त्रीचा एक वेळ विवाह होणें हें प्रशस्त, सनातन धर्म प्रतिपादित होय. परंतु आपत्समयीं अर्थात नवरा अकालीं मृत झाला, किंवा कुल-हीन, भ्रष्ट, सगोत्री, महारोगी वगैरे झाला तर [मर्जी असल्यास] तिणे पुनर्लग्न संबंध ठेवावा. सारांश वेदानुसार वर्तावें; वेदव्य-तिरिक्त ग्रंथ किंवा व्यासाच्या वगैरे नांवांचीं वाक्यें प्रमाणार्ह मानूं नयेत. मतलबी लोक हवीं तीं वाक्यें रचतात; याचें एक ताजें उदाहरण दृग्गोचर झालें तें हें कीं, सारस्वतादि ' ब्राह्मण जातीला ' नीच मानावें अशा अर्थाचीं वाक्यें मुंबईवासी एका कृष्णासाठे चितपावनाने पराशराच्या नांवावर जशीं (वर दर्शविल्याप्रमाणें) घडविलीं आहेत तद्वत् इंदूर वासी हरि सास्त्री चितपावनानें व्यासाच्या नांवावर " वर्धको नापि-तोगोप आशय: कुंभकारका:। वणिक् किरात कायस्थ मालाकार

कुटुंबिनः । एतेंत्यजाःसमाख्याता ये चान्ये च गवाशनाः। एषां संस्पर्शनात्स्नानं दर्शनादर्क वीक्षणं" या प्रमाणें सोनार, तांबट, लोहार, कायस्थ, परभु, वाणी, गौळी, माळी, क्षत्री न्हावी अशा 'इतर जातीला' हि माहाराप्रमाणें नीच मानून स्पर्शाअंतीं स्नान व दर्शनाअंतीं सूर्यावलोकन करावें अशा अर्थाचीं वाक्यें घडविलीं आहेत. तस्मात् सदरहू सोनार, परभू वगैरे जातींतील कुलीन श्रीमंत गृहस्थांनीं 'सदरहू चितपावनानें आपल्या जातीला व्यर्थ काळिमा लाविली आहे त्याचा विचार करून तत्संबंधी कांहीं बंदोबस्त करणें हें त्याच्या मानवीपणाला भूषणास्पद होय; अस्तु; चितपावन हे स्वतः मूळ बर्बरस्थ अनार्य होत. तेव्हां ते आपल्या पंक्तीला आर्य लोकांला मिळवूं पहात आहेत ! यांत कांहींनवल नाहीं.

श्रोता—प्रथम बाललग्न सुरू झालें व त्याचा परिणाम जेव्हां एकेका अर्भक मुलीचीं दोन दोन, तीन तीन लग्ने केवळ अज्ञानावस्थेंत होऊं लागलीं तेव्हां कांहीं विचारी पुरूषांनीं 'सकृत्कन्या प्रदीयते' ह्मणजे कन्या एक वेळच दिली जाते' अशा अर्थाचीं वाक्यें रचलीं असें कित्येकांचें ह्मणणें आहे तें खरें दिसतें. कारण मुलगी अर्भक असली ह्मणजे 'मंगलाष्टक ध्वनी, होमाग्नी, वेश्यागान, भोजनपंक्ती' वगैरे त्यांच्या लग्नाचा ह्मणून जो समारंभ होतो तो त्यांजला तमाशा—खेळसा वाटतो व कांहीं वेळानें त्यांजला त्या बद्दल स्मृति सुद्धां रहात नसते. अशा स्थितींत बुभुक्षित लोभी लोक

द्रव्य घेऊन अर्भक मुली बहिणींचीं दोन दोन, तीन तीन लग्नें लावितात. पित्रे नांवाच्या एका कऱ्हाड्यानें अशाच प्र-प्रकारें एका अर्भक पोरीचीं प्रथम गोमान्तक प्रान्तीं पेडणें गावीं एक व नंतर वेंगुर्लें गावीं एक अशीं दोन लग्नें लावि-लीं व त्याजबद्दल वेंगुर्लें मुनसिफ कोर्टांत दावाही झाला. तात्पर्य असे प्रकार घडूं नये ह्मणून सदरहू वाक्य. रचलें आहे. कीं जेणे करून योग्य ( सज्ञान ) कालीं लग्न संबंध लोकांनीं ठेवावा. ह्मणजे विशेष आपत्ति विपत्ति प्राप्त नाहीं होत.

ना०—अकाल लग्न बंधन व तज्जन्य वैधव्यादि जे जुलूम बिचाऱ्या स्त्री जातीवर होत आहेत व तेणेंकरून गर्भपात व बालहत्या होतात हें जर सर्व लार्ड बेंटिंग सार-ख्या हिंदुस्थानांतील इंग्लिश सरकारच्या मुख्य राज्यकार-स्थानीं कामदाराच्या दृष्टीस पूर्वी आणलें असतें तर त्या विषयीं कांहीं बंदोबस्त झाला असता. सती घालविण्याची अर्थात् पति मरणोत्तर विधवे स्त्रीला पति प्रेतासह जीवन्त जाळून टाकण्याची अत्यंत भयंकर क्रूर चाल या हिंदुस्था-नांत ५०।६९ वर्षां मागें चालू होती ती बंद करून टाक-ण्याचा विचार सरकारानें जेव्हां प्रदर्शित केला, तेव्हां या अनार्य आनरेबला सारखे – ' जीवन्त विधवा जाळण्याच्या चालीला ' धर्म मानणारे बरेच लोक होते. त्यांणीं सती जाण्याची चाल बंद करूं नये ह्मणून आपल्या हाडाचीं कार्डे केलीं. आपल्या पक्षास ( सदरहू माधवबागेंतील बालविवाहानु-

कूल जमविलेल्या गुजराथी गोळागुळा प्रमाणें ) लाखो वेड-गळ लोक गोळा करून सती बंद न करण्या विषयीं सरकारास अर्ज करविले परंतु त्या मूर्ख लोकांच्या ( मेजारिटी ) अधिक पक्षाकडे लक्ष न देतां सती बंद होऊं इच्छिणाऱ्या ९१६ ज्ञात्या, विचारी, सज्जन, दयाळू व सद्धर्म वेत्त्या परोपकारी गृहस्थांच्या ह्मणण्याचा, सदरहू मोक्ष मूलरनें आपल्या पत्रांत लिहिल्या अन्वयें दूर वर विचार करून सतीची शास्त्र निषिद्ध, दुष्ट, भयंकर चाल दयाळू न्यायशील लार्ड विल्यम बेन्टिक, गव्हर्नर जनरल यांनीं बंद करून टाकली. याच प्रमाणें जर सांप्रत राज्य कारस्थानीं पुरुषांनीं बाल लग्न बंधन व तज्जन्य बाल वैधव्यादि दुःसह जुलूम सारस्वतादि कांहीं लोकांत होत आहेत त्यांच्या बंधनार्थ कांहीं उपाय योजिले तर होण्या सारखे आहेत. पण हें यश घेण्याचें ज्याचे नशीबीं असेल त्यालाच बुद्धि सुचणार! असा यशस्वी पुरुष कोण केव्हां निपजेल तो सुदिन.

**भट**— कायहो आनरेबल ! लार्ड बेंटिक याणें दुष्ट निंद्य सतीची चाल बंद करण्या बद्दल पहिल्यानें जेव्हां चळवळ केली तेव्हां तुमची स्वारी असती तर तुह्मीं त्या विरुद्ध असेंच गुजराथी गोळागुळ जमविलें असतें ना ? ( आन० स्तब्ध. )

**गुजराथी**— अशा हिंसेच्या कामीं आह्मीं तर मुळींच जमलों नसतों व असे हे चितपावन अनार्य असून धर्म भ्रष्ट, यज्ञ निमित्तानें बोकडास **श्वासावरोधनेकरून ( मांस बेचव होऊं नये ह्मणून )** मारून खाण्याचें नीच कर्म करणारे असल्या बद्दल

समजलें असतें तर त्यांच्या वाट्यास सुद्धां आह्मी राहिलों नसतों. सती ही 'क्षणिक हिंसा' परन्तु बाल लग्न व तज्जन्य बाल वैधव्य व केश वपनादि दुःखें, वर्ष ६ महिन्यांपासून ८।१० वर्षांच्या अर्भकांचीं लग्न बंधनें करून त्यांजवर लादणें व प्रसंगवशात् अर्भक पति मृत झाल्यावर त्या अर्भक पोरीला कामानलानें वगैरे आमरणान्त जळत ठेवणें ही 'चिरकाल हिंसा' होय. उघडच आहे कीं 'सती' गेल्यानें घटिके अर्ध घटिकेंतच जळून जाऊन तेवढी घटिका अर्ध घटिका काय तें दुःख होतें. पण अशा बाल विधवा असल्यानें वर्षांचीं वर्षं कामानलाचें वगैरे दुःख भोगीत राहिलें पाहिजे. तात्पर्य अशा नीच हिंसा कर्माला आमचें मन नाहीं धजावणार.

**विधवा**– ज्या साहेबानें 'सतीची' चाल बंद केली ह्मणतात तो मूर्ख शिरोमणी होता. सती सुरू असती तर एकदम मरून तरी आह्मी दुःसह दुःखांतून एकदाच्या सुटलों असतों.

**श्रोता**–असें कां बरें? बाई! सतीच्या बंदी मुळें तर तुह्मी जिवंत राहून आज आमच्या दृष्टीस पडतां. त्याजबद्दल त्यांचे उपकार मानणें योग्य होय. मग कां बरें नाहीं मानीत?

**विधवा**–आह्मांला मरण्याचें बंद करून आमचें जें आयुष्य वर्धन केलें त्याजबद्दल त्या साहेबाचे उपकार तर खरेच. पण हें आयुष्य वर्धन कशा करितां? तर बालपणापासून केव्हां केव्हां पुरीं ९९ वर्षं वैधव्यादि दुःसह दुःखें भोगण्याकरितां बरें! मृत पति सह एकदम मरून गेलों असतों तर फार

चांगलें होतें. पण विषयादि व्यतिरिक्त वैधव्य दुःखें व केश वपनादि हाल विपष्टा हीं वर्षानुवर्षे नाहीं सोसवत. पहा, माझें लग्न ह्मणून ५ वे वर्षी केलें. त्यावेळीं नवऱ्याचें तोंड कसलें काळें, गोरें तें माहीत नाहीं बरें! लग्न संबंधानें मोठ्या दबा-ज्यानें जो मोठा समारंभ (गाणें, बजावणें, नृत्य, गीत, व्याह्या' पाहुण्यांदिकांनीं केलेली पंच पक्वान्नांची झोडाझोड, करवल्या, वऱ्हाड्यांच्या पोशाखाचे वगैरे नखरे व डामडौल) झाला त्याचें मुळीं स्मरणच नाहीं. मग नवरा बिचारा यःकश्चित् पाणिगृहण, होम विधि वगैरे करितांना घटिका अर्ध घटिका कोठें नजरेस पडावयाचा—तो मोठा असला तर लाजत व अर्भक असला तर खेळत असा; व 'मी' बायको ह्मणून जवळ बसलेली ४।५ वर्षांची पोरी—नेसण्याची किंवा मल मूत्र विसर्जनाचीहि लाज नसावयाची अशा स्थि-तींतली— त्या मला नवऱ्याची कसची आठवण व ओळख राहणार! तात्पर्य मेल्या नवऱ्याचें तोंड कसलें काळें गोरें तें न पहातां त्याच्या मृत्यु नंतर आह्मा स्त्रीयांला त्याच्या नांवानें विधवा मानून सृष्टि संबंधी आवश्यक गोष्टींची बंदी व तज्जन्य अनेक शारीरिक व मानसिक दुःखें विनाकारण चिरकाळ भोगावीं लागतात त्याजबद्दल प्रथम विचार करून नंतर सती बंद करावयाची होती. कोणी तशांच दयाळू राजपुरुषानें आज 'सती' सुरू केली तर थोडेंसें जळण्याचें दुःख सहन करून मरून तरी जाऊं व चिरकाल दुःखा-

पासून एकदाच्या सुटूं. नवरा मरून जरी कांहीं वर्षे लोटलीं तरी आमच्या ' दयाळू ! ' भटजी उपाध्यांनीं आमची सोई करून ठेविली आहे ती अशी कीं ' पति प्रेत ( कांहीं कारणामुळें ह्मणजे अन्य गांवीं मृत्यु झाला, स्त्री रजस्वला असली, गरोदर असून बाळंत होण्याला मुदत असली, पतीचा सुमारें तीस वर्षें पत्ता नसला, किंवा तो एकाएकीं अग्नींत सांपडून भस्म झाल्यास) प्रत्यक्ष नसलें तर त्याचें पागोटें, अंगरखा, वगैरे वस्त्र प्रावरण किंवा पायांतील चर्मी जोडा, वाहाणा वगैरे असतील त्या उराशीं धरून सती गेल्यानें विशेष सुखप्राप्ति उभय नवऱ्या बायकोला मिळते. ह्मणजे " सती स्त्री 'अरुंधती' तुल्य मृत पती सह स्वर्गीं वास करिते" किती वर्षे ह्मणाल तर ' प्रत्येक मानवी शरीरावर ३॥ कोटी केश असतात तेव्हां तेवढीं साडे तीन कोटी वर्षें ती स्वर्गीं वास करिते. ' एका ठिकाणीं तर असें आहे कीं ' ती सती ' मातृ व पितृ पक्षांच्या पूर्वजांला पावन करून ' १४ इंद्र ' राज्य करी पर्यंत जसा गारुडी बिळांतून सर्पाला खेंचतो तद्वत् पतीला नरकांतुन बाहेर काढून व ब्रह्म हत्या, स्त्री हत्या अशा पापापासूनहि मुक्त करून त्या सह स्वर्ग भोग भोगते "–असा हा सुख लाभ भटजींनीं दिलेला आह्मी कां बरें टाकावा ? सुमारें ६० वर्षां मागें कोणी विश्वेश्वर छत्रे नांवाचा मिश्र चितपावन मुंबईंत मयत झाला ते समयीं त्याच्या पत्नीनें सती जाण्याची तयारी केली; परंतु मुंबई ही त्या वेळीं न्यायी दयाळू इंग्लिश अमला-

खालीं असल्या मुळें तिला 'सती' जातां येईना. तिनें नवऱ्याचें प्रेत १।२ दिवस ठेवून 'धर्माची' वगैरें कारणें लावून सरकारास अनेक अर्ज केले. परंतु हुकूम मिळेना. तेव्हां प्रेत मुंबईतल्या मुंबईतच जाळिलें व नंतर आपण मृत नवऱ्याचा अंगरखा, पागोटें व चर्मी जोडा व वाहाणा बरोबर घेऊन सर्वांगास हळद लावून व कपाळावर कुंकवाचे पट्टे ओढून घोड्यावर बसून वाद्य गजराच्या वगैरे मोठ्या थाटानें मुंबईहून निघाली ती आलीबाग नजीक हबसी प्रान्तीं गेली व तेथें चिता—सरण तयार करून त्याजवर उजव्या कुशीनें आपण प्रथम निजली व नंतर बरोबर आणलेल्या नवऱ्याच्या वाहणा व कपडे उराशीं धरले व भटजीस आपले सर्व वस्त्रालंकार व शिवाय दक्षिणा देऊन चिता पेटवून घेऊन जळून मेली" या प्रमाणें बिचारी वैधव्य व केश वपनादि चिरकाल विपष्टा व दुःखें यांपासून सुटली. तद्वत् सांप्रत 'सती' सुरू असती तर आह्मीं हि तशा दगदगींतून एकदाच्या सुटलों असतों.

बाल विधवा—खरेंच बरें; आमचीं दुःखें दुष्ट पुरुषांच्या लक्षांत नाहीं रिघत. पुराणांतील अंतरिक्षीं लटकत रहाणाऱ्या त्रिशंकू प्रमाणें ना आह्माला सुखप्रद माहेर, ना घर; 'बाल विधवा' ह्मणून अत्यंत दीनवाण्यासारखें लोकांला भीत भीत मोठ्या लज्जेनें, काळोखी तुरुंगांतील कैद्या प्रमाणें कसे तरी दिवस लोटावे. कामानलेंकरून अति व्यथा होते ती तर अपारच; बरें एवढें हि सोसलें तरी जन्माचे मेले डोक्याचे

केश, तोहि लक्ष्या न्हाण्या पुढें एकान्तीं बसून भादरून विद्रूप करून घेणें ही वरती 'दक्षिणा' द्यावी लागते ! घरा बाहेरील हवेवर पडून घटिकाभर कोणा नातलगाचे घरीं कोठें बाहेर जावें ह्मटलें, तर मनांत धस धस कीं कोणी चांडाळ, व निर्दय पुरुष आपल्याला ह्मणेल ' आली पुढें रांड, गेली आडवी बोडकी,' ' बोडक्यावर पदर टाकून पहा कशी मिरवते '. हर ! हर ! अशा नीच स्थितींत रहाण्यापेक्षां मरण बरें खरेंच.

भट—धर्मप्रमाणें विधवा वपन जर योग्य होय तर अशा वपन केलेल्या विधवांचें तोंड पहाण्यांत अपशकून, अधर्म मानणें हें पोरकट. अशा सक्षौर स्त्रीचें तोंड दृष्टीस पडणें जर अशुभ आहे तर तें दृष्टीस न पडण्या बद्दल वपन कर्त्यांनें कांहीं तरी तजवीज करणें योग्य होय. वल्लभाचार्य पंथी गुजराथी महाराजांच्या बायकांचें तोंड कोणी पाहूं नये ह्मणून त्या बायकांला कोठें बाहेर जाणें असलें तर बुरख्याच्या मेण्यांतून त्यांजला नेतात; तद्वत् या अशा 'स्त्री वपन' कर्त्या लोकांनीं कांहीं तजवीज प्रथम करून नंतर आपल्या आई सुने भावजयेस किंवा आपल्या अधिकारांतील अन्य स्त्रियांस भादरावयाच्या होत्या.

सो०—गरिबाला सामर्थ्य नाहीं तर त्यांणीं श्रीमंताचें आचरणच मुळीं करूं नये. श्रीमंताला आपल्या आई सुने भावजयेचें खुशाल वपन करून त्यांजला पालखी मेण्यांतून नाचवूं द्या; आपण तसें धर्म निषिद्ध निंद्य बाल लग्न व तज्जन्य बाल वैधव्य व केश वपनाचें कृत्य केलें नाहीं ह्मणजे झालें.

ना०—अंध परंपरेवर चालणारे लोक सांप्रत बहुत आहेत. त्यांपैकीं धर्माधर्म व न्यायान्यायाबद्दल विचार करणारेहि कांहीं आहेत. पण त्यांजला धैर्य व हिंमत नाहीं. बाल लग्न व तज्जन्य बाल वैधव्यादि होणाऱ्या जुलमाच्या निंद्यते बद्दल कांहीं विद्वान् लोक पत्रांतरीं आपलें नांव प्रसिद्ध व्हावें म्हणून शुष्क व्याख्यानें झोडतात. पण आपण तसें निंद्य कृत्य आचरितात. व त्या विरुद्ध कोणी निर्भीड पुरुषानें विचारल्यास सांगतात कीं 'आपण बोलण्या प्रमाणें वागलों नाहीं तरी आपलीं व्याख्यानें ऐकून पुढील संतति केव्हां तरी सुधरेल. एकंदम काय सुधारणा होते ? ' ठीक ! या जन्मीं भटजीस मृत मनुष्याचे नांवानें कोणी 'गाय, बिछाने, छत्र्या, जुतीं' दिल्यानें तीं अन्य जन्मीं मेलेल्यास मिळतात—अशा मतलबी भटजींच्या म्हणण्या प्रमाणें—स्वनाम प्रसिध्यर्थ योजिलेलीं हीं व्याख्यानें पुढील संततीस फलद्रूप होतील तर कोण जाणे ! व्याख्यान कर्ते जाडे विद्वान् व श्रीमंत असून त्यांच्यानें जें कृत्य होत नाहीं तें त्यांची जी भावी संतति—पुढें कोण जाणे कशी मूर्ख दरिद्री निपजेल—तिच्या हातून तें कृत्य घडणार काय ? असो. बोलण्या प्रमाणें न वागणाऱ्यास लोक निंदितात व त्यांचें बोलणें खरें असलें तरी खोटेंसें मानितात. सांप्रत जाडी विद्वान् आणि पगारदार समाज मंडळी— पुनर्विवाहोत्तेजक व बाल लग्न निषेधक अशी प्रसिद्ध आहे. त्यांपैकीं प्रौढपणीं ज्यांचेवर पुनः लग्नाची पाळी आली त्यांणीं स्वतः पुनर्लग्नेच्छु

स्त्रीशीं लग्न लावण्याचें सोडून 'नात' शोभणाऱ्या अर्भक पोरीशीं लग्न लावलें व कांहीं लावीत आहेत. याजवरून ज्या अज्ञ लोकांचीं मनें अनेक सद्विचारांचे सत्य ग्रंथ वाचून 'बाल लग्ना विरुद्ध होऊन' स्त्री पुनर्लग्नाकडे वळत होतीं त्यांचीं मनें संशयांत पडत चाललीं आहेत. व ते ह्मणतात कीं परंपरेच्या बाल लग्नांतच काय तें विशेष आहे ! तात्पर्य अशा ह्या समाज-मंडळ्या किंवा त्यांचीं व्याख्यानें समूळ नाहींशीं होतील तर बरीं. ॥ बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाऊलें ॥ या तुकारामोक्तीप्रमाणें सदरहू व्याख्यानें झोडणारे समाजवाले बोलण्या प्रमाणें वागत नसल्या मुळें निंद्य अपूज्य होत. तस्मात् त्यांच्या बोलण्याकडे तद्वत् आचरणाकडे लक्ष न देतां सत्य न्याय युक्त विचाराचें कृत्य लोकांनीं आचरावें व त्या संबंधानें वेदादि सत्य ग्रंथ स्वतः पहावे; परावलंबन बिलकूल नसावें.

भट—लग्नविषय फार लांबला. आतां चालू 'वृद्ध लग्नाचा' थोडा उल्लेख करून आपल्या स्त्री पुरुषांच्या पारमार्थिक कर्तव्य कर्माबद्दल जे सुनियम त्यांचें उद्घाटण चालूं द्या.

ना०—सारस्वतादि कांहीं जातींमध्यें बाल लग्नें सांप्रत तीन प्रकारांनीं होतात: एकांत,— उभय 'वधू वरें' अज्ञ अर्भक बालक असतात. दुसऱ्यांत,—'वधू' अज्ञ अर्भक बालक असून 'वर' सज्ञान प्रौढ असतो. तिसऱ्यांत,—'वधू' अज्ञ बालक असून 'वर' वृद्ध ह्मातारा असतो. या तिन्ही प्रकारांत वधू स्त्री ही अज्ञ बालक व शिवाय तिसऱ्या प्रकारांत आज्या समान

वृद्ध पुरुषाशीं तिचा संबंध जडत असल्यामुळें तिच्यावर अशा विजोड वृद्ध संबंधापासून दुःखें व अरिष्टें कोसळण्याचा पुरुषापेक्षां विशेष संभव असतो. पहिल्या दोन प्रकारच्या मानलेल्या लग्नाचा परिणाम अगदींच अनिष्टकारक होत नाहीं. केव्हां केव्हां चांगलाहि होत असतो. परंतु अर्भक पोरीचें ह्यातार्‍याशीं लग्न लावून देण्या पासून वधू मुलीच्या संबंधानें चांगला परिणाम बिलकूल होत नाहीं; सर्वांशीं अनिष्टकारकच परिणाम होतो. अशा विजोड वृद्ध लग्नामुळें एक तर सृष्टि नियमाप्रमाणें अज्ञान अर्भक वधू तारुण्याच्या भरांत येण्याच्या सुमारास तिचा तो लग्न समयीं साधारण वृद्ध असलेला 'वर पति' अत्यन्त वृद्ध होऊन तिला विषया संबंधी अगदींच निरुपयोगी होतो, (हें सर्वलोकानुभव सिद्ध होय) तेव्हां ती (बिचारी अनाथ वधू) भिडस्थ, सलज्ज व अप्राप्तसंधी असलीच तर, कामानल दग्ध होत्साती आमरणान्त दुःखार्णवांत पडलेलीच रहाते. परंतु बहुधा, ती कामानल तप्त अशी तरुणी आपल्या बिल्कुल निरुपयोगी गलित अशा ह्या पतीच्या हयातींतच व्यभिचारास प्रवृत्त होऊन कामानल शांत करते. व पुढें नवरा वृद्धच– मरणाजवळ ठेपलेला,–तो एकदांचा मयत झाला ह्मणजे, तिला पुनर्विवाहाची बंदी असल्यामुळें काम शांत्यर्थ अनाचारास प्रवृत्त होते. व प्रसंगीं गर्भ राहिल्यास लज्जेस्तव गर्भपात, बालहत्यादि महा पातकें करण्यास तिला भाग पडतें व अशीं हीं बालहत्यादि महा

पातकें विजोड वृद्ध लग्न प्रवर्तक व पुनर्लग्न प्रतिबंधक जे मूळ यजमान उपाध्ये त्यांचे कपाळीं बसणार हें मागें (पृष्ट १४९) उदाहरणासह स्पष्ट केलेंच आहे. एके ठिकाणीं अशा विजोड वृद्धलग्नाची पद्यरूपी निंद्यता दर्शविली आहे:—

" डोळे गेले दांतहि पडले, केशा आली जरि पांढुरता '
' तरूण समजुनी ऐशा वृद्धां, द्रव्य घेउनि मुलि देतां '
' थोड्याच दिवशीं तो मेला मग, पापि तूं सटवे तिस ह्मणतां '
' पुरूषांना परि ज्ञान तत्व हें, कां बरें लागू नच करितां '
' निष्ठुर घातकी दुष्ट कसायी, मतलबी अन्यायी कां होतां '
' पुनर्विवाहा संमति द्या हो, टाका मानींची निर्दयता '
' शोभत नाहीं तुह्मां असें हें, पापि उगिच कां तुह्मी ठरतां '
' मनुष्यजन्मीं येउनि तुह्मीं, पशुवत् कामें कां करितां '
' सत्याचा हो त्याग करूनि, असत्य पंथें कां जातां."

तात्पर्य, सदरहू सारस्वतादि कांहीं जातींतील पूर्वोक्त खऱ्या खोऱ्या विधवांला आहार, निद्रा, मैथुनादि सृष्टि संबंधी आवश्यक घडणारीं व उद्भवणारीं कृत्यें करण्याची बंदी ठेविल्यामुळें व शिवाय त्यांजवर केश वपनादि हाल विपष्टेचा जुलूम चालविल्यामुळें त्या विधवा सदरीं लिहिल्याप्रमाणें बाल हत्या, गर्भ पातादि क्रूर कर्मं आचारितात एवढेंच नव्हे तर त्या मैथुनादिकांच्या जुलमी प्रतिबंधापासून सुटका होण्याकरितां महत् प्रयत्न कारितात; त्या प्रसंगीं त्यांना एखादे समयीं एखादें मोठें साहस व अनृत कर्म करावेंहि लागतें.

कित्येक स्त्रिया सदरहू प्रतिबंधा पासून सुटण्याचा प्रयत्न करीत असतां, लोकांच्या प्राण हानीच्या, स्वतःच्या निर्लज्ज पणाच्या, क्रूरत्वाच्या व अशुद्धतेच्या वगैरे गोष्टी रचलेल्या सांप्रत पहाण्यांत येतात त्यांजला मूळ कारण स्त्रियांवरील प्रतिबंधादि अन्याय व जुलूम होय. व असा हा जुलूम दुष्ट पुरुष जाती कडून होतो; त्याचा विचार करून तो जुलूम व पक्षपात न होण्या विषयीं प्रयत्न करावा तो टाकून लहरी अविचारी कवींनीं तशा स्त्रियांची, त्यांजकडून जुलमामुळें वगैरे झालेल्या साहस कर्मा बद्दल उलट निंदारूपी खोटे श्लोक रचण्यांत आपले मगज व हस्त दूषित केले आहेत ते असे :—

> " अनृतं साहसं माया मूर्खत्व मति लोभता ।
> अशुचित्वं निर्दयत्वं स्त्रीणां दोषाः स्वभावजाः"
> " स्त्रीणां द्विगुण माहारो लज्जाचापि चतुर्गुणा ।
> साहसं षड्गुणं चैव कामश्चाष्टगुणः स्मृतः"
> " आत्म बुद्धि हितार्थाय स्त्रीबुद्धिः प्रलयं गता "

अर्थ :—खोटें, साहस कर्म, माया, मूर्खपणा, अति लोभ व अमंगलपणा हे दोष स्त्रियांला जन्मतःच जडलेले असतात. स्त्रियांला पुरुषाच्या दुप्पट भोजन, चौपट लज्जा, साहा पट साहस कर्म व आठ पट विषय–काम आहेत. स्त्रियांची बुद्धि केवळ नाशाप्रत नेणारी आहे. पुरुषाची बुद्धि हितकारक होय.

हर ! हर ! किती नीच पाजी श्लोक कर्ते हे ! त्यांच्या ह्या प्रत्येक स्त्री दोषारोपणा विरुद्ध एकेक ग्रंथ होण्यासारखा आहे, साचा एथें थोडक्यांत उल्लेख करितों. पहा सदरील साह-

सादि दोष स्त्रियांकडून तसे पुरुषांकडूनहि घडत असतात. कांहीं अविचारी स्त्रियांनीं किंवा पुरुषांनीं एखादें नीच अघोर कृत्य केलें तर सर्व पुरुष किंवा स्त्रिया अघोरकर्मी आहेत अशी कल्पना करणें हें केवढें नीचत्व ! मैथुन बंदी, केश वपनादि जुलुमा पासून सुटण्याच्या प्रयत्नांमध्यें स्त्रियांला जीं कांहीं साहस कर्में करावीं लागतात त्याच्या शतपट—दुष्ट पुरुष, कांहीं जुलूम नसतां भयंकारक खुनाचीं, विश्वास घातांचीं, घरास वगैरे आग लावायाचीं व क्षुल्लक पैशाच्या लोभानें अर्भक बालकांचे व स्त्रियांचे प्राण घेणेंचीं वगैरे साहस कर्में करीत असतात हें सांप्रतच्या राहाटी वरून दृश्य होतें. व असें जरी आहे तरी सर्वच पुरुष जात अघोर साहसी ह्मणणें जसें नीच अविचाराचें तद्वत् एखादे स्त्रीकडून पूर्वोक्त बंधन मुक्त होण्याच्या प्रयत्नीं एखादें साहस कर्म घडलें तर सर्वच स्त्रीजात 'साहसी' असें ह्मणणें नीच अविचाराचें होय. हे श्लोक रचतांना "सर्व स्त्रिया स्वभावत: साहसी असतात' अशी कोटी केल्यानें त्या कोटींत आपल्या 'आई बहिणीं बायां' चा समावेश होतो अशी कल्पना आली नसावी काय ? श्लोक कर्त्या पुरुषांच्याच आया बाया 'साहसी' होत असल्या पाहिजेत; अन्यथा त्यांणीं असे नीचार्थ दर्शक श्लोक रचले नसते. दुसरें; 'स्त्री जातीला ह्मणे पुरुषाहून ८ पट जास्त विषय कामना !' ठीक ! असा प्रकार असता तर 'पुरुष' हे वेश्या स्त्रीच्या मागें किंवा

' बैल '—गाईच्या मागें जे भटकत रहात असतात, त्याच्या उलट ह्मणजे पुरुषामागें ' स्त्रिया ' व बैला रेड्यामागें 'गाई' भटकत रहात्या. आतां स्त्रियांच्या लज्जेची हरकत कोणी पुढें आणली किंवा आणतात, तर ती हरकत पशु जातीला तर मुळींच लागू होत नाहीं हें ' चक्षुर्वै सत्यं ' होय. आतां मानवप्रविषयीं विचार केला तर कांहीं [ भिडस्थ ] पुरुषांपेक्षां कित्येक बायका शतपटीनें जास्त निर्लज्ज व निर्भीड असतात. कामवासनेचा प्रभाव व एकान्त किंवा लोक समुदाय यांच्या मानानुसार लज्जेचें कम जास्त प्रमाण उभय स्त्री पुरुषांचे अंगीं होत असतें. तात्पर्य लज्जेची इयत्ता बांधणें हें तर्क व विचार शून्य होय. तसेंच आणखीं, " स्त्रियांना ह्मणे पुरुषांपेक्षां दुप्पट आहार लागतो ! " आतां हें ह्मणणें सर्वस्वी खोटें असल्याविषयीं प्रत्येक कुटुंबांतील स्त्रीपुरुषांची स्वानुभवावरून खात्री होईलच. दळण, कांडण वगैरे मेहनत करणाऱ्या किंवा आळसी असणाऱ्या स्त्रिया असल्या तरी त्या आपल्या मेहनत कर्त्या नवऱ्या पेक्षां जास्त अन्न खात नाहींत; याचा अनुभव प्रत्येक कुटुंबांत असेलच; पण मोठमोठ्या भोजन समारंभांतहि तो विशेष दिसून येतो. गुजराथी लोकांत बायका पुरुषांला पृथक् पृथक् मेजवान्या होत असतात, त्यांत ५०० पुरुषांच्या भोजनास जेवढें अन्न लागतें तेवढेंच अन्न ७।८ शें बायकांला पुरे होऊन जातें: असे प्रत्यक्ष दाखले आहेत. तात्पर्य स्त्रियांचा आहार पुरुषांपेक्षां

अधिक असतो हें ह्मणणें सर्वथैव खोटें. आतां एखादा पुरुष रोगी, निरुद्योगी, सर्व दिवस निजून आळसांत घालविणारा असा असला आणि त्याची स्व स्त्री किंवा अन्य बायका श्रम कर्त्या असल्या, तर मात्र त्या 'नांवाच्या' पुरुषापेक्षां ती 'खरी' स्त्री अधिक अन्न सेवन करील. पण तोच नियम सर्वत्रांला सर्व स्थितींत लागू करणें हें निंद्य अविश्वासाचें कृत्य होय. तसेंच, आणखी "स्त्री जातीची बुद्धि ह्मणे प्रलय करणारी" ठीक ! हें ह्मणणें खरें असतें तर सांप्रत साध्व्या ज्ञात्या बायांनीं कुटुंबें उत्तम तऱ्हेनें चालविलेलीं दृश्य आहेत तीं नाहींशीं होतीं. स्त्रियांना बाह्य प्रापंचिक व्यवहाराचा व्याप कमी असल्यामुळें गृह्य कृत्यांत त्यांची बुद्धि विशेष हितकारक असते आणि त्यामुळेंच बहुधा कुटुंबें नांदलेलीं दिसतात. ज्या कुटुंबांत पोक्त, विचारी बायका नाहींत तें कुटुंब बैराग्याच्या मठा प्रमाणें दिसतें व तेथें झालेली संतति विरळा सद्गुणी व सुशील निपजते. दुसरें; दारूबाज, रंडीबाज, जुगारी, असे दुर्व्यसनी पुरुष असंख्य आहेत; पैकीं बहुतेकांचीं कुटुंबें असतात, तीं तर त्यांच्या साध्वी स्त्रियांच्या बुद्धिप्रभावानें उत्कृष्ट चाललेलीं आहेत. तर एथें स्त्रीबुद्धीनें प्रलय होतो किंवा उदय होतो बरें ? मैथुन बंदी, केश वपनादि नीच जुलुमापासून सुटका करून घेण्याचे प्रयत्ना मध्यें स्त्री कडून एखादें प्रलयकारक कृत्य घडलें असेल तर तोच नियम सर्व स्त्रियांला लागू करण्यास लोक कर्त्याला कसा

नीचपणा वाटला नाहीं कोण जाणे. " **आंधळ्याशी जन सारेंची आंधळे** ' या तुकारामोक्ती प्रमाणें **श्लोक कर्त्यांच्या** व तद्वत् त्या श्लोकान्वयें स्त्रियांची विचकाविचक कर्त्या हर- **दास पुराणिकांच्या आया बायांनीं** एखादें प्रलय कारक कृत्य केलें असलें पाहिजे ह्मणूनच त्यांजकडून तसे उद्गार निघाले व निघत आहेत !! अन्यथा निघते ना.

**श्रोता**— एका दुष्ट लहरी कवीनें स्त्री जातीला धन दौलती प्रमाणें निर्जीव मानून त्यांचा हवा तसा नाश व व्यय करावा अशा अर्थाचा एक श्लोक रचलेला पहाण्यांत आला तो असाः—

" आत्मानं सततं रक्षेत्, दारैरपि धनैरपि ।
पुनर्दारा पुनर्वित्तं, न शरीरं पुनः पुनः "

ह्मणजे विवाहित स्त्रीचा व पैशाचा पाहिजे तसा व्यय व नाश करून पुरुषानें आपला आत्मा व शरीर सांभाळावें. कारण धन व स्त्री पुनः मिळतील परंतु शरीर पुनः मिळणार नाहीं.

**ना०**—हा श्लोक पक्षपाती अन्यायी पुरुषानें आपल्या तर्फे रचलेला आहे. श्लोक कर्ती पक्षपाती स्त्री असती तर तिणें आपल्या तर्फे एकादा श्लोक रचला असता तो असाः—

**" आत्मानं सततं रक्षेत्, भर्त्रा वापि धनेन वा ।**
**पुनर्भर्ता पुनर्वित्तं, न शरीरं पुनः पुनः "**

ह्मणजे स्त्रीनें नवऱ्याचा व धनाचा पाहिजे तसा व्यय किंवा नाश करून आपलें शरीर सांभाळावें: कारण धन व नवरा पुनः मिळतील, परंतु शरीर पुनः मिळणार नाहीं !

श्रोता–स्त्रियांचा छळ दुष्ट पुरुषांनीं अनेक प्रकारांनीं केलेला दिसतोः–'स्त्री शूद्राणां समान धर्मः' (ह्म० स्त्री ही शूद्रवत् नीच होय ) " विधवा कबरी बंधो भर्तृ बंधाय जायते " (विधवेनें केश वेणी ठेविली तर पति नरकीं जातो) " कलौ नान्य गतिः स्त्रीणां सहानु गमनादृते " (स्त्रीनें मृतपतीसह जीवंत जळून मरणें हाच काय तो कलि युगांतील स्त्री धर्म ) "न स्त्री जारेण दुष्यति ' ' स्त्री मुखं तु सदा शुचि ' व्यभिचारादृतौ शुद्धि " (स्त्री ही जार कर्मानें दूषित होत नाहीं– स्त्री मुख तर नित्य शुद्ध– तिचा व्यभिचार हा ऋतु कालान्तीं शुद्ध होतो.)

अशा अनेक नीच व निंद्य प्रकारांनीं स्त्रियांचा छळ केला तरी अनार्य दुर्जनांची तृप्ति होईना ह्मणून होळी सारखे घाणेरे सण उत्पन्न करून त्यांना यथेच्छ अवाच्य, अशुद्ध बोलावें; निंदा करावी; इंद्रिय विशिष्टाची विचकाविचक करावी.–हें सर्व, या हिंदुस्थानांतील जे ज्ञान व विद्या संपन्न सभ्य ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य ह्मणवितात त्यांस अत्यन्त नीचत्व आणणारें, व लाजीरवाणें होय. हें जाणून ते सुधारतील अशी आशा आहे. आतां भटजीच्या सूचनेप्रमाणें परमार्थ विषय चालवूं. परमार्थाचे मुख्य दोन भाग आहेतः–एक ' ईश्वरस्मरण ' ह्मणजे निष्काम बुद्धीनें ईश्वरस्तुति व उपासना करणे व सकाम बुद्धीने प्रार्थना अर्थात सद्धर्मीं सहाय मागणें; दुसरा ' अनाथ प्राण्यांवर यथाशक्त्या दया अर्थात परोपकार करणें';–पैकीं आद्य ' ईश्वर स्मरण ' भाग अर्थात ' संध्या ' प्रथम घेऊं.

( मंत्र व तच्छद्बार्थ सहीत. )

# वेदोक्त संध्या विधि.

## ईश्वर प्रार्थना.

॥ ओ३म् ॥ विश्वानि देव सवितर्दुरितानि परा सुव ।
यद्भद्रं तन्न आसुव ॥ ( ऋग्वेद ५।८२।५ )

**अर्थः**—( ओ३म् ) हे सच्चिदानन्द अनन्त स्वरूप ! हे अनन्त सामर्थ्य युक्त परम कृपालो ! हे सर्वैश्वर्यवान् ! ( देव ) हे स्वयं प्रकाशक ! ( सवितः ) हे सकल सृष्टि उत्पादक ! ( नः ) आमचीं ( विश्वानि ) सर्व प्रकारचीं ( दुरितानि ) दुःखें व संकटें ( परासुव ) दूर अर्थात् नाहींशीं करावीं. व ( यद्भद्रं ) दुःखरहीत कल्याण अर्थात् जो सर्व सुखानन्द मोक्ष ( तन्नः ) तो आह्मांला ( आसुव ) आपल्या प्रसादानें प्राप्त होओ. **ओ३म् शान्तिः शान्तिः शान्तिः ।**

## भूमिका.*

**उद्देश :**—या जगतांत जगन्नियन्त्या परमेश्वराचें ( सकाम किंवा निष्काम असो ) ध्यान करणें हें प्रत्येक मानवाचें मुख्य कर्तव्य कर्म होय. हें ईश्वर ध्यान,—उदर निर्वाहार्थ

---

* पुस्तकांतील विषयाच्या संबंधानें प्रारंभीं उद्देश व अज्ञान व अविचार दूरी करणार्थ विशेष स्पष्टी करण व आयान्तर माहिती लिहितात त्याजला भूमिका, उपोद्घात, प्रस्तावना या संज्ञा होत.

दिवसभर धंदा उद्योग करून योग्य नियमित वेळीं, एकान्त-स्थळीं आपला आत्मा, मन व शरीर शुद्ध व शान्त करून एकाग्र चित्त लावून — नित्य करण्यासाठीं सर्वांला एकसारख सोईवार व सुगम पडावें या हेतूनें आद्य धर्म संस्थापक ज्ञात्या अनुभवी ऋषिमुनींनीं त्याची उभय ' प्रातः सायं ' संधी काळीं योजना केली आहे; ती आपल्या सत्य सनातन वेदोक्त शास्त्राप्रमाणें ब्राह्मण क्षत्रियादि सर्व वर्णांला एक सारखी अशी एकच प्रकारची असून सांप्रत तिचे भिन्न भिन्न व परस्पर विरुद्ध असे अनेक संक्षिप्त प्रकार—आधुनिक ' पुराण व तंत्र ग्रंथ विषय' मिश्रित व निंद्य क्षेपक युक्त — असे बनलेले आहेत. व शिवाय त्यांचा अर्थ काय ? हें बहुतेकांला मुळींच समजत नाहीं. या करितां आपल्या आद्य व सर्व मान्य ऋषिप्रणीत वेदोक्त संध्येचा सर्वत्रांला अर्थ सहीत लाभ घेतां यावा ह्मणून ती संध्या ( मंत्रार्थ, कठीण शद्बार्थ व विनियोगार्थ सहीत ) छापून प्रसिद्ध केलेली आहे. त्या संबंधानें वेदाची वगैरे तूर्त आवश्यक माहिती विशेष समजुती साठीं देणे कर्तव्य होय.

**वेदशास्त्र ग्रंथ :**— वेद हा शब्द ' विद—ज्ञाने' ' विद—सत्तायां' ' विद — लाभे ' 'विद—विचारणे ' असा धातूजन्य असून त्याचा प्राचीन वैदिक संस्कृतांत ' प्रापंचिक व पारमार्थिक ज्ञान सुखानंद, श्रेष्ठत्व व सद्विचार प्राप्तीचा ग्रंथ ' असा अर्थ होय. व आधुनिक लौकिक संस्कृतांत वेदाला ' शास्त्र ' (शास्—तच्छिक्षणे, सत् शिक्षण ग्रंथ) ही संज्ञा होय. ' वेद' ज्ञान

लक्षणाने एकच आहे, परंतु भिन्न भिन्न विद्या व विषयांवरून, तस्माद्यज्ञात्सर्वहुत ऋचः सामानि जज्ञिरे। छंदांᳲसि जज्ञिरेतस्मा द्यजुस्तस्मा दजायत ॥ ऋग्वेद १०।९०।९ यजुर्वेद ३१।७ ॥ यस्मादृचो अपातक्षन् यजुर्य स्मादपाकषन्। सामानि यस्य लोमान्य थर्वांगिरसोमुखम्। स्कंभं तं ब्रूहि कतमः स्विदेव सः॥ (अथर्ववेद १०।७।२३। २०)" "एवं वा अरेस्य महतो भूतस्य निःश्वसित मेतद्य दृग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्वा गिरस इ०" (शतपथ ब्राह्मण १४।५) "ऋचो यजूंषि सामानि छंदांस्याथर्वणानि च। चत्वारः सखिलाः वेदाः सरहस्याः सविस्तराः" (हरि वंश ५.) या वेद व अन्य ग्रंथोक्तीप्रमाणें ऋक्, यजुस्, साम आणि अथर्व असे चार * भाग आहेत. ४ हि वेदांस 'संहिता' (सं–

* "त्रयी वै विद्या ऋचो यजूंषि सामानि इयमेव (श० ब्रा०) तेभ्यो अभि तप्तेभ्यो त्रयो वेदाः अजायन्त ऋग्वेद एव अग्ने रजायन्त यजुर्वेदो वायोः सामवेद आदित्यात्' (ऐ० ब्रा०) 'अग्नेर्ऋचो वायोर्यजूंषि साम आदित्यात्। सएतांत्रयीं विद्यां अभ्यतप्यत' (छां० उप०) 'ऋग्यजुः साम एवच त्रयी विद्या मां सोमपाः' भारत भ० गीता) अशा कांहीं ठिकाणीं अर्वाचीन ग्रंथांत वेद तीन असल्याच्या उक्ति आहेत; पण ही योजना विशेष यज्ञ सिध्यर्थ योजिली आहे. म्हणूनच 'अग्नि वायु रविभ्यस्तु त्रयं ब्रह्म सनातनं। दुदोह यज्ञ सिध्यर्थं ऋग्यजुः सामलक्षणं' या प्रमाणें यज्ञ सिध्यर्थ तीन वेदांची गणना केली असल्याचें मनूने लिहिलें आहे. वतद्वत्च 'स च (वेदः) प्रयोग त्रयेण यज्ञ निर्वाहार्थं ऋग्यजुः साम भेदेन भिन्नः' म्हणजे भिन्न २ तीन प्रकारच्या यज्ञसिध्यर्थ योजिलेल्या पहिल्या तीन वेदाहून चवथा अथर्व हा भिन्न होय असा'प्रस्थानभेद' ग्रंथांत उल्लेख आहे.

सम्यक्, हिता– योजलेली) [गायत्र्यादि छंद युक्त व षड्जादि स्वर युक्त अशी कविता] व '**श्रुति**'(श्रु–श्रवणे = ज्याच्या योगानें ब्रह्मादिकांपासून आह्मापर्यंत सर्व लोकांस सर्व विद्या, सुविचार व सद्धर्म श्रुत होत आहेत ह्मणून ) ह्या अन्य संज्ञा आहेत. प्रत्येक वेदाची मंत्र संख्या व उच्चारण भिन्न भिन्न आहे. ऋग्वेदाचे मंत्र एकंदर १०५८९ आहेत. अमुक मंत्र अमुक ठिकाणीं आहे हें समजण्यासाठीं ऋग्वेदाचे **मंडल** व **सूक्तें** असे मुख्य दोन भाग केले आहेत. सर्व मंडलें १० व यांत सूक्तें १०१८ आहेत. (तत्सवितुर्वरेण्यं० ऋ०३।६२।१० ह्मणजे तो मंत्र, ऋग्वेद मंडल ३ रें, सूक्त ६२ वें, यांत १० वा आहे ) याचप्रमाणें यजुर्वेदाचे सर्व १९७५ मंत्र असून त्याचे ४० **अध्याय** केले आहेत. सामवेदाचे १५५६ मंत्र असून त्याचे **पूर्वार्चिक** व **उत्तरार्चिक** असे मुख्य दोन भाग करून **प्रपाठक, अर्ध, दशति** व **मंत्र** असे अनुक्रम ठेविले आहेत. अथर्वण वेदाचे ६००० मंत्र असून त्याचे **कांड, अध्याय** आणि **वर्ग** असे भाग योजलेले आहेत. कांहीं कांहीं मंत्रांचा पाठ (उदाहरणार्थ ' तत्सवितुर्वरेण्यं० ' हा गायत्री मंत्र) चारी वेदांत आहे. याचें कारण, असा मंत्र चारी वेदाच्या भिन्न भिन्न उच्चारणानें ह्मणतां व गातां यावा ' हें होय.

**वेद मंत्रोच्चारण :–** ऋग्वेदाच्या स्वरांचें उच्चारण द्रुत अर्थात् शीघ्रवृत्तींत होत असतें. दुसरी **मध्यम वृत्ति**, जीजमध्यें यजुर्वेदाच्या स्वरांचें उच्चारण ऋग्वेदाच्या मंत्रोच्चारणा-

हून दुप्पट वेळांत होतें. तिसरी विलंबित वृत्ति होय; जीच्या मध्यें पहिल्या (ऋग्वेद) वृत्तीहून ३ प्पट वेळ जास्त लागतो; जसा सामवेदाच्या उच्चारणांत आणि गाण्यांत. व या तिन्ही वृत्तीच्या मिश्रणानें अथर्व वेदाचें बहुधा उच्चारण होतें. परंतु पहिल्या ( द्रुत ) वृत्तींत अधीक उच्चारण होत असतें. उदात्त अनुदात्त व स्वरीत भेदानें साधारण मंत्रोच्चारण नियम पतंजलीनें ( अ० १ पा० २ ) लिहिले आहेत ते असे:—

" आयामो दारुण्य मणुता खस्येत्युच्चैः कराणि शब्दस्य । आयामो गात्राणां निग्रहः । दारुण्यं स्वरस्य दारुणता रूक्षता । अणुता कंठस्य । कंठस्य संवृतता । उच्चैः कराणि शब्दस्य । अन्ववसर्गो मार्दव मुरुता खस्येति नीचैः कराणि शब्दस्य । अन्ववसर्गो गात्राणां शिथिलता । मार्दवं स्वरस्य मृदुता स्निग्धता । उरुता खस्य । महत्ता कंठस्येति नीचैः कराणि शब्दस्य " ह्मणजे अंगावरोध करणें; उंच स्वराने बोलणे; कंठावरोध थोडासा करणे; हें उदात्त विधान अर्थात् ' उदात्त स्वर ' या नियमाला अनुसरून बोलावे; तद्वत् गात्रांचा ढीलपणा; उच्चाराची कोमलता; कंठाला फैलावा देणे हें अनुदात्त विधान होय; त्याप्रमाणे अनुदात्त स्वर उच्चारावे. अक्षरांवरील उभे स्वर 'उदात्त' व खालील आडवे स्वर ' अनुदात्त.'

**मंत्रांचे ऋषि, देवता, छन्द व स्वर:—** " मंत्रार्थ द्रष्टृभिर ध्यापकैस्तर्कैःकारणस्थैः प्राणैर्वा । ऋषिप्रशंसा चैव

मुच्चावचैरभिप्रायैर्ऋषीणां मंत्रदृष्टयो भवन्ति"(नि०७।३) याप्रमाणें सृष्टिप्रारंभीं वेदमंत्रावलोकनेंकरून त्यांचा अर्थ यथावत् जाणून तत्प्रतिपादित सद्धर्म प्रसार व सदुपदेश अयोनि पुरुषांनीं केला, त्यांजला ऋषि ही सत्कारार्ह पूज्य संज्ञा होय: अशा ह्या ज्या ज्या आद्य ऋषींनीं ज्या ज्या मंत्रांचा अर्थ प्रकाशीत केला, त्या त्या मंत्रांबरोबर त्या त्या आद्य ऋषींचीं नांवें स्मरणार्थ लिहितात. आतां देवता ह्मणजे देवो दानाद्वा दीपनाद्वा द्योतनाद्वा द्युस्थानो भवतीति वायो देव: सा देवता (निरुक्त ७–१४–१५) याप्रमाणें ज्या ज्या मंत्रामध्यें ज्या ज्या पदार्थांचें मुख्य (प्रधान) स्तवन, वर्णन किंवा प्रकाशन केलेलें आहे ते ते पदार्थ त्या त्या मंत्रांच्या देवता होत. ह्मणजे ज्या ज्या मंत्रांत सूर्य, भूमि, मधु, पत्नी, गौः किंवा ज्ञान प्रकाशित किंवा वर्णित असतें अर्थात् ज्या ज्या वेद मंत्रांचा जो जो मुख्यार्थ होतो त्यालाच त्यांची देवता ही संज्ञा होय; कीं ज्याच्या योगानें मंत्राभिप्राय सहज समजूं लागेल. या करितां देवताहि मंत्रांसह लिहितात. त्याच प्रमाणें उदात्तानुदात्त स्वरीत युक्त अक्षर गणणानुसार गायत्र्यादि छंद मंत्रांसह लिहितात; कीं जेणेकरून मनुष्याला छंदाचें यथावत् ज्ञान राहात जाईल. व त्याचप्रमाणें आतां गायत्री, अनुष्टुप्, त्रिष्टुप्, जगती असे जे वेदमंत्रांचे छन्द आहेत ते कोणकोणत्या स्वरांत अर्थात गायन सुरांत गायिले पाहिजेत हा विषय समजण्या करितां त्या (मंत्रा) बरोबर षड्जादि स्वरहि लिहिलेले असतात. गायत्री छन्दाचे

मंत्र 'षड्ज' गान स्वरामध्यें गाईले पाहिजेत. १ षड्ज, २ ऋषभ, ३ गान्धार, ४ मध्यम, ५ पंचम, ६ धैवत, ७ निषाद—असे सप्त मुख्य गायन स्वर आहेत; त्यामध्यें अनुक्रमें १ गायत्री, २ उष्णिक्, ३ अनुष्टुप्, ४ बृहती, ५ ब्राह्मीपंक्ति, ६ त्रिष्टुप्, ७ जगती— या छंदांचे मंत्र गाईलेले असतात. या सर्वांचीं लक्षणे व विशेष माहिती गांधर्व वेद प्रतिपादक पिंगल सूत्रांत आहे: याप्रमाणें वेद मंत्रांला ऋषि, देवता, छंद व गान स्वर जोडलेले असतात. ते फक्त स्मरणार्थ होत.*

वेद मंत्रार्थज्ञान.— जें आपण ह्मणतों, शिकतों किंवा ऐकितों त्याचें सत्य अर्थज्ञान आपल्याला झालें पाहिजे. अन्यथा 'लटपट पंची' प्रमाणें आपण पोपट—पक्षी व 'ज्ञानेन हीनः पशुभिः समानः' याप्रमाणें पशु—बैल होऊं. अर्थज्ञानावाचून सर्व धर्म क्रिया व्यर्थ होत. ऋग्वेद १०।७१।५—६। यांत असें आहे:—

"उत त्वः पश्यन्न ददर्श वाचमुत त्वः शृण्वन्न शृणो-

---

* कित्येक लोक ह्या जोडलेल्या ऋष्यादिकांपैकीं 'ऋषि, देवता व छंद' कित्येक लोक — 'ऋषि व देवता' कित्येक— फक्त 'ऋषि किंवा देवता' यांस मंत्र भाग समजून ते त्या मंत्रांबरोबर घोकून उच्चारतात. कित्येक लोक तर मंत्र पठण समयीं त्या ऋष्यादिकांचा बिलकूल उपयोग करीत नाहींत; आतां वास्तवीक पहातां प्रार्थना वगैरे करण्याच्या मंत्रासह त्या मंत्रांचा छन्द, अक्षरगणणा किंवा अर्थोपदेश कर्ता (ऋषि) यांचा उच्चार करणें हें युक्तिशून्य व वेडगळ दिसतें. असे हे ऋष्यादि—घोकलेले (स्मरणार्थ ह्मणा) मनांत त्यामनांत ठेवून फक्त मंत्रच जपावे हें सयुक्तिक होय.

त्येनाम् । उतो त्वस्मै तन्वं १ वि संस्रे जायेव पत्यं उशती सुवासाः ॥ उत त्वं सख्ये स्थिरपीत माहुर्नैनं हिन्वन्त्यपि वाजिनेषु । अधेन्वा चरति माययैष वाचं शुश्रुवाँ अफलामपुष्पाम् ॥

अर्थ :—विद्वान् व अविद्वान् यांचें लक्षण असें आहे कीं, कांहीं शिकून किंवा ऐकून जो कोणी त्याचा अर्थ किंवा संबंध समजत नाही तो मूर्ख—अविद्वान्. आणि जो मनुष्य अर्थ व संबंध जाणतो तो विद्वान् असून त्याला परमानंद रूप फल प्राप्त होतें. ज्याप्रमाणें पतिव्रता स्त्री स्वपतीलाच शरीर दाखविते तद्वत् अर्थज्ञ विद्वानालाच विद्या ही आपलें सत्य रूप प्रकाशित करीते । अर्थज्ञ विद्वान् सर्वत्र पुज्य जाणावा. विद्वान् त्यालाच ह्मणावा कीं जो अर्थ सहीत विद्या शिकून तद्वत् आचरणहि करितो. अशा पुरुषास कोणी दुःखहि देऊं शकत नाहीं; कारण त्याजमध्यें विद्या रूप सूर्य प्रकाशित असतो. तेव्हां त्याच्या दुःखरूप चोरानें त्याला दुःख देववत नाहीं. आणि जो कोणी अर्थ व अभिप्राय रहीत कांहीं बोलतो किंवा ऐकतो तो दुःखांतच राहातो; कारण विद्याहीन असल्यामुळें त्याला त्या शत्रूला जिंकण्यास शक्ति होत नाहीं. तात्पर्य अर्थज्ञान शिकल्यानें उक्त सुखानंद लाभ होतो. तसा अर्थहीन पुरुषाला होत नाहीं." आयुर्वेदीय सुश्रुतकार ह्मणतो:—

"अधिगतमप्य ध्ययन मप्रभाषित मर्थः ।
खरस्य चंदन भार इव केवलं परिश्रमकरं भवति"

कीं "पुष्कळ अध्ययन केलें,परंतु त्याचा अर्थ जर कांहीं समजत नाहीं तर 'ते अध्ययनाचे परिश्रम' गाढवाने चंदनभारा वाहाण्या प्रमाणे होत. ह्मणजे एका श्लोकांत वर्णिलें आहे:—

**"यथा खरश्चंदनभार वाही । भारस्य वेत्ता न तु चंदनस्य । एवंहि शास्त्राणि बहून्यधीत्य । चार्थेषु मूढा:खरवद्वहन्ति"**

अर्थ:— ' गाढवावर चंदनाचा भारा असतो, तेव्हां त्या गाढवाला तो भारा ' चंदन ' च आहे असा बोध होत नाहीं. तर तो भारा कांहीं तरी ' ओझें ' आहे असा बोध होतो. याचप्रकारें जो कोणी पुष्कळ शास्त्रादि शिकून त्या शास्त्रादिकांचा अर्थ समजत नाहीं तो **महा मूर्ख**—गाढवा प्रमाणें भार वाहणारा पशु होय. ' यास्कमुनीनें ह्मटलें आहे कीं, (निरुक्त )

**" यदधीतमविज्ञातं निगदेनैव शब्द्यते । अनग्नाविवशुष्केन्धो न तज्ज्वलति कर्हिचित् । "स्थाणुरयं भारहार: किलाभूत् । अधीत्य वेदं न विजानाति योऽर्थं । योऽर्थज्ञ इत्सकलं भद्रमश्नुते नाकमेति ज्ञानविधूत पाप्मा"**

ह्मणजे 'शुष्क इंधन ( जळण ) अग्नी शिवाय जसें कदापि प्रज्वलीत होत नाहीं तद्वत् अर्था शिवाय वेदाध्ययन प्रकाशित होत नाहीं । जो कोणी वेद शिकून त्याचा अर्थ समजत नाहीं तो पुरुष घराचा भार (ओझें) वाहणाऱ्या अचल खांबाप्रमाणेंच खांब होय. अर्थज्ञ पुरुष ज्ञानी होऊन पाप निर्मुक्त होत्साता सुख व कल्याणाप्रत पावतो '—तात्पर्य मानवाला अर्थज्ञानाची प्राप्ति अत्यंत आवश्यक होय. कित्येक अज्ञ,

भोळे, आळशी लोक ह्मणतात कीं, "वेद मंत्रांचा अर्थच होणें नाहीं" पण ही त्यांची मोठी चूक व अविचार होय. वेदाचा अर्थच जर कोणास समजला किंवा समजत नाहीं तर सांप्रत 'वेदधर्म' ह्मणून चालू असलेला धर्म **वेदावरूनच झाला असें ह्मणतां येणार नाहीं!** कसा तरी झालेला आहे असें ह्मणणें भाग पडणार!! असो. वेदाचा सत्य अर्थ यास्क मुनीकृत निघंटु कोश व निरुक्त व्याकरणावरून पूर्वीपासून आज पर्यंत लोक करीत आले आहेत. ह्मणूनच सायणाचार्य नामें वेद भाष्य कर्त्यानें "**तस्माद्वेदार्थाव बोधाय उपयुक्तं निरुक्तम्**" ह्मणजे वेदार्थ समजण्याला निरुक्त योग्य होय' असें ऋग्वेद भाष्य प्रस्तावनेंत लिहिलेलें आहे. व तद्वत्‌च बुक्क महिपतीच्या आज्ञेवरून माधवाचार्यानें वेदभाष्य केलें, त्याचें प्रारंभीं माधव असें ह्मणतो कीं "**ब्राह्मणं कल्पसूत्रे द्वे मीमांसा व्याकृतिं तथा। उदाहृत्याथ तैः सर्वैर्मंत्रार्थः स्पष्टमीर्यते**" ह्मणजे वेदाच्या सर्व मंत्रांचा अर्थ "ब्राह्मण, सूत्र व मीमांसानुसार केलेला आहे" व त्याच प्रमाणें प्रसिद्ध स्वामी दयानन्द सरस्वतीनें निरुक्तादि ऋषि मुनींच्या ग्रंथांवरून वेदार्थ स्पष्ट होतो असें 'चतुर्वेद भाष्यभूमिकें' त प्रतिपादन केलें आहे. तात्पर्य—पुराणादि अर्वाचीन लौकिक संस्कृताचा अर्थ जसा पाणिनीचें व्याकरण व अमरकोशावरून होतो, तद्वत् प्राचीन वैदिक संस्कृताचा अर्थ — 'निरुक्त व्याकरण, निघंटु कोश व शतपथादि ब्राह्मण ग्रंथ' यांजवरूनच होतो

हें लक्ष्यांत आणून आपण नित्य नैमित्तीक संध्यादि कर्म विधींत जे जे मंत्र ह्मणतों त्यांचा अर्थ समजून घेऊन–' अर्थशून्यत्व व तज्जन्य पशुत्वा ' चा जो आरोप आपणावर येत आहे तो घालवावा तरच आपली 'मनुष्य ' ह्मणण्याची शोभा.

**वेदाध्ययनाधिकार.** – '**ब्राह्मणोऽस्यमुखमासीद्राहु॰**' इत्यादि (प्राचीन–वेदोक्त) व "**शूद्रो ब्राह्मणतां याति ब्राह्मणश्चैव शूद्रतां**" व '**चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म विभागश:**' या ( अर्वाचीन मनूक्त व भगवद्गीतोक्त ) वचनाप्रमाणें ब्राह्मणादि चतुर्वर्ण ' गुणकर्मानुसार ' पदवी विधायक असतां, कित्येक धूर्त स्वार्थी लोकांनीं ' ब्राह्मण ' हा वंशपरंपरेचा ' जाति वाचक शब्द ' असल्याचा भ्रम भोळ्या लोकांमध्यें शिरवून ' आपणच वंशपरंपरेचे ब्राह्मण – आपणासच वेदाधिकार* व तज्जन्य श्रेष्ठपणा आहे तसा इतरांला नाहीं.

---

* सिंहलद्वीपांत दालचिनी, जायफळें वगैरे मसाल्याची लागवड ' अमुकच जातीच्या माणसानें करावी. इतरांनीं केल्यास शिक्षा होईल.' असा निर्बंध डच अमलाखालीं होता. परंतु निःपक्षपाती इंग्लिश अंमल तेथें झाला तेव्हां आतां पाहिजे त्या जातीच्या माणसानें सदरहु लागवड करण्यांत आली आहे. तर याच प्रमाणें वेदाध्ययन प्रतिबंध पूर्वींच्या ज्या पक्षपाती राज्यांत व अज्ञानपणांत चालला तीं राज्यें समूळ नाहींशीं होऊन ज्ञानोदय झाला; तेव्हां आतां निःपक्षपाती इंग्लिश राज्यांत व ज्ञानप्रकाशांत वेदाध्ययनास कोणताच प्रतिबंध नाहीं; उलट उत्तेजन मिळत आहे; तरीं सर्वत्रांनीं त्याचा लाभ घ्यावा. व मनुष्यपणा दाखवावा.

इतरांनीं घेतला तर त्यांस मोठें पाप लागेल ! ' अशी भीति व प्रवृत्ति, धर्मसिंध्वादि खोटीं पुस्तकें घडवून व शिवाय राज जुलमावरून चालू केली व ब्राह्मणाच्या सवबीनें द्रव्य प्राप्तीचा आपला मतलब साधला. व लोकांचा त्याजवर पूर्ण विश्वास बसावा ह्मणून आपल्या स्त्रियांलाहि तसा अधिकार नाहीं असा समज घालून त्याप्रमाणें प्रघात पाडला. व तेणेंकरून शेंकडा ९० असामी अज्ञान व तज्जन्य अविचार व वेडगळपणा यांहीं व्यापले आहेत. प्रत्यक्ष वेदांत ( यजु० २६ )

॥ यथेमां वाचं कल्याणी मावदानि जनेभ्यः । ब्रह्मराजन्याभ्या ँ शूद्राय चार्याय च स्वाय चारणाय ।

या प्रमाणें सर्व लोकांनीं ( स्त्री पुरुषांनीं ) अर्थात् ब्राह्मणादि चारी वर्ण व त्याहूनहि पर यांनीं वेद शिकून तदनुसार वर्तावें. असें सांगितलें आहे. व तद्वत्च आणखीं,

॥ ब्रह्मचर्येण कन्या३ युवानं विन्दते पतिम् ॥

(अथर्ववेद ११।५।१४।१८) ' इदंमन्त्रंपत्नीपठेत् ' (आ०सूत्र.)

॥ जायापती अग्निमादधीयिताम् ॥ ( ऋग्वेद ब्राह्मण )

॥ वेदं पत्न्यै प्रदाय वाचयेत् ॥ ( आश्वलायन सूत्र )

॥ नास्ति स्त्रीणां पृथग्यज्ञः ॥ ( मनुस्मृति अ० ९ )

ह्मणजे स्त्रीने अर्थात् कन्या कुमारीने युवावस्थे पर्यंत ब्रह्मचर्य वर्त्तीत राहून वेदशास्त्र ( व्याकरण, धर्म, वैद्यक, गणित, पाकादि रीति विद्या शिकून ) नंतर विद्वान् तरुण पुरुषाशीं

विवाह करावा. ' अमुक हा वेदोक्त मंत्र पत्नीनेच ह्मणावा '। ' उभय नवरा बायकोनें वेदोक्त मंत्रांनीं ईश्वराचें चिंतन, व स्तवन व ध्यान करावें । पतीनें पत्नीकडून वेद मंत्र सुस्वर वाचवावे । यज्ञ यागादि मोठीं सत्कार्यें पति सान्निध असतांच स्त्रियांनीं वेद मंत्रांनीं करावीं.' त्याच प्रमाणें आणखीं.—

॥ द्वि विधाः स्त्रियो ब्रह्मवादिन्यः सद्यो वध्वश्च । तत्र ब्रह्म वादिनीना मुपनयन मग्नीन्धनं वेदाध्ययनं स्वगृहे च भैक्ष्यचर्येति । सद्यो वधूना मुपनयनं कृत्वा विवाहः कार्यः ॥ ( हारीत स्मृति )

ह्मणजे ' स्त्रियांचे दोन प्रकार : ब्रह्मवादिनी आणि सद्योवधू. पैकीं ब्रह्मवादिनीला उपनयन, अग्निहोत्र, वेदाध्ययन, स्वगृहीं भिक्षा मागणें हीं कर्में विहित होत. ज्याप्रमाणें पुरुष आमरणान्त ब्रह्मचारी राहातात, तद्वत् स्त्रियांनीं राहावें. (जशा मागें गार्गी, वैशाली वगैरे स्त्रिया झाल्या त्यांचीं हीं कर्तव्यें.) आतां सद्योवधू ह्मणजे स्त्रीचें उपनयन अर्थात् तिला वेदाध्ययनाची व ब्रह्मचर्य व्रताची प्रथम दीक्षा देऊन ( पुरुषाला देतात तद्वत्) नंतर सज्ञानपणीं यथोक्त विवाह करावा.' तद्वत्च आणखीं " पुरुषेव तु नारीणां मौंजिबन्धन मिष्यते । अध्यापनं च वेदानां सावित्री वाचनं तथा " ( यम स्मृति ) ह्मणजे पुरुषाप्रमाणें स्त्रियांलाहि मौंजिबंधन* अर्थात् वेद पढणें, पढविणें, गायत्री मंत्र जप करणें, इत्यादि उक्त आहे.

---

* मंगलाष्टकाच्या व तासे वाजंत्राच्या गजरात असभ्य ' लं-

एणे प्रमाणें स्त्रीयांला वेदाध्ययनाधिकार असल्याचीं प्राचीन व इतर अर्वाचीन ग्रंथांचीं प्रमाणें आहेत व त्याप्रमाणें मूळ आर्यावर्तांत व इतर ठिकाणीं विवाह व अग्निहोत्र समयीं रूढी-हि आहे. तरीं ज्या लोकांत रूढि नाहीं त्यानीं चालू करून वेदोक्त परमार्थदायक संध्यादि नित्य नैमित्तिक कर्तव्य कर्में आचरावीं. व आपला महल्लाभ साधावा.

एणे प्रमाणें वेद, वेदमंत्रार्थ, वेदाधिकार यांचें तूर्त आवश्यक विवेचन झालें. आतां संध्योक्त विषयांचें स्पष्टी करण करूं.

**संध्या** :—वेद प्रतिपादित नित्य कर्तव्य कर्मांचे 'ब्रह्मयज्ञ, देवयज्ञ, पितृयज्ञ, भूतयज्ञ आणि नृयज्ञ' असे ५ प्रकार होत.

---

गोटी मारणे' व निंद्य अस्पर्श्य 'चामडें बांधणें' हेंच काय तें 'उपनयन' असें शास्त्रानभिज्ञ लोक समजतात. पण शास्त्राव-लोकनान्तीं त्यांस असें कळेल कीं, "**ब्रह्मचर्य वृत्तींत राहून वेदाध्ययन करणे**" याचेंच नांव '**उपनयन व्रत**' होय. ज्याप्र-माणें सांप्रत हरितालिकादि व्रतास समारंभाची व उत्साहाची जरूरी नाहीं तद्वत्च या स्त्री उपनयन व्रताला समारंभाची अर्थात इष्ट मित्र मेळ्याची, दक्षिणा उपटणाऱ्या भटजींची, तासे आदि वाजंत्राची, कलावंतीणीची वगैरे आवश्यकता तूर्त न ठेविली तरी चालेल. ज्याला अनुकूलता व हिंमत असेल त्याणें हवा तर तसा समारंभ करावा. विवाहामध्यें वधूस्त्रीला वेदोक्त मंत्रानें सन्मा-नार्थ जशीं वस्त्रें देतात, तद्वत् बटू मुलाला उपनयन समयीं सभ्य वस्त्रें द्यावीं हाच आर्य धर्म. सभेंत **लंगोटी नेसणें, अमंगळ चर्म बांधणें**, हीं अनार्य नीच कृत्यें आचरणें अयोग्य होय.

त्यांला पंच महायज्ञ ही संज्ञा होय. या पैकीं ब्रह्म यज्ञांतर्गत संध्या प्रथम घेऊं. संध्या ह्मणजे ( सं = सम्यक् रीत्या; ध्यै= ध्यान लावणें ) मन व जीवात्मा यांचें ज्या कार्यानें परमेश्वराकडे संधान नित्य कालीं एकाग्र लागतें त्याचें नांव संध्या.व ज्या काळीं ही ध्यान क्रिया अनुकूल सुगम होते, त्याचें नांव संध्याकाल. संधीच्या वेळचा काळ तो संध्याकाळ; अशा संधी दोनच आहेत. काळोख संपण्याची व उजेड होण्याची अर्थात् 'काळोखा उजेडाची' जी संधी, ती प्रातःकाल संधी; व उजेड संपण्याची व काळोख होण्याची अर्थात् ' उजेडा-काळोखाची ' संधी ती सायंकाल संधी व या उभय ' प्रातः सायं ' संधीकालीं ईश्वर ध्यान करण्याची नियमित योजना केली आहे ह्मणून त्याचें नांव संध्या. व त्याजबद्दल आर्ष ग्रंथांत पुष्कळ प्रमाणें आहेत. त्या पैकीं थोडीं अशीं:—

तस्मादहो रात्रस्य संयोगे ब्राह्मणः संध्यामुपासीत् (साम ब्रा० ) ॥ उद्यंतमस्तं यातमादित्य मभिध्यायन् ब्राह्मणो विद्वान् सकलं भद्रमश्नुते ॥ ( यजुर्वेद ब्रा०) ॥ यज्ञोपवीत नित्योदकः संध्या मुपासीत वाग्यतः । सायमुत्तरापराभिमुखोऽन्वष्टम देशं सावित्रीं जपेदर्धास्तमिते मंडल आनक्षत्र दर्शनात् । एवं प्रातः । प्राङ्मुखस्तिष्ठन्मंडल दर्शनात् (आश्वलायन गृ. सूत्र )॥ उत्तमा तारकोपेता मध्यमा लुप्ततारका । अधमा सूर्यसहिता प्रातः संध्या त्रिधा मता । उत्तमा सूर्य सहिता मध्यमा लुप्त

भास्करा । अधमा तारकोपेता सायं संध्या त्रिधा मता॥ (धर्म प्रवृत्ति) ॥ पूर्वां संध्यां जपंस्तिष्ठन्नैशमे नोऽयपोहति । पश्चिमान्तु समासीनो मलं हन्ति दिवाकृतं ॥ न तिष्ठति तु यः पूर्वां नोपास्ते यश्च पश्चिमां । स शूद्रवद्बहिष्कार्यः सर्वस्माद् द्विजकर्मणः ( मनु स्मृति. अध्याय २ )

अर्थः—'दिवस व रात्र' आणि 'रात्र व दिवस' या उभयांच्या दोहों संयोग ( संधी ) कालींच संध्या करावी । सूर्योदय व अस्त या दोहों कालीं संध्योपासन कर्म करावें तेणें करून कल्याण होतें । सायंकालीं वायव्य दिशाभिमुख होत्साता बसून सूर्य मंडल अर्धें दिसत आहे तों पासून नक्षत्रें दिसे पर्यंत गायत्री मंत्राचा जप करावा. तद्वत् प्रातःकालीं पूर्वाभिमुख होत्साता उभा राहून सूर्य मंडळ दिसण्यांत येईपर्यंत गायत्री जप करावा. अर्थात् १॥ घटिका रात्र शेष राहिल्यापासून सूर्योदयापर्यंत प्रातः संध्याकाल, व अर्ध घटिका दिवस शेष राहिल्यापासून सूर्यास्त होईपर्यंत सायंसंध्याकाल जाणावा। या सायं प्रातः संध्येचे उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन भेद मानले आहेत. प्रातःकालीं—नक्षत्रें चांगलीं दिसत असतां संध्यारंभ करणे तो उत्तम काल.— नक्षत्रास्तीं मध्यम व सूर्योदयानंतर कनिष्ठ; त्याचप्रमाणें सायंकालीं— सूर्य चांगला दिसत असतां आरंभ करणे तो उत्तम, सूर्यास्तीं मध्यम व नक्षत्र दर्शनानंतर कनिष्ठ. प्रातःकाल संध्येनें रात्रिकृत (अज्ञान जन्य) पाप नष्ट होतें व सायंकाल संध्येनें दिवाकृत पाप नष्ट होतें.

आतां जो कोणी या उभय 'प्रातःसायं' संध्या करीत नाहीं, त्याजला शूद्र–नीच गणावा। एवंच या सर्व मान्य वचनाधारें दोनच * संध्या होत. तस्मात् या उक्त कालीं संध्या अर्थात नियमित ईश्वरस्मरण करावें; तरच तें श्रेयस्कर होय.

---

* कांहीं लोक मध्यान्ह कालीं ह्मणून 'तिसरी' संध्या मानतात. परंतु शास्त्रीय रीत्या तिला तें नांव शोभत नाहीं. कारण, संधीला दोन भिन्न भिन्न पदार्थ पाहिजेत; ते या 'माध्यान्हेला' कोठचे! माध्यान्हीं याम्योत्तर वृत्तावर सूर्य येतांच अर्ध दिवस होतो व बाकी अर्ध दिवस राहातो : तेव्हां या उभय अर्ध दिवसांचीच काय ती संधी; व अशानें तर, पाऊण–पाऊण, पाव–पाव असा 'दिवस भाग' संधी होऊन संध्यांचा अगणित सुकाळ माजेल !! दुसरें; माध्यान्हीं तीसरी संध्या मानावी तर मध्यरात्रीहि चौथी संध्या कां नये मानूं ! जर मध्यरात्रींहि संध्या करणें कोणी चाहतो, तर प्रहर–प्रहर, घटिका–घटिका, पळ–पळ किंवा क्षण–क्षणाची हि संधी होते, तिजमध्येंहि संध्योपासन विधि केली पाहिजे असें होतें ! पण ती होणें अशक्य. व शिवाय आपल्या कोणत्याच मान्य शास्त्रांत माध्यान्ह संधेचा ग्रह देखील नाहीं. तस्मात् संध्या दोहोंच कालाची; तिसऱ्या कालाची नव्हे. व जे तीन काल होतात ते भूत, भविष्य व वर्तमान या भेदानें होतात; संध्योपासनाच्या भेदानें होत नाहींत. दुसरें; प्रातः संधी कालीं 'पूर्वेस,' व सायं संधी कालीं 'पश्चिमेस'– याप्रमाणें सूर्याकडे मुख क-

एणेंप्रमाणें संध्या ह्मणजे नियमित संधिप्रकाश समयीं मन व जीवात्मा एकरूपी करून अनन्य भावें ईश्वर स्मरण करणें असा अर्थ असून त्यांत स्तुति, उपासना आणि प्रार्थनानुसार रून संध्या करावी असें आहे, तेव्हां आतां माध्यान्ह कालीं जी संध्या ह्मणून करायाची त्यावेळीं आपल्या डोक्यावर असलेल्या सूर्याकडे आपलें मुख करण्याकरितां उताणा निजून संध्या केली पाहिजे तर मग !! तात्पर्य उभय ' प्रातः सायं ' संधी व्यतिरिक्त काळीं केलेल्या ईश्वर स्मरणाला संध्या हें नांव योग्य नव्हे. त्याजला दुसरेंच कांहीं तरीं नामाभिधान असलें पाहिजे. अन्यथा, एखादे स्त्रीयेला माता असें बोलून पत्नीवत् वागविण्या प्रमाणेच होय !! सांप्रत संध्या ह्मणून जी नांवाची लोक करितात ती बहुधा जेवण्याचे वेळेस.— मग ती जेवणाची वेळ प्रहर, दोन प्रहर, तीन प्रहर दिवसा—रात्रीस किंवा मध्यरात्रीं केव्हां तरी येऊन ठेपो ! पण अशी अकाल संध्या केल्यानें " कालि तु वंदिता संध्या स्वर्ग मोक्ष प्रदायिनी। अकाले वंदिता संध्या सा च वंध्या वधूरिव" याप्रमाणें ती संध्या 'वंध्या'— वांझ जाणावी; ह्मणजे वंध्या वधू स्त्री जशी फलहीन होत्साती प्रापंचीक व पारमार्थीक सुखाला अंतरते तद्वत् अकाल संध्या फलहीन होत्साती संध्या जन्य मानसिक स्थिरता एकाग्रता, दृढता, नियामकपणा, दुःखसहनशीलता व तज्जन्य स्वर्ग ह्मणजे सुख, सत्यज्ञान यांजला संध्या कर्ता अंतरतो. तस्मात् योग्य उक्त कालींच संध्या करून आपला महल्लाभ साधावा.

आचमन, इंद्रियस्पर्श, मार्जन, प्राणायाम, अघमर्षण, दिशापरिक्रमण, उपस्थान, गुरुमंत्र, समर्पण असे भिन्न भिन्न विषय योजिले आहेत. त्यांचें संक्षिप्त विवेचन:—

**आचमन*** ह्मणजे ( आ—विशेष चम्—उदकपान ) विशेष कारणार्थ उदकादि आवश्यक वस्तु प्राप्त करणें. ' आचमन

* दाक्षिणी महाराष्ट्र लोक केशव (के—जलीं—क्षीर सागरीं शव—शयन कर्ता). माधव (मा— लक्ष्मी, धवा— नवरा). मधुसूदन—(मधु—मधु दैत्य, सूदन - मारणारा). श्रीधर (श्री— लक्ष्मी स्त्री, धर—धारण कर्ता ) अशा आधुनिक पुराणोक्त नामांनीं आचमन करितात.पण त्यांचे वडील जे पुराणकाळापूर्वी अर्थात् द्वापारा अंतीं झालेल्या पुराणकर्त्या व्यासापूर्वी होऊन गेले ते कोणत्या नामांनीं आचमन वगैरे करीत? याचा त्यांजला विचार नाहीं. कित्येक लोक आपल्या वेदकालिन वडीलांविरुद्ध अशा आधुनिक पुराणोक्त नांवांनीं आचमन करण्याचा दोष कपाळीं बसूं नये, ह्मणून ' तत्सवितुर्० ' वेदमंत्राच्या दोन दोन, तीन तीन,चार चार, शब्दांनीं एकेक आचमन करितात. परंतु या आचमन शब्दांला कांहींच अर्थ संबंध नसल्यामुळें तें आचमन निरर्थक पोरकट होय. कित्येक लोक तर वेदमंत्राला ऋषि,देवता व छंद असतात तेव्हां असे ऋषि देवता छंद 'सूर्यश्चमामन्युश्च मन्युपतयश्च मन्युकृतेभ्यः पापेभ्यो रक्षन्ताम् इ०'' व "पृथ्वीत्वयाधृतालोकादेवीत्वं विष्णुना धृता०" अशा गद्य पद्य संस्कृताला लावून व (मोराचीं पिसें कावळ्यानें लावल्याप्रमाणें)

मध्यालस्यस्य कंठस्थ कफस्य निवाणार्थ माचामेत् ' ' जलाभावश्चेन्नैव कुर्यात् ' याप्रमाणें परमेश्वराचें ध्यान आदि करण्याचेसमयीं कोणत्याही प्रकारचा आळस न यावा व कंठस्थ कफ निवृत्ति व्हावी, कीं जेणेंकरून ईश्वर चिंतनीं एकाग्र मन लागावें व हुशारी यावी, याजकरितां संध्येचे आरंभीं व मध्यन्तरीं जलपानाचें प्रयोजन ठेविलें आहे. गैरसोई व अडचणीमुळें संध्यासमयीं उदक प्राप्ति होत नसल्यास फक्त मंत्रोच्चारच करावा. जलाभावामुळें कालक्रमण करूं नये.

---

वेद बनवून त्यानें मंत्राचमन ह्मणून करितात !! कच्छ, काठेवाड वगैरे प्रांतस्थ गुजराथी व बंगाल, पंजाबादि प्रान्तस्थ हिंदुस्थानी लोक कांहीं आचमन वगैरे न करितां राधा कृष्ण, राधारमण अशा शब्दांनीं युक्त पुराणोक्त कांहीं श्लोक, वाक्यें ह्मणतात. कित्येक तर 'ऊर्ध्वकेशी विरूपाक्षी मांस शोणित भोजने ' असे निंद्य वामदेवी मार्गांतील श्लोक ह्मणतात ! एवंचकशाला कांहीं ठिकाणा नाहीं. सदरहू कांहीं महाराष्ट्र व गुजराथी लोक ' संकल्प ' अर्थात कर्माच्या ' जागेचा व वेळाचा पत्ता' ह्मणतात तो असा:—' भरत खंडे अमुक ग्रामे—क्षेत्रे गृहे—स्थले ( हा जागेचा पत्ता! ) व कलियुगे अमुक मन्वन्तरे—संवत्सरे—मासे—पक्षे—दिवसे—घटिकायां (हा वेळाचा पत्ता!) संध्या कर्ममहं करिष्ये ' ह्मणजे अमुक कर्म अमुक वेळीं अमुक जागेवर करितों !! याप्रमाणें साधारण धर्मकृत्यांतहि एकी व सयुक्तता नाहीं. तरी लोकांनीं विचारावर यावें.

इंद्रिय स्पर्श ह्मणजे चक्षु, कर्ण, हस्त,पादादि शरीरावयवांला स्पर्श करणें. पाहाणें, ऐकणें, श्वासोच्छ्वास करणें, बोलणें, चालणें अशा ज्या अनेक अद्भुत ईश्वरी क्रिया शरीर इन्द्रियद्वारा होतात त्यांचा वारंवार पृथक् २ बोध व्हावा व ईश्वराच्या अनेक अचिंत्य शक्तींचा अंत:करणावर ठसा बसावा या हेतूने या त्या इंद्रिय स्पर्शाची योजना केलेली आहे.

मार्जन ह्मणजे ( मृज् शुद्ध निर्दोष शीतल करणें ) पाप दोष निवारण. " नैवेश्वर ध्यानादावालस्यं भवेदेतदर्थं शिरो नेत्राद्युपरि जल प्रक्षेपणं । नोचेन्न " अर्थात् परमेश्वराचें ध्यान वगैरे करितेसमयीं कोणत्याच प्रकारचा आळस येऊं नये याजकरितां शिर आणि नेत्रादिकांवर जल प्रक्षेपण करावें. परंतु आळस व जलाभावीं आवश्यकता नाहीं.

प्राणायाम ह्मणजे ( प्राण–वायु, आ–विशेष, याम–अवरोध ) प्राण वायूचा अर्थात् श्वासोच्छ्वासाचा विशेष अवरोध, तो ज्ञानाने * अर्थात अन्तरस्थ चैतन्य शक्तीनें आपोआप,

* कांहीं अज्ञलोकांत नाकपुड्या हाताच्या अंगुळांनीं दाभून प्राणायाम करण्याचा परिपाठ आहे, तो शास्त्र विरुद्ध, युक्तिशून्य व चुकीचा होय.'श्वास' अर्थात् बाह्य वायु अन्तरीं घेणे व 'प्रश्वास' अर्थात् अन्तरस्थ वायु बाह्य प्रदेशीं टाकणें– या ज्या आपोआप होणाऱ्या क्रिया त्यांजला हातांची काय गरज? " श्वास प्रश्वासयोर्गति र्विच्छेद: प्राणायाम:" (योग शास्त्र) " बाह्यस्य वायोराचमनं श्वास: । कोष्ठयस्य वायो र्निस्सा.

बाह्य क्रिये वांचून करावा. त्याचा विधि पुढें संध्येंत दिलेला आहे. प्राणायाम ४ प्रकारांनी होतो :- "स ( प्राणायामः ) तु बाह्याभ्यन्तरः स्तंभ वृत्तिर्देश काल संख्याभिः परिदृष्टो-दीर्घ सूक्ष्मः" ( योग सूत्र ) ह्मणजे आंतील वायु जेवढा वेळ बाहेर टाकून देववेल तेवढा वेळ टाकणे- हा पहिला 'बाह्य प्राणायामः' बाहेरील वायु जेवढा वेळ आंत घेववेल तेवढा वेळ घेणे- हा दुसरा 'आभ्यन्तर प्राणायामः' व बाहेरील

---

र्णे प्रश्वासस्तयोर्गतिविच्छेद उभया भावः प्राणायमः". भाष्य. अर्थः-अंतरीं बाह्य वायु घणें आणि अंतर कोष्ठस्थ वायु बाहेर फेंकणे या स्वयंभू क्रियांला प्राणायाम संज्ञा असून त्या प्राणायाम क्रिया हस्तांगुलांनीं नाकपुड्या दाभल्यानें होतील काय! असो.अशा श्वासोच्छ्वासावरोधन क्रिया अन्य हस्तानें करणे हें एखाद्याच्या हातीं लेखणी देऊन तो हात आपल्या हातांत धरून आपण लिहिणे, तद्वत् होय. अंतरस्थ चैतन्य कळेलाच श्वासोच्छ्वासावरोधनाची शक्ति आली पाहिजे : तरच प्राणायामाचा जो मुख्य हेतु "सद्विचाराची स्थिरता व ज्ञानाची वृद्धि व दृढता, दुःख सहनशीलता वगैरे गुण प्राप्ति" ती साध्य होणार आहे. हस्तांगुलांनीं नाकपुड्या दाभून बळानें श्वासावरोधन करणे हें पोरकट कृत्य करूंनये व त्याजबद्दल प्रसिद्ध मुनी दयानन्द सरस्वती स्वामी त्याच प्रमाणें ह्मणतातः—

"बाल बुद्धिभिरं गुल्यंगुष्ठाभ्यां नासिका छिद्र मवरुध्य यः प्राणायामः क्रियते स खलु शिष्टैस्त्याज्य एवास्ति"

वायु आंत न घेतां प्राण वायु बाहेर टाकून जेवढा वेळ राहवेल तेवढा वेळ राहणें—हा तिसरा '**स्तंभ प्राणायाम;**' आणि श्वास आंतून जेव्हां बाहेर येतो, तेव्हां बाहेर थोडा थोडा अवरोध करणे आणि बाहेरून जेव्हां आंत येतो तेव्हां आंतहि थोडा थोडा अवरोध करणें—हा ४ था '**बाह्याभ्यन्तर क्षिपी प्राणायाम.**' प्राणायामादि उपासना 'आसन' आपणास सुगम, सोईवार, व सुखकारक असें करावें. **पद्मासन, वीरासन, भद्रासन, स्वस्तिक, दण्डासन, सोपाश्रय, पर्यंक, क्रौंच-निषदन,** उष्ट्र निषदन आणि हस्ति निषदन अशीं १० मुख्य आसनें आहेत. ( त्यांच्या आकृति पुढें पाहाव्या ) या पैकीं 'यादृशीच्छा तादृशमासनं कुर्यात्' ह्मणजे ज्या मध्यें सुख पूर्वक शरीर व आत्मा स्थिर होतात असें आपापल्या रुची प्रमाणें आसन करावें. प्राणायामाचें फळ योग शास्त्रांत लिहिलें आहे:—"**प्राणायामादशुद्धिक्षये ज्ञानदीप्तिराविवेक ख्यातेः**" "**दह्यन्ते ध्मायमानानां धातूनां च यथामलाः । तथेन्द्रियाणां दह्यन्ते दोषाः प्राणस्य निग्रहात्**" **अर्थ :**— प्राणायामाच्या योगानेंउत्तरोत्तरकालीं प्रतिक्षणीं अज्ञानाचा नाश व ज्ञानाचा प्रकाश होत जातो. ज्याप्रमाणे अग्नि मध्यें तप्त केल्यानें सुवर्णादिधातूंचा मल नाहींसा होऊन त्या शुद्ध होतात; तद्वत् प्राणायामाच्या योगानें इंद्रियदोष क्षीण होऊन तीं निर्मळ होतात.

**अघ मर्षण** ह्मणजे ( अघ—पाप, दुष्कर्म; मर्षण— दूरीकरण ) दुष्कर्मापासून दूर राहाणें. सृष्टि कर्ता परमात्मा व सृष्टि-

कर्म यांचा विचार करून व जगदीश्वराला सर्व व्यापक, न्यायकारी सर्वत्र सर्वदा सर्व जीवांचीं कर्मे पाहाणारा असें निश्चित मानून सदा सर्वदा धर्मयुक्त कार्यांत राहावें.

**दिशापरिक्रमण** ह्मणजे (दिशा— सर्व बाजू, दृश्यादृश्य स्थल, परिक्रमण— व्यापकत्व ) सर्वत्र व्यापकपणा. आपल्या सभोंवतीं ४ हि बाजूस आंत बाहेर परमेश्वर पूर्ण भरलेला आहे असें जाणून निर्भय, उत्साही, आनन्दी व पुरुषार्थी व्हावें.

**उप स्थान** ह्मणजे ( उप— जवळ, स्थान— असणें राहणें ) जवळ—निकट वासकरणें; अर्थात् परमेश्वराच्या अत्यंत जवळ राहाणें. परमेश्वर सर्व व्यापक असल्यामुळें जरीं आपल्या जवळच आहे तरीं अन्तः करण व अनन्य भावपूर्वक परमेश्वरासन्निध आपण व आपल्या अति सन्निध परम दयाळू न्यायकारी परमात्मा आहे अशी सद्बुद्धि नित्य मनांत ठेवीत असावी.

**गुरु मंत्र** ह्मणजे (गुरु— श्रेष्ठ व मंत्र— प्रार्थना पूर्वक सदुपदेश) प्रापंचिक व पारमार्थिक अत्युत्तम उपदेश. आपल्या अंत:करण वृत्तिला सत्कर्मीं व सद्धर्मीं 'तत्पर' व दुष्कर्मीं व अधर्मीं 'विमुख' करावी अशी सृष्टिकर्त्या परमात्म्याची प्रार्थना होय.

**समर्पण** ह्मणजे (सम्— चांगल्या प्रकारें, अर्पण— स्वाधीन ) अत्यन्त नम्रतेनें एकाग्र अन्त:करण व अनन्य भाव पूर्वक परमात्म्याचे ठायीं लीन व अत्यन्त आभारी होणें.

**सार्थ वेदोक्त संध्या भूमिका समाप्त.**

---

ॐ नमो जगदीश्वराय.

# सार्थ वेदोक्त संध्या विधि.

## प्रातः संध्या विधि प्रारंभ.

स्त्री पुरुषांनीं १० घटिका रात्री ( १० वाजतां ) शयनाप्रत जाऊन पहाटेस २।३ घटिका रात्र असतां अर्थात् (दिन मानानुसार ४।५ वाजतां ) निरालस्यपणें उठून शरीरशुद्धि अर्थात् शौच, दंत धावन, मुख प्रक्षालनादि स्नानपर्यंत कर्तव्य कार्य आटोपून ब्रह्मयज्ञ अर्थात् संध्योपासनेला प्रारंभ करावा तो एणें प्रमाणें:—

शुद्ध स्नान, शुद्ध वस्त्र परिधान व शिखा बंधन करून उक्त संधी कालाच्या ठायीं शुद्ध, एकान्त, सुगंध[1], हवाशीर स्थळीं स्वच्छ[2] आसनावर पूर्वाभिमुख बसावें व समोर सन्निधच शुद्ध शीतोदक पूर्ण पात्र ठेवावें व त्यांतुन अंगुष्ठ सहीत उजव्या हस्तांजलीमध्यें कंठाखालीं हृदयास पोंचे एवढें (ना कमी, ना अधिक) उदक घेऊन, हस्ताचा कोंपर खांद्याबाहेर न जाई अशा

---

१ अनुकूलता असल्यास चंदन, धुप, अगर, तगर, अशा सुवासिक पदार्थांचें चूर्ण जाळुन हवा सुगंध करावी. २ बसण्याचें आसन असणें तें शुद्ध वनस्पतिजन्य म्हणजे पीठासन ( पाट ), व तृणासन ( हांतरी ) असें असावें. अशुद्ध प्राणी जन्य चर्म नसावें.

रीतीनें सरळ ( आडवा नव्हे असा ) मुखासमोरच धरून,

**॥ ॐ । अमृतो पस्तरण मसि स्वाहा ॥ १ ॥**

**॥ ॐ । अमृता पिधान मसि स्वाहा ॥ २ ॥**

**॥ ॐ । सत्यं यशः श्रीर्मयिश्रीः श्रयतां स्वाहा ॥ ३ ॥**

या तीन ऋग्वेद सूत्रोक्त मंत्रांनीं, प्रत्येक मंत्रान्तीं एकेक अशीं तीन आचमनें, त्या हस्तांजलीच्या मूल व मध्य प्रदेशीं ओंठ लावून करावीं. नंतर उभय हस्त प्रक्षालुन (धुऊन) मुख, कर्ण, नेत्रादि इंद्रियांला दक्षिण हस्ताच्या मध्यमा व अनामिकांगुळांनीं जलस्पर्श करावा तो येणें प्रमाणें:—

॥ ॐ । वाङ्‌ मऽआस्येऽस्तु ॥ १ ॥ यानें मुखाला.
॥ ॐ । नसोर्मे प्राणोऽस्तु ॥ २ ॥ यानें उभय नाकपुडीला.
॥ ॐ । अक्ष्णोर्मे चक्षुरस्तु ॥ ३ ॥ यानें उभय डोळ्यांला.
॥ ॐ । कर्णयोर्मे श्रोत्रमस्तु ॥ ४ ॥ यानें उभय कानांला.
॥ ॐ । बाव्होर्मे बलमस्तु ॥ ५ ॥ यानें उभय बाहूला.
॥ ॐ । ऊर्वोर्मऽओजोऽस्तु ॥ ६ ॥ यानें उभय मांड्यांला.
॥ ॐ । अरिष्टानि मेंगानि तनूस्तन्वा मे सहमन्तु ॥ ७ ॥
यानें सर्व शरीरांग प्रदेशाला.

या प्रमाणें प्रत्येक मंत्रानें प्रत्येक मुख, कर्णादि इंद्रियाला उदक स्पर्श करावा. पुढें प्राणायाम करावे ते असे:—

नाभी ( बेंबी ) च्या खालील मूळेंद्रियापासून मोठ्या धैर्यानें अपान वायु नाभी प्रदेशीं आणावा; व तेथून तो अपा-

न वायु तेथील समान वायूसह हृदयांत आणावा. पुढें हे दोन वायु व तिसरा हृदयस्थ प्राण वायु–हे तीन्ही वायु हृदयांतून ऊर्ध्व आकर्षून नासिकाद्वारें बाहेर आकाशांत मोठ्या जोरानें टाकून द्यावे; अर्थात् अत्यन्त वान्तीच्या जोरानें जसें मुखांतून अन्न बाहेर पडतें तद्वत् शरीरस्थ वायु नासिकाद्वारें बाहेर सोडावो व बाहेरील वायु सामर्थ्य–दम असेपर्यंत आंत न घेतां,

| | | | |
|---|---|---|---|
| ॐ भूः ।१। | ॐ स्वहः ।३। | ॐ जनः ।५। | ॐ सत्यं ।७। |
| ॐ भुवः ।२। | ॐ महः ।४। | ॐ तपः ।६। | |

या सप्त प्राणायाम मंत्रांचा पाठ करावा. व चित्तांत श्वासावरोधनानें अत्यन्त क्लेश वाटूं लागेल, तेव्हां बाहेरील वायु हळू हळू आंत घ्यावा. याप्रमाणें कमींत कमी ३ आणि अधिकांत अधीक २१ प्राणायाम करावे.* तदनंतर,

॥ ॐ । शन्नो॑ दे॒वी र॒भिष्ट॑य॒ आपो॑ भवन्तु पी॒तये॑ । शंयो र॒भिस्र॑वन्तु नः ॥१॥ (यजुर्वेद.)

हा वेदोक्त मंत्र एक वेळ ह्मणून, एकेक आचमन अशीं, तीन आचमने पूर्वोक्त रीत्या करावीं. पुढें खालील मंत्रांनीं मध्यमा व अनामिका अंगुलांहीं इंद्रिय स्पर्श करावा तो असा.

* अशा प्रकारें २१ वेळां प्राणायाम केल्यानें प्राण वायु स्थिर होऊन त्यासह चित्तहि स्थिर रहातें. बुद्धि व ज्ञान वृद्धिंगत पावून गहन विषय समजण्याची शक्ति येते शारीरीक बळ व पराक्रम यांची वृद्धि होते व वीर्यहि स्थिर राहातें. व मानसिक शक्ति तीव्र व प्रफुल्लित राहून स्मरण शक्ति वाढते.

ॐ वाक् वाक् ॥१॥ याने मुखाच्या उजव्या व डाव्या अंगास
ॐ प्राणः प्राणः ॥२॥ याने उजव्या व डाव्या नाकपुडीला.
ॐ चक्षु श्चक्षुः ॥३॥ याने उजव्या व डाव्या डोळ्यांला.
ॐ श्रोत्रम् श्रोत्रम् ॥४॥ याने उजव्या व डाव्या कानांला.
ॐ नाभिः ॥५॥ याने नाभी–बेंबी प्रदेशाला.
ॐ कण्ठः ॥६॥ याने कंठ प्रदेश भागाला.
ॐ शिरः ॥७॥ याने मस्तक प्रदेश भागाला.
ॐ बाहुभ्यां यशो बलम् ॥८॥ याने उभय बाहूंला.
ॐ कर तल कर पृष्ठे ॥९॥ यानें हाताच्या उभय तल व पृष्ठ भागाला (दक्षिण हस्त–तलावर वाम हस्त–पृष्ठ व वाम हस्त तलावर दक्षिण हस्त–पृष्ठ या प्रमाणें. )

एणे प्रमाणें नेत्र कर्णादि प्रत्येक मंत्रानें प्रत्येक इंद्रियाला स्पर्श करावा. तदनंतर पुढील मंत्रांनीं मार्जन करावें; तें असें:—

ॐ भूः पुनातु शिरसि ॥१॥ यानें शिर प्रदेशीं,
ॐ भुवः पुनातु नेत्रयोः ॥२॥ यानें उजव्या डाव्या डोळ्यांवर,
ॐ स्वः पुनातु कण्ठे ॥३॥ याने कण्ठ प्रदेशावर,
ॐ महः पुनातु हृदये ॥४॥ यानें हृदयावर,
ॐ जनः पुनातु नाभ्याम् ॥५॥ यानें नाभी प्रदेशीं,
ॐ तपः पुनातु पादयोः ॥६॥ यानें उभय पायांवर,
ॐ सत्यं पुनातु पुनश्शिरसि ॥७॥ याने पुनः शिर प्रदेशीं,
ॐ खं ब्रह्म पुनातु सर्वत्र ॥८॥ या मंत्राने सर्वांगावर,

याप्रमाणे प्रत्येक मंत्राने शिरादि प्रत्येक अवयवावर पूर्वोक्त दक्षिण

हस्तांगुलांनीं जल सिंचन करावें. पुनः पूर्वोक्त रीतीनें " ॐ भूः०" इत्यादि सप्त मंत्रांचा जप करीत, कमींत कमी ३ व अधिकांत अधिक २१ प्राणायाम करावे. तदनंतर अघ मर्षण ( पाप दूरीकरण ) मंत्र ह्मणावे ते एणें प्रमाणे :—

॥ ॐ । ऋतं च सत्यं चाभीद्धात्तपसोऽध्यजायत । ततो रात्र्यजायत ततः समुद्रो अर्णवः ॥ १ ॥

॥ ॐ । समुद्रादर्णवादधि संवत्सरो अजायत । अहोरात्राणि विदधद्विश्वस्य मिषतो वशी ॥ २ ॥

॥ ॐ । सूर्याचंद्रमसौ धाता यथा पूर्वमकल्पयत् । दिवं च पृथिवीं चान्तरिक्ष मथो स्वः ॥ ३ ॥

या तीन ऋग्वेद मंत्रांचा पाठ केल्यावर पुनः पूर्वोक्त " शन्नोदेवी०" या मंत्रानें तीन आचमनें करावीं. नंतर खालील परिक्रमण मंत्रांनीं सर्वव्यापक परमात्म्याची स्तुति—प्रार्थना करावी.

॥ ॐ । प्राची दिगग्नि रधिपति रसितो रक्षितादित्या इषवः ॥ " तेभ्यो नमोऽधिपतिभ्यो नमो रक्षितृभ्यो नम इषुभ्यो नम एभ्यो अस्तु । योऽस्मान् द्वेष्टि यं वयं द्विष्मस्तं वो जंभे दध्मः " ॥ १ ॥

॥ ओ३म् । दक्षिणा दिगिन्द्रोऽधिपतिस्तिरश्चिराजी रक्षिता पितर इषवः ॥० ॥ २ ॥

॥ ओ३म् । प्रतीची दिग् वरुणोऽधिपतिः पृदाकू रक्षितान्न मिषवः ॥० ॥ ३ ॥

॥ ओ३म् । उदीची दिक् सोमोऽधिपतिः स्वजो रक्षिताशनिरिषवः ॥० ॥ ४ ॥

॥ ओ३म् । ध्रुवा दिग्विष्णु रधिपतिः कल्माष ग्रीवो रक्षिता वीरुध इषवः ॥० ॥ ५ ॥

॥ ओ३म् । ऊर्ध्वा दिग् बृहस्पति रधिपतिः श्वित्रो रक्षिता वर्ष मिषवः ॥० ॥ ६ ॥ (अथर्व वेद.)

या प्रत्येक मंत्राने अनुक्रमें पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर, अधर व ऊर्ध्व या दिशांकडे अवलोकन करून परमात्मा चोहों बाजूस आंत बाहेर परिपूर्ण भरलेला आहे. असें ध्यानीं आणावें व लीन असावें. पुढें **उपस्थान** मंत्रांनी परमात्म्याची उपासना करावी ते मंत्र एणें प्रमाणें:—

* या पूर्वार्ध मंत्र भागापुढें—पहिल्या मंत्रांत लिहिल्याप्रमाणेंच "**तेभ्यो नमो०**" इत्यादि उत्तरार्ध भागाचे दोन चरण या पुढील पांचहि मंत्रांस लावून मंत्र पूर्ण ह्मणावे.

॥ ॐ । जातवेदसे सुनवाम सोमं मरातीयतो नि दहाति वेदः । स नः पर्षदति दुर्गाणि विश्वा नावेव सिंधुं दुरितात्यग्निः ॥ (ऋग्वेद.)

॥ ॐ । चित्रन् देवानामुदगादनीकं चक्षुर्मित्रस्य वरुणस्याग्नेः । आप्रा द्यावा पृथिवी ऽ अन्तरिक्षꣳसूर्य्य ऽ आत्माजगतस्तस्थुषश्च स्वाहा ॥

॥ ॐ उदु त्यं जातवेदसं देवं वहन्ति केतवः । दृशे विश्वाय सूर्यम् ॥

॥ ॐ । उद्वयन् तमसस्पारि स्वः पश्यन्त उत्तरम् । देवं देवत्रा सूर्य्य मगन्म ज्योतिरुत्तमम् ॥

॥ ॐ । तच्चक्षुर्देवहितं पुरस्ता च्छुक्र मुच्चरत् । पश्येम शरदः शतं जीवेम शरदः शतꣳ शृणुयाम शरदः शतं प्रब्रवाम शरदः शतमदीनाः स्याम शरदः शतं भूयश्च शरदः शतात् ॥

॥ ॐ । नमो ब्रह्मणे नमो अस्त्वग्नये नमः पृथिव्यै नम ओषधीभ्यः । नमो वाचे नमो वाचस्पतये नमो विष्णवे महते करोमि ॥(यजुर्वेद.)

या मंत्रांनी परमात्म्याचें उपस्थान केल्यावर पुनः पुर्वोक्त 'शन्नो देवी०' या मंत्रानें ३ आचमनें पूर्वोक्त रीत्या करावीं. पुढें प्रणव ( ओ३म् ) व व्याहृति ( भूः,भुव,स्वः, ) यां सह 'गुरु' मंत्रानें परमात्म्याची स्तुति, व प्रार्थना करावी तो गुरु मंत्र—

॥ ओ३म् । भूर्भुवः स्वः । तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् ॥

या चतुर्वेदोक्त गुरु मंत्राचा करवेल तेवढा पाठ करून शेवटीं,

॥ ओ३म् । नमः शम्भवाय च, मयोभवाय च,
नमः शंकराय च, मयस्कराय च,
नमः शिवाय च, शिवतराय च ॥ (यजुर्वेद.)

या मंत्रानें परमात्म्याला अंतःकरण पूर्वक अनन्य भावें नमस्कार करून पूर्वोक्त 'शन्नो देवी०' यानें ३ आचमनें करावीं.

**प्रातः संध्या विधि समाप्त.**

——oo——

## सायं संध्या विधि प्रारंभ.

सूर्योदयापूर्वी, वर लिहिल्याप्रमाणें ब्रह्मयज्ञांतर्गत संध्या-विधि आटोपून आपल्या प्रापंचीक गृह्य कृत्याला अर्थात् उदर-निर्वाह प्राप्तीच्या किंवा सार्वजनीक परोपकाराच्या ( जशी ज्याला आवश्यकता व अनुकूलता असेल त्याप्रमाणें ) धंदा-उद्योगास लागावें. व सूर्योदयास्त कालीं सर्व व्यवसाय आ-